सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
SOLAPUR TARUN BHARAT
सोलापूर, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहमदनगर व सातारा येथून वितरित
सोलापूर | मंगळवार, १ एप्रिल २०२५ | युगाब्द ५१२७ | वर्ष ४१ वे अंक १४३ | पाने १२ | किंमत रु. ६/-
| RNI Regd. No. 46878/87 | Postal Regd No.. SLP/32/2024-2026. Posted daily at Medical college, Solapur.P.O. |
हो आमची ई-पेपर आवृत्ती असून ती 'तरुण भारत'च्या छापील आवृत्तीची प्रतिकृती नाही
dainiktarunbharat.com
epaper.dainiktarunbharat.com

**आजचा सामना**

लखनौ सुपरजाएंटस् वि. पंजाब किंग्ज

वेळ : रात्री ७.३० वाजता

ठिकाण : अटल बिहारी वाजपेयी स्टेडियम, लखनौ

# वाचाळवीरांसाठी कठोर कायदे करणे योग्यच : सभापती शिंदे

- राष्ट्र व थोर पुरुषांबाबत अवमानकारक वक्तव्यांना आळा गरजेचा
- केंद्र व राज्य शासनाने उचलावीत पावले, पंढरपूरात साधला पत्रकारांशी संवाद

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.३१ मार्च-**

थोर व राष्ट्रपुरुषांच्या विषयी केल्या जाणाऱ्या अवमानकारक वक्तव्यांना कायमचा पायबंद बसवण्यासाठी केंद्र व राज्य शासनाने कठोर कायदे करण्याबाबत खा. उदयनराजे भोसले, छत्रपती संभाजी महाराज व अन्य विचारवंतांनी मांडलेली भूमिका योग्यच असून असे कायदे करावेत, अशी भूमिका विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी पंढरपूर येथे व्यक्त केली.

सोलापूर जिल्हा दौऱ्यावर आलेले सभापती शिंदे यांनी सोमवारी सकाळी येथील श्री विठ्ठल-रखुमाईचे दर्शन घेतले. त्यानंतर ते पत्रकारांशी बोलत होते. यावेळी त्यांच्या समवेत महायुतीतील राजकीय पक्षांचे पदाधिकारी आणि कार्यकर्ते उपस्थित होते. सभापती शिंदे म्हणाले, पुर्वजांचा इतिहास कोणीतरी स्वत:च्या स्वार्थासाठी व लक्ष वेधण्यासाठी अशा पध्दतीने वक्तव्ये करत आहेत ते अतिशय चुकीचे व दुर्दैवी आहे. आपली थोर परंपरा सर्वांनी जोपासण्याचे सर्वांचे कर्तव्य आहे. जर कुणी अशा प्रकारची वक्तव्ये करीत असेल तर कायद्याने दबाव आणून कारवाई करावी लागेल. शेवटी आपली संस्कृती जोपासण्याचे काम प्रत्येक राज्यातील आणि देशातील नागरिकांचे कर्तव्य आहे. दिवसेंदिवस समाज माध्यमे, इलेक्ट्रॉनिक्स मिडियावर काहीही बोलायचे आणि रिल्स काढायच्या किंवा प्रतिक्रिया द्यायच्या हे सोपे झाल्यामुळे सर्वत्र विस्कळीतपणा आलेला आहे. त्यामुळे कायद्याने त्यांच्यावर बंधने आणणे आवश्यक आहे. राष्ट्रपुरुषांच्या विषयी वाचाळता करता कामा नये यासाठी राज्य व केंद्र शासनाने कठोर कायदे करुन कठोर कारवाई करणे आवश्यक आहे. त्याशिवाय हे थांबणे अशक्य आहे. शोध घेऊन कारवाई करेपर्यंत कायदा आणि सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण होतो. (उर्वरित वृत्त पान २ वर).



पंढरपूर : विधानपरिषद सभापती प्रा. राम शिंदे यांनी सोमवारी श्री विठ्ठल-रुक्मिणी मातेचे दर्शन घेतले. यावेळी मंदिर समितीच्या वतीने व्यवस्थापक मनोज श्रोत्री यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यावेळी तहसीलदार सचिन लंगुटे, नायब तहसीलदार बालाजी पुदलवाड उपस्थित होते.

**प्रसिध्दीच्या दृष्टिकोनातून अधिवेशनातील कामकाज अयोग्य**

अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये औरंगजेबाच्या कबरी पासून ते दिशा सालीयन खून प्रकरणापर्यंतचे प्रश्न उपस्थित केले गेले. यामुळे राज्यासमोरील शेतकरी, बेरोजगारी तसेच अन्य इतर अनेक महत्वाच्या प्रश्नांना जेवढे प्राधान्य मिळायला पाहिजे होते तेवढे मिळाले नाही किंवा त्याबाबची चर्चा झाली नाही. या बाबत सभापती शिदे म्हणाले, कोणत्या विषयाला टिआरपी जास्त, कोणता विषय उचलल्याच्या नंतर आपणाला प्रसिध्दी मिळेल अशा दृष्टीकोनातून कामकाज होणे हे अयोग्य आहे. शेवटी कामकाज फलदायी झाले पाहिजे. अर्थसंकल्पीय अधिवेशनामध्ये दर्जात्मक आणि फलदायी चर्चा होणे अभिप्रेत आहे. निश्चितच येणाऱ्या काळात सुधारणा करण्याच्या दृष्टीने विधीमंडळ प्रयत्न करेल. वेळोवेळी बदल घडविण्याची प्रक्रिया ही निरंतर सुरु आहे. अजून गतीने ती सुरु करण्याची आवश्यकता आहे आणि निश्चितच ती केली जाईल, असा विश्वास देखील सभापती शिंदे यांनी बोलताना दिला.

**वाघ्या कुत्र्याचा विषय विचारविनिमयातून सुटावा**

वाघ्या कुत्र्याच्या समाधीबाबतच्या प्रश्नावर सभापती शिंदे यांनी सांगितले की, छत्रपती शिवाजी महाराज असोत किंवा आपले कोणतेही थोर पूर्वज असोत त्यांनी त्यांच्या कालखंडामध्ये घेतलेली भूमिका आणि त्यांचा असलेला इतिहास यामधून चर्चा, विचारविनिमय आणि इतिहासकारांची मते घेऊन विचारविनिमयातून हा प्रश्न सोडविला गेला पाहिजे. शेवटी छत्रपती शिवाजी महाराज हे सर्वांचे आराध्य दैवत आहेत. त्यांच्यामुळेच आज आपण हे स्वराज्य पाहतोय ही भूमिका सर्वांचीच आहे. त्यामुळे छत्रपती शिवाजी महाराजांच्या तत्कालीन विचाराला बाधा येईल असे कोणीही वक्तव्य करु नये. कारण शेवटी प्रश्न हा विचारविनिमयाने सुटला पाहिजे असेही शिंदे यांनी सांगितले.



राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे इतर कोणतेही कार्य नाही. हिंदू समाजाला सुसंघटित करण्याचे आपले कार्य संघ अधिक वेगाने पुढेही करीत राहील. आपल्या या कार्य करण्यामुळेच स्वर्णिम दिवसाचा उदय होईल. ज्या दिवशी संपूर्ण भारत संघमय बनेल, त्यावेळी हिंदू समाजाकडे वाकड्या नजरेने पाहण्याची कुणाचीही हिंमत होणार नाही. माझ्या जीवनात संघकार्याला अग्रस्थान राहील, संघकार्यच माझे जीवनकार्य राहील, असे स्वयंसेवकांनी मानले पाहिजे, इतकेच मला सांगायचे आहे.

**(आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांच्या अंतिम भाषणातून. डॉ. हेडगेवार यांचा आज तारखेनुसार जन्मदिन.)**

## मुंबई इंडियन्सने कोलकाताला हरविले

**मुंबई, दि. ३१ मार्च-**

आयपीएल २०२५ मध्ये मुंबई इंडियन्सने कोलकाता नाईट रायडर्सचा ८ गडी राखून पराभव केला. सोमवारी मुंबईने घरच्या मैदानावर १२.५ षटकांत ११७ धावांचे लक्ष्य गाठले. रिकल्टन ६२ आणि सूर्यकुमार यादव २७ धावांवर नाबाद राहिले. रोहित शर्माने १३ आणि विल जॅक्सने १६ धावा केल्या. रसेलने २ विकेट घेतल्या. वानखेडे स्टेडियमवर मुंबईने नाणेफेक जिंकून गोलंदाजीचा निर्णय घेतला. कोलकाता नाईट रायडर्स डाव १६.२ षटकांत ११६ धावांवर संपुष्टात आला. मुंबईकडून पदार्पण करणाऱ्या अश्विनी कुमारने ३ षटकांत ४ बळी घेतले. पदार्पणाच्या आयपीएल सामन्यात ४ विकेट घेणारा तो पहिला भारतीय ठरला. दीपक चहरने २ विकेट घेतल्या. ट्रेंट बोल्ट, हार्दिक पंड्या, विघ्नेश पुथूर आणि मिशेल सँटनर यांनी प्रत्येकी एक विकेट घेतली. कोलकाताकडून अंगकृष रघुवंशीने सर्वाधिक २६ आणि रमणदीप सिंगने २२ धावा केल्या.

## कारागृहात वाल्मीक कराड, घुलेला मारहाण; धसांचा दावा

- विशेष कारागृह महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनी मारहाणीचे वृत्त फेटाळले

**बीड, दि.३१ मार्च-**

मस्साजोगचे संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणातील प्रमुख आरोपी वाल्मीक कराड व सुदर्शन घुले यांना बीडच्या कारागृहात मारहाण झाल्याचे वृत्त कारागृह प्रशासनाने फेटाळले. कारागृहात राजेश वाघमोडे आणि सुधीर सोनवणे यांच्या दरम्यान, फोनसाठी वाद झाला होता. हा वाद सुरू असताना काही इतर बंदीही जमले होते. मात्र, ही घटना घडत असताना वाल्मीक कराड व सुदर्शन घुले हे दोघेही तेथे नव्हते. त्यामुळे त्यांना मारहाण झाल्याचे वृत्त चुकीचे असल्याचा दावा कारागृह विशेष महानिरीक्षक जालिंदर सुपेकर यांनी माध्यमांशी बोलताना केला आहे.

वाल्मीक कराड व घुले यांना बीड कारागृह मारहाण केल्याचा दावा भाजपचे आमदार सुरेश धस यांनी केला होता. बीड कारागृहात घडलेल्या या वादाच्या घटनेनंतर काही कैद्यांना अन्यत्र स्थलांतरित केले जाणार आहे. मात्र, वाल्मीक कराड व सुदर्शन घुलेचा समावेश नाही, असेही सुपेकर म्हणाले. संतोष देशमुख यांच्या हत्याकांडातील आरोपी परळीच्या बापू आंधळे खून प्रकरणातील आरोपी महादेव गिते याने मारहाण केल्याचे वृत्त सोमवारी दुपारनंतर पुढे आले. दरम्यान, बीड कारागृहात अनेक प्रकारच्या अनागोंदी असून, कराड याच्या जेवणाची खास बडदास्त ठेवली जाते, असा आरोप आमदार सुरेश धस यांनी केला आहे. कारागृहातील कैद्यांना दूरध्वनीवरून कुटुंबीय आणि वकिलांशी बोलण्याची मुभा असली तरी त्यात प्राधान्यक्रम ठरवण्यावरून हे वाद घडले आहेत, असा प्रश्नही त्यांनी माध्यमांसमोर उपस्थित केला.



**दोन टोळ्यांच्या राड्यात मारहाण**

फोन करण्यावरून दोन टोळ्यांमध्ये राडा झाला आणि त्यातून वाल्मिक कराड व सुदर्शन घुले यांना मारहाण झाल्याचा दावा सुरेश धस यांनी यावेळी केला आहे. दोन टोळ्यांमध्ये वाद झाल्याचे मला समजले आहे. प्रशासन सांगताना इतरांची नावे सांगत आहेत. पण हा वाद मुख्य दोन टोळ्यांमध्ये झालाय. बीडच्या जेलमध्ये काहीही होऊ शकते. माझी तर माहिती आहे की आकांना स्वतंत्र जेवणही दिले जातेय. एक स्पेशल फोन आहे ज्यावरून आकांचे थेट कनेक्शन परळीतल्या कोणत्यातरी फोनशी होते ही माहिती मला मिळाली आहे, असं सुरेश धस पत्रकार परिषदेत म्हणाले आहेत.



## राष्ट्रपतीं द्रोपदी मुर्मू यांचे मुंबईत आगमन

**मुंबई,दि.३१ मार्च:**

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांचे आज एक दिवसाच्या शासकीय भेटीसाठी मुंबई येथे आगमन झाले. राजभवन येथे आगमनप्रसंगी राज्यपाल सी.पी. राधाकृष्णन यांनी त्यांचे स्वागत केले.

राष्ट्रपतींच्या प्रमुख उपस्थितीत मंगळवारी दि. १ एप्रिलला रिझर्व्ह बँकेचा ९० वा स्थापना दिन साजरा होणार आहे. राष्ट्रपतींच्या दौऱ्यानिमित्त सरकारकडून कडे पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला आहे मंगळवारी कार्यक्रम रिझर्व बँकेचा कार्यक्रमच्यास्थळी आज रिहर्सल घेण्यात आली. त्यांच्या दौऱ्यात कोणतेही निष्काळजीपणा होऊ नये, यासाठी पुरेपूर दक्षता घेण्यात येत आहे

## राजकारण संपले तरी चालेल, पण पवारांसमोर झुकणार नाही

- मंत्री जयकुमार गोरे यांचे जाहीर कार्यक्रमात वक्तव्य

**माण, दि.३१ मार्च-**

भारतीय जनता पक्षाचे नेते तथा राज्याचे ग्राम विकास मंत्री जयकुमार गोरे यांनी राष्ट्रवादी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे अध्यक्ष शरद पवार यांच्यावर जोरदार हल्लाबोल केला आहे. 'मी मंत्री झालो, पण हे शरद पवारांना अजूनही मान्य होत नाही, असं म्हणत राजकारण संपलं तरी चालेल, पण मी पवारांच्या पुढे कधीही झुकणार नाही', असे मंत्री जयकुमार गोरे यांनी एका कार्यक्रमात बोलताना म्हटले आहे.



गोरे म्हणाले, ज्या लोकांवर माझ्या माण-खटावच्या मातीने, जिल्ह्याने प्रचंड प्रेम केले अशा बारामतीच्या लोकांना सर्वात आधी ही कळ लागली की, हा सामान्य कुटुंबातील व्यक्ती आहे. हा साधा माणूस आमदार कसा होऊ शकतो. मी आमदार झालो हे त्यांनी १० वर्ष मान्य केले नाही. आता आमदार झालो हे मान्य झाले, पण मंत्री झालो हे मान्य होत नाही.

आजपर्यंत सर्व नेत्यांनी त्यांच्याबरोबर तडजोड केली असेल, पण या पश्चिम महाराष्ट्रातील मी एकमेव व्यक्ती आहे जो कधीही पवारांच्या पुढे झुकलो नाही आणि कधी झुकणारही नाही, माझे राजकारण संपले तरी चालेल, असे मंत्री जयकुमार गोरे यांनी म्हटले आहे. बारामतीच्या पुढे कधीही झुकलो नाही. बारामतीच्या पुढे झुकलो असतो तर माझी आमदारकी सोपी झाली असती. मात्र, आपल्या शेतात पाणी आलं नसते. मी त्यांची गुलामगिरी स्वीकारली असती तर माण खटावच्या मातीत पाणी आले नसते. आज माण खटावच्या मातीत जी विकासाची गंगा वाहते ती कधीही वाहिली नसती. कारण बारामतीच्या दारात जाऊन बसण्याशिवाय माझ्या हातात काही राहिले नसते. मी एकमेव व्यक्ती असा आहे की कधीही बारामतीची पायरी देखील चढलो नाही, असेही मंत्री जयकुमार गोरे म्हणाले आहेत.

**माझा विरोध पवारांना नाही : गोरे**

माझा विरोध त्यांना नाही, बारामतीला देखील माझा विरोध नाही. माझा विरोध हा ज्यांनी या मातीला, माण खटावला पाण्यापासून वंचित ठेवले त्यांना माझा विरोध आहे. माझी लढाई ही माझ्या मातीच्या स्वाभिमानासाठी आहे. माझा विरोध बारामतीला किंवा पवारांना नाही, असेही मंत्री जयकुमार गोरे यांनी म्हटले आहे.

## वक्फ विधेयकावर दिशाभूल नको, चर्चा करा

### किरेन रिंजिजू यांचे विरोधकांना आवाहन

**नवी दिल्ली, ३१ मार्च**

वक्फ सुधारणा विधेयकाच्या नावाने काही पक्ष आणि संघटना लोकांची दिशाभूल करीत आहेत. कोणतेही वक्तव्य करण्यासाठी विधेयक पूर्ण वाचा आणि नंतर तर्कशुद्ध बोला. खोटे बोलून समाजाची दिशाभूल करू नका. हे विधेयक सादर करण्याची संपूर्ण तयारी झाली आहे, असे प्रतिपादन संसदीय कार्यमंत्री किरेन रिजिजू यांनी सोमवारी केले.

वक्फ विधेयकाच्या मुद्द्यावर काही पक्ष आणि संघटना दिशाभूल करीत आहेत. त्यांनी खोटे बोलू नये. हे विधेयक पूर्णपणे वाचावे. खोटे बोलून समाजाची दिशाभूल करू नये, असे येथे झालेल्या पत्रकार परिषदेत किरेन रिजिजू यांनी सांगितले.

संसदेत विधेयक सादर करण्याची आम्ही पूर्ण तयारी केली आहे. ते कधी सादर केले जाईल तुम्हाला सांगितले जाईल. विधेयकाच्या नावाने ज्या संघटना तणाव निर्माण करीत आहेत, त्यांची ओळख पटवण्यात आली. ईदेला पट्टी बांधून नमाज पठण करा, असे सांगणाऱ्या संघटना चुकीचे काम करीत आहेत. मशीद, दफनभूमी किंवा मुस्लिमांची जमीन हिरावली जाणार असल्याचे सांगून लोकांची दिशाभूल केली जात आहे, असे रिजिजू यांनी स्पष्ट केले.

वक्फ विधेयकाला असंवैधानिक म्हणणे हा सर्वात मोठा खोटारडेपणा आहे. आम्ही कुणाची जमीन कशी हिसकावू शकतो? चुकीची माहिती पसरवणारे लोक कोण आहेत, असे प्रश्न त्यांनी उपस्थित केले. चुकीची माहिती पसरवणाऱ्यांची ओळख पटवा, असे आवाहन मी माध्यमांना करतो. कोणत्याही विधेयकावर या पातळीवरील चर्चा झालेली नाही, असे रिजिजू यांनी सांगितले.

*(वृत्तसंस्था)*

**आक्षेप असल्यास संसदेत चर्चा करा**



सीएए विधेयक सादर करण्यात आले, त्यावेळीही याच लोकांनी विरोध केला. केवळ विरोधासाठी एखाद्या चांगल्या आणि जनतेचे कल्याण करणाऱ्या विधेयकाला विरोध करणे चुकीचे आहे. आम्ही विशिष्ट समाज आणि धर्मासाठी निर्णय घेत नाही तर त्यात सर्वांचे हित साधेल, असे निर्णय घेतो. तुम्हाला कोणताही आक्षेप असल्यास कृपया यावर संसदेत चर्चा करा, असे आवाहन तुम्हाला करतो, असे रिजिजू यांनी यावेळी स्पष्ट केले.





## महावितरण देणार वीज नियामक आयोगाच्या निर्णयाला आव्हान

- सर्वसामान्यांच्या हितासाठी राज्य सरकारचा पुढाकार
- संचालक विश्वास पाठक यांनी दिली माहिती

**नागपूर, ३१ मार्च**

छोट्या ग्राहकांना दिलासा देण्यासाठी विजेच्या दरात जवळपास १७ टक्के कपात करण्याचा तर उद्योगांना टप्प्याटप्याने पुढील पाच वर्षांत दिलासा देण्याचा प्रस्ताव महावितरणने वीज नियामक प्राधिकरणाला पाठविला होता. पण, प्राधिकरणाने छोट्या ग्राहकांऐवजी उद्योजकांना वीज दरकपातीमध्ये प्राधान्य दिले. या आदेशामुळे महावितरणची आर्थिक स्थिती अतिशय कमकुवत होणार आहे. अशा स्थितीत सर्वसामान्य ग्राहकांच्या हिताला सर्वोपरी मानत महावितरण कंपनी वीज नियामक आयोगाच्या निर्णयाला आव्हान देणार असल्याचे प्रतिपादन महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक यांनी केले. ते दै. तरुण भारतला दिलेल्या सदिच्छा भेटीदरम्यान बोलत होते.

श्री नरकेसरी प्रकाशन संस्थेचे अध्यक्ष डॉ. विलास डांगरे यांनी विश्वास पाठक यांचे स्वागत केले. यावेळी झालेल्या अनौपचारिक चर्चेत विश्वास पाठक यांनी महावितरणशी संबंधित विविध मुद्यांवर प्रकाश टाकला. ते म्हणाले, वीज पुरवठा ही मूलभूत गरज आहे. त्यामुळे ग्राहकांना कमीत कमी खर्चात ती मिळावी, असा ध्यास मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी घेतला. त्यानुसार वीज नियामक आयोगाकडे काही प्रस्ताव पाठविण्यात आले होते. त्यात छोट्या वीज ग्राहकांना मोठा दिलासा देण्याचा प्रस्ताव होता आणि मोठ्या उद्योगांना टप्प्याटप्प्याने दिलासा देण्याचा मुद्दा अंतर्भूत होता. नियामक आयोगाने मात्र अगदी उलट केले. त्यांनी उद्योगांना लाभ देत छोट्या ग्राहकांना अपेक्षित दिलासा दिला नाही. महावितरण या निर्णयाने संतुष्ट नाही. त्यामुळे आयोगाच्या या निर्णयाविरोधात याचिका दाखल करून त्याला आव्हान दिले जाणार आहे. सर्वसामान्यांना मोठा दिलासा मिळवा, हा यामागील मुख्य हेतू राहणार आहे.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मात्र अत्यल्प दरात वीज मिळवून देण्याच्या ध्यासापोटी महावितरणच्या माध्यमातून छोट्या ग्राहकांकडे लक्ष केंद्रित केले आहे. उत्तरप्रदेश, बिहारसारख्या मोठ्या राज्यांपेक्षाही आपल्याकडे विजेची मागणी जास्त आहे. पूर्वी पारंपरिक पद्धतीने वीज निर्मिती व्हायची. आता विविध मार्गाद्वारे वीज निर्मितीचे क्षेत्र विस्तारले आहे. या माध्यमातून वीज निर्मिती करून ती जास्तीत जास्त माफक दरात उपलब्ध करून देण्याकडे महावितरणचा कल आहे.

*(तभा वृत्तसेवा)*



'तरुण भारत'ला मुलाखत देताना महावितरणचे स्वतंत्र संचालक विश्वास पाठक. सोबत चार्टर्ड अकाऊंटन्ट समीर बाकरे.

**वीज गळती कमी झाली**

पूर्वी वीज खांबांवर आकडा टाकून वीज चोरी करण्याचे प्रमाण राज्यभरात मोठे होते. पण, पायाभूत सुविधांची निर्मिती आणि तंत्रज्ञानाचा वापर यामुळे सध्या वीज गळतीचे प्रमाण फारच कमी झाले आहे. तसेच मोठ्या महानगरांमध्ये खाजगी कंपन्यांच्या हाती प्रशासन असल्याने वीज गळतीचे प्रमाण घटल्याचे पाठक यांनी सांगितले. आघाडी सरकारच्या काळात २१ टक्के वीजचोरीचे प्रमाण होते जे सध्या १५ टक्क्यांवर आले आहे.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.
सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## महत्त्वाचे

### मादक द्रव्य तस्कर, अफू उत्पादकांना अटक

**इम्फाळः** मणिपूरच्या कांगपोक्पी जिल्ह्यात वेगवेगळ्या सहा कथित ड्रग्ज तस्कर आणि चार अफू लागवड करणाऱ्यांना अटक करण्यात आली असल्याची माहिती पोलिसांनी सोमवारी दिली. कांगापोक्सी पोलिस ठाण्यात दाखल झालेल्या गुन्ह्याप्रकरणी सहा ड्रग्ज तस्करांना अटक करण्यात आली. खैकाहाओ किपगेन उर्फ जॉन, लेटगौमांग तौथांग उर्फ अमोन, आबी बराल, जितेन खारका, एल एच रानीरो आणि लीह चाओ अशी त्यांची ओळख पटली असल्याचे निवेदनात म्हटले आहे. शनिवारी त्यांच्या ताब्यातून १७४ साबणाच्या पेट्यांमध्ये लपून ठेवलेली ब्राऊन शुगर आणि एक चारचाकी वाहनही जप्त करण्यात आले. दरम्यान कांगपोक्सी जिल्ह्यातील सोंगजांग गावात बेकायदेशीरपणे अफूची लागवड केल्याबद्दल त्यांच्याविरुद्ध दाखल केलेल्या गुन्ह्यासंदर्भात इतर चार जणांना अटक करण्यात आली असल्याची त्यांनी म्हटले आहे. जंगगोलेन किपगेन, लेटगिनला किपगेन, कामगिनलेन किपगेन आणि थांगमिनलेन किपगेन अशी अटक करण्यात आलेल्यांची नावे आहेत.

### राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पदाधिकाऱ्यांची तरुण भारतला सदिच्छा भेट

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या पदाधिकाऱ्यांनी सोमवारी तरुण भारत कार्यालयास सदिच्छा भेट दिली. याप्रसंगी तरूण भारतचे कार्यकारी संचालक दिलीप पेठे आणि मुख्य संपादक प्रशांत माने यांनी त्यांचे स्वागत केले. पश्चिम महाराष्ट्र प्रांत सहप्रचार प्रमुख विकास फडके, पुणे विभाग सहप्रचार प्रमुख डॉ. सचिन लादे, सोलापूर जिल्हा प्रचार प्रमुख मनीष झानपुरे, वीरशैव हिंदू लिंगायत प्रतिष्ठानचे राहुल पावले या संघ पदाधिकाऱ्यानी सविस्तर चर्चा केली.

### एलपीजी गळतीमुळे आग लागून भावंडांचा मृत्यू

**नवी दिल्ली** : पश्चिम दिल्लीतील मनोहर पार्क येथील त्यांच्या घरात एलपीजी सिलेंडरमधून गॅस गळती झाल्यामुळे लागलेल्या आगीत दोन अल्पवयीन भावंडांचा मृत्यू झाला, असे दिल्ली अग्निशमन दलाने सोमवारी सांगितले. रविवारी रात्री मनोहर पार्क येथील डब्ल्यूझेड-७ येथे ही घटना घडली. अग्निशमन दलाच्या दोन गाड्या घटनास्थळी दाखल झाल्या. घटनास्थळी भेट दिलेल्या पथकाने एलपीजी सिलेंडरमधून आग लागल्याची पुष्टी डीएफएस अधिकाऱ्यांनी सांगितले. साक्षी आणि आकाश अशी या घटनेत मृत्यू झालेल्या मुलांची नावे आहेत.

### कूलर निर्मिती कारखान्याला आग, जीवितहानी नाही

**नोएडा** : ग्रेटर नोएडाच्या इकोटेक ३ मधील एका कूलर निर्मिती कराखान्याला सोमवारी भीषण आग लागली, असे पोलिसांनी सांगितले. दुरूनच काळ्या धुराचे लोट आकाशात उडताना दिसत होते. दुपारी १:३० च्या सुमारास कुलर निर्मिती कारखान्यला लागलेली आग विझवण्यासाठी अग्निशमन दलाच्या पंधरा गाड्या घटनास्थळी पोहोचल्या आणि आग नियंत्रणात आणली, असे त्यांनी सांगितले.

## पान १ वरुन

### वाचाळवीरांसाठी कठोर कायदे...

त्यामुळे सर्वसामान्य नागरिकांच्या भावना दुखावल्या जातात. उदयनराजे, संभाजीराजे किंवा अन्य विचारवंत यांनी मांडलेली भूमिका योग्य आहे. शासन त्यादृष्टीकोनातून प्रयत्न करते आहे आणि तातडीने करण्याची आवश्यकता आहे असेही सभापती शिंदे यांनी सांगितले. आ. रोहित पवार यांना हक्कभंगाबाबतची नोटीस मिळाली नसल्याच्या संदर्भात विचारलेल्या प्रश्नाला उत्तर देताना राम शिंदे म्हणाले की, विधी मंडळाचे कामकाज हे नियमाने चालते. हक्कभंग समितीमध्ये ज्यांच्यावर हक्कभंग दाखल झाले आहेत, दाखल करुन घेतले आहेत ते हक्कभंग समितीचे कार्य ठरते. त्यांच्याकडून नोटीस दिल्यानंतर उत्तर घेणे, त्या उत्तराच्या अभ्यासातून दोष आहे की नाही हे तपासण्याचे काम हे हक्कभंग समितीचे असते. परंतु हक्कभंग हा विधानसभेमध्ये अध्यक्षांच्या आणि विधानपरिषदे मध्ये सभापतींच्या समोर मांडला जातो. एकदा तो स्विकारल्या नंतर हक्कभंग समिती त्याच्यावर कारवाई करते आणि जसे कोर्टाचे काम चालते त्या पध्दतीने हक्कभंग समितीचे काम चालते. शेवटी संविधानिक पदावरती आणि निवडून आलेला जो लोकप्रतिनिधी असतो त्याच्या आधिकाराचे संरक्षण झाले पाहिजे, ते कर्तव्य अध्यक्ष आणि सभापती पार पाडीत असतात. त्यामुळे हक्कभंग समिती त्या संदर्भातील कार्यवाही करेल त्याचे जे काही पुढे होईल ते अध्यक्ष आणि सभापतींपुढे सादरीकरण होते, अशीही माहिती यावेळी त्यांनी दिली.

# काश्मीरला मिळणार पहिली वंदे भारत

## १९ एप्रिलला पंतप्रधान मोदी यांच्या हस्ते हिरवा झेंडा





◆ **नवी दिल्ली, ३१ मार्च**

पंतप्रधान नरेंद्र मोदी १९ एप्रिल रोजी कटरा येथून काश्मीरसाठी पहिली वंदे भारत ट्रेन झेंडा दाखवून रवाना करणार आहेत. केंद्रीय मंत्री जितेंद्रसिंग यांनी ही माहिती दिली.

यावेळी २७२ किलोमीटरच्या उधमपूर-श्रीनगर-बारामुल्ला रेल्वे प्रकल्पाच्या पूर्णत्वाचीदेखील घोषणा करण्यात येणार आहे. जम्मू-कटरा-श्रीनगर वंदे भारत एक्प्रेस सुरुवातीला कटराहून चालवली जाईल. कारण जम्मू रेल्वे स्थानकाचे सध्या नूतनीकरण सुरू आहे.

जम्मूमध्ये पत्रकारांशी बोलताना केंद्रीय मंत्री जितेंद्र सिंग म्हणाले की, पंतप्रधान मोदी १९ एप्रिल रोजी उधमपूरला येणार आहेत. ते जगातील सर्वांत उंच रेल्वे पुलाला भेट देतील आणि त्याचे उद्घाटन करतील. त्यानंतर ते कटराहून वंदे भारत ट्रेनला झेंडा दाखवतील.

या उद्घाटनामुळे काश्मीरसाठी थेट रेल्वे कनेक्टिव्हिटीची दीर्घकालीन मागणी पूर्ण होणार आहे. सध्या केवळ संगलदान-बारामुल्ला आणि कटरा ते देशभरातील विविध स्थळांदरम्यान रेल्वे सेवा कार्यरत आहेत.

**३८ बोगदे, ९२७ पूल, ११९ किमी लांबी**

या प्रकल्पात ३८ बोगदे असून, त्यांची एकूण लांबी ११९ किलोमीटर आहे. यातील टनेल - ४९ हा सर्वात लांब बोगदा असून, त्याची लांबी १२.७५ किलोमीटर आहे. हा देशातील सर्वात लांब परिवहन बोगदा आहे.

**चिनाब पुलाचाही समावेश**

प्रकल्पात ९२७ पूल असून, त्यांची एकत्रित लांबी १३ किलोमीटर आहे. यामध्ये अद्भुत चिनाब पूल देखील आहे, जो १३१५ मीटर लांब, ४६७ मीटर कमान असलेला आणि नदीपात्राच्या ३५९ मीटर उंचीवर असलेला आहे. हा आयफेल टॉवरपेक्षा ३५ मीटर उंच असून, जगातील सर्वात उंच कमानी रेल्वे पूल म्हणून ओळखला जाईल. (वृत्तसंस्था)

# देश हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करा

## मालेगाव हिंदू संत संमेलनात भारतानंद सरस्वती यांची मागणी

◆ **मालेगाव, ३१ मार्च**

या देशात बहुसंख्य हिंदू असल्याने हिंदूंचा सन्मान झाला पाहिजे. साधू-संतानी देश, राष्ट्रभक्तीसाठी तसेच धर्मासाठी जीवन वेचले असल्याने देशाला हिंदू राष्ट्र म्हणून घोषित करा, अशी मागणी आपण पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्याकडे करणार असल्याचे प्रतिपादन अखिल भारतीय संत समितीचे महामंत्री भारतानंद सरस्वती यांनी केले.

मालेगाव शहरात आयोजित हिंदू संत साहित्य संमेलनात ते बोलत होते. यावेळी अनेक मान्यवर उपस्थित होते. संमेलनाचे अध्यक्ष महामंत्री भारतानंद म्हणाले, या देशात हिंदूंचा सन्मान झाला पाहिजे. आमच्या साधू-संतांनी देश, राष्ट्रभक्तीसाठी आपले जीवन समर्पित केले असून, ते मानवतावादी काम करीत आहेत. ते कधीही देशाच्या विरोधात बोलत नाहीत.

ते सर्व सनातनी हिंदुत्वाचे काम करत असूनही त्यांच्यावर गुन्हे का दाखल होतात? अन् जे देशाच्या विरोधात नारे देतात त्यांच्याविरोधात काही केले जात नाही, अशी खंत त्यांनी व्यक्त केली.

**संमेलनास बंदोबस्तासाठी मोठा फौजफाटा**

या संमेलनासाठी पोलिस प्रशासनाने मोठा बंदोबस्त तैनात केला होता. यात स्थानिक पोलिसांसह राज्य राखीव दलाचे जवान, दंगा नियंत्रण पथक आदींचा समावेश होता. यावेळी पोलिसांच्या विविध प्रकारच्या वाहनांनी रस्ता भरून गेला होता. दरम्यान बंदोबस्तासाठी पोलीसांनी १४ लाखांचे बिल आकारण्याचा आरोप आयोजकांनी केला.

**प्रकृती अस्वास्थ्यामुळे साध्वी प्रज्ञासिंह अनुपस्थित**

या संत संमेलनाला साध्वी प्रज्ञासिंह या येणार असल्याने संपूर्ण राज्याचे लक्ष त्यांच्या मालेगावातील संमेलनाकडे लागले होते. त्यांच्या नावामुळेच हे संमेलन वादाच्या भोवऱ्यातही सापडले होते. प्रकृती बरी नसल्याने त्या या संमेलनास उपस्थित राहू शकल्या नाहीत. मात्र, त्यांनी मोबाइल ऑडिओच्या माध्यमातून संमेलनात संवाद साधला. (वृत्तसंस्था)

# सैनिकी शाळेमुळे सैन्यदलाला मिळाले उत्कृष्ट अधिकारी

● देवेंद्र फडणवीस यांचे प्रतिपादन ● संस्थापक डॉ. बाळाकृष्ण मुंजे यांच्या पुतळ्याचे अनावरण

### जनरल बिपीन रावत सभागृहाचे लोकार्पण



मार्गदर्शन करताना देवेंद्र फडणवीस. मंचावर कुमार काळे, शैलेश जोगळेकर, शिरीष देव, मनोज पांडे, सूर्यरतन डागा, दिलीप चव्हाण, विवेक रानडे, संजय जोशी, अमरेंद्र हरदास

◆ **नागपूर, ३१ मार्च**

शालेय शिक्षण घेताना विद्यार्थ्यांमध्ये सैनिकांप्रमाणे लढण्याची क्षमता निर्माण व्हावी, यासाठी भोसला सैनिकी शाळेला सुरुवात झाली होती. या सैनिकी शाळेत शिस्तप्रिय नागरिक घडविण्याचे कार्य होत असल्याने त्या माध्यमातून देशाच्या सैन्यदलाला उत्कृष्ट अधिकारी मिळत असल्याचे गौरवोद्‌गार मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काढले.

कोराडी मार्गावरील बोखारा, चक्की खापा येथील भोसला सैनिकी शाळा परिसरात संस्थेचे संस्थापक डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे व जनरल बिपीन रावत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधण्यात आलेल्या अत्याधुनिक सभागृहाच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. मंचावर प्रमुख पाहुणे म्हणून सेवानिवृत्त जनरल मनोज पांडे, वायुदलाचे एअर चीफ मार्शल शिरीष देव, सेंट्रल हिंदू मिलिटरी एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सूर्यरतन डागा, भोसला सैनिकी शाळेचे अध्यक्ष शैलेश जोगळेकर, संस्थेचे कुमार काळे, दिलीप चव्हाण, राहुल दीक्षित, हेमंत देशपांडे, विवेक रानडे, संजय जोशी, अमरेंद्र हरदास आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला संस्थेचे संस्थापक डॉ. बाळकृष्ण शिवराम मुंजे व जनरल बिपीन रावत यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ बांधण्यात आलेल्या अत्याधुनिक सभागृहाचे लोकार्पण मुख्यमंत्र्यांच्या हस्ते झाले.

आधुनिकतेला स्वीकारणारी पिढी निर्माण करण्याचे काम संस्थेच्या माध्यमातून होत आहे. अनुशासित भारत घडविण्याच्या कार्यासोबतच सैन्यदलाला आधुनिकतेकडे नेणारे सैन्यदल प्रमुख मेजर जनरल बिपीन रावत यांच्या स्मृती कायम राहाव्यात व त्यांच्या कार्यापासून विद्यार्थ्यांना सातत्याने प्रेरणा मिळावी आणि सैनिकांप्रमाणे त्यांच्यात जिद्द निर्माण व्हावी यासाठी अत्याधुनिक सभागृहाची निर्मिती करण्यात आली आहे, असे देवेंद्र फडणवीस म्हणाले.

आत्मनिर्भर भारताच्या दृष्टीने देशाची वाटचाल सुरू असून जगातील सर्वांत आधुनिक शस्त्रे भारतात तयार होत आहेत व आपण या शस्त्रांची निर्यातही करीत आहोत. भारताने नेहमीच शांतीसाठी कार्य केले असल्यामुळे बलशाली भारत संपूर्ण जगाला शांतीचा संदेश देऊ शकतो, असा विश्वास फडणवीस यांनी व्यक्त केला. (तभा वृत्तसेवा)

### दिशा सालियन प्रकरणी पुरावे वकिलांना सुपूर्द

**मुंबई** : दिशा सालियन मृत्यू प्रकरणात सोमवारी एक महत्त्वपूर्ण घडामोड घडली. मुंबईच्या दोन माजी सहाय्यक पोलिस आयुक्तांनी सोमवारी दिशाचे वडील सतीश सालियन यांचे वकील नीलेश ओझा यांची भेट घेऊन त्यांना या प्रकरणाशी संबंधित अत्यंत संवेदनशील माहिती व पुरावे असणारा पेनड्राइव्ह दिला. यामुळे या प्रकरणी काही महत्त्वाचे खुलासे होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. यासंबंधीच्या माहितीनुसार, ए. पी. निपुंगे व भीमराज घाडगे या दोन माजी सहाय्यक पोलिस आयुक्तांनी सोमवारी नीलेश ओझा यांची भेट घेतली. यावेळी त्यांच्यासोबत दिशाचे वडील सतीश सालियनही उपस्थित होते. या पुराव्यांत फोटो, व्हिडीओ रेकॉर्डिंग, स्टिंग ऑपरेशन फुटेज व इतर अनेक महत्त्वाच्या दस्तऐवजाचा समावेश आहे.

# समृद्धी महामार्गावरील अपघातात एक गंभीर

◆ **कारंजा लाड, ३१ मार्च**

पिकअप उलटल्याने घडलेल्या अपघातात चालक गंभीर जखमी झाल्याची घटना नागपूर मुंबई या स्व. बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गावरील शेलूबाजार गावाजवळ सोमवारी सकाळी घडली. मेहाजीत दिवाकर लोणारे असे जखमीचे नाव असून, ते वर्धा येथील रहिवासी असल्याची माहिती पुढे आली आहे.

सूत्रांच्या माहितीनुसार, ते पिकअपमध्ये काही माल घेऊन नागपूरहून नाशिककडे जात असताना मार्गातील अपघातस्थळी त्यांना डुलकी आली. त्यामुळे त्यांचे वाहनावरील नियंत्रण सुटले आणि वाहन उलटल्याने हा अपघात घडला. अपघाताच्या घटनेची माहिती मिळताच समृद्धी रुग्णवाहिका चालक खिल्लारे यांनी त्यांना उपचारासाठी कारंजा उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले आणि तेथील प्राथमिक उपचारानंतर पुढील उपचारासाठी इतरत्र हलविण्यात आले. (तभा वृत्तसेवा)

# नागपूरचा कलाकार अन् भामरागडचे कारागिर!

### कल्की म्हणजे भारतमातेचे विराट रूप

### भारतीय संस्कृती टिकून रहाणे आवश्यक

**रेवती जोशी-अंधारे**





पेटंट जेम सन्मान मिळविणारे प्रताप काशीकर आणि भारतमातेची मूर्ती!

◆ **नागपूर, ३१ मार्च**

जिवंत आणि शाश्वत ऊर्जास्रोत असलेल्या भारतमातेची नावीन्यपूर्ण मूर्ती घडवून, नागपूरचे कलाकार प्रताप काशीकर यांनी नवा इतिहास घडविला आहे. 'मदर युनिव्हर्स'ची संकल्पना त्यांनी मूर्तीमंत साकारली असून, त्यांच्या या संकल्पनेला विविध क्षेत्रातील विचारवंत आणि अभ्यासकांनी उचलून धरले आहे. भारतमातेचे विराट रूप दाखविणाऱ्या या मूर्तीला 'पेटंट जेम' हा मान मिळाला आहे.

'वन वर्ल्ड, वन फॅमिली, वन फ्युचर' हे जीवनसूत्र असलेल्या भारतीयांसह संपूर्ण विश्वाला तारून नेण्यासाठी मातृहृदयी भारतमाता ही काळाची गरज असल्याचे मत प्रताप काशीकर यांनी तरुण भारत प्रतिनिधीशी बोलताना व्यक्त केले. काशीकर हे आर्किटेक्ट, भविष्यवेत्ता आणि कलाकार आहेत. 'काही वर्षांपूर्वी माझ्या आईचे कर्करोगाने निधन झाले. पण, आई नेहमी सोबत असायला हवी, या विचारातून भारतमातेची मूर्ती घडविली. महाकाली, महासरस्वती, महालक्ष्मी अशा तीन स्वरूपांचे एकत्रीकरण असलेली ही भारतमाता पांढऱ्या आणि पंख असलेल्या घोड्यावर स्वार असून, तिच्या हातात पृथ्वी आहे. चांगले अपत्य जन्माला येण्यासाठी ज्याप्रमाणे गरोदर स्त्रीसमोर चांगली चित्रे लावली जातात. त्याप्रमाणे, ही विश्वगुरू भारतमाता राष्ट्रप्रेमासोबतच कारुण्याची प्रेरणा देणारी आहे,' असे विचार काशीकर यांनी मांडले.

त्यांनी थ्री-डीमध्ये तयार केलेल्या या मूर्तीचे डिझाईन भामरागडच्या माडिया गोंड आदिवासी कारागिरांच्या कुशल हातातून पंचधातूच्या मूर्तीत रुपांतरीत होत असून, मोठ्या प्रमाणात रोजगार निर्मिती होत आहे.

सर्वधर्मीय प्रार्थनास्थळांमध्ये, शिक्षणसंस्थांमध्ये ही विश्वगुरू भारतमाता असावी. सामान्य नागरिकांनीही या विराट रूपाला दैनंदिन जीवनात आवर्जून स्थान द्यावे, असे आग्रही प्रतिपादन त्यांनी केले. विशेष म्हणजे, ते विविध क्षेत्रात कार्यरत असलेल्या महिलांनी १०८ मूर्ती भेट देणार आहेत. परदेशातील राजदूतांना आणि अनिवासी भारतीयांना भेटीदाखल ही 'मदर युनिव्हर्स' देऊन, एक नवा विचार रूढ करता येईल, असेही ते म्हणाले.

आपल्या दोन दशकांच्या संशोधनानुसार, कल्की अवतार म्हणजे भारतमाताच आहे, असा विश्वास काशीकर यांनी व्यक्त केला. या मूर्तीतून प्रेरणा घेऊन, प्रत्येक भारतीयाने विराटरूप घेऊन भारताला विश्वगुरू करण्यात योगदान द्यावे, असे ते म्हणाले. त्यांच्या या संकल्पनेचे राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत, लोकसभेच्या माजी सभापती सुमित्रा महाजन यांच्यासह सामाजिक आणि आध्यात्मिक क्षेत्रातील विचारवंतांनी विशेषत्वाने कौतुक केले आहे.

# वडेट्टीवार, तुमची तरी काय चूक? तुमचे संस्कारच वेगळे

**आमदार संदीप जोशी यांचा घणाघात**



◆ **मुंबई, ३१ मार्च**

काँग्रेसचे विरोधी पक्ष नेता विजय वडेट्टीवार यांचे वक्तव्य ऐकून चीड येण्यापेक्षा मला त्यांची कीव करावीशी वाटते. विजय वडेट्टीवार यांनी केलेले वक्तव्य म्हणजे खऱ्या इतिहासाची मोडतोड करून तो जनतेसमोर कसा मांडावा याचे उत्तम उदाहरण आहे. वडेट्टीवार, तुमची तरीत काय चूक, तुमचे संस्कारच वेगळे आहेत, असा घणाघात आ. संदीप जोशी यांनी केला.

विजय वडेट्टीवार यांच्या संस्कारांची परिभाषाच वेगळी आहे. अर्थार्जनासाठी मुलीला बार उघडून देणारे वडेट्टीवार काय संस्कार करणार आणि काय इतिहास जाणणार, असा सवाल संदीप जोशी यांनी उपस्थित करीत आपण तरी त्यांच्याकडून कोणत्या अपेक्षा करू शकतो, असे सांगितले. त्यांनी छत्रपती संभाजी महाराजांबद्दल केलेल्या चुकीच्या विधानाला उत्तर देणे, अत्यंत गरजेचे वाटत असल्याचे आ. संदीप जोशी यांनी स्पष्ट केले. अन्यथा ते अशीच विधाने करीत जनतेची दिशाभूल करतील. छत्रपती संभाजी महाराजांच्या मृत्यूचा दिवस फाल्गुनातील अमावस्या म्हणजेच गुढीपाडव्याच्या आधीचा दिवस आहे. मात्र वडेट्टीवार म्हणतात, छत्रपती संभाजी महाराजांचा खून झाला आणि आम्ही गुढी-बिडी उभारतो.

वडेट्टीवार हे स्वतः एक हिंदू असूनही गुढी आणि बिडी असा उच्चारी कसे करू शकतात, असा प्रश्न आ. संदीप जोशी यांनी विचारला. गुढीपाडव्याच्या दिवशी आपण हिंदू नववर्षाचे स्वागत करतो आणि त्यानिमित्ताने गुढ्या आणि पताका उभारतो. ही एक हिंदू अस्मिता असल्याचे मला वाटते. पण, हिंदू हा दहशतवादी नाहीत. मात्र, हिंदुत्वाला गद्दारीचे गालबोट नेहमीच लागले, असे मी नेहमीच म्हणत असल्याचे जोशी यांनी सांगितले. वडेट्टीवारांनी एकदा छत्रपती संभाजी महाराजांचा इतिहास नीट वाचाव,ा म्हणजे याचे उत्तर त्यांना निश्चित मिळेल.

छत्रपती संभाजी महाराजांचा मृत्यू १६८० मध्ये झाला. खरे तर गुढीपाडवा साजरा करण्याची परंपरेचा उल्लेख महाभारतातही आहे. हे वडेट्टीवारांना लक्षात आणून देणे हे माझे कर्तव्य आहे. कारण, माहिती असायला वाचन संस्कृती जपणारे व्यक्तिमत्त्व असावे लागते. विजय वडेट्टीवार संस्कृतीच विसरले, तर वाचन संस्कृती त्यांना कुठून माहिती असणार, असा सवाल आ. संदीप जोशी यांनी केला. (तभा वृत्तसेवा)

**काँग्रेसकडून शिवरायांचा वापर केवळ राजकारणासाठी**

प्रक्षोभक विधाने करून समाज मन स्वतःकडे आकर्षित करण्याचा प्रयत्न वडेट्टीवारांनी बंद करावा. खरा इतिहास लोकांसमोर येऊ द्यायचा नाही हे काँग्रेसचे धोरण आहे. हे धोरण आता नागरिकांच्याही लक्षात आले आहे. छत्रपती शिवराय आणि छत्रपती संभाजी महाराजांच्या नावाचा वापर केवळ राजकारणासाठी करता कसे करतो, हेच आजवर काँग्रेस पक्षाने दाखवले आणि तेच तुम्ही करीत आहात, अशी टीका आ. संदीप जोशी यांनी वडेट्टीवार यांच्यावर केली.

# मार्च एन्डमुळे सुटीच्या दिवशीही शासकीय कार्यालयात गजबज!

### डिपीसीतून आलेला संपूर्ण निधी मार्गी लागण्यासाठी पळापळ

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

शहर-जिल्ह्यातील सर्व सरकारी कार्यालये, बँकिंग विश्व आणि वित्तीय संस्थांमध्ये सध्या मार्च एंडिंगची धावपळ सुरू आहे. शहर जिल्ह्यातील महसूल विभाग, जिल्हा परिषद, नगरपालिका, महापालिकेच्या पातळीवरही विविध विभागांकडून उत्पन्नाचे उद्दिष्ट गाठण्यासाठी वसुलीची लगबग सुरू आहे. इतकेच नाहीतर डिपीसीतून विविध विकासकामांसाठी आलेला सर्व निधीही मार्गी लागावा यासाठी अधिकाऱ्यांची आणि कर्मचाऱ्यांचीही पळापळ सुरू होती.

दरम्यान, सलग ३ सुट्या असतानाही शासन स्तरावरील विविध कार्यालये अधिकारी-कर्मचाऱ्यांनी गजबजलेली दिसून आली. इतकेच कायतर खाजगी, शासकीय बँका आणि पतसंस्थेने थकीत कर्जासाठी वसुली प्रक्रिया गतिमान केली असल्याचे या महिन्यात दिसून आले. बँका आणि वित्तीय संस्थांमध्ये वार्षिक ताळेबंदाची मांडणी वेगाने सुरू होती. सोमवारी रात्री उशिरापर्यंत अनेक कार्यालये, बँकांचे हिशोब सुरूच असल्याचे दिसून आले. सरकारी कार्यालयात अन्य विभागांची देणी भागविताना वर्षभरातील जमा-खर्चाचा हिशोब मांडला जात होता. एकंदरीत, सगळीकडे मार्च एंडिंगचा फिव्हर निर्माण झाल्याचेच दिसून आले. सलग सुट्या असल्यामुळे गुरुवारपासून बँका आणि सरकारी कार्यालय बंद आहेत. कार्यालयीन कामकाज बंद असले तरी बँका आणि पतसंस्थांनी वसुलीसाठी यंत्रणा उपलब्ध केली होती. सहकारी बँकांची वाहने वसुलीसाठी फिरत होती. सहकारी व खासगी बँका, वित्तीय संस्थांमधील कर्मचाऱ्यांच्या सुट्या रद्द करण्यात आल्या आहेत. महापालिकेची घरपट्टी, पाणीपट्टी, व्यवसाय फी आणि परवाना फी यासाठी यंत्रणा गतिमान केली होती. जिल्हा परिषदेतही विविध खात्यांच्या आलेल्या डिपीसीतील निधीच्या जमा-खर्चाचा तपशील मांडणी रात्री उशिरापर्यंत सुरूच होता. एकंदरीत, शहरातील विविध कार्यालयात मार्च एंडिंगची धांदल दिसून आली. उपलब्ध निधी, खर्ची पडलेल्या निधीचा ताळेबंद मांडताना राज्य सरकारकडून जाहीर झालेला निधी मिळविण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचेही काही ठिकाणी दिसून आले. याचबरोबर पोलिस प्रशासनाकडून वर्षभराच्या जमा-खर्चाचा हिशोब मांडला जात आहे. गृहखात्याकडून उपलब्ध निधीतून कर्मचाऱ्यांची वैद्यकीय बिले मंजूर केली जात आहेत. शिवाय घरफाळा, पाणीपट्टी विभागाचा खर्च चुकता केला जात आहे. जिल्हा नियोजन अधिकारी अन् कर्मचाऱ्यांनीही गेल्या १५ दिवसांत १५ टक्के राहिलेला निधी विविध खात्यांच्या यंत्रणेला पारीत करुन एक रूपयाही परत जावू नये; यासाठी प्रयत्नांची पराकाष्टा केली. या खात्यातील काही अधिकारी-कर्मचाऱ्यांनीही मार्च एन्ड असल्याने सुटी घेतली नसल्याचे सांगण्यात आले.

**पवित्र पोर्टल प्रणालीव्दारे शिक्षक भरती (टप्पा-2)**

**स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था करमाळा (२७३००३SC००६)**

**ता.करमाळा** जि.सोलापूर संचलित मराठी माध्यमाच्या सोलापूर जिल्ह्यातील माध्यमिक विद्यालयात पवित्र पोर्टल मार्फत ऑनलाईन पध्दतीने खालील प्रमाणे शिक्षक नेमणे आहेत.

विषय व शैक्षणिक व्यवसायिक पात्रतेसह रिक्त पदांचा तपशील

| अ. क्र. | माध्यम | पद | वेतन श्रेणी/ मानधन | अनुदानित | विषय | आवश्यक पद संख्या | एकूण पदे | आरक्षण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | मराठी | शिक्षण सेवक इ.१ ते ५ | एकत्रित मानधन १६०००/- | अनुदानित | सर्व विषय | १ | १ | ई डब्ल्यू एस |

* अभियोग्यता व बुध्दीमत्ता चाचणी (TAIT) 2022 प्रविष्ट झालेल्या उमेदवारापैकी ज्या उमेदवारांनी पवित्र पोर्टल प्रणाली (https://tait2022.mahateacherrecruitment.org.in) या संकेतस्थळावर वैयक्तिक माहिती नोंदवून स्वप्रमाणित केलेली आहे. असेच उमेदवार जाहिरातीनुसार ऑनलाईन अर्ज करु शकतील.
* इच्छुक व अर्हता धारण करणा-या उमेदवारांनी ऑनलाईन जाहिरातीच्या अनुषंगाने पात्र असलेल्या पदासाठी पसंती क्रम नमूद करुन पोर्टलवर ऑनलाईन अर्ज करावेत.
* वरील रिक्त पदासाठी पवित्र पोर्टल प्रणाली मार्फत शासनाकडून उमेदवारांची नावे कळविली जाणार असल्याने प्रत्यक्ष संस्थेकडे कोणीही उमेदवारांनी अर्ज करु नयेत.

सही/-
सचिव अध्यक्ष
स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था करमाळा ता करमाळा जि सोलापूर

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

# भूकंपातील मृतांचा आकडा दोन हजारांपलीकडे

## नागरिकांना ढिगाऱ्याकडून काढण्याचे काम युद्धस्तरावर



म्यानमारमधील मंडाले येथील मलब्याखाली दबलेल्या महिलेला बाहेर काढताना रशियन मदत पथकाचे जवान

### मदतीचा ओघ कायम

**मंडाले, ३१ मार्च**

म्यानमारमध्ये आलेल्या भूकंपात बळी गेलेल्यांचा आकडा दोन हजारांच्या पलीकडे गेला आहे. अजूनही शेकडो नागरिक मलब्याखाली दबलेले आहेत. ढिगारे उपसण्याचे काम युद्धस्तरावर सुरू आहे. दुसरीकडे जगभरातून म्यानमार आणि थायलंडकडे मदतीचा ओघ कायम आहे.

म्यानमारमधील मंडाले परिसरात भूकंपामुळे सर्वाधिक नुकसान झाले आहे. मृतांचा आकडा वाढत असून ३,४०० जखमी झाले आहेत व ३०० हून अधिक बेपत्ता आहेत. लष्कराने यापूर्वी १,६४४ मृतांची नोंद केली होती. त्यात सोमवारी वाढ झाली. असे असले तरी म्यानमारमधील लष्करी प्रशासनाने अधिकृत आकडेवारी अद्याप जारी केली नाही. हा आकडा प्राथमिक असल्याचे सरकारी प्रवक्ते मेजर जनरल झॉ मिन तुन यांनी सांगितले.

शुक्रवारी ७.७ तीव्रतेचा भूकंप आल्यामुळे राजधानी नायपिटाव व दुसरे सर्वात मोठे शहर मंडालेसह सर्वत्र मोठ्या प्रमाणात नुकसान झाले.

भूकंपामुळे प्रभावित झालेल्या प्रदेशांमध्ये मृतांची व जखमींची खरी संख्या अधिकृत आकडेवारीपेक्षा कितीतरी पट जास्त असल्याचे मानले जाते, परंतु दूरसंचार खंडित झाल्यामुळे व देशभरात आव्हानात्मक परिस्थिती निर्माण झाल्यामुळे अनेक भागात झालेल्या नुकसानीबद्दल फारशी माहिती नाही. सद्यपरिस्थिती आम्हाला विनाशाचे प्रमाण स्पष्ट नाही, असे आंतरराष्ट्रीय बचाव समितीच्या म्यानमारमधील कार्यक्रमांच्या उपसंचालक लॉरेन एलेरी यांनी सांगितले.

सहा प्रदेशांमध्ये आणीबाणीची स्थिती आहे. आमची चमू व स्थानिक भागीदार सध्या भूकंपग्रस्तांच्या सेवेत आहेत. आपत्कालीन वैद्यकीय सेवा, मानवतावादी पुरवठा व इतर मदत पुरवताना गरजा कुठे सर्वात जास्त आहेत याचे मूल्यांकन करत आहे, असे एलेरी म्हणाल्या. (वृत्तसंस्था)

### भूकंपात ६० मशिदींचे नुकसान, ७०० नागरिकांचा मृत्यू

पवित्र रमजान महिन्यात देशातील मुस्लिम अल्पसंख्याकांसाठी शुक्रवारीच्या नमाजची वेळ होती आणि मशिदी कोसळल्यामुळे सुमारे ७०० नागरिकांचा मृत्यू झाला. भूकंपात सुमारे ६० मशिदींचे नुकसान झाले किंवा ते उद्ध्वस्त झाले, असे स्प्रिंग रिव्होल्यूशन म्यानमार मुस्लिम नेटवर्कच्या सुकाणू समितीचे सदस्य तुन की यांनी सांगितले.

## मणिपूरमध्ये दोन बंडखोरांना अटक

**इंफाळ, ३१ मार्च**

बंदी घातलेल्या कांगलेईपाक कम्युनिस्ट पार्टी (पीडब्ल्यूजी) संघटनेशी संबंधित दोन बंडखोरांना अटक करण्यात आली आहे, असे पोलिसांनी सोमवारी सांगितले.

एका गुप्त माहितीच्या आधारे सुरक्षा दलांनी रविवारी जिरीबाम जिल्ह्यातील निंगसिंगखुल येथून थोयदम सुरेश सिंग उर्फ लेम्बा (३४) या बंडखोराला अटक केली. तर बिष्णुपूर जिल्ह्यातील उपोपी येथून सलाम मालेमंगनबा सिंग उर्फ वांगलेन (२३) या संघटनेच्या आणखी एका बंडखोराला अटक करण्यात आली. दरम्यान, तेंग्नौपाल जिल्ह्यात सुधारित स्फोटके (आयईडी), शस्त्रास्त्रे आणि दारूगोळ्याचा साठा जप्त करण्यात आला आहे. आयईडीशिवाय तीन देशी बनावटीचे हेवी मोर्टार लाँचर, मॅगझिनसह दोन ७.६२ मि.मी. आणि ७.६५ मि.मी. देशी बनावटीचे पिस्तूल, चार एके-४७ आदींचा समावेश आहे. (वृत्तसंस्था)



केंद्र सरकारच्या सहकारिता मंत्रालयाच्या योजनेची लाभार्थी ठरलेल्या महिलेचा केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी बिहारचे मुख्यमंत्री नितिशकुमार, उपमुख्यमंत्री सम्राट चौधरी उपस्थित होते.

# अमेरिकेत होणाऱ्या मानवी तस्करीतील सूत्रधाराला अटक

### एनआयएची कारवाई

**नवी दिल्ली, ३१ मार्च**

कित्येकांना कुख्यात 'डंकी'मार्गाने अमेरिकेत पोहोचवणाऱ्या टोळीच्या सूत्रधाराला राष्ट्रीय तपास संस्था अर्थात् एनआयएने अटक केली.

'डंकी' हा शब्द इंग्रजीतील 'डाँकी' शब्दावरून घेण्यात आला आहे. कोणत्याही वैध दस्तावेजांशिवाय अवैध मार्गांचा वापर करीत अमेरिकेसारख्या देशात घुसखोरी करण्यासाठी 'डंकी' या शब्दाचा वापर केला जातो. मानवी तस्करी करणाऱ्या टोळ्या त्यांना या देशात पाठवतात तसेच यासाठी अत्यंत धोकादायक आणि खडतर मार्गाचा वापर केला जातो.

पश्चिम दिल्लीतील टिळकनगर येथे राहणाऱ्या गगनदीप उर्फ गोल्डी नावाच्या सूत्रधारास अटक करण्यात आली, असे एनआयएने निवेदनात म्हटले आहे. बेकायदेशीर मार्गाने विदेशात जाण्यासाठी पंजाबच्या तरण तारण जिल्ह्यातील एकाने गोल्डीला जवळपास ४५ लाख रुपये दिले होते. त्या पीडिताला गोल्डीने 'डंकी' मार्गाने डिसेंबर २०२४ मध्ये अमेरिकेत पोहोचवण्यात आले होते. अमेरिकी प्रशासनाने त्याला १५ फेब्रुवारी रोजी परत भारतात पाठवले. त्यानंतर त्याने आरोपीच्या विरोधात तक्रार दाखल केली होती.

१३ मार्च रोजी याचा तपास एनआयएकडे वर्ग करण्यात आला. लोकांना विदेशात पाठवण्यासाठी गोल्डीकडे वैध परवाना नसल्याचे एनआयएला तपासात आढळले. स्पेन, साल्वाडोर, ग्वाटेमाला आणि मेक्सिको या 'डंकी' मार्गाचा वापर करून तो पीडितांना अमेरिकेत पाठवायचा. तो विदेशात पाठवल्या जाणाऱ्या पीडितांना प्रवासादरम्यान मारहाण करून त्यांच्याकडील डॉलर्स हिसकवायचा, असेही तपासात निष्पन्न झाल्याचे एनआयएने म्हटले आहे. (वृत्तसंस्था)

# ओडिशातील कटक-नेरगुंडी भागात रेल्वे सेवा सुरळीत

**भुवनेश्वर, ३१ मार्च**

ओडिशाच्या कटक जिल्ह्यातील कटक-नेरगुंडी रेल्वे भागातील एसएमव्हीटी बेंगळुरू-कामख्या एसी एक्सप्रेस रुळावरुन घसरल्यानंतर सोमवारी सकाळी दोन्ही रुळांवर रेल्वे सेवा पुन्हा सुरू करण्यात आले. ही माहिती एका वरिष्ठ रेल्वे अधिकाऱ्यांनी दिली. कटक-भद्रक रेल्वे विभागातील केंद्रपाडा रोड आणि नेरगुंडी स्थानकादरम्यान रविवारी झालेल्या अपघातामुळे रेल्वेसेवा तात्पुरती विस्कळीत झाली होती, असे ईस्ट कोस्ट रेल्वेने म्हटले आहे.

रेल्वे कर्मचाऱ्यांनी रात्रभर आणि आव्हानात्मक परिस्थितीत अथक परिश्रम करून सोमवारी सकाळी बाधित मार्ग पूर्ववत केला. डाऊन लाईनवरील पहिली रेल्वे सकाळी ९:३० वाजता निघाली. त्यानंतर लगेचच आप लाईन सेवा पुन्हा सुरू झाली, असे रेल्वे अधिकाऱ्यांनी सांगितले. काम सुरू असल्याने गाड्या कमी वेगाने सामान्य हालचाली सुरू झाल्या. परिस्थिती स्थिर होताच वेग मर्यादा हळूहळू वाढवल्या जातील, असे त्यांनी सांगितले. पश्चिम बंगालमधील अलीपूरद्वार येथील एका २२ वर्षीय तरुणाचा अपघातात मृत्यू झाला आणि इतर तीन जण जखमी झाले. रेल्वे अधिकाऱ्यांनी पीडितांना भरपाई दिली आहे. (वृत्तसंस्था)

## चित्रपट वार्ता

### पुन्हा चित्रपटात नशीब अजमावणार कपिल

**मुंबई** : कॉमेडी किंग कपिल शर्मा पुन्हा एकदा चित्रपटांमध्ये परतत आहे. त्याच्या सुपरहिट चित्रपट किस किस को प्यार करूं चा सिक्वेल 'किस किस को प्यार करूं २' लवकरच प्रदर्शित होणार आहे. चित्रपटाचा पहिला लूक रिलीज झाला आहे, ज्यामध्ये कपिल एका मिस्ट्री गर्लसोबत दिसत आहे. कपिलने २०१७ मध्ये फिरंगी बनवला, जो त्याचा पहिला निर्मित चित्रपट होता. यावेळी त्याने त्याच्या परिचित विनोदापासून दूर जाऊन एक गंभीर कथा निवडली, परंतु हा प्रयोग यशस्वी झाला नाही. सुमारे २५-३० कोटी रुपयांच्या बजेटमध्ये बनवलेला हा चित्रपट फक्त १० कोटी रुपये कमवू शकला. या अपयशाचा कपिलच्या व्यावसायिक आणि वैयक्तिक आयुष्यावर परिणाम झाला. आता पुन्हा तो चित्रपटात नशीब अजमावत आहे.



### 'पत्रापत्री' नाटकाचा सुवर्ण महोत्सवी प्रयोग



**मुंबई** : मराठी रंगभूमीवरील एक वेगळा प्रयोग म्हणून नावाजलेला 'पत्रोपत्री'चा प्रयोग आपला सुवर्ण सोहळा साजरा करणार आहे. येत्या ६ एप्रिल रोजी सायंकाळी साडेचार वाजता ठाण्यातील काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात या नाटकाचा ५० वा प्रयोग सादर होणार आहे. याचा पहिला प्रयोग १७ मे २०२४ रोजी झाला होता. अमेरिकेतही याचे १६ यशस्वी प्रयोग झाले. हे नाटक दिलीप प्रभावळकर यांच्या 'पत्रापत्री' या पुस्तकावर आधारित आहे, जे ऑक्टोबर २०१३ मध्ये प्रकाशित झाले. दोन वृद्ध मित्र, तात्यासाहेब आणि माधवराव यांच्यातील पत्रव्यवहारावर आधारित हे नाटक हास्य, जुन्या आठवणी आणि मार्मिक सामाजिक निरीक्षणांनी भरलेले आहे. याचे दिग्दर्शन विजय केंकरे यांनी केले आहे. यात दिलीप प्रभावळकर आणि विजय केंकरे यांचा अफलातून अभिनय आहे.



### अभिनेत्री आदिती द्रविडचा साखरपुडा

**मुंबई** : मराठी मालिकेतील प्रसिद्ध अभिनेत्री आदिती द्रविडने नुकताच साखरपुडा आटोपला. अभिनेत्री, गीतकार आणि नृत्यांगना असणाऱ्या आदितीने नवीन वर्षाच्या पहिल्या दिवशी आयुष्याच्या नव्या इनिंगला सुरुवात केली. तिच्या होणाऱ्या नवऱ्याचे नाव मोहित लिमये असून तो ट्रॅव्हल कंपनीशी संबंधित क्षेत्रात कार्यरत आहे. विशेष म्हणजे, आदिती क्रिकेटपटू राहुल द्रविडची पुतणी आहे. उत्तम अभिनेत्री असणारी आदिती उत्तम कवयित्री आहे. 'बाईपण भारी देवा' या चित्रपटातील 'मंगळागौर' गाणे आदितीने लिहिले होते.



रशिया आणि युक्रेन यांच्यातील युद्धाने भीषण रूप धारण केले आहे. रशियन लष्कराने आता लांब पल्ल्यांच्या तोफांचा मारा युक्रेनच्या शहरांवर सुरू केला आहे.

# आसामच्या तीन जिल्ह्यांत वाढवली आफ्स्पाची मुदत

### एका जिल्ह्यातून घेतला मागे

**गुवाहाटी, ३१ मार्च**

आसामच्या तीन जिल्ह्यांमध्ये सशस्त्र दल विशेषाधिकार कायदा-१९५८ ची मुदत आणखी सहा महिन्यांनी वाढवण्यात आली आहे. हा निर्णय या परिसरातील कायदा व सुव्यवस्थेचे विश्लेषण केल्यानंतर घेण्यात आला, अशी माहिती आसाम सरकारने दिली.

परिस्थितीत सुधारणा झाल्यामुळे केंद्र सरकारने दिब्रुगड जिल्ह्यातून हा कायदा मागे घेतला आहे. उर्वरित राज्यातून आफ्प्सा मागे घेण्यात आल्यानंतर चार जिल्ह्यांमधील आफ्स्पाचा आढावा मागील वर्षी ८ ऑक्टोबरपासून घेण्यात आला, अशी माहिती गृह आणि राजकीय विभागाचे सचिव देवप्रसाद मिश्रा यांनी दिली.

विविध सुरक्षा यंत्रणांनी दिलेल्या अहवालानंतर आसाममधील संपूर्ण सुरक्षा परिस्थितीत सुधारणा होत असल्याचे निदर्शनास आले. विशेषतः मागील साडेतीन वर्षांत ही सुधारणा झाली. आसाम पोलिस आणि सुरक्षा दलांनी केलेल्या बंडखोरविरोधी उपाययोजनांमुळे ही सुधारणा झाली, असे त्यांनी सांगितले. त्यामुळे दिब्रुगडमध्ये ३१ मार्चनंतर आफ्स्पा लागणार नाही, असा आसाम सरकारला विश्वास आहे. राज्यातील काही जिल्ह्यांत आयईडी पेरण्यासारख्या कारवाया उल्फा (आय) बंडखोर संघटनेने केल्या आहेत. या व्यतिरिक्त खंडणी वसुलीचे प्रकारही घडले आहेत. त्यामुळे तिनसुकिया, चाराईडो आणि शिवसागर या तीन जिल्ह्यांत आफ्स्पाची मुदत आणखी सहा महिन्यांनी वाढवण्याचा निर्णय घेण्यात आला. (वृत्तसंस्था)

# पंतप्रधान मोदींच्या खाजगी सचिवपदी अधिकारी निधी तिवारी यांची नियुक्ती

**नवी दिल्ली, ३१ मार्च**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या खाजगी सचिवपदी (प्रायव्हेट सेक्रेटरी) निधी तिवारी यांची निवड करण्यात आली आहे. केंद्र सरकारने ही नियुक्ती केली असून याबाबतचे निवेदनही जारी केले आहे.

निधी तिवारी या नोव्हेंबर २०२२ पासून पंतप्रधान कार्यालयात उपसचिव म्हणून कार्यरत आहेत. त्याआधी त्या परराष्ट्र मंत्रालयाच्या निरस्त्रीकरण आणि आंतरराष्ट्रीय सुरक्षा व्यवहार विभागात अवर सचिव होत्या. केंद्र सरकारने शनिवारी प्रसिद्ध केलेल्या निवेदनात म्हटले आहे की, निधी तिवारी या २०१४ बॅचच्या भारतीय परराष्ट्र सेवा अधिकारी आहेत.

कार्मिक व प्रशिक्षण विभागाने २९ मार्च रोजी जारी केलेल्या निवेदनानुसार, मंत्रिमंडळाच्या नियुक्ती समितीने त्यांची नियुक्ती तात्काळ प्रभावाने मंजूर केली आहे. दरम्यान, आतापर्यंत विवेक कुमार आणि हार्दिक सतीशचंद्र शहा हे दोन अधिकारी पंतप्रधान नरेंद्र मोदींचे खासगी सचिव म्हणून काम पाहत होते.

**कोण आहेत निधी तिवारी?**

निधी तिवारी यांनी २०१३ च्या नागरी सेवा परीक्षेत ९६ वा क्रमांक मिळवला होता. त्या वाराणसीच्या मेहमूरगंज येथील रहिवासी आहेत. (वृत्तसंस्था)

# स्क्रीन पाहण्यात उगाच वेळ घालवतात भारतीय



### जगभरात लागतो तिसरा क्रमांक

**नवी दिल्ली, ३१ मार्च**

भारतात अंदाजे १२० कोटी स्मार्टफोन युजर्स आहेत तर ९५ कोटी इंटरनेट युजर्स आहेत. युजर्सना इंटरनेटसाठी प्रति गिगाबाइट (जीबी) केवळ १० रुपये इतका कमी खर्च येतो. स्वस्तातील स्मार्टफोनची उपलब्धता आणि कमी खर्चात इंटरनेट यामुळे देशात डिजिटलायझेशन वेगाने वाढत असले तरी यामुळे भारतीय नागरिक विशेषतः तरुण स्मार्टफोनच्या आहारी गेल्याचे दिसून येत आहे. देशातील युजर्सनी एकत्रितपणे २०२४ मध्ये स्क्रीनवर अनेक तास खर्च केले आहेत. भारतात दररोज मोबाइल स्क्रीनवर खर्च होणाऱ्या वेळेच्या बाबतीत इंडोनेशिया आणि ब्राझीलनंतर तिसऱ्या स्थानी आहे.

भारतीयांनी १.१ लाख कोटी तास मोबाईल स्क्रिनवर वाया घालवले आहेत. जागतिक व्यवस्थापन सल्लागार कंपनी इव्हाय यांच्या ताज्या अहवालानुसार, भारतीय युजर्स दररोज सरासरी पाच तास सोशल मीडिया, गेमिंग आणि टिटिसो स्ट्रिमिंगवर खर्च करीत आहेत. ५ तासांतील ७० टक्के वेळ यातच जातो आहे. परवडणारे इंटरनेट आणि स्वस्तातील फोन यामुळे हे शक्य झाले असले तरी यात भारतीय तरुणांचा अत्यंत महत्त्वाचा वेळ वाया जात आहे. हा वेळ तरुणांनी गुंतवणुकीच्या विविध पर्यायाचा अभ्यास करण्यात खर्च केला तर यातून कमाई वाढून त्यांचे जगणे अधिक समृद्ध होऊ शकले असते.

भारतीय नागरिक दररोज सोशल मीडिया, व्हिडीओ स्ट्रिमिंग आणि गेमिंगवर खर्च करीत आहेत. यामुळे भारत ही जगातील सर्वांत मोठी डिजिटल बाजारपेठ बनली आहे. (वृत्तसंस्था)

# वैद्यकीय खर्चाच्या भरपाईतून 'मेडिक्लेम'ची रक्कम वजा करता येत नाही


### मुंबई उच्च न्यायालयाचा निर्णय

**मुंबई, ३१ मार्च**

मोटार वाहन कायद्याच्या तरतुदीनुसार वैद्यकीय खर्चासाठी दावेदाराला देय असलेल्या नुकसान भरपाई रकमेतून मेडिक्लेम विम्याअंतर्गत एखाद्या व्यक्तीला मिळालेली रक्कम वजा करता येणार नाही, असे मुंबई उच्च न्यायालयाने म्हटले आहे.

मेडिक्लेम विम्याअंतर्गत रक्कम दावेदाराने विमा कंपनीशी केलेल्या कराराच्या आधारे प्राप्त होते, असे न्या. ए. एस. चांदुरकर, न्या. मिलिंद जाधव आणि न्या. गौरी गोडसे यांच्या पूर्णपीठाने २८ मार्च रोजी दिलेल्या निर्णयात म्हटले आहे. आमच्या मते, मेडिक्लेम विम्याच्या अंतर्गत दावेदाराला मिळालेल्या कोणत्याही रकमेची कपात अनुज्ञेय नाही, असे न्यायालयाने निकालात म्हटले आहे.

विविध एकल आणि विभागीय खंडपीठांचे वेगवेगळे मत असल्याने हा मुद्दा पूर्णपीठाकडे पाठवण्यात आला. मोटार अपघात दावे न्यायाधिकरण केवळ अधिकारप्राप्त नाही, तर न्याय्य भरपाई देण्यास बांधील आहे, असे सर्वोच्च न्यायालयाने दिलेल्या निकालाचा संदर्भ देताना पूर्णपीठाने म्हटले. विम्यापोटी मिळालेली रक्कम ही विमाधारकाने कंपनीसोबत केलेल्या कराराच्या जबाबदाऱ्यांमुळे आहे, असे त्यात म्हटले आहे.



विमा हप्ता भरल्यानंतर हे स्पष्ट होते की विम्याच्या परिपक्वतेनंतर किंवा मृत्यूनंतर मृत्यूची पद्धत काहीही असली, तरी दावेदाराच्या वाट्याला फायदेशीर रक्कम जमा होईल, असे न्यायालयाने म्हटले आहे. मृत व्यक्तीने केलेल्या दूरदृष्टीचा आणि शहाणपणाच्या आर्थिक गुंतवणुकीचा फायदा घेतला जाऊ शकत नाही. ही कायद्याची निश्चित स्थिती आहे. वैद्यकीय खर्चापेक्षा जास्त आर्थिक भरपाई देण्याच्या मोटार अपघात दावे प्राधिकरणाच्या निर्णयाविरुद्ध न्यू इंडिया इन्शुरन्स कंपनी लि. ने दाखल केलेल्या अपिलावर सुनावणी करताना पूर्णपीठाने हा निर्णय दिला. (वृत्तसंस्था)

### तरतुदींचा अर्थ दावेदाराच्या बाजूने हवा

वैद्यकीय खर्चही मेडिक्लेम विम्याचा भाग म्हणून मिळालेल्या विम्याच्या रकमेमध्ये समाविष्ट आहे. कंपनीने म्हटले की, ही भरपाई दुप्पट होईल. वैद्यकीय खर्चाशी संबंधित मोटार वाहन कायद्यातील तरतुदींचा अर्थ दावेदाराच्या बाजूने लावला पाहिजे. कारण तो एक कल्याणकारी कायदा आहे, असा युक्तिवाद न्यायालयीन मित्र गौतम यांनी केला.

## अग्रलेख...

# संस्कार, समर्पण आणि सेवारूपाचे दर्शन

राष्ट्रनिर्माणाचे व्रत घेऊन गेल्या शतकभरापासून देशात समर्पितपणे समाजनिर्मितीचे अद्भुत कार्य करणाऱ्या राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या असंख्य सेवाकार्यांच्या शृंखलेतील एका अतूट धाग्याच्या निमित्ताने वर्षप्रतिपदेच्या दिवशी संघ आणि स्वयंसेवक यांच्यातील नात्याचे अनोखे दर्शन देशाला घडले. पंतप्रधान नरेंद्र मोदी नागपूरच्या संघ मुख्यालयास भेट देणार, संघाचे संस्थापक आणि आद्य सरसंघचालक डॉ. हेडगेवार यांच्या स्मृतिस्थळाचे दर्शन घेणार, द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजींच्या स्मृतीस अभिवादन करणार हे अधिकृतरीत्या जाहीर झाल्यापासून संघाच्या विरोधकांना आणि भाजपचा पाडाव करण्यासाठी देव पाण्यात घालून बसलेल्या अनेकांना, नव्या वर्षाच्या पहिल्याच दिवशी वैफल्याचे चटके सोसावे लागले असतील. या भेटीच्या निमित्ताने देशाचा पंतप्रधान व संघ यांच्यातील नात्याकडे वेगळ्या अपेक्षांनी पाहणाऱ्या अनेकांना काहीतरी वैचारिक खाद्य मिळणार अशी अटकळ बांधू पाहणाऱ्या अनेकांना दिवसाअखेरीस नैराश्यानेदेखील ग्रासले असेल, यात शंका नाही. अर्थात, पंतप्रधानांच्या संघ मुख्यालय भेटीकडे व माधव नेत्रालय या संघप्रणीत प्रकल्पाच्या पायाभरणी समारंभाच्या निमित्ताने पंतप्रधानांनी आपले संघासोबतचे नाते सुस्पष्टपणे देशासमोर मांडले आणि संघसंस्कारांचा अभिमानपूर्वक उल्लेख करून संघकार्याची स्तुती केल्याने आनंद व समाधान वाटलेल्या नागरिकांची संख्या अगणित असली, तरी नैराश्य आलेल्यांच्या मानसिकतेकडे दुर्लक्ष करून चालणार नाही. संघ आणि भाजपच्या नात्याविषयी किंवा संघाच्या शंभर वर्षांच्या स्वार्थनिरपेक्ष समाजसेवेसाठी व त्यातून राष्ट्रनिर्माणाच्या कार्याविषयी द्वेषमूलक भावनेने सातत्याने टीका करणाऱ्यांची मानसिकता ही त्यांच्या अपयशाची किंवा त्यांच्यातील मानसिक न्यूनगंडाची भावना असते, हे वारंवार स्पष्ट झाले असले, तरी त्यांच्या द्वेषभावनेतून व्यक्त होणारा विखार बेदखलही करता येणार नाही. गुढीपाडव्याच्या दिवशी माधव नेत्रालयाच्या पायाभरणी समारंभाच्या निमित्ताने पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी व्यक्त केलेल्या भावना हेच अनेकांच्या नैराश्याचेही कारण ठरले असावे. याच भेटीच्या निमित्ताने अशा अनेकांच्या अनंतकाळापासून प्रतीक्षित असलेल्या अपेक्षांचे प्रतिबिंब उमटेल व मोदी-संघ यांच्यातील नात्याविषयीच्या वावड्यांना नवे बळ मिळेल अशी अटकळ बांधली जात असताना, मोदी यांनी त्यांचा पूर्ण भ्रमनिरास केलाच, पण संघ व भाजप आणि सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत व पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्यातील संबंधांचे हळवे धागे हळुवार पण स्पष्टपणे देशासमोर उलगडून अशा अनेक वावड्या आणि शंका-संशयांना कायमचा पूर्णविराम दिला. इतकेच नव्हे, तर आपण संघाचे निष्ठावान स्वयंसेवक आहोत याची स्पष्ट शब्दांत जाणीव करून देताना, राष्ट्रभावनेच्या संस्काराचे बाळकडू संघाच्या शाखेतूनच मिळाल्याचा अभिमानास्पद उल्लेख करून संघाच्या राष्ट्रकार्यास एक प्रकारे संपूर्ण मान्यता मिळवून दिल्याने, संघाविषयी पसरविलेल्या संभ्रमाच्या जाळ्यात गुरफटलेल्यांच्या मनातील प्रश्नांची जळमटे कायमची दूर करण्याचे महत्त्वाचे कार्यदेखील पूर्ण झाले आहे.

आद्य सरसंघचालक डॉ. केशव बळीराम हेडगेवार यांची जयंती आणि राष्ट्रीय स्वयंसेवक संघाच्या गौरवशाली प्रवासाच्या शताब्दी वर्षाची आठवण करून देणाऱ्या माधव नेत्रालयाच्या पायाभरणी समारंभात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची उपस्थिती असणार व या निमित्ताने सरसंघचालक डॉ. मोहनजी भागवत व पंतप्रधान मोदी हे एका व्यासपीठावर एकत्र येणार असल्याने संघाशी संबंधित असलेल्यांच्या माना अभिमानाने उंचावल्या असतानाच, संघ-भाजपविषयीच्या विखाराने पछाडलेल्यांच्या मनात मात्र, वेगळ्याच भावना उचंबळून येत होत्या. समाजमाध्यमांवर त्याची पुसटशी चिन्हेही उमटू लागली होती. सरसंघचालकांची अलिकडील काही वक्तव्ये आणि भाजपच्या काही नेत्यांनी जाहीरपणे व्यक्त केलेले विचार यांचे या भावनांना अव्यक्त पाठबळ लाभल्यामुळे, या कार्यक्रमाच्या निमित्ताने एकाच मंचावर असेच काहीतरी घडणार अशी अटकळ बांधणाऱ्यांना एक तर संघ संपूर्ण समजला नाही आणि मोदी अजिबातच समजले नाहीत, हे पुरते स्पष्ट झाले. संघाच्या संस्कारातून घडलेल्या प्रत्येक स्वयंसेवकासाठी सरसंघचालकपदावरील व्यक्ती ही परम पूजनीयच असते, हे पंतप्रधानांनी आपल्या भाषणाच्या सुरुवातीसच केलेल्या विनम्र उल्लेखातून स्पष्टपणे अधोरेखित केले, तेव्हाच भ्रमनिरासाच्या भावनेने वैफल्याचा पुढचा टप्पा गाठण्यास सुरुवात केली असावी. पुढे आपल्या संपूर्ण भाषणात पंतप्रधानांनी राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे संस्थापक डॉ. हेडगेवार, द्वितीय सरसंघचालक माधवराव गोळवलकर गुरुजी यांच्या विचारांच्या आपल्यावरील प्रभावाची प्रचीती देत, भाषणाचे धागे गुंफले, तेव्हा समोर बसलेल्या श्रोतृवर्गाच्या मनात मोदी, संघ आणि संघकार्य यांच्याविषयीच्या अभिमानाने उंचीचा अंतिम स्तर गाठला असताना, मोदीविरोधकांचा मात्र मानसिक जळफळाट सुरू होता. संघाच्या स्थापनेपासून गेल्या शंभर वर्षांच्या वाटचालीत सुसंस्कृत समाजनिर्मितीच्या ध्येयाने सुरू असलेल्या स्वार्थनिरपेक्ष वाटचालीचा गौरवशाली उल्लेख करताना पंतप्रधानांनी या संघटनेच्या राष्ट्रनिर्मितीच्या कार्यातील सहभागाची जाणीवही देशाला करून दिल्याने, संघाविषयी विरोधकांनी पेरलेल्या संभ्रमातून अनेकांना मुक्ती मिळाली असेल, यातही शंका नाही. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ हा भारताच्या अमर आणि अभिमानास्पद संस्कृतीचा आधुनिक अक्षयवट असून तो राष्ट्राच्या चेतनेस सातत्याने ऊर्जा देत आहे, ही पंतप्रधानांची ग्वाही संघाविषयी सातत्याने संभ्रम पसरविण्याच्या प्रयत्नांस मिळालेले चोख उत्तर आहेच, पण शंभर वर्षांपूर्वी राष्ट्रीय चेतनेच्या संरक्षणासाठी व संवर्धनासाठी रुजू घातलेले हे बीज आता एक विशाल वटवृक्षात रूपांतरित झाला आहे, हे त्यांचे गौरवोद्गार म्हणजे संघकार्याच्या वाटचालीचा सन्मान ठरला आहे. जीवनाचे मोल हे त्याच्या कालावधीमध्ये नाही, तर उपयुक्ततेमध्ये आहे, हे गोळवलकर गुरुजींचे विचार उद्धृत करणाऱ्या मोदी यांना ऐकताना, त्यांच्या कारकीर्दीचे मर्मदेखील उपस्थितांना निश्चितच जाणवले असेल. स्वयंसेवक या नात्याने झालेले सेवाभावाचे संस्कार ही मोदी यांच्या कार्यशैलीची शिदोरी आहे. पारतंत्र्यांच्या काळातील स्वतंत्रता संग्रामातील संघाच्या भूमिकेवरून संभ्रम माजवून संघ-भाजपविद्वेषाची बीजे पेरण्याचा प्रयत्न काही मूठभर निराशाग्रस्तांकडून सातत्याने होत असतो. मोदी यांनी त्यांच्या भाषणातून दिलेल्या उत्तरातून या प्रश्नालाही कायमची मूठमाती मिळणार आहे. राष्ट्रीय गौरवाचा इतिहास लिहिला जात असताना, त्यामध्ये संघाचे योगदान अतुलनीय असे आहे आणि पारतंत्र्याच्या काळात देशातील जनतेची अस्मिताचिन्हे पुसून टाकण्याकरिता सातत्याने होणारे प्रयत्न हाणून पाडून सामाजिक अस्मिता चेतविण्याचे काम अविरतपणे करून संघाने भारतीयत्वाची सामाजिक जाणीव जिवंत ठेवली. सेवा हा संघाच्या संस्काराचे मूलमंत्र आहे, ही द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजींची शिकवण स्वतः आचरणातून अव्यक्तपणे देशाला संघकार्याची ओळख करून देण्याचा पंतप्रधानांच्या भाषणातून, भाजपने गेल्या दहा वर्षांत सत्ताकाळातील सेवाभावाने सुरू केलेल्या कामगिरीचाही आढावा घेतला. संघटन, समर्पण आणि सेवा ही संघकार्याची त्रिवेणी विकसित भारताच्या भविष्यातील वाटचालीची ऊर्जा ठरणार आहेच, पण विकसित भारताची वाटचाल ही संघाच्या इतक्या वर्षांच्या तपश्चर्येची फलश्रुती आहे, याची ग्वाही देत त्यांनी सत्तेच्या माध्यमातून राबविलेल्या सेवाभावाचे सारे श्रेयदेखील संघ आणि संघ संस्कारांस समर्पित करून एका सुसंस्कृत संघ स्वयसेवकाच्या व्यक्तिमत्त्वाचे दर्शन घडविले. भाजप आणि संघ यांच्यातील नात्यावर प्रश्नचिन्हे उमटविणाऱ्या, नेत्यांच्या नैमित्तिक वक्तव्यांचा आधार घेत नात्यामध्ये मिठाचे खडे टाकू पाहणाऱ्या आणि संघ-भाजपचा प्रभाव संपविण्याचे मनातले मांडे केवळ आभासी मंचांवर व्यक्त करीत आयुष्य वाया घालविणाऱ्या निष्क्रिय विचारवंतांना या एका कार्यक्रमातून मिळालेली मात्रा काहीशी कडवट लागली असेल, पण प्रामाणिकपणे ती मात्रा पचविण्याचा प्रयत्न केला, तर मनाला झालेला विकाराचा आणि विखाराचा आजार बरा करण्यासाठी ती पुरेशी ठरेल, यात शंका नाही.

## आंतरराष्ट्रीय

# नेपाळमध्ये पुन्हा राजेशाही येईल?

**प्रा. जयसिंग यादव**

नेपाळमध्ये राजेशाही लागू करण्याची मागणी प्रामुख्याने राष्ट्रवादी राष्ट्रीय प्रजातंत्र पक्षाकडून करण्यात येत आहे. सध्या नेपाळ आणि भारतातही धर्म आणि संस्कृतीचे पुनरुज्जीवन होताना दिसत आहे. नेपाळला २००७ मध्ये धर्मनिरपेक्ष राष्ट्र घोषित करण्यात आले. परिणामी, २००८ मध्ये तिथली राजेशाही व्यवस्था संपुष्टात आली. या चळवळीला 'राष्ट्र, राष्ट्रवाद, धर्म, संस्कृती आणि नागरिकांच्या रक्षणासाठी मोहीम' असा दर्जा दिला जात आहे. २००८ मध्ये नेपाळ प्रजासत्ताक बनल्यापासून तिथले व्यापारी दुर्गा प्रसाई चळवळीला चालना देत आहेत. एके काळी प्रसाई यांचे पंतप्रधान प्रचंड आणि ओली यांच्याशी जवळचे संबंध होते; पण आता ते त्यांचे कठोर टीकाकार आहेत. त्याच वेळी राजेशाहीच्या काळात गृहमंत्री राहिलेल्या कमल थापा यांनी हिंदू राष्ट्राच्या मागणीसाठी नवी आघाडी स्थापन केली आहे. यापूर्वीचे राजे ज्ञानेंद्र शहा यांनीही अचानक सक्रिय होऊन सार्वजनिक कार्यक्रमात सहभागी होण्यास सुरुवात केली आहे. ते मंदिरात होणाऱ्या पूजेला हजेरी लावत आहेत. खरे तर नेपाळच्या कम्युनिस्ट पक्षाने चीनच्या मांडीवर बसून भारतविरोधी मोहीम चालवल्याने देशातील जनता नाराज आहे. राजेशाहीबरोबरच हिंदू राष्ट्राच्या पुनर्स्थापनेची मागणीही जोर धरू लागली आहे. नेपाळमधील मुस्लिमही देशाला हिंदू राष्ट्र बनवण्याच्या बाजूने आहेत. नेपाळला हिंदू राष्ट्र बनवण्याच्या मागणीच्या समर्थनार्थ होणाऱ्या निदर्शनांमध्ये सहभागी असलेले राप्ती मुस्लिम सोसायटीचे अध्यक्ष अमजद अली यांनी इस्लामला वाचवण्यासाठी हे आवश्यक असल्याचे म्हटले आहे.

हिंदू राष्ट्राचा दर्जा रद्द केल्यानंतर नेपाळमध्ये ख्रिश्चन मिशनरी अधिक सक्रिय झाल्याचे काही नेत्यांचे मत आहे. मिशनरी या परिस्थितीचा फायदा घेऊन लोकांचे धर्मांतर करत आहेत. माओवाद्यांच्या मुस्लिम मुक्ती मोर्चालाही मिशनऱ्यांचा वाढता प्रभाव मान्य नाही. राष्ट्रवादी मुस्लिम आघाडीलाही देशाची धर्मनिरपेक्ष ही ओळख नको आहे. ८० टक्के मुस्लिम जनता देशाची हिंदू अस्मिता पुनर्स्थापित करण्याच्या बाजूने आहे. नेपाळला पुन्हा हिंदू राष्ट्राचा दर्जा मिळावा, यासाठी राजेशाही समर्थक राष्ट्रीय प्रजातंत्र पक्ष आणि अनेक हिंदू संघटना अनेक दिवसांपासून मोहीम राबवत आहेत. नव्या संविधानात देशाची धर्मनिरपेक्ष ओळख संपुष्टात आणण्याबाबत राजकीय पक्षांमध्ये एकमत झाले. तेव्हापासून ही मागणी अधिक तीव्र झाली आहे. देशातील सर्व समाजाचे लोक मानतात की हिंदू अस्मितेच्या पुनर्स्थापनेशिवाय पर्याय नाही. धर्मनिरपेक्षता हे हिंदू-मुस्लिम ऐक्य तोडण्याचे षडयंत्र आहे. खरे तर सात वर्षांपूर्वी बुटवलमध्ये जुने राष्ट्रगीत गाताना दोन नेपाळी तरुणांना पोलिसांनी अटक केल्यापासून हे राष्ट्रगीत संपूर्ण नेपाळमध्ये सुरू असल्याने हिंदू राजवट बहाल करण्याची मागणी जोर धरू लागली आहे. नेपाळ हा हिमालयाच्या कुशीत वसलेला एक छोटा आणि सुंदर देश आहे. चीनच्या सततच्या वाढत्या हस्तक्षेपामुळे विशेषतः हिंदू धर्मीयांचा असलेला हा देश आपली मूळ संस्कृती आणि स्वातंत्र्य गमावून बसेल असे लोकांना वाटू लागले आहे. नेपाळ हा दक्षिण आशियातील देश आहे. त्याच्या उत्तरेला तिबेट हा चीनचा स्वायत्त प्रदेश आहे, जो चीन गिळंकृत करत आहे. दक्षिण-पूर्व आणि पश्चिमेला भारताची सीमा आहे. नेपाळची ८५.५ टक्के लोकसंख्या हिंदू आहे. त्यामुळे टक्केवारीच्या दृष्टीने हा सर्वांत मोठा हिंदू धार्मिक देश आहे. नेपाळमध्ये दीर्घकाळ राजेशाही होती; परंतु राजेशाहीच्या रक्तरंजित आणि दुःखद अंतानंतर माओवादी नेते प्रचंड हे पंतप्रधान झाल्यानंतर सरंजामशाही आकुंचन पावू लागली आणि १८ मे २००६ रोजी राजाचे अधिकार कमी करून आणि नेपाळला धर्मनिरपेक्ष देश घोषित करून माओवादी लोकशाहीला सुरुवात झाली. तेव्हापासून चीनच्या हस्तक्षेपामुळे या ठिकाणची मूळ रचना बदलण्याबरोबरच भारतासोबतचे संबंधही बिघडू लागले.

पंतप्रधान असताना के. पी. शर्मा ओली यांनी चीनच्या दबावाखाली भारतासोबतच्या वैमनस्यपूर्ण संबंधांचा पाया तर घातलाच; शिवाय चीनच्या सैन्याला मोकळे हात देऊन जमीनही गमावली. नेपाळमध्ये लोकशाही व्यवस्था प्रस्थापित झाली आहे; पण कमकुवत नेतृत्वामुळे हा देश आपले अस्तित्व गमावण्याच्या मार्गावर आहे. आता पुन्हा ओली पंतप्रधान झाल्याने चीनचा हस्तक्षेप वाढणार आहे. नेपाळ आणि भूतानमधील १८५० किलोमीटर लांबीची सीमारेषा कोणत्याही मजबूत गस्तीशिवाय खुली आहे. असे असूनही चीन, पाकिस्तान आणि बांगलादेशसारखा वाद तेथे नाही. पासपोर्टशिवाय हालचाली सुरू आहेत. जवळपास ६० लाख नेपाळी भारतात काम करून आपला उदरनिर्वाह करत आहेत. नेपाळमध्ये लोकशाहीच्या नावाखाली लोकांना फसवल्यासारखे वाटू लागले आहे. राजेशाही आणि हिंदू राष्ट्राच्या मागणीने हिंसक आंदोलनाचे रूप धारण केले आहे. लोक रस्त्यावर उतरले असून सुरक्षा दलांशी चकमक होत आहे. अलिकडेच नेपाळची राजधानी काठमांडूसह अनेक भागांमध्ये आंदोलक आणि सुरक्षा दलांमध्ये चकमक झाली. राजेशाही संपली आणि नेपाळमध्ये लोकशाही प्रस्थापित झाली तेव्हा लोकांची अपेक्षा होती की अनेक चांगल्या गोष्टी घडतील; परंतु गेल्या १६ वर्षांमध्ये नेपाळमध्ये दहा सरकारे बदलली आहेत. खुर्ची आणि युतीच्या वादात जनहिताच्या योजना राबवता आलेल्या नाहीत. सरकारमध्ये भ्रष्टाचाराने कळस गाठला असून चीनही विकासाच्या नावाखाली नेपाळचे शोषण करत आहे. या देशाचे भारतासोबतचे संबंधही बिघडू लागले आहेत. आता लोकांचा असा विश्वास आहे, की मजबूत केंद्रीय नेतृत्व आणि लोककल्याण केवळ राजेशाहीतच शक्य आहे. नेपाळच्या इतिहासात असे अनेक राजे होते, ज्यांच्या कारकीर्दीत जनता समाधानी होती. तेव्हा लोकांच्या सुरक्षिततेचीही काळजी घेण्यात आली. लोक नेपाळचा राजा वीरेंद्र यांनाही चांगला शासक मानत. १९ फेब्रुवारी रोजी पूर्वीचे राजा ज्ञानेंद्र शहा त्रिभुवन आंतरराष्ट्रीय विमानतळावर पोहोचले. त्याच्या समर्थनार्थ लोकांनी मोटारसायकल रॅली काढली. 'राजे या, देश वाचवा' हा संदेश त्यांनीच दिला. नेपाळ हे हिंदू राष्ट्र मानले जात होते. राजेशाहीच्या काळात हिंदू राष्ट्र अशी नेपाळची ओळख होती; मात्र येथे लोकशाही आल्यानंतर कम्युनिस्टांचे वर्चस्व निर्माण झाले. राजेशाहीमध्ये स्थिरता होती. नेपाळमधील बहुसंख्य हिंदूंना आपली संस्कृती केवळ राजेशाहीतच जतन केली जाऊ शकते, असे वाटते.

नेपाळमध्ये १९९० मध्ये लोकशाहीची चळवळ सुरू झाली. यानंतर तेथे बहुपक्षीय व्यवस्था सुरू झाली. राजा महेंद्र शहा यांच्यानंतर त्यांचा मुलगा वीरेंद्र शहा यांनी सरकारच्या समन्वयाने घटनात्मक सम्राट म्हणून काम केले. २००१ मध्ये राजघराण्याचे हत्याकांड झाले आणि राजा वीरेंद्र शहा यांच्यासह कुटुंबातील अनेक जण मारले गेले. यानंतर ज्ञानेंद्र शहा यांनी गादी हाती घेतली. २००५ मध्ये त्यांनी देशातील लोकशाही संपुष्टात आणून लष्करी राजवट लागू केली. यानंतर त्यांच्या या निर्णयाला विरोध होऊ लागला. २००८ मध्ये राजेशाही संपुष्टात आली आणि नेपाळला प्रजासत्ताक घोषित करण्यात आले. सध्याची परिस्थिती पाहता राजेशाही परत येणे शक्य वाटत नाही; मात्र जनतेची नाराजी अशीच सुरू राहिली आणि पारंपरिक राजकीय पक्षांनी स्वत:मध्ये सुधारणा न केल्यास या आंदोलनाला आणखी बळ मिळू शकते. नेपाळसाठी खरा प्रश्न राजे राजकारणात परत येतील की नाही हा नाही, तर नेपाळची सध्याची राजकीय व्यवस्था जनतेचा विश्वास जिंकू शकेल का हा खरा प्रश्न आहे.

## वेध

**पुंडलिक आंबटकर**

# हिंदू राष्ट्राचे पाईक आम्ही...

हिंदू धर्म प्राचीन आहे. पूर्वीची सनातन व्यवस्था म्हणजेच हिंदू धर्म होय. निसर्गाचे काही नियम असतात आणि ते सनातन असतात. अर्थातच शाश्वत असतात आणि काळ बदलला तरी निसर्गाचे शाश्वत स्वरूप बदलत नाही. या नियमाचे पालन करणे म्हणजेच सनातन धर्म होय. इतिहास साक्षी आहे, हिंदूंनी कधीच कुणावर अन्याय अथवा अत्याचार केलेला नाही. तरीही भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्यास हिंदूंचाच विरोध आहे. भारताला मातृभूमी मानणारा आणि आपल्या महापुरुषांप्रति आदर बाळगणारा प्रत्येक व्यक्ती हिंदू असल्याचे धर्मवेत्त्यांनी मानले आहे. त्यामुळे भारतास हिंदू राष्ट्र घोषित केले तर इतरांवर अन्याय होईल, ही भीती निराधार आहे. केवळ राजकीय लाभासाठी ही भीती इतर धर्मीयांना दाखवून सत्तेसाठी हे लोक आपल्या भावी पिढ्यांचा बळी देत आहे. भविष्यात हिंदू आपल्याच भूमीत अल्पसंख्यक होण्याचा धोका आहे. हिंदू अल्पसंख्यक झालाच तर त्याला आपल्याच भूमीतून बहिष्कृत व्हावे लागेल आणि तेव्हा हिंदू राष्ट्राला विरोध करणाऱ्यांच्या पिढ्यांनाही लाचारीचे जीवन जगावे लागेल! हिंदू धर्मात पंथवादाला थारा नाही. त्यामुळे भारत हिंदू राष्ट्र घोषित झाल्यास 'हिंदू' हीच ओळख सर्वांची उरेल आणि जातिव्यवस्था कमकुवत होत जाईल. अखंड भारताचा विस्तार इंडोनेशियापर्यंत होता. आजही इंडोनेशियात हिंदूंच्याच देवी-देवतांची पूजा केली जाते. 'आम्ही आमचे पूर्वज बदलले, संस्कृती नाही' असे तेथील सत्ताधारी सांगतात. परंतु, आता परिस्थिती खूप भिन्न आहे. २२ देशांचा समावेश अखंड भारतात होता. तब्बल २४ वेळा भारताची फाळणी झाली आणि तरीही हिंदूंचे हक्काचे राष्ट्र नाही! हिंदू मुळातच सहिष्णू व परोपकारी असल्याने सर्वधर्मसमभाव अथवा धर्मनिरपेक्षतेची गरज उरत नाही. परंतु, केवळ राजकारणासाठी या शब्दांचा वापर वारंवार केला जातो. १२ व्या शतकात मध्य आशियात चंगेज खान नावाचा मंगोलियन शासक होऊन गेला. त्याने जवळपास ४ कोटी हत्या केल्या. चंगेज खानाने मुस्लिम धर्माचा नायनाट करण्याचा आटोकाट प्रयत्न केला.

मात्र, आज चंगेज खानाचेच वंशज मुस्लिम आहेत! भारतातील मुस्लिम महिलांना सर्व प्रकारचे अधिकार प्राप्त आहे. परंतु, अफगाणिस्तान, इराण अथवा पाकिस्तानातील महिलांवर प्रचंड निर्बंध लादले जातात. अशाही परिस्थितीत भारतातील राजकारणी गठ्ठा मते पदरात पाडून घेण्यासाठी देश आणि देशवासीयांशी बेईमानी करतात. मुंबईवरील २६/११ चा हल्ला पाकिस्तानी आतंकवाद्यांनी नाही, तर भारतीयांनीच केल्याचे सांगतात! आज भारतात २२ कोटींपेक्षा जास्त मुस्लिम राहतात. २०४७ पर्यंत मुस्लिमांची संख्या ३५ कोटींवर जाण्याची शक्यता आहे. हिंदूंनी आपसी मतभेद आणि सत्तेचे राजकारण सोडले नाही तर इतिहासाची पुनरावृत्ती होणारच नाही, कशावरून? त्यामुळे २०४७ पर्यंत भारताला विश्वगुरुपदी आरूढ करतानाच हिंदू राष्ट्र घोषित करणे काळाची गरज आहे. मोहंमद बिन कासिम याने ७ व्या शतकात भारतावर आक्रमण केले. परंतु, हिंदुस्थानात त्यावेळी काश्मीरचे ललितादित्य, राजपुतानामध्ये बाप्पा रावल, चालुक्यचे विक्रमादित्य, नागभट्ट यशोवरमान आणि कैक हिंदू राजांनी ३०० वर्षे यवनी सत्तेवर अंकुश ठेवला. पण, नंतर आपसी मतभेद भोवले. मोहम्मद गजनीने १० व्या शतकात १७ वेळा भारतावर हल्ला केला. ११ व्या शतकात मोहम्मद घोरीने आक्रमण केले. पृथ्वीराज चव्हाण यांनी त्याला तब्बल १६ वेळा पराभूत करूनही वारंवार जीवदान देण्याचा मूर्खपणा केला. शेवटच्या लढाईत मोहम्मद घोरी जिंकला आणि त्याने पृथ्वीराज चव्हाण यांना हाल हाल करून मारले. भारत हिंदू राष्ट्र घोषित झाल्यास धर्माची अस्मिता वाढेल आणि पर्यायाने संस्कृती, धर्म, धर्माचरण आणि अभिमान वाढेल. परंतु, तरीही हिंदू राष्ट्राला विरोध केला जातो! १९७१ च्या मुक्ती युद्धात भारताच्या मदतीने बांगलादेशने पाकिस्तानला धूळ चारली. त्यावेळी काही उत्साही स्वयंसेवक रा. स्व. संघाचे द्वितीय सरसंघचालक गोळवलकर गुरुजींना ही वार्ता देण्यासाठी गेले. परंतु, गुरुजींनी याचा भारताला काहीही फायदा होणार नसल्याचे सांगून बांगलादेश भविष्यात भारताशी इमान राखणार नाही, अशी भविष्यवाणी केली. आज गुरुजींचा एकेक शब्द खरा ठरत आहे. आजही भारतातील मुसलमानच सर्वाधिक सुरक्षित आहे. कारण, सहिष्णुता हिंदूंच्या रक्तातच आहे. त्यामुळे भारताला हिंदू राष्ट्र घोषित करण्यास हरकत नाही. हिंदू राष्ट्राच्या समर्थनार्थ चळवळ उभारण्याची वेळ आलेली आहे. प्रत्येक देशप्रेमी नागरिकांनी यासाठी पुढाकार घेतला पाहिजे. अन्यथा इतिहास आपल्याला कधीच माफ करणार नाही.

९८८१७१६०२७

## इतस्तत:

**दत्तात्रेय आंबुलकर**

# अशा 'आशां'मुळेच आशा...

स्वत:च्या समस्यांपासून सुटका झाल्यानंतर, त्यातूनच प्रेरणा घेत इतरांचे दु:ख कमी करण्याचा प्रयत्न करणे महत्त्वाचे असते. मराठवाड्यातील एकल महिला संघटनेशी जोडलेल्या असंख्य महिला, आज हेच कार्य करत आहेत. यामध्ये आशालता पांडे यांचे कार्य लाखमोलाचे. आशालता यांच्या माध्यमातून एकल महिला संघटनेच्या कार्याचा घेतलेला आढावा.

मराठवाड्याच्या बीड जिल्ह्यातील अंबेजोगाई हे शहर प्रसिद्ध आहे. तेथील मंदिरांमुळे दूरवरून भाविक मंडळी, तिथे दर्शनासाठीं येत असतात. गेल्या ५० वर्षांत अंबेजोगाईला एक आणखी विशेष वारसा लाभला, तो 'शैक्षणिक पंढरी' होण्याचा. अल्पावधीतच या शहराने दर्जेदार शिक्षणामुळे, उभ्या महाराष्ट्रात आपल्या कार्यकर्तृत्वाचा ठसा उमटवला. अशा या अंबेजोगाईच्या नावलौकिकात आता वैशिष्ट्यपूर्ण भर पडली, ती 'आशा' उपक्रमामुळे. योगायोग म्हणजे अंबेजोगाईच्या या आशादायी उपक्रमाची प्रयत्नशील सुरुवात करणाऱ्या महिलेचे नावसुद्धा आशाच आहे. आशालता पांडे या अंबेजोगाईच्या. वयाच्या अवघ्या १६व्या वर्षी त्यांचे लग्न झाले. त्यानंतर दोन मुलींसह आशालता यांना एकटे सोडून, त्यांचा नवरा घर सोडून गेला तो कधीही परत न येण्यासाठीच. परिणामी, 'आता तुला कसे वाटते', इथपासून ते 'आता तुझे कसे होणार?' या आणि अशा प्रश्नांचा ससेमिरा त्यांच्यामागे लागला, तो कायमचाच. यावर तोडगा व उदरनिर्वाहाचे साधन म्हणून, आशालता पांडे यांनी 'आशा' कर्मचारी म्हणून काम करण्यास सुरुवात केली. काम तसे आव्हानपर होतेच. मात्र, त्यांनी आपली जिद्द आणि प्रयत्न सुरूच ठेवले. तशातच त्यांची गाठ चित्राताई या समवयीन व समदु:खी सखीशी पडली. चित्राताईंची ओळख व सहवास यांतून, आशालतांच्या जीवनाचे चित्रच पालटून गेले. त्यांच्या जीवनाला नवे वळण आणि दिशा मिळाली होती. चित्राताईंच्या प्रेरणा आणि मार्गदर्शनामुळे आशालता, महिला स्वयंसाहाय्यता बचतगटाच्या सदस्य, कार्यकर्त्या झाल्या. महिला स्वयंसाहाय्यता बचतगटाच्या व्यवस्थेतून, आशालता यांना 'महिला मूलभूत नेतृत्व क्षमता विकास' अभ्यासक्रमात प्रवेश मिळाला. या अभ्यासक्रमाचा मुख्य फायदा म्हणजे, आशालता यांना त्यांच्यासारख्या महिलांच्या हक्कांची जाणीव झाली. पतीच्या मिळकतीत त्यांचा कायदेशीर वाटा त्यांना हक्क स्वरूपात मिळू शकतो, हे सुद्धा समजले.



प्रत्यक्षात आशालता यांच्या सासऱ्यांकडे पिढीजात घर होते. आशालता यांना या घरामध्ये रीतसर हिस्सा हवा होता, जो त्यांना कायद्याने मिळाला. त्यांच्या यासाठीच्या प्रयत्नांना, मराठवाड्यात महिला जागृती व हितरक्षणासाठी काम करणाऱ्या व विविध कारणांनी एकाकीपणे जीवन जगणाऱ्या 'एकल महिला संघटने'चे विशेष साहाय्य व मार्गदर्शन लाभले. या संघटनेच्या सदस्य महिलांची मराठवाड्यातील संख्या सुमारे २२ हजार आहे, हे यासंदर्भात उल्लेखनीय आहे. या सदस्य महिलांना संस्थेतर्फे त्यांच्या एकाकीपणाच्या पृष्ठभूमीवर, स्वावलंबनासह सन्मानाने जगण्यासाठी हरसंभव मदत केली जाते.

'एकल महिला संघटने'ची स्थापना मराठवाड्यात सुमारे दहा वर्षांपूर्वी झाली. संघटनेचे कार्यक्षेत्र प्रामुख्याने मराठवाड्यातील बीड, लातूर, नांदेड व धाराशिव या जिल्ह्यांपुरते आहे. आशालता या संस्थेच्या महिला अत्याचारविरोधी विभागासाठी सक्रियपणे कार्यरत असून, त्यादृष्टीने त्यांचे महिला जागृतीचे काम सुरू आहे. संस्थेच्या कार्यकर्तृत्वामुळे व सक्रिय प्रयत्नांतून महिलांवरील अत्याचाराच्या घटनांविरोधात आवाज उठविण्याबरोबरच महिलांना मार्गदर्शन करणे, त्यांना सामाजिक अवहेलनेपासून मुक्तता देणे, कौटुंबिक हिंसाचारप्रसंगी संरक्षण व मार्गदर्शन करणे, कायदेशीर मदत उपलब्ध करून देणे, गरजूंच्या निवासाची व्यवस्था करणे व या महिलांना स्वतःच्या पायावर उभे करण्यासाठी रोजगार-स्वयंरोजगारविषयक मदत व मार्गदर्शनही केले जाते. आजमितीस संस्थेशी संबंधित सुमारे ५०० संलग्न संस्था, महाराष्ट्र व राजस्थानमध्ये कार्यरत आहेत. या संस्थांना स्थानिक स्वयंसेवी संस्थांचीही साथ मिळत असते. संस्थेतर्फे 'पीडित महिलेच्या प्रश्नांची महिलांकरवी सोडवणूक' हे ध्येयवाक्य निश्चित करण्यात आले असून, त्याची प्रभावीपणे अंमलबजावणी सुरू आहे. याचा लाभही संबंधित महिलांना होत आहे, हे विशेष. याच प्रयत्नांचा एक भाग म्हणून, महिला सक्षमीकरण प्रबळ करण्याच्या उद्देशाने 'महिला नेतृत्व सक्षमीकरण' हा उपक्रम विशेषत्वाने राबविण्यात येत आहे. संस्थेतर्फे 'महिलांद्वारा महिलांचे नेतृत्व' या विषयावरील विशेष प्रशिक्षण आयोजित केले जाते. गेल्या सुमारे दहा वर्षांत या नेतृत्व विकासविषयक प्रशिक्षणाचा लाभ सुमारे ६९ टक्के सदस्य महिलांनी घेतला असून, त्याद्वारे महिलांमधूनच सक्रिय नेतृत्वाची एक मोठी फळीच तयार झाली आहे. यामध्ये ग्रामीण व मागासवर्गीय समाजातील महिलांची संख्या मोठी आहे. बालपणापासून वा प्रसंगी लग्न झाल्यानंतरही विविध प्रकारे संधी नाकारल्या जाण्यापासून, वाऱ्यावर सोडल्यागत जीवनाला एकाकीपणे सामोरे जाणाऱ्या या महिलांमधून आता कार्यरत व करारी नेतृत्व पुढे येत आहे.

महिला नेतृत्व क्षमता विकास उपक्रमाला मिळणारा वाढता प्रतिसाद आणि त्याचे तळागाळातील गरजू महिलांवर होणारे सकारात्मक परिणाम पाहता, या अभ्यासक्रमाला अधिक व्यापक व परिणामकारक बनविण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत. त्यानुसार या अभ्यासक्रमाची नव्याने रचना करण्यात आली आहे. त्यानुसार आता महिला नेतृत्व क्षमता विकास अभ्यासक्रमाला महिलांच्या मूलभूत व कायदेशीर हक्कांप्रति जनजागृतीच्या माध्यमातून प्रबोधन करणे, त्याची अंबलबजावणी करण्यासाठी मार्गदर्शकांना प्रशिक्षित करणे, महिलांना आपल्या अडचणी व व्यथा मांडण्यासाठी त्यांना संवादविषयक प्रशिक्षण देणे, त्यांना अधिक साक्षर करणे, आर्थिक व्यवहारांची मूलभूत माहिती देणे, महिला सुरक्षाविषयक विविध मुद्यांसंदर्भात जागृती करून, त्यानुसार कृती करणे इ. विविध मुद्यांचा समावेश करण्यात आला आहे. कधी घरगुती व कौटुंबिक स्तरावर विविध समस्यांना सामोरे जावे लागलेल्या राजस्थानच्या ग्रामीण भागातील टीना रावत यांनी, महिलांपुढे उभ्या ठाकणाऱ्या अत्याचाराच्या समस्यांचा सामना करण्यासाठी जिद्दीने पदवीचे शिक्षण आणि त्यानंतर कायद्यातील पदवी घेतली. आज त्या राज्याच्या विभिन्न भागांत केवळ महिला अत्याचाराप्रकरणीच वकिली करत असून, अशा महिलांना न्यायालयातून त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी कसोशीने प्रयत्न करतात. एका महिलेच्या तक्रारप्रकरणी न्यायनिवाडा करताना स्थानिक न्यायालयाने, टीना रावत यांची जिद्द आणि प्रयत्न म्हणजे घुंघटपासून काळ्या कोटापर्यंतचे मोठे परिवर्तन असल्याचे आवर्जून नमूद केले आहे. 'एकल महिला संघटने'ची स्थापना झाल्यापासून या संघटनेने गेल्या दशकाभरात, महाराष्ट्र व राजस्थानातील सुमारे २५० तालुक्यांपर्यंत आपल्या कामाचा विस्तार केला आहे. या क्षेत्रातून संस्थेने १ हजार, ६०० महिलांना नेतृत्व विकासाचे प्रशिक्षण दिले आहे. याचा लाभ, तीन हजारांहून अधिक गावांमधील गरजू महिलांना मिळाला आहे.

(लेखक एचआर व्यवस्थापन सल्लागार आहेत.)

९८२२८४७८८६

## प्रदूषणाचा भस्मासुर थांबवायला हवा!

स्विस संस्था आयक्यूएआरने जागतिक प्रदूषणावर ११ मार्च २०२५ रोजी एक अहवाल प्रसिद्ध केला. हा अहवाल भारतासाठी धक्कादायक आहे. कारण या अहवालानुसार जगातील सर्वाधिक प्रदूषित २० शहरांत १३ शहरे भारतातील आहेत. या शहरांत वातावरणातील प्रदूषणकारी घटक म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पीएम - २.५ कणांचे प्रमाण ५३.३ मायक्रोग्राम क्यूबिक मीटर या पातळीवर आले असून ते आरोग्य संघटनेने निर्धारित केलेल्या सुरक्षेच्या पातळीपेक्षा दहापटीने अधिक असल्याचे दिसून आले. स्विस संस्थेचा हा अहवाल देशातील नागरिकांची झोप उडवणारा आहे, कारण आज देशातील सर्वच महत्त्वाची शहरे प्रदूषणाने गुदमरत आहेत. त्या शहरात राहणाऱ्या नागरिकांचे जीवन प्रदूषणामुळे धोक्यात आले आहे. स्विस संस्थेने जाहीर केलेला हा अहवाल म्हणजे धोक्याची घंटा आहे. वाढते प्रदूषण कमी करण्यासाठी वेळीच ठोस उपाय करायला हवेत. कारखान्यातून बाहेर पडणाऱ्या धुरातून प्रदूषणकारी घटक कमी करण्यासाठी अत्याधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करायला हवा. दगड खाणींवर नियंत्रण आणायला हवे. वाहनांची संख्याही कमी करायला हवी. प्रसंगी सम-विषमसारखे कठोर निर्णय घ्यायला हवेत. युरोपीय देशात प्रदूषण कमी करण्यासाठी काय उपाययोजना केले जातात याचा अभ्यास करायला हवा. नागरिकांनी सार्वजनिक वाहतूक व्यवस्थेचा अधिकाधिक वापर केला पाहिजे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

●● ●●

## वाचक पत्रे

## अपत्यच नको म्हणणे चुकीचे

दोन पिढ्यांचा आचारविचार, आर्थिक बाब यात फरक राहणारच. आमच्या लहानपणी प्रत्येक स्त्रीला आठ दहा मुले राहत. गोकुळ हे संसाराचे भूषण होते. शेती मुख्य व्यवसाय असल्यामुळे खाण्याची कमतरता नव्हती. नणंद-भावजय, दीर-वहिनी, जावा-जावा, सासा-सुना नाते टिकून होते. नात्यांची समृद्धी होती. कुटुंब नियोजनामुळे ४-३-२-१ आता अपत्यच नको म्हणतात. काही जण लग्न करतात, काही रिलेशनशिपमध्ये राहतात. युवा पिढी म्हणते स्पर्धेचे युग आहे. मोलकरीण सुद्धा पंधरा दिवस आली नाही तर आम्ही दुसरी ठेवतो. हेच प्रकार नोकरीत लगेच दुसरा कर्मचारी ठेवतात. पुन्हा नोकरी मिळेलच याची शाश्वती नाही. पूर्वी एकत्र कुटुंब पद्धती होती. मुलांमध्ये मुले सहज वाढत. आता विभक्त कुटुंब पद्धती आहे. कुणाच्या भरवशावर मुले ठेवणार? सर्वांनाच आजी, आजोबा असतात किंवा सांभाळतील असे नाही. लहान मुलाला सांभाळण्यासाठी बाई ठेवली तर ती मुलाचे रक्त काढते, त्याचे दूध -जेवण स्वतः घेते, त्यांना झोपवून बाहेर जाते वगैरे प्रकार ऐकतो. त्यामुळे बाई ठेवायला मन धजावत नाही. मुलगा असो व मुलगी त्यांना पळवून नेणे, खंडणी मागणे, गैरवर्तणूक त्यामुळे अपत्य म्हणजे जीवनाला आनंद देणारी गोष्ट नसून काळजीचा विषय वाटतो. मुले नोकरीमुळे लांब राहतात त्यामुळे म्हातारपणीची काठी, आधार म्हणणे चुकीचे आहे. आता मुलांना वंशवृद्धी यापेक्षा करीअर महत्त्वाचे वाटते. त्यामुळे हिंदूंची संख्या कमी होत आहे. काही जाती अल्पसंख्यक होऊं पाहतात. स्वातंत्र्यासाठी, संसारासाठी पाठ फिरविणारी पिढी इतिहासजमा होत आहे. मी, माझे सुख, करीअर, पैसा, समाजात नाव कमावणे थोडक्यात आत्मकेंद्रित जीवन जगण्याकडे कल आहे. मूल म्हणजे प्रेमाचे प्रतीक, संसारातील आनंद न वाटता जीवनातील अडचण घोड वाटते.

**निर्मला गांधी**/९११२२७५२८४

●● ●●

## हिंदू धर्माचे ऐश्वर्य

जगात सध्या सनातन हिंदू धर्माबद्दल प्रचंड चर्चा आणि उत्सुकता जागृत झाली आहे. प्रयागराज येथील १४४ वर्ष म्हणजे दर १२ वर्षांनंतर १ कुंभ असे १२ कुंभ झाल्यानंतर हा योग आला होता म्हणून याला महाकुंभ असे म्हणले जाते. कुंभ काळात ४२ देशांतील तब्बल ६६ कोटी हिंदूंनी पवित्र स्नान करून स्वत:ला पावन करून घेतले. मूलतः हिंदू धर्माचे हे ऐश्वर्य दर्शन होते. कारण न भूतो न भविष्यति असा हा श्रद्धा आणि भक्तीचा योग पुन्हा होणे नाही. धर्म हा आस्था आणि आचरणचा विषय असल्यामुळे आपल्या सनातन धर्मात सवंग जाहिरातीला



किंमत नाही. शास्त्र जे सांगते तसेच पालन म्हणजेच सनातन धर्म होय. यावर कारणमीमांसा नाहीच. हजारो वर्षापासून मास, तिथी आणि योग नुसार धर्मपालन हीच सनातनची विशेषतःआहे. पुरातन काळापासून आपले वेद, उपनिषद, पुराण धर्मग्रंथ, विविध शास्त्र ग्रंथ हे वैभवाचेच आहेत. त्याचा तर अभिमान आहेच. पण या महाकुंभ पवित्र काळात ६६ कोटी भाविकांनी उपस्थिती दर्शवून आपल्या आस्थेवर मोहर उमटविली हे हिंदू धर्माचे वैशिष्ट्य. प्रथमच अनुभवले. हिंदू धर्माच्या ऐश्वर्य, वैभवाने व निर्माण झालेल्या धाकाने स्वतःच्याच धर्माला सर्वश्रेष्ठ मानणाऱ्या तथाकथित धर्ममार्तंडाचे डोळे न दिपल्यास नवल ते काय?

**संजय पाठक**/नागपूर

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com
तसेच **कुठलाही लेख** पाठवायचा असल्यास **९८५०७५३२८१** या व्हॉट्स ॲप क्रमांकावर पाठवावा.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# सोलापूर विद्यापीठाच्या प्रश्नांसाठी मुख्यमंत्र्यांसोबत लवकरच बैठक घेणार : सभापती प्रा.राम शिंदे

● पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर स्मारकाची केली पाहणी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च -**

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे विविध प्रश्न व समस्या सोडवून विद्यापीठ प्रशस्त होण्यासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यासमवेत लवकरच एक बैठक बोलावणार असल्याचे महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी सांगितले.

सोमवारी महाराष्ट्र विधानपरिषदेचे सभापती प्रा. राम शिंदे यांनी पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठास भेट दिली. यावेळी त्यांनी विद्यापीठाच्या विकासाचा आढावा घेतला. त्याचबरोबर विद्यापीठाच्या नूतन कॅम्पसमध्ये साकारलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर पुतळा व स्मारकाची पाहणी केली. प्रारंभी विद्यापीठाचे कुलगुरू प्रा. डॉ. प्रकाश महानवर यांनी सभापती प्रा. राम शिंदे यांचे स्वागत केले. त्याचबरोबर विद्यापीठाच्या ४८२ एकर परिसरातील फॉरेस्टच्या काही आरक्षित जागेमुळे निर्माण झालेल्या समस्येबद्दल माहिती त्यांना दिली. अल्प मनुष्यबळ असल्यामुळे शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी भरतीसाठी मान्यता देण्यासंदर्भात देखील त्यांना विनंती केली. यावेळी प्र-कुलगुरू प्रा. डॉ. लक्ष्मीकांत दामा, कुलसचिव योगिनी घारे, स्मारक समिती सदस्य अमोल बापू कारंडे , माऊली हळणवर, प्रा. शिवाजी बंडगर, चेतन नरोटे नरेंद्र काळे, प्रा. सुभाष मस्के, सोमेश क्षीरसागर, बापू मेटकरी, व्यवस्थापन परिषदेचे सदस्य प्रा. देवानंद चिलवंत आदी उपस्थित होते.

सभापती प्रा. राम शिंदे म्हणाले की, पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाच्या विविध प्रश्नांची माहिती घेतली. या संदर्भात आठवडाभरात संबंधित विभागाच्या मंत्र्यांची तसेच सचिवांची बैठक घेऊन त्या सोडवण्यासाठी प्रयत्न करू. त्यानंतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या समवेत देखील बैठक लावून विद्यापीठ प्रशस्त करण्यासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही त्यांनी यावेळी दिली. यावेळी विद्यापीठाचे अधिकारी तसेच विविध प्राधिकरणाचे सदस्य उपस्थित होते.




### स्मारक अनावरणासाठी पंतप्रधानांना आमंत्रण देण्याची समिती सदस्यांची विनंती

पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर यांच्या त्रिशताब्दी जयंतीचे औचित्य साधून विद्यापीठाच्या नूतन कॅम्पसमध्ये साकारलेल्या अहिल्यादेवींच्या भव्य पुतळा व स्मारकाचे अनावरण देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते करण्याची समितीच्या सदस्यांची इच्छा आहे. त्यानुसार देशाचे पंतप्रधान श्री नरेंद्र मोदी यांना अहिल्यादेवी होळकर यांच्या ३०० व्या जयंती दिवशी म्हणजे दि. ३१ मे रोजी वेळ घेण्यासाठी आपण प्रयत्न करावे, अशी मागणी स्मारक समितीचे सदस्य प्रा. शिवाजी बंडगर यांनी केली. यावेळी निश्चितच आपण यासाठी पुढाकार घेऊ, असे सभापती प्रा. राम शिंदे यांनी यावेळी सांगितले. त्याचबरोबर स्मारकाच्या कामासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अधिकाऱ्यांकडून त्यांनी माहिती घेऊन लवकरात लवकर उर्वरित काम पूर्ण करण्याचे आदेश यावेळी दिले.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त

### लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर अत्याचार

**सोलापूर, दि. ३१ मार्च -**

लग्नाचे आमिष दाखवून तरूणीवर अत्याचार करणाऱ्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत पिडीतेच्या फिर्यादीवरुन मोहम्मद अशपाक इब्राहीम शेख (रा. ३७१, न्यु पाच्छा पेठ, सोलापूर) याच्याविरुध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. यातील तरूणी व मोहम्मद शेख यांची ओळख आहे. या ओळखीतून डिसेंबर २०२२ ते २३ मार्च २०२५ या कालावधीत मोहम्मद शेख याने त्याचा पहिला विवाह झालेला असतानासुध्दा पिडीतेला लग्नाचे आमिष दाखवून तिच्या इच्छेविरुध्द वारंवार जबरदस्तीने शरीरसंबंध केला. त्यामुळे पिडीतेने शेख यास लग्न करण्याबाबत विचारले असता तो टाळाटाळ करू लागला व त्याने पिडीतेला मारहाण केली. म्हणून पिडीतेने सलगर वस्ती पोलिस ठाणे गाठून याबाबत फिर्याद दाखल केली. महिला सहायक पोलिस निरीक्षक खामकर पुढील तपास करीत आहेत.

### सिध्देश्वर पेठेत १५ हजारांची घरफोडी

**सोलापूर, दि. ३१ मार्च -**

ज्येष्ठ नागरिकाच्या घरात अज्ञात चोरट्याने प्रवेश करीत घरात ठेवलेले हॉटेलच्या साहित्याची चोरी केली. याबाबत साहिकअली मोहम्मद युसुफ आबाजी (वय ६४ रा. सिध्देश्वर पेठ, डॉ. नदाफ यांच्या डेंटल हॉस्पिटलजवळ, सोलापूर) यांनी फिर्याद दिली असून जेलरोड पोलिसांत रविवारी रात्री अज्ञात व्यक्तीविरुध्द गुन्हा नोंद झाला आहे. ही घटना ९ डिसेंबर २०२४ ते २६ मार्च दरम्यान सिध्देश्वर पेठेत घडली आहे. फिर्यादीच्या राहत्या घरात कोणीतरी अज्ञात चोरट्याने प्रवेश केला. घरातील दोन मोठ्या कढई, एक मोठी लोखंडी साखळी, दोन उलताने, सहा दरवाजाच्या झडपा, चार मोठी पातेली, दोन स्टील च्या किटल्या, दोन दुधाचे कॅन, बारा ग्लास, दोन लोखंडी शिगड्या, १२ स्टीलचे प्लेट असा एकुण १४ हजार ७०० रुपयांचा ऐवज लंपास केला आहे.

# रमाबाई आंबेडकर नगरात मारहाण, सात जणांविरुद्ध परस्परविरोधी गुन्हा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ मार्च -**

लहान मुलांची मस्करी करण्याच्या कारणावरून किरकोळ तक्रार झाली होती. या तक्रारीवरून मारहाण प्रकरणी सात जणांवर परस्परविरोधी गुन्हे जोडभावी पेठ पोलिसांत दाखल झाले आहेत. ही घटना २९ मार्च रोजी रात्री साडे आठच्या सुमारास न्यू बुधवार पेठ रमाबाई आंबेडकर नगर, कडबा बाजार, सोलापूर या ठिकाणी घडली आहे.

सुरज शंकर आखाडे (वय ३० रा. रमाबाई आंबेडकरनगर न्यू बुधवार पेठ सोलापूर)यांनी दिलेल्या फिर्यादीवरून वैष्णवी मिसाळ, सुनिता मिसाळ, अजय जेठीथोरचा भाऊ(सर्व रा. रमाबाई आंबेडकर नगर,न्यू बुधवार पेठ,सोलापूर) यांच्यावर गुन्हा नोंद झाला आहे. तर

अजय संतोष जेटीथोर (वय २५ रा रमाबाई आंबेडकर नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार सुरज शंकर आखाडे, धिरज आखाडे, पंकज शंकर आखाडे व मनोज शंकर आखाडे(सर्व रा. रमाबाई आंबेडकर नगर) यांच्यावर गुन्हा नोंद करण्यात आला आहे.पहिल्या घटनेत सुरज आखाडे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार लहान मुलांच्या मस्करी करण्याच्या कारणावरून किरकोळ तक्रार झाली होती. ती तक्रार आपआपसात मिटली होती. त्याच कारणावरून फिर्यादीची वहिणी प्रांजली आखाडे व आई घरासमोर बोलत थांबले होते. त्यावेळी आरोपींनी आमच्याविषयी काय बोलत आहात असे म्हणत शिवीगाळ करून दमदाटी करून



मारहाण केली. अजय च्या भावाने फिर्यादीच्या डोक्यात लाकडाने मारून जखमी केले. यामध्ये फिर्यादी व त्याचा भाऊ जखमी झाला आहे. याचा तपास पोलिस अंमलदार वाडीकर करीत आहे.

दुसऱ्या घटनेत अजय जेटीथोर यांनी फिर्याद दिली असून सुरेखा आखाडे व सुनिता आखाडे यांनी शिवीगाळ करून दमदाटी करीत असल्याचे कळताच फिर्यादीही गेले, आरोपींनी तु कशाला आलास म्हणत मारहाण केली. असे पोलिसांत दिलेल्या फिर्यादीत म्हटलं आहे. या प्रकरणाचा तपास पोलिस उपनिरीक्षक येळे करीत आहेत.



# जनमंगल फाउंडेशनतर्फे बाळे जिल्हा परिषद शाळेत वृक्षारोपण उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

पर्यावरण संवर्धन आणि हरित भविष्य घडवण्याच्या उद्देशाने जनमंगल फाउंडेशनच्या वतीने बाळे येथील जिल्हा परिषद शाळा येथे वृक्षारोपण करण्यात आले. हा उपक्रम राबवण्यात आला.

यावेळी जनमंगल फाउंडेशनचे अध्यक्ष कानिफनाथ थोरात, उपाध्यक्ष संजय घोलप, खजिनदार विशाल मोरे, सदस्य भालचंद्र साखरे, सुरेखा जमदाडे, संतोष क्षीरसागर, निखिल अंकुशे, संस्कार पलंगे, राज क्षीरसागर, साठे यांच्यासह मान्यवर उपस्थित होते. हरित सोलापूर, स्वच्छ सोलापूर या संकल्पनेला बळ देण्यासाठी जनमंगल फाउंडेशनचा हा स्तुत्य उपक्रम भविष्यातही सुरू राहणार आहे, असे अध्यक्ष कानिफनाथ थोरात सांगितले.

# टाकळी शिवारात आढळला पुरुषाचा मृतदेह

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

दक्षिण सोलापूर तालुक्यातील टाकळी गावच्या शिवारात ७० ते ७५ वर्षीय अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळून आला आहे. टाकळी येथील बोदलप्पा मदुगोंडा दिवटे यांच्या शेतात अनोळखी पुरुषाचा मृतदेह आढळला.सदर पुरुष हा रंगाने काळा सावळा असुन त्याने अंगावर तीनगुंडी असलेल्या पांढऱ्या रंगाचे मळका शर्ट घातले आहे. हिरव्या काठाचे पांढरे धोतर घातलेल असुन बांधा सडपातळ असुन उंची अंदाजे ५ फूट ५ इंच इतकी आहे. उजवा पाय अपंग आहे . सदर अनोळखी मृतदेहाबाबत माहिती असल्यास मंद्रूप पोलीस ठाणे व सहाय्यक फौजदार संदिप काशिद यांच्या ९८२३५७१११३ या मोबाईल नंबर वर संपर्क साधण्याचे आवाहन मंद्रूप पोलिसांकडून करण्यात येत आहे.

# गाडी लावण्याच्या कारणावरून मारहाण; सात जखमी

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च -**

गाडी लावण्याच्या कारणावरून झालेल्या मारहाणीत सात जण जखमी झाले. योगेश धनंजय उघडे (वय २५), धनंजय गंगाराव उघडे (वय ६०), आदर्श मेजर उघडे (वय २४), कार्तिकी अभिजित वाघमारे (वय ३२), श्रवण धनंजय उघडे (वय २०), रतन नंदू सोनवणे (वय ४०),



श्रध्दा अभिजित वाघमारे (वय १५, सर्व रा. हब्बू वस्ती, देगाव नाका, सोलापूर) अशी जखमींची नावे आहेत.

३० मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास हब्बू वस्ती येथे घराजवळ गाडी लावण्याच्या कारणावरून श्रीकांत चंदनशिवे, आकाश चंदनशिवे व इतर ७-८ जणांनी मिळून लाकडाने व लोखंडी रॉडने मारहाण केली. त्यामध्ये वरील सातजण जखमी झाले असून त्यांना उपचारासाठी शासकीय रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे. याबाबत सिव्हील पोलिस चौकीत नोंद करण्यात आली आहे.

# ज्योतिर्मय योग केंद्राला सोलापूर कथामालेची भेट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

शेळगी येथे खास महिलांसाठी ज्योतिर्मय मोफत योग, प्राणायम केंद्र सातत्याने सुरु आहे. या केंद्रास साने गुरुजी कथामालेच्या पदाधिकाऱ्यांनी नुकतीच सदिच्छा भेट दिली.

कथामाला शाखाध्यक्ष अशोक खानापुरे यांच्या मार्गदर्शनाखाली आयोजित या भेटी प्रसंगी, कथामालेच्या उपाध्यक्षा आरती काळे यांनी महिलांना योगासने, प्राणायाम, ध्यान-धारणा इ. विषयांचे साध्या सोप्या आणि रसाळ शब्दांत मार्गदर्शन केले. ''महिलांनी आरोग्य टिकविण्यासाठी यात सातत्य ठेवावे, आपल्या आरोग्याची आपणच काळजी घ्यावी'' असा सल्ला त्यांनी दिला. कथामालाचे कार्यवाह रामचंद्र धर्मासाले प्रसिद्धी प्रमुख अरुणकुमार धुमाळ यांनीही मार्गदर्शन केले. योग केंद्राच्या मार्गदर्शिका ज्योती दुलंगे यांनी सूत्रसंचालन केले. नवनिर्वाचित राष्ट्रीय उपाध्यक्ष प्रा. अशोक म्हमाणे यांनी आभार मानले. सुमारे ४०-४५ महिलांची या वेळी उपस्थिती होती.

# शहर व जिल्ह्यात वेगवेगळ्या घटनांमध्ये तिघांची गळफास घेऊन आत्महत्या

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ मार्च -**

शहर व जिल्ह्याच्या विविध भागात दोघांनी अज्ञात कारणावरून व एकाने आजारपणाला कंटाळून गळफास घेवून आत्महत्या केल्या आहेत. आत्महत्या केलेल्यांमध्ये एक महिला व दोन पुरुषांचा समावेश आहे. या घटनेची नोंद सिव्हिल पोलिस चौकीत झाली आहे.

द्रौपदी महादेव गवळी (वय ७१ रा. नान्नज, ता. उत्तर सोलापूर), श्रीकृष्ण विश्वास पवार (वय ३० रा. गवळी गल्ली, वडाळा, ता उत्तर सोलापूर) विनायक बाबुराव पवार (वय ३१ वर्षे रा. भगवान नगर झोपडपट्टी, सोलापूर) अशी गळफास घेवून आत्महत्या केलेल्यांची नावे आहेत.

भगवान नगर झोपडपट्टी, पोलिस मुख्यालयाच्या जवळ राहणाऱ्या विनायक पवार यांनी सार्वजनिक पाण्याच्या टाकीला अज्ञात कारणावरून गळफास घेवून आत्महत्या केली. ही घटना नातेवाईकांना कळाल्यानंतर भाऊ सागर पवार यांनी उपचार करण्यासाठी ३१ मार्च रोजी रात्री सव्वा बाराच्या सुमारास सिव्हिलमध्ये दाखल केले. तो उपचारापूर्वीच मयत झाला होता, याची सिव्हिल पोलिस चौकीत नोंद झाली आहे.

दुसरी घटना उत्तर सोलापूर तालुक्यातील वडाळा येथील आहे. वडाळ्यातील गवळी गल्लीत राहणाऱ्या श्रीकृष्ण पवार यांनी सोमवारी सकाळी सहा वाजण्याच्या सुमारास घरातील लोखंडी ॲंगला साडीच्या सहाय्याने गळफास घेतला, त्याचे कारणही अज्ञात आहे. गळ फासावरून वडील व नातेवाईक यांनी खाली उतरवले, सदर घटनेची माहिती सोलापूर तालुका पोलिसांत देण्यात आली. पोलिस हवालदार डी. एम. चव्हाण यांनी सदर तरुणास बेशुध्द आवास्थेत सिव्हिलमध्ये उपचारासाठी दाखल केले. तो उपचारापूर्वीच मयत झाली होती.

तिसरी घटना नान्नज ता उत्तर सोलापूर येथील आहे. द्रौपदी गवळी या महिलेने आजारपणाला कंटाळून राहत्या घरातील लोखंडी ॲंगला दोरीच्या सहाय्याने गळफास घेतला. तीस खाली उतरवून उपचारासाठी सिव्हिलमध्ये दाखल केले असता ती उपचारापूर्वीच मयत झाली होती. याची माहिती डॉ. प्रतिक माने यांनी दिली.

महाराष्ट्र शासन
ग्राम विकास व जलसंधारण विभाग
जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद (ल.पा.) सोलापूर
जाहिर नोटीससांतर्गत निविदा सुचना क्र. सन 2024-25

अति. मुख्य कार्यकारी अधिकारी/जिल्हा जलसंधारण अधिकारी जि.प. (ल.पा) सोलापूर दुरध्वनी क्रमांक 0217 - 2727408 हे जिल्हा परिषद सोलापूर कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत मक्तेदाराकडून दोन लिफाफा पध्दतीने खालील कामाच्या जाहिर-नोटीसद्वारे निविदा मागवित आहेत. जाहीर-नोटीद्वारे निविदेचा कोरा नमुना जिल्हा जलसंधारण अधिकारी जिल्हा परिषद (ल.पा) सोलापूर यांचे कार्यालयामध्ये दि.01/04/2025 रोजी सकाळी 10.00 वाजले पासून दिनांक 16/04/2025 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यंत उपलब्ध राहील. परिपूर्णरित्या भरलेल्या जाहिर-निविदा दिनांक 16/04/2025 रोजी सांयकाळी 17.00 वाजेपर्यंत व त्यापुर्वी स्विकारण्यात येतील.

| अ. क्र. | कामाचे नाव | अंदाजित रक्कम रु लाखात | बयाणा रक्कम रु. | कामपूर्ण करणेची मुदत | कोऱ्या निविदा संचाची किंमत रुपये | अधिकृत ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | मौजे गिरवी ता. माळशिरस येथील पाझर तलाव क्र. १ गिरवी (चौंढी नाला) (जलसंपदा विभागाकडील) या योजनेची विशेष दुरुस्ती करणे. | 9.42 | -- | 6 महिने | 2000/- | सु.बे.अ. |

उपरोक्त सर्व कामाबाबत निविदा अटी व शर्ती इ. बाबतचा सर्व तपशील निविदा संचामध्ये नमुद केलेला असून कोऱ्या निविदा संच जिल्हा जलसंधारण अधिकारी जि.प. (ल.पा) सोलापूर यांचे

१) कार्यालयामध्ये दिनांक 01/04/2025 रोजी सकाळी 10.00 वाजलेपासून दिनांक 16/04/2025 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यंत कार्यालयातील नोटीस बोर्डावर पहावयास मिळतील.
२) उपरोक्त तक्यातील कामाचे नावासमोर रकाना क्र.4 व 6 मध्ये नमुद केलेल्या बयाणा व निविदा फी रक्कम रु. स्टेट बँक ऑफ इंडिया येथे चलनाने भरण्यात यावी. सदरची निविदा दिनांक 01/04/2025 रोजी सकाळी 10.00 वाजलेपासून दिनांक 16/04/2025 रोजी सायंकाळी 17.00 वाजेपर्यंत कोऱ्या निविदा संच खरेदी करता येतील व सादर करता येतील.
३) निविदेच्या अटी शर्तीमध्ये बदल करणे, प्राप्त निविदापैकी एक किंवा सर्व निविदा कोणतेही कारण न देता नाकारणेचा हक्क निम्न स्वाक्षरीत यांनी राखून ठेवला आहे.
४) लिफाफा क्रमांक 1 मधील सर्व कागदपत्रे जाहिर-निविदा मध्ये सादर करणे आवश्यक आहे तसेच सादर केलेल्या कागदपत्रावर मक्तेदारानी स्वतःच्या सहिने (स्वाक्षरीने) साक्षांकित करुनच सादर करावी अन्यथा सदरची निविदा अपात्र करणेत येईल. (निविदे व्दारे सुशिक्षित बेरोजगार अभियंता व मजूर सहकारी संस्थेस काम असलेस बयाणा रक्कम सुट आहे)
५) दिनांक १ जुलै २०१७ पासून जीएसटी (GST) या नव्या कररचनेची अंमलबजावणी सुरु करण्यात आलेली असल्याने जीएसटी (GST) कराची तरतुद निविदा BOQ मध्ये करण्यात आलेली आहे याची नोंद घ्यावी.

शिक्का

सही/-
जिल्हा जलसंधारण अधिकारी
जिल्हा परिषद (ल.पा.) सोलापूर

# रयत शिक्षण संस्थेकडून सोलापुरातील पाटील कुटुंबीयांचा सन्मान

लक्ष्मीबाई पाटील पुण्यतिथी निमित्त कार्यक्रम..!



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

येथील पाटील कुटुंबातील अण्णाराव पाटील यांच्या कन्या व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या पत्नी लक्ष्मीबाई पाटील यांनी रयत शिक्षण संस्थेच्या विकासासाठी तसेच वस्तीगृहातील विद्यार्थ्यांच्या भोजन खर्चासाठी माहेर कडून मिळालेले ९० तोळे सोन्याचे दागिने मोडले. सरते शेवटी आपल्या गळ्यातील मंगळसूत्राचा देखील त्याग केला. त्यांच्या ऋणातून अल्पशी उतराई करण्याच्या हेतूने संस्थेच्या वतीने पाटील कुटुंबियांचा सत्कार करण्यात आला.

सातारा येथील धननीच्या बागेत कर्मवीर भाऊराव पाटील यांनी मुलांसाठी सुरू केलेल्या वस्तीगृ हा स शंभर वर्ष पूर्ण झाल्याच्या निमित्ताने रयत शिक्षण संस्थेच्या वतीने रयत माऊली लक्ष्मीबाई पाटील यांच्या ९५ व्या पुण्यतिथी चे औचित्य साधून संस्थेसाठी योगदान देणाऱ्या व्यक्तिमत्त्वाचा गौरव कार्यक्रम आयोजित केला होता. यावेळी संस्थेचे संघटक डॉ अनिल पाटील व्यवस्थापन समितीचे सदस्य रामशेठ ठाकूर संस्थेच्या मध्य विभागाचे कार्याध्यक्ष संजीव पाटील, डॉ अशोक पाटील, उद्योजक अनिल पाटील, कर्मवीर भाऊराव पाटील विद्यापीठाचे कुलगुरू डॉ ज्ञानदेव मस्के, सचिव विकास देशमुख, सहसचिव चंद्रकांत दळवी, उच्च शिक्षण सहसचिव डॉ शिवलिंग मेनकुदळे, ऑडिट सहसचिव राजेंद्र मोरे, सहसचिव बंडू पवार ,डॉ मोहन पाटील, मीना बागी ,शुभांगी पाटील, उल्का पाटील उपस्थित होते. यावेळी बोलताना डॉ अनिल पाटील म्हणाले की, माझी आजी सोलापूर येथील पाटील कुटुंबातील होती. त्यांचे बंधू कलगोंडा पाटील या दोघांनी मिळून कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या १९२५ ते १९३५ पर्यंतच्या अडचणीच्या काळात भरघोस आर्थिक मदत केली. आजी लक्ष्मीबाईंनी तर आपल्याजवळील सोन्याचे दागिने मोडले. मंगळसूत्र मोडून त्यागाचा आदर्श घालून दिला. त्याचे स्मरण म्हणून आज पाटील कुटुंबीयांचा सत्कार होत आहे.

संजीव पाटील म्हणाले की, अण्णाराव पाटील यांच्यानंतर माझे वडील जयकुमार पाटील तसेच चुलते अण्णासाहेब पाटील यांनी लक्ष्मीबाईंच्या त्यागाचा वारसा अत्यंत समर्थपणे जोपासला. त्यांचा आदर्श घेऊन आम्ही देखील संस्थेची सेवा करत आहोत. पुढील पिढीस आदर्श घालून देत आहोत.

प्रारंभी कलगोंडा पाटील व लक्ष्मीबाई पाटील यांच्या प्रतिमेस मान्यवरांनी अभिवादन केले. संस्थेच्या वतीने पाटील कुटुंबातील तिसऱ्या पिढीतील डॉ अशोक पाटील, उद्योजक अनिल पाटील, संस्था सदस्य संजीव पाटील यांचा सत्कार करण्यात आला. संस्थेचे सचिव विकास देशमुख यांनी प्रास्ताविक केले. सहसचिव डॉ शिवलिंग मेनकुदळे यांनी आभार मानले.

Truhome FINANCE

ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )
मुख्य कार्यालय: लेव्हल-३, वोक्खार्ड टॉवर्स, ईस्ट विंग, सी-२ ब्लॉक, वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, वांद्रे (पूर्व), मुंबई ४०० ०५१;
दूरध्वनीः १८०० १०२ ४३४५, वेबसाइट: http://www.truhomefinance.in
नोंदणीकृत कार्यालय: श्रीनिवास टॉवर, पहिला मजला, दरवाजा क्र.५,जुना क्र.११दुसरी लेन, सेनाटोफ रोड, अलवरपेट, तेनमपेट, चेन्नई-६०००१८; ;

परिशिष्ट-४-ए [नियम ८(६) ची तरतूद पहा] स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता विक्री सूचना

सिक्युरिटायझेशन अँण्ड रिकन्स्ट्रकशन ऑफ फिनान्शिअल ॲसेट्स अँण्ड एनफोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इन्टेरेस्ट ॲक्ट, २००२ सहवाचिता सिक्युरिटी इन्टेरेस्ट (एनफोर्समेंट) रुल्स , २००२ च्या नियम ८ (६) तरतुदीअनव्ये स्थावर मालमत्तेच्या विक्रीकरिता ई - लिलाव विक्री सूचना.

सर्व सामान्य जनतेस व विशेषतः कर्जदार, तारणकर्ता / कर्ते आणि जामीनदाराना येथे सूचना देण्यात येत आहे कि, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात)कडे तारण /अधिभारीत असलेल्या खाली नमूद केलेल्या स्थावर मालमत्तेचा भौतिक ताबा **ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात**) सुरक्षित धनकोच्या प्राधिकृत अधिकाऱ्यांनी घेतलेला आहे आणि खाली तक्त्यात दिलेल्या तपशिलानुसार लिलावाच्या आधारावर **'जसे आहे जेथे आहे', 'जसे आहे जे आहे' आणि 'जसे जेथे आहे ' या तत्वावर दि २२.०४.२०२५ रोजी स ११.३० ते दु १२.३०** या वेळेत विक्री केली जाईल. कर्जदार/जामीनदार/ तारणकर्ता , देय रक्कम , स्थावर मालमत्तेचे लघु वर्णन राखीव किंमत आणि बयाणा रक्कम ठेव आणि तपासणीची तारीख देखील खालीलप्रमाणे दिली आहे: :

| कर्जदार/सहकर्जदार/ जमानतदार/ तारण ठेवणाऱ्यांचे नाव | मागणी सूचनेची आणि वसुलीची रक्कम तारीख | राखीव किंमत (रु. ) आणि वाढीव बोली | लिलावाची तारीख व वेळ | संपर्क व्यक्ती तपशील – (एओ व निवारण समूह ) |
|---|---|---|---|---|
| **१. श्री. लिसनुल हक अब्दुल सत्तार बेलीफ (कर्जदार),<br>२. श्री. उमरा लिसानुल हक बेलिफ (सह-कर्जदार),<br>निवासाचा पत्ता : प्लॉट क्रमांक१४, पहिला मजला, बिलाल नगर, एस. बी. हाईटच्या मागे, कल्याण नगर, मीरा फ्लोअर मिल जवळ, सोलापूर, उत्तर, जिल्हा सोलापूर –४१३००३<br>आणि येथे देखील: फ्लॅट क्र ७०२, ७वा मजला, अलाव्वाल उंची, प्लॉट क्र १०८, माजरेवाडी, मंत्री चांडक, किलडियर हॉल जवळ, होतीगी रोड, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर -४१३००४<br>लॅन: SHLHSOLR0000410**<br>**ताबा दिनांक व ताबा प्रकार**<br>**०८-०१-२०२५ भौतिक ताबा**<br>**ज्ञात अधिभार** **ज्ञात नाही** | मागणी सूचना तारीख: ११.०३.२०२४<br>दिनांक ०७/०३/२०२४ रोजी कर्ज खाते क्र. SHLHSOLR0000410 अंतर्गत रु. २९,७०,३७१/-(रुपये एकोणतीस लाख सत्तर हजार तीनशे एकहत्तर फक्त) सदर नोटीस मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत कराराच्या दराने पुढील व्याजासह. | रु. १५,००,०००/- (पंधरा लाख रुपये फक्त)<br>**बोली वाढविणे :** रु. १०,०००/- आणि त्यापटीने<br>**बयाणा ठेव रक्कम (ईएमडी ) (रुपयात )**<br>रु. १,१५,०००/- (रुपये एक लाख पंधरा हजार फक्त)<br>**ईएमडी सादर करण्याची अंतिम तारीख : २१ एप्रिल २०२५ वेळ सकाळी १०.०० ते सायं ०५.०० वा.** | **२२ एप्रिल २०२५<br>वेळ. सकाळी ११.३० ते दुपारी १२.३०** | **अश्फाक पत्का- ९८१९४ १५४७७.<br>योगेश पवार ७७९८७२२९९९<br>सुनील मानेकर ८९९९३४४८९७<br>मयूर भोजने ८८९८५२७०७६<br>निरीक्षण तारीख: ११.०४.२०२५ वेळ दुपारी १२.०० ते ३.०० वाजेपर्यंत.** |

संपत्तीचे विवरण

स्थावर मालमत्तेचे ते सर्व तुकडा आणि पार्सल, फ्लॅट क्रमांक ७०२, क्षेत्रफळ ५२.९२ चौ. मीटर (बांधलेले), ७ व्या मजल्यावर,"अलावल हाइट्स" म्हणून ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत,प्लॉट क्रमांक १०८ ,नवीन सर्वे क्रमांक ११/१बी/२ए/२बी पैकी (जुना सर्वे क्रमांक २८१/१बी/२ए/२बी) च्या जमिनीवर बांधलेले,माजरेवाडी, मंत्री चांडक, किलडियर हॉलजवळ, होतागी रोड, ता. उत्तर सोलापूर, जिल्हा सोलापूर -४१३००४, येथे स्थित आणि खालील प्रमाणे सीमाबद्ध. उत्तर:प्लॉट क्रमांक१०७,दक्षिण: प्लॉट क्रमांक १०९,पूर्व: फ्लॅट क्रमांक ७०१, पश्चिम: रस्त्याने आणि समोरील मार्जिनने

**०१. विक्रीच्या तपशीलवार अटी आणि शर्तींसाठी, ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वी श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड) च्या वेबसाइटला देखील भेट देऊ शकता.**
**०२. इच्छुक बोलीदारांनी ईएमडी रक्कम आरटीजीएस / एनईएफटी स्वरूपात बँकेचे नाव- ॲक्सिस बँक लिमिटेड शाखा: वांद्रे कुर्ला कॉम्प्लेक्स, मुंबई बँक खाते क्रमांक-चालू खाते क्रमांक ९११०२००४५६७७६३३ आयएफएससी कोड- यूटीआयबी ०००२३० येथे जमा करावी:**

ठिकाण - सोलापूर
दिनांक - ०१-०४-२०२५

स्वाक्षरी /- प्राधिकृत अधिकारी
ट्रूहोम फायनान्स लिमिटेड (पूर्वीची श्रीराम हाऊसिंग फायनान्स लिमिटेड म्हणून ज्ञात )

www.tarunbharat.net
तरुण भारत

# धूम आयपीएलची...



## महत्त्वाचे

### राजस्थानच्या रियान परागला १२ लाखांचा दंड



**गुवाहाटी** : इंडियन प्रीमियर लीग हंगामात येथे रविवारी चेन्नई सुपर किंग्जविरुद्धच्या जिंकलेल्या टी-२० सामन्यात संथ गतीने षटके टाकल्याबद्दल राजस्थान रॉयल्स संघाचा हंगामी कर्णधार रियान पराग याला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात आला आहे. बारसपारा स्टेडियमवर खेळल्या गेलेल्या या सामन्यात राजस्थानने ५ बाद १८२ धावा केल्या आणि नंतर त्यांनी चेन्नई सुपर किंग्जला ६ बाद १७६ धावांवर रोखले. संथ गतीने षटके टाकणे म्हणजे हा कलम २.२२ आयपीएल संहितेचे उल्लंघन आहे, या उल्लंघनाबद्दल रियान परागला १२ लाख रुपयांचा दंड ठोठावण्यात येत असल्याचे आयपीएलने म्हटले आहे. राजस्थानने सनरायझर्सविरुद्धचा आपला पहिला सामना गमावला होता. सीएसकेविरुद्ध त्यांनी पहिला विजय नोंदविला. आता पुढील सामना ५ एप्रिल रोजी मुल्लानपूर येथे पंजाब किंग्जविरुद्ध होणार आहे.

### चेन्नईयीनचा इरफान यादव महिन्याचा उदयोन्मुख खेळाडू

**चेन्नई** : चेन्नईयीन एफसीचा आक्रमक खेळाडू इरफान यादवदला मार्च २०२५ चा सर्वोत्तम उदयोन्मुख खेळाडू म्हणून गौरविण्यात आले आहे. जमशेदपूर एफसीविरुद्धच्या सामन्यात इरफानने दोन गोल नोंदविले होते. यादवद हा सातत्यपूर्ण कामगिरी करणारा आहे आणि या वर्षी मरीना माचन्ससोबत त्याने यशस्वी हंगाम अनुभवला आहे. या महिन्यात चेन्नईयीन एफसीच्या दोन्ही सामन्यांमध्ये तो खेळला होता. त्याने आपल्या शेवटच्या घरच्या सामन्यात जमशेदपूर एफसीविरुद्ध दोन गोल केले होते आणि ५-२ असा विजय मिळवला होता. गोव्यात जन्मलेल्या २३ वर्षीय इरफानने इंडियन सुपर लीग (आयएसएल) २०२४-२५ हंगामात पाच गोल केले आहेत आणि चार सहाय केले आहेत. त्याच्या प्रभावी आक्रमक गुणांव्यतिरिक्त, यादवद आपल्या कामाच्या गतीने, द्वंद्वयुद्ध जिंकण्याची क्षमता आणि बचावात्मक पुनर्प्राप्तीसह प्रभावी आहे.

### राष्ट्रीय वरिष्ठ खो-खो स्पर्धेला प्रारंभ

**पुरी** : येथे सोमवारपासून ५७ व्या वरिष्ठ गट राष्ट्रीय खो-खो अजिंक्यपद स्पर्धेला प्रारंभ झाला आहे. या स्पर्धेत सर्वाधिक संघ सहभागी झाले आहे. हा एक विक्रम आहे. पाच दिवसांची ही स्पर्धा ४ एप्रिलपर्यंत पुरी येथील जिल्हा क्रीडा संकुलात चालेल. यामध्ये ३० राज्यांमधील संघांसह भारतीय विमानतळ प्राधिकरण (एएआय), महाराष्ट्र पोलिस, सशस्त्र सीमा बल (एसएसबी), कर्नाटक पोलिस, अखिल भारतीय पोलिस क्रीडा नियंत्रण मंडळ (एआयपीएससीबी), इंडो-तिबेटी सीमा पोलिस (आयटीबीपी) आणि रेल्वे यासारख्या प्रमुख संस्थात्मक पथकांमध्ये तीव्र स्पर्धा पाहायला मिळत आहे. हा कार्यक्रम डीडी स्पोर्ट्सवर थेट प्रक्षेपित केला जात आहे. ४० पुरूष आणि ४० महिला संघ यात सहभागी झाले असून खो-खो राष्ट्रीय स्पर्धेच्या इतिहासात संघांचा सर्वाधिक सहभाग असणारी ही स्पर्धा असेल. सर्व नियोजित सामने केवळ मॅटवर खेळवले जाणारे पहिले राज्य होण्याचे श्रेय ओडिशाला जाते, असे भारतीय खो-खो महासंघाचे (केकेएफआय) अध्यक्ष सुधांशू मित्तल म्हणाले. खो खो राष्ट्रीय स्पर्धेत प्रथमच उपांत्यपूर्व, उपांत्यपूर्व आणि अंतिम सामन्यांसाठी निर्णय पुनरावलोकन प्रणाली (डीआरएस) देखील सुरू करण्यात आली आहे. तसेच, सामन्यांचे स्वरूप खो खो विश्वचषक २०२५ प्रमाणेच आहे.

### अनन्या पांडेचा वानखेडेवर धमाल नृत्य



**मुंबई** : सोमवारी मुंबईत मुंबई इंडियन्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यातील आयपीएल सामन्यापूर्वी बॉलिवूड अभिनेत्री अनन्या पांडेने वानखेडे स्टेडियमवर परफॉर्म केले. या ग्लॅमरस मुलीने लोकप्रिय हिंदी चित्रपटांमधील आपल्या दिलखेचक नृत्याने स्टेडियमवर धुमाकूळ घातला व प्रेक्षकांचे लक्ष वेधले. इंडियन प्रीमियर लीगची १८ वर्षे साजरी करण्यासाठी हा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता.

# लखनौचे घरच्या मैदानावर पहिला विजय मिळविण्याचे लक्ष्य



◆ **लखनौ, ३१ मार्च**

अठराव्या इंडियन प्रीमियर लीग हंगामात मंगळवारी येथे लखनौ सुपर जायण्ट्स आणि फॉर्ममध्ये असलेला पंजाब किंग्ज यांच्यादरम्यान साखळी सामना खेळला जाणार आहे. लखनौ सुपर जायण्ट्सचा नवीन कर्णधार ऋषभ पंत या हंगामात आपल्या घरच्या मैदानावर आपला पहिला विजय नोंदवण्यास उत्सुक आहे.

आयपीएलचा सर्वात महागडा खेळाडू ठरलेला ऋषभ पंत पहिल्या दोन सामन्यात फलंदाज म्हणून फारशी चमकदार कामगिरी केली नाही. त्यामुळे तो आपल्या २७ कोटी रुपयांच्या मोठ्या किमतीचे समर्थन करण्यासाठी कटिबद्ध असेल.

लखनौ सुपर जायण्ट्समधील पंतची कर्णधारपदाची सुरुवात दुर्दैवी पराभवाने झाली. लखनौला पंतच्या माजी संघ दिल्ली कॅपिटल्सविरुद्ध केवळ एका गड्याने पराभव पत्करावा लागला.

तथापि, लखनौने घरच्या मैदानावर सनरायझर्स हैदराबादवर ५ गड्यांनी विजय मिळवून दमदार पुनरागमन केले. निकोलस पूरन (२३ चेंडूत ७०) व मिशेल मार्श (३१ चेंडूत ५२) व शार्दुल ठाकूर (४-३४) यांच्या शानदार कामगिरीमुळे हैदराबादला मात दिली.

संघाच्या यशानंतरही पंतला सलग दुसऱ्यांदा फलंदाजीमध्ये अपयश आले, पहिल्या दोन सामन्यात तो केवळ ० आणि १५ धावा करू शकला. त्यामुळे आता पंत आपल्या टीकाकारांना शांत करण्यास आणि आपल्या बॅटची चमक दाखवण्यास उत्सुक असेल.

पंत पहिल्यांदाच दिल्ली कॅपिटल्सचे माजी प्रशिक्षक रिकी पॉण्टिंग यांच्याशी सामना करेल. पॉण्टिंग या हंगामात पंजाब किंग्जमध्ये सहभागी झाले आहेत.

आयपीएलच्या इतिहासातील सर्वात महागड्या व दुसऱ्या क्रमांकाच्या सर्वात महागड्या खेळाडूंमध्ये हा सामना असेल, यात श्रेयस अय्यर पंजाब किंग्जचे नेतृत्व करेल. पंत २७ कोटी रुपयांत लखनौ संघात, तर अय्यर २६.७५ कोटी रुपयांत पंजाब संघात दाखल झाला.

अलिकडेच अय्यरने गुजरात टायटन्सविरुद्ध ४२ चेंडूत नाबाद ९७ धावांची खेळी करून पंजाब किंग्ज संघाला सामना जिंकून दिला.

पंजाबकडून शशांक सिंगने जबरदस्त फटकेबाजी केली, तर प्रियांश आर्यने २३ चेंडूत ४७ धावा करत आयपीएलमध्ये दमदार पदार्पण केले. पंजाब किंग्जच्या फलंदाजीच्या प्रयत्नांना गोलंदाजांची उत्तम साथ मिळाली. भारताचा जलदगती गोलंदाज अर्शदीप सिंग व मध्यमगती गोलंदाज विजयकुमार वैशाखने डेथवर शिस्तबद्ध गोलंदाजी केली.

एकाना स्टेडियमची खेळपट्टी गोलंदाजांना, विशेषतः फिरकीपटूंना चांगली साथ देते. तथापि, गत हंगामात आयपीएलमध्ये व गत महिन्यात झालेल्या चार वर्ल्ड प्रीमियर लीगमध्ये या खेळपट्टीने वेगवेगळे निकाल दिले. दोन्ही संघांचे फिरकीपटू सामन्याच्या निकालात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.

लखनौकडून रवी बिश्नोईवर प्रभावी फिरकी गोलंदाजी करण्याची जबाबदारी असेल, त्याच्यासोबत लेग स्पिनर दिग्वेश राठी असेल. गत वर्षी दिल्ली प्रीमियर लीगमध्ये राठीने आपल्या उत्कृष्ट कामगिरीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले होते.

यजमान संघाकडे डावखुरा फिरकीपटू शाहबाज अहमद खेळवण्याचा पर्याय आहे, तर एडन मार्कराम ऑफ स्पिनमध्येही उपयुक्त आहे. अनुभवी भारतीय लेग स्पिनर युजवेंद्र चहल पंजाबच्या फिरकी आक्रमणाचा नेता असेल. ग्लेन मॅक्सवेलही आपल्या कामगिरीवर भर देईल अशी अपेक्षा आहे. त्यांच्याकडे वेगवान गोलंदाजीचे भरपूर पर्याय आहेत. (वृत्तसंस्था)

**आजचा सामना**

**लखनौ सुपर जायण्ट्स**
**वि. पंजाब किंग्ज**
**स्थळ** : लखनौ
**वेळ** : सायंकाळी ७.३० वाजतापासून
**थेट प्रेक्षपण** : स्टार स्पोर्ट्सवर

# धोनी दहा षटके फलंदाजी करू शकत नाही : प्रशिक्षक फ्लेमिंग





◆ **गुवाहाटी, ३१ मार्च**

महेंद्र सिंह धोनीचा गुडघा अजूनही त्रासदायक आहे, त्यामुळे तो दहा षटके पूर्ण धावत फलंदाजी करू शकत नाही आणि सामन्याच्या परिस्थितीनुसार तो आपल्या फलंदाजीच्या स्थानाचा निर्णय घेतो, असे चेन्नई सुपर किंग्ज संघाचे प्रशिक्षक स्टीफन फ्लेमिंग यांनी स्पष्ट केले.

गत आठवड्यात चेपॉक येथे रॉयल चॅलेंजर्स बंगळुरूविरुद्ध चेन्नई सुपर किंग्जच्या ५० धावांनी झालेल्या पराभवादरम्यान ४३ वर्षीय धोनीने ९ व्या क्रमांकावर फलंदाजी केल्याबद्दल त्याच्यावर टीका झाली होती.

सीएसकेचा हा खेळाडू ७ व्या क्रमांकावर मैदानाबाहेर पडला. त्यावेळी संघाला २५ चेंडूत ५४ धावांची आवश्यकता होती परंतु राजस्थान रॉयल्सविरुद्ध त्यांना ६ धावांनी पराभव पत्करावा लागला.

ही काळाचा महिमा आहे हे धोनीला पटवून देतो. त्याचे शरीर आणि त्याचे गुडघे पूर्वीसारखे राहिलेले नाहीत. तो व्यवस्थित हालचाल करत आहे, पण तरीही त्यात पोषणाचा एक पैलू आहे. तो १० षटके पूर्ण धावत फलंदाजी करू शकत नाही. त्यामुळे तो परिस्थितीनुसार खेळण्याचा निर्णय घेतो, असे फ्लेमिंगने सामन्यानंतरच्या पत्रकार परिषदेत सांगितले

धोनी ९-१० षटके खेळतो, हेच संघासाठी खूप मौल्यवान आहे. असे ते म्हणाले.

आम्ही पॉवरप्लेमध्ये सामना गमावला, असे ते म्हणाले. पॉवरप्लेमध्ये राजस्थान रॉयल्सने १ बाद ७९ धावा केल्या, तर सीएसकेने १ बाद ४२ धावा केल्या. धावफलकावर हा मोठा फरक आहे, त्यामुळे आमचा पराभव झाला, असेही ते म्हणाले. (वृत्तसंस्था)

### ग्लोबल इंडियन प्रवासी कबड्डी लीग १८ एप्रिलपासून

**गुरुग्राम** : १८ एप्रिलपासून गुरुग्राममध्ये ग्लोबल इंडियन प्रवासी कबड्डी लीग (जीएल-पीकेएल) स्पर्धेला प्रारंभ होणार आहे. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी स्टार आंतरराष्ट्रीय कबड्डीपटू सहभागी होण्यास उत्सुक आहेत, यात हंगेरी, पोलंड, इंग्लंड आणि हाँगकाँगमधील खेळाडूंचा समावेश आहे. भारतात होणाऱ्या या जीएल-पीकेएलमध्ये इजिप्त, चीन, केनिया, अर्जेंटिना, जर्मनी, इंग्लंड, नॉर्वे आणि पोलंड सारख्या देशांचे प्रतिनिधित्व करणाऱ्या संघांच्या सहभागाने या लीगने आधीच जागतिक लक्ष वेधले आहे. अनेक आंतरराष्ट्रीय खेळाडूंनी लीगचा भाग असल्याबद्दलचा उत्साह व्यक्त केला आहे.

### भारताचे पदक जिंकण्याचे लक्ष्य

◆ **फोज दो इगुआकू, ३१ मार्च**

ब्राझीलमधील फोज दो इगुआकू येथे होणाऱ्या पहिल्या जागतिक चषक मुष्टियुद्ध स्पर्धेत १० सदस्यीय भारतीय पुरुष संघ सहभागी होत असून या संघाचे नेतृत्व आशियाई क्रीडा कांस्यपदक विजेता नरेंद्र बेरवाल करणार आहे. भारतीय संघाने या स्पर्धेतून दोन सुवर्णांसह किमान अर्धा डझन पदके जिंकण्याचे लक्ष्य ठेवले आहे.

भारतीय खेळाडूंना संमिश्र ड्रॉ मिळाला आहे. यामध्ये दोन खेळाडूंना थेट उपांत्य फेरीत प्रवेश मिळाला आहे आणि काही खेळाडूंना अंतिम चारमध्ये पोहोचण्यासाठी केवळ एक विजय आवश्यक आहे. अधिकृतपणे स्पर्धा म्हणून ओळखल्या जाणाऱ्या जागतिक मुष्टियुद्ध चषक २०२५ च्या पहिल्या टप्प्यात १९ देशांतील १३० हून अधिक खेळाडू पदकासाठी व रँकिंग गुणांसाठी स्पर्धा करतील. पुढील दोन टप्प्या कझाकस्तान आणि भारतात होतील आणि त्यानंतर सर्वोच्च क्रमांकाचे मुष्टियोद्धे हंगामाच्या अखेरच्या जागतिक मुष्टियुद्ध चषक अंतिमसाठी पात्र ठरतील. ८० किलो वजन गटात भारताच्या लक्ष्य चहरचा पहिल्या फेरीचा सामना ब्राझीलच्या वँडरली परेराविरुद्ध होणार आहे. (वृत्तसंस्था)

# सोलापूरचा वेताळ शेळके महाराष्ट्र केसरी

## पृथ्वीराज पाटीलचा पराभव



महाराष्ट्र केसरी विजेता वेताळ शेळके

◆ **अहिल्यानगर, ३१ मार्च**

येथे रात्री उशिरा पार पडलेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेच्या अंतिम सामन्यात सोलापूरच्या वेताळ शेळकेने मुंबईच्या पृथ्वीराज पाटील याचा पराभव केला. वेताळ शेळके हा पहिल्यांदाच महाराष्ट्र केसरी ठरला असून त्याच्या विजयानंतर चाहत्यांनी एकच जल्लोष केला.

अहिल्यानगरमधील कर्जत शहरात आमदार रोहित पवार मित्र मंडळ आणि अहिल्यानगर जिल्हा तालीम संघाच्या वतीने ६६व्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते.

स्पर्धेत गादी विभागात नांदेडचा शिवराज राक्षे व मुंबईचा पृथ्वीराज पाटील यांच्यदरम्यान उपांत्य सामना खेळला गेला. यात पृथ्वीराजने शिवराज राक्षेचा पराभव केला. तर वेताळ शेळके महाराष्ट्र केसरी स्पर्धेच्या उपांत्य सामन्यात अकोल्याच्या प्रशांत जगतापचा पराभव केला होता. महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर संघाच्या नुकत्याच झालेल्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेत शिवराज राक्षे व पृथ्वीराज मोहोळ यांच्यातील अंतिम लढतीच्या निकालावरून चांगलाच गोंधळ झाला होता. शिवराज राक्षेने पंचांना मारलेल्या लाथेवरुन मोठा वाद निर्माण झाला होता. त्यामुळे अहिल्यानगर जिल्हा तालीम संघ आयोजित महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेकडे सर्वांचे लक्ष लागले होते. (वृत्तसंस्था)

# दीपक, उदितने जिंकले रौप्यपदक; दिनेशला कांस्य

## आशियाई कुस्ती


◆ **अम्मच, ३१ मार्च**

दीपक पुनियाने आशियाई कुस्ती अजिंक्यपद स्पर्धेत तिसरे आणि एकूण पाचवे रौप्यपदक जिंकले, तर उदितने जॉर्डनमधील अम्मान येथे झालेल्या स्पर्धेच्या शेवटच्या दिवशी कॉन्टिनेंटल स्पर्धेत सलग दुसऱ्यांदा उपविजेतेपदावर समाधान मानावे लागले. भारताने स्पर्धेतून १० पदके जिंकली.

पॅरिस ऑलिम्पिकसाठी पात्रता मिळवू न शकलेल्या २५ वर्षीय पुनियाने ९२ किलो वजनी गटात बेकझत राखिमोव्हविरुद्धच्या कठीण लढतीत संघर्षपूर्ण झुंज दिली. त्याला त्याच्या किर्गिस्तानच्या प्रतिस्पर्ध्याकडून कठोर प्रतिकाराचा सामना करावा लागला, परंतु उपांत्यपूर्व लढतीत त्याने १२-७ असा विजय मिळवला.

जपानचा ताकाशी इशिगुरो हा एक कठीण प्रतिस्पर्धी असायला हवा होता, परंतु दीपकने त्याला ८-१ असा सहज मात दिली.

इराणचा जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकावर असलेल्या अमीरहोसेन बी. फिरोज पौरबंदपेईविरुद्धच्या सुवर्णपदकाच्या लढतीत, दीपकने बाहेर पडल्यामुळे पहिला गुण गमावला. सुरुवातीच्या दोन मिनिटांत त्याने फारशी हालचाल केली नाही. दीपकने २०२१ (अल्माटी) आणि २०२२ (उलानबाटार) मध्ये आशियाई अजिंक्यपद स्पर्धेत रौप्यपदक जिंकले होते, तसेच २०१९ आणि २०२० मध्ये कांस्यपदक जिंकले होते.



रौप्यपदक विजेता दीपक पुनिया

उदितने (६१ किलो) किर्गिस्तानच्या बेकबोलोट मिरझांझर उलुविरुद्ध ९-६ असा विजय मिळवत चीनच्या वानहाओ झूचा २-० असा पराभव केला. मात्र सुवर्णपदकाच्या लढतीत उदितला जागतिक क्रमवारीत अव्वल क्रमांकाचा खेळाडू तकारा सुदाकडून ४-६ असा पराभव पत्करावा लागला. केवळ ११ सेकंद शिल्लक असताना उदितला केवळ तीन गुण मिळू शकले. उदितला गत वर्षीही रौप्यपदकावर समाधान मानावे लागले होते.

मुकुल दहियाकडे कांस्यपदक जिंकण्याची उत्तम संधी होती परंतु तो रिकाम्या हाताने परतेल. तो सिंगापूरचा वेंग लुएन गॅरी चाऊ हा दहियासाठी सोपा बळी ठरला.

हेवीवेट १२५ किलो वजनी गटात दिनेशने उपांत्यपूर्व फेरीत चीनच्या बुहीरदुनला तांत्रिक श्रेष्ठतेमुळे पराभूत केले, परंतु उपांत्य फेरीत मंगोलियन लखागवागेरेल मुन्खतुरने त्याला ५-१ असे हरवले. जयदीप अहलावत (७४ किलो) मात्र स्पर्धेतून लवकर बाहेर पडला. (वृत्तसंस्था)

# सोलापूरच्या मुलांची विजयी घोडदौड

## १९ वर्षाखालील क्रिकेट : आदर्श राठोड व समर्थ दोरनालची अष्टपैलू खेळी

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

महाराष्ट्र क्रिकेट असोसिएशनच्या १९ वर्षाखालील क्रिकेट स्पर्धेत आदर्श राठोड (१७७ धावा व ४ बळी) व समर्थ दोरनालच्या (९२ धावा व ३ बळी) अष्टपैलू खेळींमुळे सोलापूरच्या मुलांनी नांदेड जिल्ह्याचा पहिल्या डावाच्या आघाडीवर विजय मिळविला. आदर्श राठोड यास सामनावीर पुरस्काराने गौरवण्यात आले.

नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजी करताना नांदेड संघाने ५० षटकात सर्वबाद २९१ धावा केल्या. यात आदित्य घोगरे ७१, आर्यन मुंढे ५७, अफताफ सय्यद ५६ तर हर्ष कापसे याने ३३ धावा केल्या. सोलापूरकडून आदर्श राठोड याने ४, समर्थ दोरनालने ३ बळी टिपले. विघ्नेश जाधव व समर्थ कोळेकर यांनी प्रत्येकी एक गडी बाद केला. सोलापूरने पहिल्या डावात ८२ षटकात ६ बाद ४१० धावा केल्या. यात आदर्श राठोड १७७ धावा याने केल्या. समर्थ दोरनाल ९२ आणि वीरांश वर्मा याने ५९ धावा केल्या. नांदेडकडून आर्यन मुंढे याने ३ तर फरहान शेख याने २ गडी बाद केले. नांदेड संघाने दुसऱ्या डावात ४३ षटकात ९ बाद १५३ धावा केल्या. यामधे प्रथमेश पावडेने ४६ व हर्ष कापसे ३१ धावा केल्या. सोलापूरकडून श्रीनिवास कुलकर्णी याने ३ तर विघ्नेश जाधव व समर्थ कोळेकर यांनी प्रत्येकी दोन बळी मिळवले.



समर्थ दोरनाल



आदर्श राठोड

# डब्ल्यूटीसी अंतिम सामन्यासाठी ऑस्ट्रेलियाचा स्कॉट बोलंड सज्ज

◆ **नवी दिल्ली, ३१ मार्च**

भारताविरुद्धच्या बॉर्डर-गावस्कर चषक मालिकेत प्रभावी कामगिरी केल्यानंतर ऑस्ट्रेलियाचा वेगवान गोलंदाज स्कॉट बोलंडने लॉर्ड्स मैदानावर होणाऱ्या आगामी जागतिक कसोटी अजिंक्यपद स्पर्धेच्या (डब्ल्यूटीसी) अंतिम सामन्यावर आपले लक्ष केंद्रित केले आहे.

ऑस्ट्रेलिया आणि दक्षिण आफ्रिका यांच्यातील बहुप्रतिक्षित एकमेव कसोटी जवळ येत असताना, दोन्ही संघांनी अंतिम सामन्यासाठी तयारी सुरू केली आहे. ऑस्ट्रेलियाच्या वेगवान गोलंदाजीतील प्रमुख खेळाडू बोलंडने या सामन्यासाठी संघात स्थान मिळवण्याची आपली महत्त्वाकांक्षा व्यक्त केली आहे.

जानेवारीमध्ये आम्ही पात्रता मिळवल्यापासून मी त्या सामन्यावर लक्ष केंद्रित केले आहे, म्हणून ११ जून रोजी होणाऱ्या सामन्यासाठी मी योग्य आहे याची खात्री करण्यासाठी मी पुढील दोन किंवा तीन महिन्यांत माझ्याकडून शक्य तितके सर्व प्रयत्न करेन, असे बोलंड म्हणाला. ३५ वर्षीय खेळाडूने ऑस्ट्रेलियाच्या २०२३ च्या विश्वचषक विजेतेपदात महत्त्वाची भूमिका बजावली, त्याच्या संघाला पहिल्यांदाच गदा उंचावण्यास मदत केली. बोलंडचा दोन डावात पाच बळी घेणे महत्त्वाचे ठरले. त्याने शुभमन गिल, विराट कोहली आणि रवींद्र जडेजाला बाद करून ऑस्ट्रेलियाला विजय मिळवून दिला. (वृत्तसंस्था)

# राज्यातील खासगी क्रीडा अकादमीचे सक्षमीकरण

## ● राज्य शासनाच्या मिशन लक्ष्यवेध अंतर्गत १० ते ३० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य

**तभा वृत्तसेवा । अजितकुमार संगवे**
**सोलापूर, दि. ३१ मार्च**

मिशन लक्ष्यवेध या महत्वांकाक्षी योजनेची अंमलबजावणी महाराष्ट्रात करण्याचा निर्णय राज्य शासनाच्या क्रीडा व युवक सेवा खात्याने घेतला आहे. यासाठी राज्यातील उत्तम खेळाडू निर्माण करण्याऱ्या १२ क्रीडा प्रकाराच्या खासगी व नोंदणीकृत अकादमींना आर्थिक सहाय्य देऊन अश्या संस्थांचे सक्षमीकरण करण्यात येणार आहे. या क्रीडा अकादमीना त्यांच्या गुणांकनानुसार अनुक्रमे ३०, २० व १० लाख रुपयांचे आर्थिक सहाय्य देण्यात येणार आहे.

महाराष्ट्रात क्रीडा संस्कृतीचे संवर्धन, प्रचार, प्रसार व जोपासना करण्यासाठी व प्रतिभावंत खेळाडू तयार करण्यासाठी शासनाच्या क्रीडा खात्याने हा निर्णय घेतला. राज्यातील खेळाडूंनी ऑलिम्पिकसारख्या आंतरराष्ट्रीय क्रीडा स्पर्धेत पदके संपादित करण्याकरिता नियोजनबध्द प्रयत्न क्रीडा खाते करीत आहे. राज्यातील खेळाडूंसाठी अदयावत क्रीडा प्रशिक्षण यंत्रणा, क्रीडा विषयक पायाभूत सुविधा, क्रीडा वैद्यकशास्त्र, क्रीडा स्पर्धाचे आयोजन, खेळाडूंना पुरस्कार व प्रोत्साहन, खेळाडूंकरिता करिअर मार्गदर्शन व खेळाडूंच्या क्षमता विकासासाठी देशी/विदेशी प्रशिक्षक व संस्थांचा सहयोग हे सर्व घटक विकसित करण्याच्या निर्णय राज्य शासनाच्या क्रीडा खात्याने घेतलेला आहे.

त्यानुसार मिशन लक्ष्यवेध अंतर्गत खासगी अकादमींना आर्थिक सहाय्य करावयाच्या दृष्टीने संबंधित अकादमीमधील खेळाडू, क्रीडा मार्गदर्शक, सहाय्यक प्रशिक्षक, प्रशिक्षणासाठी उपलब्ध पायाभूत सुविधा व त्यांचा स्तर, क्रीडा साहित्य व क्रीडा अकादमीच्या कामगिरीचे गुणांकन करण्यात येऊन हे आर्थिक सहाय्य करण्यात येणार आहे. यात पायाभूत क्रीडा सुविधा उभारणी, क्रीडा सुविधा उन्नत करणे, प्रशिक्षक मानधन, क्रीडा व प्रशिक्षण उपकरणे इ बाबींवर खर्च करण्यासाठी देण्यात येणार आहे.

### पाच एप्रिलपर्यंत प्रस्ताव सादर करा



राज्यातील इच्छूक नोंदणीकृत खासगी क्रीडा अकादमीनी विहित नमुन्यातील अर्ज संबंधित जिल्हा क्रीडाधिकारी यांच्याकडे ५ एप्रिलपर्यंत सादर करावेत. संबंधित जिल्हा क्रीडाधिकारी हे प्रस्ताव गुणांकन करून ७ एप्रिलपर्यंत विभागीय कार्यालयाकडे पाठवितील. त्याची छाननी होऊन हे प्रस्ताव क्रीडा व युवक सेवा खात्याकडे मंजूरीसाठी जातील

**- युवराज नाईक**
**उपसंचालक क्रीडा व युवक सेवा संचालनालय, पुणे**

### गुणांकनानुसार मिळणार असे आर्थिक सहाय्य

अ वर्ग (७६ ते १०० गुण) : ३० लाख
ब वर्ग (५१ ते ७५ गुण) : २० लाख
क वर्ग (३५ ते ५० गुण) : १० लाख

### मिशन लक्ष्यवेध अंतर्गत निवडलेले १२ खेळ

ॲथलेटिक्स, आर्चरी, बॅडमिंटन, बॉक्सिंग, हॉकी, लॉनटेनिस, रोईंग, शुटींग, सेलींग, टेबल टेनिस, वेटलिफ्टींग व कुस्ती.



सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

# स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त होमहवन



**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त कुंभारी येथील कर्दळी फाटा येथे संत दर्शन सोहळा आणि होमहवन कार्यक्रमाच आयोजन करण्यात आले होते.

श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त दक्षिण सोलापूर तालुक्यातील कुंभारी येथील ओम गुरुदेव नमः समाजसेवा न्यास सोलापूर संचालित ओम गुरुदेव नमः आश्रम कुंभारी कर्दळी फाटा येथे संत दर्शन सोहळा आणि होम हवन कार्यक्रमाच आयोजन करण्यात आलं होतं. यावेळी १०८ दापत्याने होम हवनास बसले होते. यावेळी प पु बाळयोगी पिरजी गणेशनाथ बाबा, आयोजक दत्त उपासक वैभव पाटील, वैजनाथ हत्तुरे, नाताजी शिंदे, बसवेश्वर प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष श्रीशैल हत्तुरे, शिवानंद आदोडगी,श्रीशैल मोळे, सोमशंकर करजोळे, शिवानंद होनराव, बिपीन करजोळे, पपू डोपरे, प्रवीण खजूरगी, अर्जुन वाघमारे, अप्पी करजोळे, मुन्ना वाले यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते. चांगले पाऊस पडावं, शेतातील धान्य पिकाव, सुखी समाधानी असावं या कलियुगामध्ये भावभक्ती श्रेष्ठ असून मनुष्य कसे जीवन जगावे असे अनेक उदाहरणे देत यावेळी प पु बाळयोगी पिरजी गणेशनाथ बाबा यांनी आशीर्वचने केले.

होमहवनामुळे भाविकांना संकट दूर होते, मनाला शांती समाधानी मिळते असे प्रतिपादन आयोजक दत्त उपासक वैभव पाटील यांनी यावेळी व्यक्त केले. अक्कलकोटचे स्वामी महाराज यांचे या परिसरात पाददर्श लागलेला आहे अक्कलकोटचे स्वामी महाराजांनी या ठिकाणी येऊन जप करून गेलेले आहे या पवित्र ठिकाणी स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त संत दर्शन सोहळा आणि होम हवन कार्यक्रमाच आयोजन करण्यात आल्याचं वैजनाथ हत्तुरे, शिवानंद आदोडगी यांनी यावेळी सांगितले. या होमहवन कार्यक्रमास भाविक भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# मंद्रूपमध्ये रमजान ईद उत्साहात साजरी

- पोलिसांनी गुलाब पुष्प देत शुभेच्छा दिल्या.
- नमाज अदा केल्यानंतर ईद मुबारक म्हणून शुभेच्छा
- हिंदू-मुस्लिम बांधवांनी शिरखुर्माचा आनंद घेतला.



**तभा वृत्तसेवा,**
**मंद्रुप, दि. ३१ मार्च-**

इस्लामी संस्कृतीतील पवित्र सण रमजान ईद मंद्रूपमध्ये उत्साहात साजरी करण्यात आली. रमजान महिना संपूर्ण उपवास आणि उपासनेत व्यतीत केल्यानंतर, चंद्रदर्शन होताच शव्वाल महिन्याचा प्रारंभ होतो आणि त्याच्या पहिल्या दिवशी ईद साजरी केली जाते. पहाटेपासूनच मुस्लिम मोहल्लयांमध्ये ईदची लगबग दिसून येत होती. मुस्लिम बांधवांनी पारंपरिक पोशाख परिधान करून नमाज अदा केली. या निमित्ताने सामाजिक एकतेचे दर्शन घडले. नमाज अदा केल्यानंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत ईद मुबारक म्हणत शुभेच्छा दिल्या.

ईदचा सण शांततेत पार पडावा म्हणून मंद्रूप पोलिसांनी चोख बंदोबस्त ठेवला होता. तसेच, पोलिस प्रशासनाच्या वतीने मुस्लिम बांधवांना गुलाब पुष्प देत शुभेच्छा देण्यात आल्या.

रमजानच्या उपवासानंतर ईद येते आणि हा दिवस आमच्यासाठी खूप खास असतो. आज आम्ही सर्वांनी मिळून नमाज अदा केली आणि एकमेकांना शुभेच्छा दिल्या. हा सण केवळ आनंदाचा नाही, तर मानवतेचा संदेश देणारा आहे. प्रेम, बंधुत्व आणि एकात्मतेचा संदेश देत आम्ही सर्वांना ईदच्या शुभेच्छा देतो.

**- आसिफ काझी**

ईद केवळ आमच्यासाठीच नाही, तर संपूर्ण समाजासाठी प्रेम आणि बंधुत्वाचा संदेश देणारा सण आहे. हिंदू-मुस्लिम बांधवांनी एकत्र शिरखुर्म्याचा आनंद घेतल्याने खरंच समाधान वाटलं. अशा सणांमुळे समाजात एकोप्याची भावना वाढते.

**- महम्मद शेख**

## निधन वार्ता

### सगुणाई जाधव



**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

मराठा आरक्षणाच्या चळवळीतील सक्रिय नेतृत्व, सोमपा परिवहनचे माजीसभापती राजन भाऊ जाधव यांच्या मातोश्री सगुनाई शंकर जाधव यांचे वृद्धापकाळाने सोमवारी सकाळी नऊ वाजता दुःखद निधन झाले. मृत्यूसमयी त्या ८२ वर्षाच्या होत्या. त्यांच्या पश्चात तीन मुले, सुना, नातवंडे, असा परीवार आहे. त्यांच्यावर सोमवारी सायंकाळी जुना पूना नाका येथील स्मशानभूमीमध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले. यावेळी समाजातील विविध स्तरातील नागरीक, राजकीय नेते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### शेषाबाई विरकर



**पिलीव, दि. ३१ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव (जरगवस्ती) येथील शेषाबाई दादा विरकर यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले. मृत्यूसमयी त्या ७६ वर्षांच्या होत्या. त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, पाच मुली, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

### तुकाराम पाटील



**अक्कलकोट, दि. ३१ मार्च-**

रुद्देवाडी येथील सरपंच तुकाराम पाटील (वय-७८) यांचे वाढदिनादिवशीच रविवारी रात्री अफजलपुर जवळ अपघाती निधन झाले. त्यांच्यावर सोमवारी दुपारी अंत्यविधी करण्यात आला.त्यांच्या मागे पत्नी, तीन मुले, सूना, नातवंडे असा परिवार आहे. ते सोलापूर जिल्हा परिषदेत ३४ वर्ष शाखा अभियंता होते. सेवानिवृत्तीनंतर ते दोन वर्षापूर्वी थेट सरपंच झाले होते. रुद्देवाडी गावावर शोककळा पसरली आहे. त्यांच्या अंत्यविधीस आमदार सचिन कल्याणशेट्टीसह अनेक गावचे सरपंच उपस्थित होते.

# भावसार व्हिजन क्लबच्यावतीने कर्तृत्ववान महिलांचा सन्मान




**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

भावसार व्हिजन सोलापूर क्लबच्या वतीने रविवार दिनांक २३ मार्च २०२५ रोजी सायं. ७ वा. इंद्रप्रस्थ हॉल येथे जागतिक महिला दिनाचे औचित्य साधून विविध स्पर्धा चे व भावसार समाजातील कर्तृत्ववान महिलांचा सन्मान सोहळा चे आयोजन करण्यात आले होते.

व्यासपीठावर प्रमुख पाहुणे म्हणून रोटे. धनश्री केळकर व परीक्षक म्हणून अरुणा गुजर, सोबत अध्यक्ष गीतांजली खमितकर, सचिवा सुप्रिया जवळकर उपस्थित होते. सर्वप्रथम गायत्री महामंत्राने कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. वेशभूषा स्पर्धा, पाककला स्पर्धा, रांगोळी स्पर्धा, म्युझिकल प्ले राऊंड स्पर्धा अशा स्पर्धा यावेळी घेण्यात आल्या. प्रत्येक स्पर्धेतून दोन विजेते याप्रमाणे एकूण आठ विजेती महिलांना बक्षिसे देण्यात आली. या स्पर्धा यशस्वी करण्यासाठी प्रणिता महिंद्रकर, वंदना पुकाळे, गीतांजली खमितकर, रूपाली निकते आदींनी परिश्रम घेतले. या स्पर्धेमध्ये वर्षा सुलाखे, अरुणा निकते, हर्षदा तांदळे, नम्रता पुकाळे, शिल्पा उपरे, सुनिता क्षीरसागर, सुवर्णा बासुतकर, पुनम भावसार, रूपाली निकते, खुशी निकते आदींनी सहभाग घेतला होता.

तद्नंतर शिक्षण क्षेत्रात शिक्षिका म्हणून कार्यरत असलेल्या भावसार समाजातील पुष्पा बासुतकर, सागरीका हिबारे, शोभा अंबुरे या तीन कर्तृत्ववान महिलांचा सत्कार करण्यात आला. शाल, श्रीफळ व पुष्पगुच्छ असे सत्काराचे स्वरूप होते. यांची ओळख सीमा बासुतकर, वंदना पुकाळे, सुनिता क्षीरसागर यांनी करून दिली. तर प्रमुख पाहुणे रोटे. धनश्री केळकर यांची ओळख प्रणिता महिंद्रकर यांनी करून दिली.

प्रमुख पाहुण्या रोटे. धनश्री केळकर म्हणाले की प्रत्येक क्षेत्रामध्ये महिलांची भागीदारी वाढत चालली आहे. महिला प्रत्येक क्षेत्रात आगेकूच करत आहेत. त्यांची ही प्रगती इतर महिलांना प्रेरणा देणारी आहे. आजही तीन कर्तृत्ववान महिलांचा येथे सन्मान करुन आयोजकांनी खऱ्या अर्थाने सर्व महिलांचा सन्मान केला आहे.

विशेषप्राविण्यमिळवल्याबद्दल खुशी निकते, आशिष जवळकर, संस्कृती उपरे, श्रेयस महिंद्रकर, अथर्व राशिनकर यांचाही यावेळी सत्कार करण्यात आला. यानंतर क्लबचे मासिक बुलेटिन झेप या अंकाचे यावेळी मान्यवरांच्या हस्ते प्रकाशन करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. सोनाली बेंद्रे यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुप्रिया जवळकर यांनी केले.



# सविता पाटील यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

आविष्कार सोशल ॲड. एज्युकेशनल फाउंडेशन कोल्हापूर शाखेकडून सोलापूरच्या सविता राजूदास पाटील यांना राज्यस्तरीय राजमाता जिजाऊ पुरस्कार मिळाला. शैक्षणिक व काव्य लेखनाबद्दल हा पुरस्कार देण्यात आला.

फडकुले सभागृहात पोलीस आयुक्त दीपक आर्वे, संस्थापक संजय पवार , पत्रकार व प्रसिद्ध लेखक सचिन वायकुळे, डॉ. अनिल देशमाने इंदिरा गांधी कॉलेज ऑफ इंजीनियरिंगचे संस्थापक यांच्या हस्ते पुरस्कार वितरण करण्यात आले. सविता पाटील यांना यापूर्वी देखील प्रवासवर्णने, काव्यलेखन व उत्कृष्ठ साहित्य लेखनाचे अनेक राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पुरस्कार मिळालेले आहेत. त्यांचे सर्व स्तरातून कौतुक होत आहे.

# तरूणास दगडाने मारहाण

**सोलापूर :** शहरातील विजापूर रोडवरील दोन नंबर झोपडपट्टी येथे थांबलेल्या तरूणास दोघांनी दगडाने व लाथाबुक्क्याने मारहाण करून जखमी केले.आदित्य बाळासाहेब भोसले (वय १९, रा. आदित्य नगर) असे जखमी तरूणाचे नाव आहे. ३० मार्च रोजी रात्री दहाच्या सुमारास आदित्य हा २ नंबर झोपडपट्टी येथे थांबला असताना अज्ञात कारणावरून रोहित जाधव व शुभम वडणे या दोघांनी मारहाण करून जखमी केले. त्याला उपचारासाठी धनराज जाधव याने रुग्णालयात दाखल केले.

# हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय
# एक शिक्षण समृध्द दीपस्तंभ




श्री सिध्दरामेश्वरांच्या पावननगरीत सोलापूर नगरीच्या हृदयस्थानी उभी असलेली एक भव्य, ऐतिहासिक व शिक्षण प्रेमींसाठी आकर्षण ठरणारी शिक्षण संस्था म्हणजे हरिभाई देवकरण प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय ! ही संस्था म्हणजे केवळ शिक्षण संस्था नाही, तर ज्ञानदानाचे पवित्र मंदिर, संस्कारांची गंगोत्री व समाज घडवणारी प्रयोगशाळा आहे.

आज हरिभाई देवकरण प्रशालेचा १०७ वा वर्धापन दिन, पण मी तर म्हणेन या ज्ञानयज्ञाच्या अखंड ज्योतीचा हा आनंदोत्सव! आजच्या या वर्धापनदिनी संस्थेचे संस्थापक कै. रामकृष्ण भिकाजी उर्फ दामूअण्णा कुलकर्णी, कै. श्री. कृष्णाजी बल्लाळ डोंगरे, कै. रामचंद्र गोपाळ देव, कै. दामोदर सदाशिव करंबळे या महान विभूतींच्या चरणी नतमस्तक होताना अंतकरण भरून येते.

शहराच्या मध्यवर्ती हरिभाई देवकरण प्रशालेची दगडी इमारत ही सर्वांच्या दृष्टीने महत्त्वाची वास्तु म्हणून ओळखली जाते. २० व्या शतकाच्या प्रारंभी सोलापूर ही भूमी गिरणगाव म्हणून ओळखली जात होती. या शहरात मोठा अल्पशिक्षित कामगार वर्ग होता. शैक्षणिक समृध्दी म्हणावी तितकी नव्हती. सर्वसामान्यांना शिक्षण घेता यावे यासाठी बोटावर मोजता येणाऱ्या शाळा व मॅट्रीकपर्यंत शिक्षण देणारे सरकारी हायस्कूल म्हणजे नॉर्थकोट तांत्रिक प्रशाला या शहरात होती.

त्याचवेळी समाजसेवेचा वारसा जोपासणारे, ज्ञानाचे शिल्पकार असणारे पुणे येथील नामवंत शिक्षण प्रसारक मंडळी या शिक्षण संस्थेचे सोलापूर येथील सदस्य ना. रावबहादूर भाऊसाहेब साठे आणि श्री. गो. पं. शिदोरे यांना संस्थेने सोलापूर येथे शाळा काढावी असे सुचविले, ही कल्पना नव्हे. तर, हे स्वप्न सत्यात उतरविण्यासाठी संस्थेचे जेष्ठ सदस्य प्राचार्य विनायकराव आपटे आणि कादंबरीकार हरी नारायण आपटे यांनी मान्यता दिली. त्याचवेळी ही कल्पना सोलापूरच्या नागरीकांपुढे मांडण्यासाठी भाऊसाहेब साठे यांनी सोलापुरातील नागरिकांची सभा घेतली. त्याचवेळी दातृत्वाचा गुण असणारे, सामाजिक कार्याची आवड असणारे सोलापूर येथील प्रसिध्द हरिभाई देवकरण पेढीचे प्रमुख शेठ हिराचंद रामचंद गांधी यांनी यासाठी देणगी जाहीर केली.

त्याचवेळी आणखी एक सुवर्णकांचन योग आला तो म्हणजे डोळे स्कूलचे चालक रा. ब. आपटे यांनी आपली स्वतःची शाळा शि. प्र. मंडळीने चालवावी असा अर्ज केला. तेव्हा मा. शेठ हिराचंद रामचंद गांधी यांच्या देणगीतून ती शाळा चालविण्याचे ठरले व १ एप्रिल, १९१८ रोजी शेठ हिराचंद पेढीच्या नावावरून हरिभाई देवकरण प्रशाला सुरू झाली. सुरुवातीला अत्यंत प्रतिकूल परिस्थिती निर्माण झाली होती, कारण शाळेला इमारत नसल्याने अनेक जागांचा विचार झाल्यानंतर कलेक्टर साहेबांनी होम मैदानालगतची खाणीची साडेचार एकर जागा १९२७-२८ या काळात शाळेला देवू केली. त्या जागेला लगत असणारी चार एकर पंधरा गुंठे जागा शाळेने नगरपालिकेकडून विकत घेतली तर नगरपालिकेने एक एकर २७ गुंठे जागा शाळेला ज्ञानदानासाठी देणगी म्हणून दिली. थेंबे थेंबे तळे साचे या उक्तीप्रमाणे आणखीन थोडी जागा शाळेने मिळविली व एकूण साडे दहा ते अकरा एकर जागा शाळेला मिळाली. याच जागेवर २२ मार्च, १९२८ रोजी शाळेच्या इमारतीची पायाभरणी झाली व त्या भव्य वास्तूचे उद्घाटन ७ नोव्हेंबर, १९३२ रोजी तत्कालीन मुंबई इलाख्याचे गव्हर्नर सर फ्रेडरीक राणा यांच्या हस्ते झाले. आज या भव्य वास्तूमध्ये ६० पेक्षा जास्त वर्गखोल्या उपलब्ध आहेत.

ज्ञानरूपी सरीतेच्या अखंड प्रवाह असलेल्या हरिभाई देवकरण विद्यालयाच्या भव्य दगडी इमारतीकडे पाहिले की, एका महान शिक्षण संस्थेचे दर्शन होते. ही वास्तू फक्त विटा, दगड व चुन्यांनी बांधलेली नाही तर स्वप्न, कर्तव्य, साधना आणि समर्पणाच्या इमारतीला उभे करणारे शिक्षक, संस्थापक आणि विद्यार्थी यांची यशोगाथा येथे कोरली आहे.

विद्यालयाच्या अकरा एकराच्या विस्तीर्ण परिसरात वसलेले सुशोभित अंगण असलेले हे ठिकाण म्हणजे ज्ञानोपासकांसाठी तीर्थक्षेत्रच ! या विशाल प्रागंणात पाऊल टाकताच एक आगळीच सकारात्मक ऊर्जा अनुभवास येते. इथे शिकणाऱ्या प्रत्येक विद्यार्थ्यांच्या चेहऱ्यावर आत्मविश्वासाची झळाळी येते आणि त्यांच्या डोळ्यात भविष्याचे सुंदर स्वप्न दिसते.

या विद्यालयाचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे येथील वैज्ञानिक दृष्टीकोनातून सुसज्ज असणाऱ्या विज्ञान विषयाच्या तीन सुसज्ज प्रयोगशाळा, इलेक्ट्रॉनिक्स विभाग, क्रॉफ्ट सायन्ससाठी विशेष व्यवस्था, एक लाखाहून अधिक ग्रंथाचा खजिना असलेले सुसज्ज ग्रंथालय म्हणजे ज्ञानाचा सुवर्णसिंधू, येथे प्रत्येक विषयावर विपुल प्रमाणात पुस्तके उपलब्ध असून स्पर्धा परीक्षासाठी मार्गदर्शन करणारी ग्रंथसंपदा विद्यार्थ्यांना यशाच्या शिखरावर पोहचविण्याचा मार्ग दाखविते.

विद्यार्थ्यांच्या सृजनशीलतेला वाव मिळावा यासाठी विद्यालयात स्वतंत्र विशेष कलादालन व मुळे सभागृह आहे. विद्यार्थ्यांना रंगमंचावर उभे रहाण्याची पहिली संधी मिळावी. त्यांच्यामध्ये आत्मविश्वास निर्माण व्हावा, त्यांचे अभिनय कौशल्य फुलावे यासाठी प्रयत्न केले जातात.

प्रशालेत असणाऱ्या संगीत दालनामध्ये व्हायोलीन, बासरी, तबला, हार्मोनियम, खंजीर, तालवाद्ये, पखवांज यासारखी वाद्ये विद्यालयात विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातात. दररोज या विद्यार्थ्यांचा गाण्याचा रियाज घेतला जातो. त्यामुळे विद्यार्थ्यांच्या अंगी असलेल्या कलागुणांना इथे नवा आयाम मिळतो.

या प्रशालेचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे या प्रशालेत जात-धर्म-प्रांत या सर्व बंधनाना झुगारून मानवता हाच खरा श्रेष्ठ धर्म मानून इथे येणाऱ्या विद्यार्थ्यांमध्ये गरीब श्रीमंत, जात धर्म याचा विचार न करता सर्व विद्यार्थी ही एकाच प्रभूची लेकरे आहेत म्हणून सर्वांना शिक्षणाची समान संधी दिली जाते. विद्यार्थ्यांची मेहनत, त्यांचा अभ्यास व त्यांच्या ज्ञानलालसेला महत्त्व दिले जाते.

दहावीच्या १९६७ सालच्या माजी विद्यार्थ्यांनी इमारतीपासून नू.म.वि. पर्यंत जाणारा डांबरी रस्ता तयार करून दिला तर याच काळात शाळेचे माजी उपमुख्याध्यापक पद्माकर देव यांनी त्यांच्या पत्नीच्या स्मरणार्थ दिलेल्या देणगीतून कै. सौ. प्रतिभा पद्माकर देव हे कलादालन उभा केले. १९८६ मध्ये याच वास्तुत पद्माकांत बक्षी यांनी दिलेल्या देणगीतून पद्माकांत बक्षी ग्रंथालय दालन निर्माण केले आहे.

या प्रशालेत स्वतंत्र कीडादालन, व्यायामशाळा, कलाकक्ष सुसज्ज असून त्याचा विद्यार्थी उपयोग करून घेत आहेत. याचा मनस्वी आनंद होतोय. या वर्षाची उल्लेखनीय व संस्थेच्या दृष्टीने आनंदाची व अभिमानाची बाब म्हणजे संस्थेमार्फत सुरू करण्यात आलेल्या कनिष्ठ महाविद्यालयास ५० वर्षे पूर्ण झाली असून या कनिष्ठ महाविद्यालयाचा सुवर्ण महोत्सव विविध नवनवीन उपक्रमाने साजरा केला जात आहे.

शतकाहून अधिक काळ शिक्षणाचा अखंड दीप तेवत ठेवणाऱ्या हरिभाई देवकरण प्रशाला व विद्यालयाच्या नियामक मंडळाला आज कृतज्ञतेच्या शब्दांनी वंदन करावे तरी ते अपूरेच ठरेल. ह. दे. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालयाचे शांत स्वभावाचे, दूरदृष्टी विचाराचे, कृतीतून आपल्या कार्याची ओळख करून देणारे, संयमशील, संस्थेच्या हितासाठी निःस्वार्थपणे त्याग करणारे शाळा समितीचे अध्यक्ष मा. श्री राजेश पटवर्धन साहेब यांच्या मार्गदर्शनाखाली शाळेमध्ये आधुनिकीकरणाला गती प्राप्त झाली आहे. समाजाची व विद्यार्थ्यांची गरज त्यांनी अचूकपणे हेरली असून या जिल्ह्यातील गोरगरीब, गरजू, बुध्दिमान, गुणवंत विद्यार्थ्यांसाठी , , या सारख्या कठिण परीक्षांसाठी मार्गदर्शनाची सोय अल्प दरात उपलब्ध करून दिली आहे. ही एक सुवर्ण संधीच होय.

खरोखर नियामक मंडळाने पटवर्धन कुंटुंबियावर ठेवलेला विश्वास, त्याचे सामाजिक, शैक्षणिक कार्य विचारात घेतल्यानेच त्यांची तिसरी पिढी आज मोठ्या उमेदीने हा विद्येचा वटवृक्ष बहरण्यासाठी प्रयत्न करीत आहे. याचा प्रत्येकांस अभिमान व आनंदच वाटत आहे.

आज याच प्रशालेतून हजारो डॉक्टर, अभियंते, शास्त्रज्ञ, कलाकार, खेळाडू, उद्योजक, वास्तुतज्ञ, लेखक, कवी तयार झाले आहेत. याचा आम्हा सर्वांना अभिमान वाटते. संस्थेच्या प्रेरणेतून प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय निश्चितच उत्कर्षाच्या यशावर पोहचेल, याचा आम्हास आत्मविश्वास वाटतो.

**- शब्दांकन : मल्लिकार्जुन घवाळे**



१९१८ मध्ये रोवलेल्या या ज्ञानसंकुलरूपी रोपट्याचे आज एका विशाल वटवृक्षात रूपातंर झाले आहे. आज या गौरवशाली क्षणी माझ्या हृदयात कृतज्ञतेचा पूर आलेला आहे. ह. दे. प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय म्हणजे केवळ एक शाळा नव्हे तर ज्ञानाचा दिवा, संस्कारांचे शिल्पगृह आणि उज्वल भविष्याची पवित्र वाटचाल आहे. शिक्षण हाच सर्वोत्तम धर्म आणि विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास हाच एक एकमेव ध्यास, या तत्वाने मी स्वतःला या ज्ञानयज्ञासाठी वाहून घेत आहे.

**राजेश पटवर्धन, अध्यक्ष, शाळा समिती**



ही शाळा म्हणजे माझ्यासाठी एक ज्ञानमंदिर आणि या मंदिरातील खऱ्या मूर्ती म्हणजे माझे प्रिय विद्यार्थी ! त्यांच्या डोळ्यातील चमक हीच माझी प्रेरणा आणि त्यांच्या यशाची कहाणी हेच माझ्या कार्याचे फळ. या विद्यालयाचा प्रत्येक शिक्षक म्हणजे एक दीपस्तंभ ! म्हणूनच प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय ज्ञानाच्या आकाशात नक्षत्राच्या तेजाप्रमाणे झळकत आहे.

**दीपा फाटक, प्राचार्या**



ज्या संस्थेने माझ्यावरती, माझ्या कार्यावरती संस्थेच्या, शाळेच्या प्रगतीसाठी महत्वाची जबाबदारी अत्यंत विश्वासाने सोपवली, आज या विश्वासास पात्र झाल्याने माझ्या हृदयातून एकच प्रार्थना उमटते. हा ज्ञानदीप अखंड तेवत राहो ! विद्यार्थ्याचे यश आकाशाएवढे विस्तारीत होवो ! संस्था व शाळेचे नाव जगाच्या नकाशात सुवर्णाक्षरांनी कोरले जावो ! हीच मनःपूर्वक हार्दिक शुभेच्छा!

**- हणमंत मोतीबने, जेष्ठ पर्यवेक्षक, ह. दे. प्रशाला.**

हाती घ्याल ते तडीस न्या हे ब्रीद वाक्य उराशी बाळगून एकीकडे एकशे सहावा वर्धापन दिन साजरा करणारी हरिभाई देवकरण प्रशाला व शैक्षणिक धोरणात झालेल्या बदलानुसार उच्च शिक्षणाकडे वाटचाल करीत असताना २०२४-२५ हे वर्ष सुवर्ण महोत्सवी वर्ष म्हणून साजरा करणारे कला, वाणिज्य, शास्त्र शाखा असणारे क. महाविद्यालय म्हणजे ज्ञान, कला, क्रीडा, उद्योग, व्यापार, मनोरंजन, देशसेवा या क्षेत्रात वेगळी ओळख निर्माण करणारे शिक्षण संकुल होय ! संगणक, इलेक्ट्रॉनिक्स, क्रॉफ्ट सायन्स सहित एन. सी. सी. विभागासह अनेक स्पर्धा परीक्षेत घवघवीत यश संपादन करणारे विद्यार्थी म्हणजे आमचे दैवतच ! अशा या संकुलात अध्यापन करण्याची संधी मिळणे व अन्य शैक्षणिक उपक्रमात, राष्ट्रीय अंतरराष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग होण्याचे भाग्य मिळते ते फक्त या संस्थेच्या कृपेमुळे ! हे आमचे भाग्यच म्हणावे लागेल ! संस्थेच्या पदाधिकाऱ्यांचे प्रोत्साहन, शाळा समिती अध्यक्ष श्री राजेश पटवर्धन यांचे मार्गदर्शन, प्राचार्य, पर्यवेक्षक, सर्व शिक्षकांचे सहकार्य अवर्णनीय आहे. येथील अनेक माजी विद्यार्थी आज देशविदेशात अनेक क्षेत्रातील उच्च पदावर प्रशंसनीय कार्य करीत आहेत, याचा महाविद्यालयाला सार्थ अभिमान आहे. सुवर्ण महोत्सवी वर्षानिमित्त वक्तृत्व, वादविवाद, रांगोळी, मेहंदी, समूह गायन, समूह नृत्य, कबड्डी यासारख्या अनेक स्पर्धा या वर्षभर घेण्यात आल्या. त्यांचा पारितोषिक वितरण समारंभ क. महाविद्यालयाच्या प्रथम बॅचचे विद्यार्थी व महाराष्ट्र राज्याच्या उच्च न्यायालयाचे माजी न्यायमूर्ती श्री पृथ्वीराज केशवराव चव्हाण यांच्या शुभहस्ते आज सकाळी ठीक नऊ वाजता मुळे सभागृहात संपन्न होत आहे. याशिवाय रक्तदान शिबीर आयोजित करण्यात आले आहे. सर्व माजी शिक्षक, माजी विद्यार्थी, पालक व हितचिंतकांनी उपस्थित राहून आपला आनंद द्विगुणित करावा ही विनंती !

**- प्रा. धन्यकुमार बिराजदार**
सहशिक्षक, प्रशाला व कनिष्ठ महाविद्यालय

# रमजान ईदनिमित्त हजारो मुस्लिम बांधवांनी केले सामूहिक नमाज पठण

## ● देशाच्या उन्नतीसाठी शांतता व मानवता आवश्यक : शहर काझी मुफ्ती सय्यद अमजद अली यांचा संदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

सर्व जगाला मानवतेची शिकवण देणारी ईद-उल-फित्र अर्थात रमजान ईद सोलापूर शहरात मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. शहरातील विविध ईदगाह मैदानावर ईदचा विशेष नमाज अदा करण्यात आला. यामध्ये हजारो मुस्लिम अबालवृद्ध बांधवांनी एकत्रित येत नमाज पठण केले. सामूहिक नमाज अदा केल्यानंतर आबाल वृद्ध मुस्लिम बांधवांनी एकमेकांना आलिंगन देत ''ईद मुबारक'' असे म्हणत एकमेकांना शुभेच्छा दिल्या.

दरम्यान, गेल्या महिन्याभरापासून मुस्लिम बांधवांचा रमजान पवित्र महिना सुरू होता. या निमित्ताने समाज बांधवांनी महिनाभर निर्जल उपवास केले. अल्लाहाच्या उपासनेत स्वतःला अधिक-अधिक व्यस्त ठेवण्यास प्राधान्य दिले. याकाळात अनेक मुस्लिम बांधवांनी पाच वेळेची नमाज अदा केली. यादरम्यान पहाटेपासून रात्री उशिरापर्यंत सर्वच मशिदीमध्ये वर्दळ पाहावयास मिळत होती. रविवारी संध्याकाळी चंद्रदर्शन घडले. त्यामुळे आज रमजानच्या पवित्र महिन्याची सांगता झाली. दरवर्षीप्रमाणे सोमवारी इदगाह मैदानात सामुहिक नमाज पठण सोहळा संपन्न झाला. यावेळी मैदानाकडे येणारे सर्वच रस्ते फुलून गेले होते. होटगी रोडवरील आलमगीर ईदगाह मैदानावर पारंपारिक डोक्यावर इस्लामी टोपी, नवीन पठाणी कुर्ता अशा पोशाखात हजारो मुस्लिम बांधव एकत्रित जमले होते. यावेळी मुफ्ती काझी सय्यद अमजद अली (शहर काझी) यांच्या प्रमुख उपस्थितीत सामूहिक नमाज पठण झाली. त्यानंतर त्यांनी मुस्लिम बांधवांना संबोधित केले. नमाज अदा करण्या अगोदर अनेक मुस्लिम नागरिकांनी





जकात रक्कम दान केली. विशेष दोन रकात नमाज अदा केल्यानंतर अरबी भाषेतून शहर काझी यांनी विशेष खुतबा वाचला. यावेळी उपस्थित मुस्लिम बांधवांनी मौन ठेवत एकाग्रतेने खुतबा ऐकला. यानंतर संपूर्ण मानव जातीच्या कल्याणासाठी, भारताच्या उत्तर सर्वांगीण प्रगती करता दुवा अदा करण्यात आली. इदगाह मैदानातून नमाज पठणाच्या सोहळ्या दरम्यान राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यात आला. देशात अमन, शांती कायम ठेवण्यासाठी प्रगतिशील राहावे, असे आवाहन करण्यात आले. नमाज पठणानंतर सर्वांनी एकमेकांना आलिंगन देत शुभेच्छा दिल्या.

### जुना आलमगीर ईदगाह (पानगल स्कूल मैदान)

देशात वक्फ बोर्डाचा योग्य वापर करा. आपल्या समाजातील मुलांना उच्च शिक्षण द्या. देशात शांती कायम ठेवा.नाहक कोणालाही त्रास देवू नका असे आवाहन यावेळी डॉ.मौलाना सैय्यद नक्शबंदी यांनी आपल्या प्रवचनातून केले.

### जुनी मिल ईदगाह



जुनी मिल कंपाउंड येथील आदिलशाही ईदगाह येथे नमाज पठण झाल्यावर खतीब मोहम्मद फजुलुल्लाह यांनी देशात शांतता प्रस्थापित करण्यासाठी सर्वांनी एकत्रित रहावे. कोणाच्याही धार्मिक भावना दुखावल्या जातील, असे कृत्य कोणी करू नये. लक्षात ठेवा अल्लाह आणि त्यांच्या पैगंबरांना अमन आणि एकात्मता पसंद आहे असे आवाहन त्यांनी केले.

### आसार मैदान ईदगाह



आसार मैदान येथे सामूहिक नमाज पठण झाल्यावर इमामसाब सादिक मणियार यांनी दुआ मागितली. यावेळी त्यांनी देशात शांतात रहावी देशात कोणत्याही प्रकारचे संकट येऊ नयेत. मुस्लिम बांधवांवरील दुःख दूर व्हावेत, अशी प्रार्थना अल्लाह कडे करण्यात आली.

### रंगभवन ईदगाह



रंगभवन येथील अहले हदीस ईदगाह येथे नमाज पठण संपन्न झाल्यानंतर उपस्थित मुस्लिम बांधवांना संबोधित करताना मौलाना ताहेर बेग यांनी सामूहिक प्रार्थना केली. यावेळी त्यांनी हिंदू-मुस्लिम समाजात धार्मिक तेढ निर्माण करणाऱ्यांना थारा नसल्याचे सांगितले. देशातील स्त्रियांवरील वाढत्या अत्याचार बाबत त्यांनी चिंता व्यक्त करत देशात बंधुता कायम रहावी यासाठी प्रार्थना केली.

### पोलिसांचा चोख बंदोबस्त...

सोलापूर शहरात रमजान ईदसाठी शहर पोलिसांकडून चोख बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. शहरातील पाच ठिकाणी सार्वजनिक नमाज पठण करण्यात आले. याठिकाणचे रस्ते वाहतूकीसाठी बंद करण्यात आले होते. पोलिस आयुक्त एम राजकुमार यांच्या नेतृत्वाखाली शहरात ३ पोलिस उपायुक्त, ५ सहायक पोलिस आयुक्त, २२ पोलिस निरीक्षक, ६५ पोलिस उपनिरीक्षक, ७०० पोलिस कर्मचारी, ४०० होमगार्ड आणि राज्य राखीव दलाची १ कंपनी असा बंदोबस्त तैनात करण्यात आला होता. तसेच शहरातील १२ प्रमुख मशिदींच्या ठिकाणी आणि ३६ ठिकाणी फिक्स पॉईट लावण्यात आले होते. होटगी रोडवर नमाज पठणानंतर पोलिस विभागाच्यावतीने मुस्लीम बांधवांना गुलाब पुष्प देऊन रमजान ईच्या शुभेच्छा देण्यात आल्या.

### शहरातील या ईदगाह मैदानावर विशेष नमाज

रमजानची ही ईद समस्त भारत वासियांसाठी सुख समृद्धीमय असो.देशात एकता अखंडता कायम राहो. एकमेकांच्या विरोधात खोट्या गोष्टी पसरवणे, एक दुसऱ्यांबद्दल द्वेष, संशय निर्माण करणे, अफवा पसरवणे, धार्मिक भावना दुखावणे यापासून दूर राहावे. याने अल्लाह तुमच्यावर ना खुश होतो. जर आपण या गोष्टीपासून लांब राहिल्यास अपापसातील वाद राहणार नाही. देशात सर्वधर्मीय लोक एकत्र गुण्या गोविंदाने राहतील, असा संदेश शहर काझी मुफ्ती सय्यद अमजद अली यांनी यावेळी दिला.

# हत्तुरच्या सोमेश्वर-बनसिध्देश्वर मंदिरासाठी ३ कोटी ७६ लाखांचा निधी मंजूर

## आ. सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नांना यश; मंदिर परिसराचा होणार कायापालट

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

दक्षिण तालुक्यातील हत्तुर येथील सोमेश्वर व बनसिध्देश्वर मंदिर देवस्थानच्या करण्यात येणाऱ्या विविध विकासकामांसाठी शासनाच्या ग्रामविकास विभागाकडून ३ कोटी ७६ लाखांचा निधी मंजूर करण्यात आला आहे.

आ. सुभाष देशमुख यांनी या कामासाठी वारंवार पाठपुरावा केला होता. नुकतेच त्यांनी यासाठी ग्राम विकासमंत्र्यांसोबत बैठक घेऊन निधीची मागणी केली होती. अखेर त्याला यश आले आहे. आ. सुभाष देशमुख यांच्या प्रयत्नांमुळे हत्तुर येथील सोमेश्वर व बनसिध्देश्वर मंदिरास तीथक्षेत्र ब दर्जा प्राप्त झाला होता. आ. देशमुख यांनी येथील ग्रामस्थांना या सुशोभिकरणाचा शब्द दिला होता. त्यासाठी त्यांनी वारंवार मुख्यमंत्री, ग्रामविकास मंत्र्यांकडे पाठपुरावा केला होता. या ठिकाणी भक्तनिवाससह विविध विकासकामांसाठी आ. सुभाष देशमुख यांनी ५ कोटींची मागणी केली होती. याबाबत २४ मार्च रोजी ग्रामविकासमंत्र्यासोबत बैठक घेतली होती. ग्राम विकास विभागाने यासाठी ३ कोटी ७६ लाखांचा निधी मंजूर केला असून पहिल्या टप्प्यात ७५ लाखांचा निधी वितरीतही करण्यात आला आहे. या निधीमधून महिला आणि पुरूषांसाठी स्वतंत्र भक्त निवास बांधणे, सार्वजनिक शौचालय, स्नानगृह बांधणे, पाणी पुरवठा करणे, वाहनतळ बांधणे यासह परिसराचे सुशोभिकरण करण्यात येणार आहे. लवकरच या कामांना सुरूवात होणार आहे.





### मंदिर राज्यात नावारूपाला आणणार

ग्रामस्थांना मी शब्द दिला होता, तो पूर्ण केला आहे. आगामी काळात मंदिराच्या सुशोभीकरणासाठी व तीर्थक्षेत्र विकासाच्या अनुषंगाने मंदिर राज्यात नावारूपाला येण्यासाठी पूर्ण सहकार्य करणार असल्याचे आ. सुभाष देशमुख यांनी सांगितले.

# ७२ आसनी विमानसेवेला मिळाला परवाना; मुहूर्त लागणार, सोलापूरकरांचा आनंद द्विगुणीत!

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

येथील होटगी रोडवरील विमानतळाला नागरी विमान वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) ७२ आसनी विमानसेवेचा परवाना दिला असल्याने शहरातील विविध स्तरातील नागरिकांनी दै. तरूण भारतशी बोलताना आपला आनंद द्विगुणीत केला. एप्रिल किंवा मेच्या पहिल्या आठवड्यात विमानसेवा सुरू होण्याचे संकेत मिळत असून, याची टेस्ट राईड कधी होणार? याकडे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.



मध्यंतरी 'रिजनल कनेक्टिव्हीटी स्कीम' अंतर्गत अमरावती विमानतळ आता अधिकृत परवानाधारक विमानतळ म्हणून घोषित झाले आहे. अलायन्स एअरची मुंबई-अमरावती-मुंबई ही विमानसेवा सुरुवातीला आठवड्यातून तीनदा देण्यात येणार आहे. अमरावती विमानतळावर नुकतीच 'एअर कॅलिबरेशन ऑफ प्रिसिजन अप्रोच पाथ इंडिकेटर' अर्थात 'पीएपीआय' चाचणी यशस्वीरीत्या पूर्ण केली आहे. आता टेस्ट राईड झाल्यामुळे अमरावतीकरांना मुंबईपर्यंत विमानाने ये-जा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमरावतीच्या धर्तीवरच सोलापूरलाही ७२ आसनी विमानसेवा देण्यासाठी डिजीसीएकडून परवानाही मिळाला आहे. मात्र विमानसेवा कधी सुरू होईल हे अजूनही नक्की सांगता येत नाही.

विमानसेनेचे उद्घाटन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाल्यानंतर ही विमानसेवा सुरू करण्यासाठी जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद, सोलापूर विकास मंचचे सदस्य, माजी आ. संजयमामा शिंदे, आ. सचिन कल्याणशेट्टी यांनी प्रचंड परिश्रम घेतले. मात्र, हायटेक नेत्यांनी यांची दाळ शिजू दिली नाही. स्वतः मुख्यमंत्री फडणवीस यांनी विमानसेवेबाबत ६ जानेवारी रोजी एक व्हिसीद्वारे बैठक घेवून संबंधित यंत्रणेला लवकर विमानसेवा सुरू करण्याबाबत निर्देश दिले होते. अडीच महिने उलटल्यानंतर हा ७२ आसनी परवाना मिळाला आहे.

विधानसभा निवडणुकीपूर्वी एका पत्रकार परिषदेत केंद्रीय हवाई राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांनीही सोलापूरकरांना ही विमानसेवा लवकर सुरू करण्याचे आश्वासन दिले होते. गेल्या अनेक वर्षांपासून सुरु असलेल्या मागणीला यश येत नसल्याने सोलापूर विकास मंचचे सदस्य, चेंबर ऑफ कॉमर्सचे पदाधिकारी, स्थानिक उद्योजकांनी मध्यंतरी नाराजी व्यक्त केली होती. चिमणी पाडकाम केल्यानंतर ६० कोटी रूपये खर्चून विमानतळाचेही मोठ्या प्रमाणात नुतनीकरण केले आहे. आता ७२ आसनी परवाना मिळाल्याने जाणकार नागरिकांच्या आशा पल्लवित झाल्या असून, ही विमानसेवा सुरू झाल्यानंतर शहरात विविध उद्योग वाढतील आणि शहरातील बेरोजगारीचेही निर्मुलन होईल. या विमानसेवेमुळे शहरातील उद्योजकांना मुंबईतील काम एका दिवसात करून परत त्याच दिवशी घराकडे येता येणार आहे. शहरातील महामार्ग, रेल्वे आणि आता विमानसेवा सुरू झाल्याने शहराची आता औद्योगिक क्रांतीही होईल. मात्र यासाठी आता फ्लाय ९१, इंडिगो का स्टार एअरवेजचे विमान धावून येणार? याची उत्सुकता सर्वांना लागली आहे.

### अमरावतीच्या धर्तीवर लवकर विमानसेवा सुरु व्हावी

टेस्ट राईड झाल्याने आता अमरावतीकरांना मुंबईपर्यंत विमानाने ये-जा करण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. अमरावती विमानतळावरून विमान उड्डाण करण्यासाठी डीजीसीए परवानगी देण्यात आली आहे. याच धर्तीवर आता सोलापूरलाही ७२ आसनी विमान उड्डाणाचा परवाना मिळाला आहे. सोलापूरचे जिल्हा प्रशासन आणि चेंबर ऑफ कॉमर्सनेही यासाठी वारंवार वरिष्ठ पातळीवर पत्रव्यवहारही केला होता. आता ही सेवा लवकर सुरू झाली तर त्याअनुषंगाने या भागात उद्योगधंदे, रोजगाराच्या संधी नक्कीच वाढणार आहेत.

**- राजू राठी, अध्यक्ष, चेंबर ऑफ कॉमर्स, सोलापूर**





# पु.ना.गाडगीळ आणि सन्सच्या लक्ष्मी रोडवरील दालनाचे उद्घाटन

**पुणे, दि. ३१ मार्च-**

महाराष्ट्रातील सर्वाधिक विश्वसनीय आणि लोकप्रिय ज्वेलरी ब्रँड पु. ना. गाडगीळ आणि सन्स आता पुण्याच्या हृदयस्थानी लक्ष्मी रोड येथे नव्या आणि भव्य शोअरूम सह परत आले आहेत. सरस्वती सदन, कुंटे चौक, लक्ष्मी रोड येथे या दालनाचे उद्घाटन राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रविंद्र वंजारवाडकर यांच्या हस्ते संपन्न झाला. याप्रसंगी चितळे बंधू मिठाईवालेचे पार्टनर सौ. व श्रीकृष्ण चितळे यांची विशेष उपस्थिती लाभली. तसेच ग्राहकांच्या, शुभेच्छुकांच्या आणि हिरे-सोन्याच्या दागिन्यांच्या चाहत्यांच्या उपस्थितीत हा सोहळा झाला.

उदघाटन सोहळ्यानंतर राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे पुणे महानगर संघचालक रविंद्र वंजारवाडकर म्हणाले ''अति उच्च दर्जाची परंपरा सांभाळणाऱ्या अजित गाडगीळ यांचे लक्ष्मी रोडवर दालन सुरू झाल्यामुळे जणू सरस्वती आणि लक्ष्मीचा मिलापच झाला आहे. हे केवळ व्यवसायाचे दालन नसून, संस्कृती, परंपरा आणि नवकल्पनांचे अनोखे संगमस्थान आहे. तसेच गुणवत्तेची जपणूक आणि ग्राहकसेवेची निष्ठा हीच त्यांच्या यशाची खरी ओळख आहेच आणि तशीच कायम राहील .''

या वेळी पु ना गाडगीळ आणि सन्सचे संचालक अजित गाडगीळ म्हणाले, ''पुणेकरांचा पु. ना. गाडगीळ आणि सन्सला लक्ष्मी रोडवर पुनरागमन करण्याचा आग्रह अनेक वर्षांपासून होता. ग्राहकांच्या या प्रबळ मागणीला आणि ब्रँडच्या दीर्घकालीन परंपरेला प्रतिसाद देत, आम्ही अत्यंत आनंदाने हे नवे भव्य दालन सुरू करत आहोत. आता पुन्हा एकदा ग्राहकांना सर्वोत्तम कलाकुसर, पारंपरिकतेची जोड आणि उत्कृष्ट सेवा यांचा मिलाफ लक्ष्मी रोड येथील दालनमध्ये अनुभवायला मिळणार आहे.'' गेल्या १९० वर्षांपासून ग्राहकांना उत्कृष्ट दागिने व प्रामाणिक सेवा पुरवणाची परंपरा असलेल्या पु. ना. गाडगीळ आणि सन्स लि. यांचे हे नवीन पाऊल अधिक सोयीस्कर व व्यापक सेवा पुरवण्यासाठी महत्त्वाचे ठरेल.

या भव्य उद्घाटनाच्या निमित्ताने ग्राहकांसाठी खास आकर्षक ऑफर्स: सोन्याच्या दागिन्यांच्या घडणावळीवर ३०% पर्यंत सवलत हिऱ्यांच्या दागिन्यांच्या घडणावळीवर १००% पर्यंत सवलत ही ऑफर ६ एप्रिलपर्यंत लागू राहील. सर्व पुणेकरांनी आणि ग्राहकांना या नव्या आणि भव्य सरस्वती सदन, कुंटे चौक, लक्ष्मी रोडवरील दालनाला भेट देण्याचे आग्रहाचे आमंत्रण पु ना गाडगीळ आणि सन्स तर्फे करण्यात आले. विश्वास, परंपरा आणि दर्जेदार दागिन्यांचा शाही अनुभव आता तुमच्या आवडत्या ठिकाणी मिळेल असा विश्वास ह्या वेळी व्यक्त करण्यात आला. अधिक माहितीसाठी www.pngadgilandsons.com किंवा www.onlinepng.com यावर भेट द्या. अथवा १८०० २३३ ०८८८ टोल-फ्रीवर संपर्क साधा.

# बर्ड फ्लू आटोक्यात आल्याने शहरातील प्रतिबंधित क्षेत्र होणार खुले

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

शहरात विविध ठिकाणी कावळे, घार व बगळा मृत्युमुखी पडल्याच्या घटना गेल्या मार्च महिन्यात घडत होत्या. याचे निदान बर्ड फ्लूचे झाले होते. यातील काही पक्षासह घरगुती कोंबड्यांचे काही नमुने घेवून पुणे आणि भोपाळ येथील लॅबला पाठविले होते. त्याचा अहवाल निगेटिव्ह आला आणि सर्वांनी सुटकेचा निश्वास सोडला.

दरम्यान, यासाठी महापालिका आयुक्त आणि जिल्हाधिकारी यांनी तत्काळ केलेल्या विविध उपाययोजनांमुळे प्रतिबंधित क्षेत्रातील पक्षांच्या मृत्युचे प्रमाण पूर्णतः घटले असल्याने शहरातील ३ ठिकाणी प्रतिबंधित केलेले क्षेत्र नागरिकांसाठी आता एप्रिलच्या पहिल्या आठवड्यात खुले होणार आहे. मार्चमध्ये जास्त पक्षी मृत पावल्यानंतरचा तपासणी अहवाल भोपाळच्या लॅबमधून प्राप्त झाला होवून बर्ड फ्ल्युमुळेच त्या पक्षांचा मृत्यू झाला असल्याचे स्पष्ट झाले होते. यानंतर मनपा आणि जिल्हा प्रशासन अलर्ट झाले आणि जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांनी संबंधित अधिकाऱ्यांना घरगुती पक्षी तपासणीचे आदेश दिले होते. इतकेच कायतर प्रतिबंधित क्षेत्रातील चिकन दुकानेही बंद करण्याचे आदेश दिले होते. डॉक्टर आणि संबंधित कर्मचाऱ्यांच्या १४ टीमनी शहरातील विविध भागातून १०० घरगुती कोंबड्यांचे, कबुतरांचे नमुने तपासणीसाठी आणले आणि त्याचे सॅम्पलही पुणे आणि भोपाळ येथील लॅबला पाठविले होते. त्याचा अहवाल निगेटिव्ह आला होता. इतकेच कायतर प्रतिबंधित स्थळी आता पक्षाची मरतुकही थांबल्याने हे प्रतिबंधित क्षेत्र आता नागरिकांसाठी खुले केले जाणार आहे.





### वेळीच उपाययोजना झाल्याने बर्ड फ्लू नियंत्रणात

जिल्हाधिकाऱ्यांनी वेळीच आढावा बैठक घेवून सर्व संबंधित विभागांना सतर्क राहण्याचे आदेश दिले होते. वन्य पक्षांमध्ये बर्ड फ्लूचा अहवाल पॉझिटिव्ह आला होता; पण घरगुती कोंबड्या, बदके किंवा इतर पक्षी यांना कोणताही आजार अथवा लागण झाल्याचे निदर्शनास आले. बर्ड फ्लुसाठी शहरात वेळीच प्राथमिक खबरदारी घेतली. संबंधित तिन्ही ठिकाणी स्वच्छता आणि औषध फवारणी वेळीच केल्याने बर्ड फ्यु नियंत्रणात आल्याचा दावा डॉक्टरांच्या टीमने दै. तरूण भारतशी बोलताना केला.

**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून सोलापूर, धाराशिव, लातूर,संपूर्ण मराठवाडा तसेच पश्चिम महाराष्ट्र सातारा,सांगली,कोल्हापूर येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. ● प्रबंध संपादक : **विवेक कृष्णाजी घळसासी.** ● समूह मुख्य संपादक : **दिलीप यशवंत पेठे.**● मुख्य संपादक :**प्रशांत वसंतराव माने** दैनिक सोलापूर तरुण भारत रजि.नं.G2/RNP/SLP/D/32/2024-26.RNI Reg.No.46878/87. दूरध्वनी -संपादकीय-(०२१७)-२६००४९८ ● जाहिरात विभाग (०२१७)-२६००३९८. **E-mail starunbharatgmail.com.** ● **Website:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

Mr. Dilip Shivmurthi Dulange is the publisher on behalf of the Company **Solapur Tarun Bharat Media Limited.**, and Daily Solapur Tarun Bharat. We print/publish and distribute these Editions like Solapur, Dharashiv, Latur Nanded, Parbhani, Hingoli, Jalna, and Beed from Register Address 19/20, Industrial Estate, Hotgi Road, Solapur – 413003. ● **Mr. Vivek Krishnaji Ghalsasi -** Dissertation Editor / ● **Mr. Dilip Yeshwant Pethe** - Group Chief Editor ● **Mr. Prashant Vasantrao Mane** - Chief Editor, Daily Solapur Tarun Bharat Postal Register No. G2/RNP/SLP/D32/2024-26. RNI Register No. 4687/87. Editorial Department Tel. No. – 0217-2600398) **Email ID starunbharat@gmail.com** and Advertisement Department Tel. No. – 0217-2600498, ● Website: **https://dainiktarunbharat.com/**, ● Epaper: **https://epaper.dainiktarunbharat.com/.** The Editors / Directors do not necessarily agree with the views expressed in the news and articles published in this issue. (responsible as per PRB Act)

सोलापूर

दिनांक

**सोलापूर तरुण भारत,** सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जुळे सोलापुरात श्रींचा प्रकटदिन सोहळा उत्साहात संपन्न

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

जुळे सोलापूरच्या समर्थ नगर मधील श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.

गुरुवार दि. २७ मार्च रोजी सायं. ७ वा. ह.भ.प. नागनाथ पाटील यांचे हरी पारायण शुक्रवार दि. २८ मार्च रोजी सायं. ७ वा.महात्मा बसवेश्वर व ज्ञानेश्वरी तसेच कार्यक्रमानंतर महाप्रसाद, शनिवार दि. २९ मार्च रोजी सायं. ७ भक्ती संगीत सेवा संपन्न झाला. प्रकट दिनानिमित्त सोमवार दि.३१ मार्च सकाळी सुहासिनी महिलांच्या हस्ते कलश मिरवणूक मोठ्या उत्साही वातावरणात काढण्यात आली. तदनंतर ९ ते १२ वाजेपर्यंत शिवानंद स्वामीजी करजगी व बसवराज शास्त्री तिर्थ यांचे हस्ते होम हवन कार्यक्रम संपन्न झाले. त्यानंतर दुपारी १२ वाजता गुलाल तसेच महाआरती व पाळणा कार्यक्रम संपन्न करण्यात आले. पाळणा कार्यक्रमानंतर महाप्रसादाचा लाभ भाविकांनी घेतला. सायं. ७ वा. लक्ष दिपोत्सव व आरती असे धार्मिक कार्यक्रम संपन्न झाल्याची माहिती युवराज राठोड यांनी दिली.



यावेळी वैशाली चंद्रकांत शहापुरे, चंद्रकांत शहापुरे, युवराज राठोड, श्रध्दा शहापुरे, शकुंतला मोरे, मिनाक्षी राठोड, विद्या कोळी, रेश्मा सोलनकर, अर्चना होळकर,अपर्णा प्रयाग, ज्योती ढवारे, सरोजा कोळी, अर्चना अचलेरे, जगदेवी पाटील, रोहिणी साने, रेखा पवार,.सुवर्णा सलगरे, उर्मिला नवले, हेमलता गवळी, सारीका परबतराव, अनिता कराडे, पूजा कंचे, कल्पना रोकडे, अनिता हिरेमठ एकता राठोड, राजश्री गायकवाड, सरिता शालगर आदींसह भक्तगण उपस्थित होते.









# स्वामी समर्थांच्या दर्शनाला अक्कलकोट नगरीत लोटला जनसागर

## अन्नछत्र मंडळात श्रीपाद वल्लभ दिगंबराचा जयघोष; पाळणा गीताबरोबरच विविध धार्मिक कार्यक्रम उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ मार्च-**

दिगंबरा.. दिगंबरा.... श्रीपाद वल्लभ दिगंबरा....! श्रीक्षेत्र अक्कलकोटनिवासी श्री स्वामी समर्थ महाराज की जय...! श्री अन्नपूर्णा माता की जय..!! च्या जयघोषात श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात सोमवारी श्रींच्या प्रकट दिनानिमित्त न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली व विश्वस्त अर्पिताराजे भोसले यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रींचा प्रकट दिन सोहळा मोठ्या उत्साहात संपन्न झाला. न्यासाकडून महाप्रसादाची उत्कृष्ठ व्यवस्था केल्याने समाधान व्यक्त होत होते. लाखो स्वामी भक्तांनी महाप्रसादाचा लाभ घेतला.

दरम्यान न्यासाच्या महाप्रसाद गृहात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त दुपारी बारा वाजता पाळणा कार्यक्रम झाले. याप्रसंगी न्यासाच्या विश्वस्त अर्पिताराजे अमोलराजे भोसले, रत्नमाला मचाले, तेजस्विनी अमोलराजे भोसले, सुवर्णा घाडगे, पल्लवी कदम, स्मिता कदम, कविता वाकडे, स्वप्ना माने यांच्यासह स्वामी भक्त उपस्थित होते. पाळणा गीताबरोबरच मुख्य पुरोहित अप्पू पुजारी यांच्या हस्ते विधिवत पूजा, धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. श्री वटवृक्ष स्वामी महाराज मंदिरात स्वामी भक्तांच्या उपस्थितीत श्रींना नैवेद्य दाखविण्यात आला. महाप्रसादाचा संकल्प अर्पिताराजे अमोलराजे भोसले यांच्या हस्ते सोडण्यात आल्यानंतर महाप्रसादास सुरुवात करण्यात आली. प्रकट दिनानिमित्त सकाळी महाप्रसादालयात भजनाचा कार्यक्रम झाला. चांदीच्या पाळण्यासह श्रींच्या पूजेच्या ठिकाणास आकर्षक फुलांनी सजविण्यात आले होते.

स्वामी भक्तांनी अन्नछत्र मंडळाच्या परिसरात असलेल्या श्री शमी-विघ्नेश गणेश मंदिर, ब्रह्मांडनायक उभी स्वामींची मूर्ती, नियोजित महाप्रसादगृह इमारत, सध्याचे अद्यावत तात्पुरते महाप्रसादालय, कपिला गाय, कारंजा, शिवस्मारक, कार्यरत यात्री निवास-१, यात्रीभुवन-२, अतिथी गृह, आऊटडोअर व इनडोअर जीम, प्रशस्त वाहनतळ, टेकडीवरील श्री समर्थ वाटिका, शिवचरित्र प्रदर्शन हॉल, अग्निशमन, रुग्णवाहिका, आश्रयदाते कक्ष हे सर्व न्यासाचे विविध उपक्रम भक्तांच्या सेवसाठी सुरु केलेल्या विविध उपक्रम व व्यवस्थेचे स्वागत करुन न्यासाचे कौतुक केले.

यावेळी न्यासाचे उपाध्यक्ष अभय खोबरे, सचिव शामराव मोरे, विश्वस्त भाऊ कापसे, सौरभ मोरे, मनोज निकम, रामचंद्रराव घाटगे, डॉ. विनायक बुदले, सनी सोनटक्के, रोहित खोबरे, शिवराज स्वामी, निखील पाटील, अतिश पवार, गोटू माने, योगेश कटारे, विराज माणिकशेट्टी, राजाराम पवार, सतीश महिंद्रकर, शहाजी यादव, संजय गोंडाळ, बाळासाहेब घाडगे, बाळासाहेब पोळ, नामा भोसले, संभाजीराव पवार, श्रीनिवास गवंडी, दत्ता माने, रोहित मोरे, सरफराज शेख, मैनुद्दीन कोरबू, तानाजी पाटील, राजू पवार, रमेश हेगडे, प्रसाद हुल्ले, शरद भोसले, बसवराज क्यार, अनिल बिराजदार, चंद्रकांत हिबारे, एस. के. स्वामी, सिद्धाराम कल्याणी, शावरेप्पा माणकोजी, मल्लिनाथ कोगनुरे, कल्याण देशमुख, धनंजय निंबाळकर, गोविंदराव शिंदे, विशाल घाडगे, रोहित कदम, विठ्ठल रेड्डी, समर्थ चव्हाण यांच्यासह सेवेकरी, कर्मचारी, भक्तगण उपस्थित होते.

### महाप्रसादाचे उत्कृष्ठ नियोजन

श्रींच्या प्रकट दिनाच्या दिवशी श्रीक्षेत्र अक्कलकोटला आलो असता श्री स्वामी समर्थ अन्नछत्र मंडळात लाखो स्वामी भक्त महाप्रसादाकरिता आलेले होते. त्याठिकाणी न्यासाचे संस्थापक अध्यक्ष जन्मेजयराजे भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली व कार्यकारी अध्यक्ष अमोलराजे भोसले यांच्या नेतृत्वाखाली न्यासाकडून महाप्रसादाचे उत्कृष्ठ नियोजन व व्यवस्थापन पाहून माझ्यासह स्वामी भक्तांनी समाधान व्यक्त केले.

**- सुनिल मरळे**
**संचालक, नगर रचना,**
**पी.एम.आर.डी.ए.आकुर्डी, पुणे**

## श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ... स्वामी भक्तांच्या गर्दीने फुलली अक्कलकोट नगरी

**तभा वृत्तसेवा,**
**अक्कलकोट, दि. ३१ मार्च-**

श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ ... च्या जयघोषात अक्कलकोटमध्ये श्री स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिन लाखो भाविकांच्या उपस्थितीत मोठ्या उत्साहात व भक्तीभावात संपन्न झाला. वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर, समाधी मठ, राजेराय मठ, गुरुमंदिर, बॅगेहळ्ळी स्वामी समर्थ विश्रांती धाम या ठिकाणी स्वामींचा प्रकट दिनानिमित्त भाविकांनी स्वामीचे दर्शन घेतले. यानिमित्त तीर्थक्षेत्र अक्कलकोट नगरी स्वामी भक्तांच्या गर्दीने फुलली होती. स्वामी नामाच्या जयघोषाने आसमंत दुमदुमून गेला होता.

स्वामी समर्थ महाराजांचा प्रकटदिनानिमित्त रविवारी रात्रीपासून राज्याच्या विविध भागातून पायी पालखी दिंडी सोहळे व स्वामी भक्त दर्शनार्थ अक्कलकोट तीर्थक्षेत्री दाखल झाले होते. सोमवारपर्यंत हा ओघ चालूच होता. वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिर दर्शनासाठी रविवारी मध्यरात्रीपासून गुरुमंदिर रस्ता, राजेफत्तेसिह चौक, गायत्री हॉटेल, स्वामी मंदिर दक्षिण महाद्वारपर्यंत दर्शन बारी लांबच लांबपर्यंत पोहचली होती. सोमवारी दिवसभर भाविकांची दर्शन रांग वाढतच गेली. स्वामी महाराज मंदिर येथुन पहाटे ४ वाजता बोला श्री स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ, सदगुरू स्वामी समर्थ जयजय स्वामी समर्थ, बोला दिंगबरा दिंगबरा श्रीपाद वल्लभ दिगंबरा, श्रीपाद वल्लभ दिंगबराच्या जयघोषात हजारो स्वामी भक्तांच्या उपस्थितीमध्ये नगर प्रदक्षिणा निघाली. वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरातून फत्तेसिंह चौक, समर्थ चौक, वीर सावरकर चौक, कापड बाजार, कारंजा चौक, बुधवार पेठ, समाधी मठापर्यंत मार्गस्थ झाली. समाधी मठापासुन पुन्हा प्रभात फेरी नगर प्रदक्षिणा दावल बैन्ड, सुभाष गल्ली, जयजवान गल्ली, रामगल्ली, भारत गल्ली, देशमुख गल्ली, वटवृक्ष मंदिरा पर्यंत मार्गस्थ झाली. यावेळी नगरप्रदक्षिणेत राजेराय मठाचे विश्वस्त विकास दोडके, अक्षय सरदेशमुख, बाळासाहेब घाटगे, चन्नविर फुलारी, प्रदिप हिंडोळे, नरेश अहिर, अखिलेश नायकु, विशाल संजय पाठक, काशिनाथ इंडे आदी सहभागी होते.

**स्वामी प्रकटदिन पाळणा कार्यक्रम :** वटवृक्ष स्वामी समर्थ मंदिरात स्वामी समर्थ महाराज प्रकट दिन कार्यक्रम संपन्न झाला. देवस्थानचे मुख्य पुरोहित मोहन गुरुजी यांच्या मार्गदर्शनाखाली पुरोहित मंदार महाराज पुजारी, व्यंकु महाराज पुजारी यांच्या मंत्रोपचारात विश्वस्त अध्यक्ष महेश इंगळे, प्रथमेश इंगळे, विश्वस्त आत्माराम घाटगे, नागनाथ जेऊरे, ऋषी लोणारी, नागनाथ गुजले, संजय पवार, बबन सोनार, पिंटू पवार आदींच्या उपस्थितीत प्रकट दिन पाळणा कार्यक्रम भजन गुलाल पुष्पवृष्ठीने संपन्न झाला.

**तिहेरी पद्धतीने दर्शन व्यवस्था करावी :** भाविकांची एकाच वेळी एकाच मंदिराकडे गर्दी झाल्यास दर्शनास विलंब हातो. उत्सव काळात अक्कलकोट येथील विविध स्वामी मठात दर्शन घेतल्यास सर्वांना कमी वेळात स्वामीचे दर्शन होईल. उत्सव काळात अक्कलकोट येथील विविध स्वामी मंदिरात २४ तास दर्शन सेवा उपलब्ध करावी. यामुळे भाविकांना रात्री तासनतास रस्त्यावर रांगेत उभे राहण्याचा त्रास कमी होईल. दर्शन पद्धतीमध्ये मुख दर्शन, धर्म दर्शन, देणगी अर्पण, दर्शन रांग अशा तिहेरी पद्धतीने दर्शन व्यवस्था करावी. ज्या भाविकांना जसा वेळ उपलब्ध असेल त्या पद्धतीने दर्शन घेऊ शकतील अशी मागणी पुणे येथील स्वामी भक्त नरेश अहिर, अखिलेश नायकु, विशाल ऋषीकेश यांनी केली आहे.

## बनशंकरी नगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात प्रकटदिन उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

श्री स्वामी समर्थ प्रकट दिन सोहळ्यानिमित्त शहरातील बनशंकरी नगर, म्हाडा कॉलनी जुळे सोलापूर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. गुढीपाडव्यानिमित्त पालखी नगर प्रदक्षिणा रविवार (दि. ३०) मार्च रोजी मोठ्या उत्साही वातावरणात संपन्न झाली. त्यानंतर सोमवार (दि.३१) मार्च रोजी स्वामी समर्थ मंदिरात सकाळी ७ वाजता अभिषेक भजनाचा कार्यक्रम संपन्न झाला. त्यानंतर दुपारी १२ वाजता गुलाल व महाआरती त्यानंतर महाप्रसाद संध्याकाळी ७ वाजता महाराजांची पालखी आणि रात्री ठीक ८ वाजता आरती मोठ्या उत्साहात संपन्न झाली.



दरम्यान, सालाबाद प्रमाणे यंदाच्या वर्षी देखील ईच्छा स्वामी समर्थांची महिला सेवाभावी संस्था यांच्यावतीने धार्मिक कार्यक्रम संपन्न झाले. यावेळी धुळे सोलापूर परिसरातील आबाल वृद्ध भाविकांनी श्रींचे दर्शन घेऊन महाप्रसादाचा लाभ घेतला. यावेळी संस्थेचे पदाधिकारी सदस्य तसेच स्वामीभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## गणेश नगरमध्ये स्वामी समर्थ प्रकटदिन साजरा

### रजनीगंधा अपार्टमेंटमध्ये रूद्राभिषेक व अन्नदान उपक्रम..!

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर,दि.३१ मार्च-**

विजापूर रोडवरील राजस्व नगरजवळील गणेश नगर येथील रजनीगंधा अपार्टमेंटमध्ये दत्त संप्रदायाचे उपासक सुनिल कुलकर्णी गुरूजी यांच्यावतीने स्वामी समर्थ प्रकटदिनानिमित्त लघुरूद्र करण्यात आला. यावेळी सुमारे दोनशे भाविकांना अन्नदान करण्यात आले.


गेल्या २१ वर्षापासून श्री. कुलकर्णी यांच्यावतीने हा उपक्रम सुरू आहे. यंदा यानिमित्त सोमवारी सकाळी अकरा ब्रह्मवृंदांच्या मंत्रघोषात स्वामी समर्थांच्या मूर्तीस लघुरूद्राचा अभिषेक करण्यात आला. त्यानंतर प्रकटदिनाचे भजन गायन करून गुलाबपुष्पवृष्टी करण्यात आली. त्यानंतर महाप्रसादाची पंगत देण्यात आली. यामध्ये सुमारे दोनशे लोकांनी सहभाग नोंदवला. सायंकाळी चौपाड विठ्टल मंदीरातील महिला मंडळाचे भजन झाले. उपासक श्री. कुलकर्णी यांनी आतापर्यंत उपासनेद्वारे याठिकाणी तीन वर्षे तेरा अक्षरी श्री. स्वामी समर्थ जय जय स्वामी समर्थ या मंत्राचा सुमारे १३ लाख जप केला आहे. याशिवाय येथे दररोज सायंकाळी स्वामींची आरती व पूजन केल जात असल्याचे श्री. कुलकर्णी यांनी सांगितले.

## जुनी पोलिस लाईन येथील स्वामी समर्थ मंदीरात प्रकटदिन साजरा

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. ३१ मार्च -**

शहरातील जुनी पोलिस लाईन येथील स्वामी समर्थ मंदीरात प्रकट दिन धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला.

जुनी पोलिस लाईन येथील श्री स्वामी समर्थ महाराज मंदिर स्वामी समर्थांच्या प्रकट दिनानिमित्त गेल्या काही दिवसापासून सारामृत पारायण वाचन करण्यात येत आहे. याचा समारोप ३० मार्च रोजी करण्यात आला आहे. सोमवारी प्रगट दिनानिमित्त सकाळी ट्रस्टतर्फे स्वामी महाराजांची पूजा, अभिषेक मोठ्या उत्साहात करण्यात आली. त्याचप्रमाणे दुपारी बारा वाजता महाराजांची विधिवत अशी आरती करून नैवेद्य अर्पण करण्यात आला.



सायंकाळी चार वाजता यशश्री भजनी मंडळाचे स्वामी समर्थांच्या गीतांचा भजन कार्यक्रम पार पडला. त्यानंतर महिला कीर्तनकार प्रवचनकार हरिभक्त पारायण ह. भ. प सुरेखाताई सांगळे यांचे स्वामींच्या चरित्रावरील प्रवचन झाले. सायंकाळी सात वाजता विविध मान्यवरांच्या हस्ते महाराजांची पूजा करण्यात येऊन गुलालाचा कार्यक्रम झाला. त्यानंतर भाविकांना महाप्रसाद वाटप करण्यात आला.

# अवधूतचिंतन अन् श्री स्वामी समर्थांच्या जयघोषाने नवचैतन्य

### प्रकट दिनानिमित्त सुंदरम नगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.३१ मार्च-**

''अवधूतचिंतन गुरुदेव दत्त... अक्कलकोट निवासी ब्रम्हांडनायक श्री स्वामी समर्थ महाराज की जय...! जयघोषाने सारा मंदिर परिसर दुमदुमला''... निमित्त होते श्रीस्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनाचे!

विजापूर रोड परिसरातील सुंदरम नगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. यावेळी आबालवृद्ध भाविकांनी पहाटेपासूनच श्रींच्या दर्शनासाठी मंदिरात गर्दी केली होती. यावेळी श्रींच्या गर्भगृहाला आकर्षक सुवासिक फुलांनी सजवण्यात आले होते. सर्वत्र चैतन्याचे आणि आनंदाचे वातावरण दिसून आले.

दरम्यान, सालाबादप्रमाणे यंदाही श्री स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त सुंदरम नगर येथील श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाच्या वतीने विविध धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले होते. दरम्यान रविवारी गुढीपाडव्यानिमित्त मंदिराच्या शिखरावर ध्वजारोहण करण्यात आले. त्यानंतर श्री स्वामी समर्थ अवतार कांड सामूहिक वाचन झाले.





सायंकाळी रामा भजनी मंडळाचा भजनाचा कार्यक्रम झाला. रात्री गणपत लोकुरे, सिद्धलिंग कांबळे मधुकर शिंदे, राहुल उळागड्डे, राजू पवार, राजेश आदने यांच्या हस्ते श्रींची महाआरती झाली. सोमवारी (दि.३१) मार्च रोजी प्रकट दिना निमित्त सकाळी ६ वाजता श्री स्वामी समर्थ महाराजांच्या मूळ मूर्तीस लघु रुद्राभिषेक व रुद्रस्वाहाकार संपन्न झाला. शशिकांत लोंढे, जयप्रकाश कळमणकर, अथर्व खांडेकर यांच्या हस्ते सदरची पूजा व महाभिषेक संपन्न झाला. सकाळी १० वा. रोहिणी पावडशेट्टी यांच्या प्रमुख उपस्थितीत श्री स्वामी समर्थ सारामृत पोथीचे सामूहिक पारायण करण्यात आले. श्रींच्या दर्शनासाठी दिवसभर भक्तांची गर्दी होती. दुपारी १२ ते ३ वाजेपर्यंत महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. त्यानंतर सायंकाळी ६ वाजता श्रींची पालखी नगर प्रदक्षिणा मोठ्या उत्साही वातावरणात व नवचैतन्यात संपन्न झाली. यावेळी डॉ. हेगडेवार रक्तपेढीच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. विविध अलंकारांनी अलंकृत करण्यात आलेली श्रींची मूर्ती आकर्षक आणि लक्षवेधी ठरत होती. मंदिर परिसरात नवचैतन्य आणि प्रसन्नतेचे वातावरण दिसून आले. यावेळी श्री स्वामी समर्थ सेवा मंडळाचे व मंदिराचे अध्यक्ष रमेश मेंढापूरकर, उपाध्यक्ष पंडित गायकवाड, सचिव संजोग सुरत गावकर, सहसचिव लक्ष्मण यादव, खजिनदार रविशंकर हत्याळीकर, आदींसह ट्रस्टी विश्वस्थ आबालवृद्ध व महिला भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### रांगोळीच्या माध्यमातून समर्थांची प्रतिकृती

सुंदरम नगर येथील श्री स्वामी समर्थ मंदिरात दर्शनी भागात श्री स्वामी समर्थ महाराजांची रांगोळीमध्ये आकर्षक प्रतिमा साकारण्यात आली होती.

श्री स्वामी समर्थ सेवा मंडळ अंतर्गत श्री स्वामी समर्थ मंदिरात दरवर्षीप्रमाणे यंदाच्या वर्षीही धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते. शहरवासीयांनी मंदिरात येऊन श्रींचे दर्शन घेतले तसेच महाप्रसादाचा लाभ घेतला.

**- रमेश मेंढापूरकर, अध्यक्ष श्री स्वामी समर्थ सेवा मंडळ**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/

## ज्ञानामृत आनंदलहरी १०७३

### पुंडलिके विठ्ठल आणिला पंढरी आणूनी लवकरी तारी जन

सांसारिक जीवांचा उद्धार करण्यासाठी भक्त पुंडलिकाने कमरेवर हात ठेऊन समचरणी विटेवर उभा असलेल्या पांडुरंगाला पंढरपूर क्षेत्री आणल्याचे अनेक संतांनी म्हटले आहे. जगद्गुरु तुकाराम महाराजांनी, धन्य पुंडलिका बहु बरें केलें निदान आणिले पंढरीये तुका म्हणे मोक्ष देखील्या कळस तात्काळ हा नाश अहंकाराचा ; असे म्हटले आहे. संत सेना महाराजांनी, धन्य महाराज पुंडलिक मुनी वैकुंठीचा सखा आणिला भूतळा लागोनी जोडूनियां पाणी सेना करी विनवणी म्हणे धन्य पुंडलिका माथा ठेविला चरणीं अशा वचनोक्तीने भक्त पुंडलिकाने पंढरीनाथाला वैकुंठावरून आणल्याचे म्हटले आहे. ज्ञानमाता मुक्ताईने सांसारिक जीवाला भक्ती मार्ग दाखवण्यासाठी तसेच या जीवाला साक्षात भगवंताकडून प्रेरणा मिळण्यासाठी भक्त पुंडलिकाने भगवंताला पंढरी क्षेत्री आणल्याचे सांगताना, पुंडलिकें विठ्ठल आणिला पंढरी आणूनि लवकरी तारी जन असे म्हटले आहे.



भगवंताच्या अनेक भक्तांना भेटी झाल्या, त्यांच्यात संवाद झाले; पण काही वेळाने का होईना भगवंत भक्त भेटीनंतर निघून गेल्याच्या अनेक कथा विविध ग्रंथात वाचायला मिळतात; पण मुक्ताईच्या म्हणण्याप्रमाणे जगाच्या कल्याणासाठी भक्त पुंडलिकाने पंढरीनाथाला पंढरीक्षेत्री आणले आहे, ते एकप्रकारे कायमचेच. भक्ती करणा-याला तारून देव निघून गेला. मात्र पंढरीचा भगवंत जनाला तारण्यासाठी आजही पुंडलिकांने दिलेल्या विटेवर तसाच उभा आहे. पंढरीचा पांडुरंग हा खरे म्हणजे केवळ ऐकण्याचा, सांगण्याचा किंवा चर्चेचा विषय नाही तर खऱ्या अर्थाने तो अनुभवण्याचा विषय आहे. मुक्ताईच्या म्हणण्याप्रमाणे त्याच्या नावात प्रचंड वलय आहे. त्याचे ध्यान, त्याचा नाम जप शुद्ध भावाने केला तर सांसारिक दुःख, दारिद्र्य अजिबात सतावू शकत नाही. माणूस अज्ञानात, अहंकारात आणि स्वार्थात स्वतःला नको तेवढे गुरफटून घेत असतो. त्याचे हे गुरफटणेच त्याला दुःख, दारिद्र्यात अडकवत असते. स्वतःचा खरा परिचय न होण्याचा हा परिणाम असतो. पंढरीच्या पांडुरंगाचे चिंतन त्याच्या वलयाची आणि आपण कोण आहोत याची जाणीव करून देते. त्याचे चिंतन कळत न कळत भक्ताला नाशवंत देहाची जाणीव करून देते. संतांनी पांडुरंगाबददल काय सांगितले आहे, हे कळत गेल्याने मी चा खरा परीचय होऊ लागतो आणि आपोआप नाशवंत बाबीच्या जमवा जमवीतून मन बाहेर निघू लागते. नको त्याची साठवा साठवी करण्याची अपेक्षा कमी होऊ लागणे म्हणजे सुखाच्या मार्गावर मार्गक्रमण करणे होय. असे होणे म्हणजेच संसारात असूनही आपोआप सांसारिक भवसागर तरणे होय.

**- ज्ञानदास डॉ. विजयकुमार फड**
**मो. ९४२२२१६४४८**

# धम्म आचरणातून जीवन सुखी समृद्ध

### मारुती बेलभंडारे; बौद्ध साहित्य संमेलनानिमित्त व्याख्यानमालेस प्रारंभ

### मड्डी वस्ती येथील सम्यक बुद्ध विहारात विचारांचा जागर

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

बौद्ध धम्म आचरण करणारे देश प्रगतीपथावर आहेत. धम्मविचार जगाला तारणारे आहेत. बुद्धांचा धम्म हा ज्ञानावर आधारित आहे. ज्ञानातून शिक्षण मिळते. प्रज्ञा-शील - करुणा ही धम्माची मूलतत्त्वे आहेत. धम्म आचरणातून जीवन सुखी समृद्ध होईल. सद्यस्थितीत युवा पिढीला बौद्ध संस्काराची गरज आहे, असे प्रतिपादन प्रमुख वक्ते मारुती बेलभंडारे यांनी केले.

सोलापूर नगरीत शनिवार दि. ३ मे रोजी होणाऱ्या बौद्ध साहित्य संमेलनाअंतर्गत ३० मार्च ते २७ एप्रिल २०२५ दरम्यान आयोजित व्याख्यानमालेस प्रारंभ करण्यात आला. शहरातील मड्डी वस्ती येथील सम्यक बुद्ध विहारात ''बौद्ध धम्म आचरण काळाची गरज या विषयावर पहिले पुष्प प्रमुख वक्ते मारुती बेलभंडारे यांनी गुंफुले. त्याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी विचारमंचावर संमेलनाचे कोषाध्यक्ष किरण बनसोडे, कार्यवाह भालचंद्र साखरे, कार्यकारणी समिती सदस्य विठ्ठल मोरे, युवक क्रीडा मंडळाचे संस्थापक के. डी. कांबळे, अध्यक्ष प्रेम तोरणे, जनरल सेक्रेटरी मारुती गायकवाड, कार्याध्यक्ष प्रतीक कांबळे आदी मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.



प्रमुख वक्ते बेलभंडारे यांनी बौद्ध धम्म, अष्टांगिक मार्ग, पंचशील, प्रज्ञा - शील- करुणा आदी तत्त्वांवर मार्गदर्शन केले. ते पुढे म्हणाले, सद्यस्थितीत अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचार अनैतिकता, स्वैराचार, अधःपतनाच्या घटना घडत असल्याचे चित्र पाहायला मिळते. बौद्ध धम्मातील प्रज्ञा,शील, करुणा, मैत्री, समता या तत्त्वांचे आचरण आज गरजेचे आहे. शील नसल्यानेच बदलापूर सारख्या घटना घडतात. सर्वांच्या कल्याणासाठी बौद्ध धम्म आचरणाची नितांत गरज आहे. धम्म विचार जगाला तारणारे आहेत. धम्म म्हणजे नीती. धम्म हा दुःखमुक्ती आणि सर्व कल्याणाचा मार्ग आहे. आजच्या अंधःकारमय परिस्थितीवर मात करण्यासाठी धम्म विचार आचरणात आणले पाहिजेत. विज्ञानवादी आणि संविधाननिष्ट समाज घडविण्याची नितांत गरज आहे, असे आवाहन बेलभंडारे यांनी केले. सोलापुरात शनिवार दि. ३ मे रोजी हुतात्मा स्मृती मंदिरात होणाऱ्या बौद्ध साहित्य संमेलनात सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन संमेलनाचे स्वागताध्यक्ष अण्णासाहेब भालशंकर यांनी केले. सूत्रसंचालन व आभार प्रदर्शन जनार्दन मोरे यांनी केले. यावेळी सुनील कांबळे, दयानंद डावरे, केतन कांबळे, कांचन कांबळे, सुभाष येरवडे, चंद्रकांत गायकवाड, अंकुश गायकवाड, गौतम कांबळे, गौतम बनसोडे, लखन गवळी उपस्थित होते. प्रारंभी तथागत गौतम बुद्ध आणि बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या मूर्तीस अभिवादन करण्यात आले.

## बुद्धराष्ट्र प्रतिष्ठान उत्सव समितीच्या अध्यक्षपदी महादेव खराटे

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

न्यू बुधवार पेठ येथील बुद्धराष्ट्र प्रतिष्ठानच्या वतीने यंदाच्या विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त डॉ. आंबेडकर भारतीय संविधानाचे शिल्पकार आणि सामाजिक न्यायाचे प्रणेते हा संदेश देणारा देखावा साकारण्यात येणार आहे, अशी माहिती संस्थापक अजित गादेकर यांनी दिली.

बुद्धराष्ट्र प्रतिष्ठानच्या वतीने यंदा नियोजनबद्ध मिरवणूक काढण्यात येणार आहे. यामध्ये आकर्षक असा देखावा साकारण्यात येणार आहे. विविध उपक्रमाचे आयोजनही करण्यात येत आहे. यंदाच्या जयंती उत्सव समितीच्या अध्यक्षपदी महादेव खराटे यांची निवड करण्यात आली आहे.

**इतर पदाधिकारी असे -**

उपाध्यक्ष : अविनाश गायकवाड, अनुज गायकवाड, समर्थ मस्के, प्रथम कांबळे, सेक्रेटरी - आकाश गंटोल, राहुल ओहाळ, मनोज जाधव, सहसेक्रेटरी - प्रशिक खराटे, अजिंक्य कांबळे, खजिनदार -मल्लेश घागरे, सुहास साबळे.अजित प्रक्षाळे, सोशल मिडीया प्रमुख - पृथ्वी चौधरी, प्रदिप हजारे, कायदेशीर सल्लागार -ॲड. अमित कांबळे, रोहित जाधव, मिरवणूक प्रमुख - संजय बनसोडे, प्रमोद चंदनशिवे, अमोल सोनवणे, शांतकुमार साबळे, पिंटू सुर्वे, मल्लिनाथ राम शेट्टी, गजानन व्हटकर, महाराज वाघमोडे, सागर कदम, सत्यजीत वडाराव, प्रशांत गायकवाड, नितीन गादेकर, विजय गादेकर, अमोल शिंदे अजित लोंढे, गणेश तिकुटे आदी.

# 'हिराचंद नेमचंद'चा गोकुळ खंडेलवाल आयआयटी मुंबईच्या स्पर्धेत प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

हिराचंद नेमचंद कॉलेज ऑफ कॉमर्सच्या एम.बी.ए. प्रथम वर्षातील विद्यार्थी गोकुळ भागीरथ खंडेलवाल याने इंडियन इन्स्टिट्यूट ऑफ टेक्नॉलॉजी (आयआयटी) मुंबईत राष्ट्रीय स्तरावर आयोजित ''हॅकेथॉन'' स्पर्धेत प्रथम पारितोषिक पटकावले. या स्पर्धेत देशभरातील २०० विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता.

गोकुळ खंडेलवाल याने आयआयटी मुंबईच्या अत्यंत स्पर्धात्मक ''मास्टर इट अँड रँक इट'' चॅलेंजमध्ये भाग घेतला. या चॅलेंजमध्ये स्पर्धकांना केवळ १५ मिनिटांत एक अत्यंत प्रभावी आणि ऑप्टिमाइझ केलेला ब्लॉग पोस्ट तयार करून प्रकाशित करायचा होता. या स्पर्धेच्या मूल्यांकनासाठी वेग, सर्च इंजिन ऑप्टिमायझेशन



(एसईओ) कौशल्ये आणि कंटेंटच्या गुणवत्तेचा विचार करण्यात आला. ही स्पर्धा डिजिटल मार्केटिंग कार्यशाळेचा भाग होती, जिथे उद्योगतज्ज्ञांनी कंटेंट स्ट्रॅटेजी, एसईओ आणि ऑनलाइन ब्रँडिंगविषयी अंतर्दृष्टी प्रदान केली. कार्यशाळेनंतर, स्पर्धकांच्या व्यावहारिक कौशल्यांची चाचणी घेण्यासाठी एसईओ हॅकेथॉनचे आयोजन करण्यात आले. या यशामुळे गोकुळ खंडेलवाल याची दबावाखाली उत्कृष्ट दर्जाचा कंटेंट तयार करण्याची क्षमता सिद्ध झाली असून, त्याच्या कंटेंट स्ट्रॅटेजी, तांत्रिक एसईओ आणि अंमलबजावणी कौशल्यांची चमक झळकली आहे. या यशाबद्दल श्री ऐलक दिगंबर जैन पाठशाला संस्थेचे मानद सचिव डॉ. रणजित गांधी, विश्वस्त वैभव गांधी यांनी गोकुळ खंडेलवाल याचा विशेष सत्कार केला. या वेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सत्यजित शहा, संचालक डॉ. ओमप्रकाश आष्टणकर, डॉ. पंकज डोळस, प्रा. प्रवीण बजाज, डॉ. सुहास खंडाळ उपस्थित होते.

## मलेरिया विभागाच्या भीमजयंती उत्सव अध्यक्षपदी सावंत

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

महानगरपालिका आरोग्य खाते अंतर्गत नागरी हिवताप योजना (मलेरिया) विभाग कामगार संघटनेच्या वतीने विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या १३४ व्या जयंतीनिमित्त वार्षिक बैठक मोठ्या उत्साहात पार पडली.



बैठकीच्या अध्यक्षस्थानी वालचंद पाटील हे होते. यावेळी नूतन पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली.मलेरिया विभागाच्या उत्सव अध्यक्षपदी सिद्धेश्वर सावंत, खजिनदारपदी परमेश्वर कसबे, सेक्रेटरीपदी महेश कदम यांची निवड करण्यात आली.




## वीरशैव लिंगायत गवळी समाजाचा मोफत साखरपुडा सोहळा उत्साहात

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

वीरशैव लिंगायत गवळी समाज तुळजापूरवेस यांच्या वतीने मोफत सामुदायिक साखरपुडा सोहळा संपन्न झाला या कार्यक्रमात ३० वधू-वरचा सहभागी होते.

या कार्यक्रमासाठी प्रमुख पाहुणे आमदार विजयकुमार देशमुख, नगरसेवक विक्रांत वानकर, भाजप शहर अध्यक्ष नरेंद्र काळे आदी उपस्थित होते. यात चार राज्यातून गवळी समाज बांधवांची उपस्थिती होती. १७ हजार लोकांची जेवणाची सोय, वधू-वरांची बगीतून दीड किलोमीटर मिरवणूक (वरात), विद्युत रोषणाई करण्यात आली.

या कार्यक्रमासाठी मनोज मलकुनाईक, किसन आंजिखाने, केदार जानगवळी, संतोष रानसर्जे, सचिन आंजिखाने, मयुर आंजिखाने, सागर दहिहांडे, गंगाराम मलकुनाईक, नरेश बडवणे आदींनी परिश्रम घेतले.

## सुप्रभात

### आजचा दिवस

| | |
|---|---|
| **वार : मंगळवार** | **दिनविशेष - विनायक चतुर्थी** |
| **दि. १ एप्रिल २०२५** | **अंगारक योग** |
| **विक्रम संवत् २०८२** | **शुभ दिवस** |
| **शके - १९४७** | **....राहू काल....** |
| **संवत्सर - क्रोधी नाम** | **रविवार : दु.४.३० ते ६.००** |
| **मास - चैत्र** | **सोमवार : स. ७.३० ते ९.००** |
| **शु. द्वितीया (०९.११)** | **मंगळवार : दु. ३.०० ते ४.३०** |
| **ऋतु - वसंत** | **बुधवार : दु. १२ ते १.३०** |
| **नक्षत्र - भरणी (१३.४५)** | **गुरुवार : दु. १.३० ते ३.००** |
| **योग - विष्कंभ (०९.४७)** | **शुक्रवार : स.१०.३० ते १२** |
| **करण - वणिज (१६.०५)** | **शनिवार : स. ९ ते १०.३०** |

### राशीभविष्य

**मेष :** व्यापारीक वाद, मतभेद होण्याची शक्यता, जबाबदारीचे काम सांभाळून करा, आर्थिक योग मध्यम, कौटुंबिक जीवन सुखी राहील.

**वृषभ :** राजकीय व्यक्तींपासून फायदा होईल. वहान चालविताना सावधानीने चालवा. नवीन योजनांची सुरूवात कराल.मुलांची काळजी घ्यावी.

**मिथुन:** आरोग्याची काळजी घ्या. रोजगारात यश व फायदा मिळण्याची शक्यता. वाचनाची गोडी वाढेल.

**कर्क:** अनावश्यक चिंतापासून दूर रहा. देणे - घेणे पासून सावधानता बाळगा. लोभ - लालचे पासून दूर रहा. धंदा मध्यम राहील.

**सिंह :** विद्यार्थ्यांना आपल्या प्रगतीत वाढ होईल. प्रतिस्पर्धामुळे लाभ होण्याची शक्यता.

**कन्या :** व्यापारासाठी प्रवास होण्याचा योग आहे. कामकाजात गुप्तता बाळगा. जीवनात यशस्वी व्हाल.

**तुळ :** आर्थिक योग चांगला. नोकरीमध्ये उत्साह वाढेल. प्रवास जपून करा. वाचनाची आवड लागेल. जिवनात यशस्वी व्हाल. आनंदाने संकटावर मात कराल.

**वृश्चिक :** कामकाजाचा विस्तार होईल. अनावश्यक कामासाठी वेळ वाया घालू नका. प्रयत्न केल्यास थांबलेला पैसा निघून येईल.

**धनु :** व्यावसायिक चिंता राहील. मुलांच्या व्यवहारामुळे दुःखी व्हाल. सहयोगी मदत करणार नाहीत. खर्च कमी करण्याचा प्रयत्न करा.

**मकर :** सामाजिक किंवा राजकीय प्रसिद्धी मिळेल. व्यापार चांगला चालेल. घरासंबंधी समस्या दूर होतील.

**कुंभ :** मागे केलेल्या कामाचे फळ मिळेल. धंद्यात स्वतः निर्णय घेतल्यास निश्चित फायदा. दुसऱ्यांवर विश्वास ठेवू नका.

**मीन:** बुद्धी व तर्काने कार्यामध्ये सफलता मिळण्याचे योग आहेत. व्यापारात नवीन योजनेमुळे लाभ होईल. आपल्या बोलण्यावर नियंत्रण ठेवा.

# दिव्यांगांसाठी सहाय्यक उपकरणाचे मोफत वाटप

### इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेडच्या सी.एस.आर फंड अंतर्गत व भारतीय कृत्रिम अंग निर्माण निगम मुंबई (अलिम्को) आणि जिल्हा परिषद समाजकल्याण विभाग व नॅब-जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्र यांच्या संयुक्त विद्यमाने जिल्ह्यातील दिव्यांगांना (अंध, कर्णबधिर, अस्थीव्यंग, बहुविकलांग) त्यांच्या आवश्यकतेनुसार सहाय्यक उपकरणाचे मोफत वाटप शिबीराचे उद्घाटन करण्यात आले.

जिल्हा समाजकल्याण अधिकारी सुलोचना सोनवणे यांच्या हस्ते लुई ब्रेल व डॉ. हेलन केलर यांच्या प्रतिमेचे पूजन व दिपप्रज्वलन करण्यात आले. यावेळी इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापक विकास व नॅब जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे प्रकल्प संचालक व नॅब संस्थेचे संस्थापक अध्यक्ष प्रकाश यलगुलवार तसेच अलीम्कोचे सीएसआर मॅनेजर कमलेश यादव व किरण पावरा यांची प्रमुख उपस्थिती होती.



इंडियन ऑइल कॉर्पोरेशनचे व्यवस्थापक विकास यांनी सर्व दिव्यांगाचे स्वागत केले व पुढेही दिव्यांगासाठी साहित्य वाटप करण्याचे आश्वासन दिले. नॅब संस्थेचे सेक्रेटरी शशीभूषण यलगुलवार यांनी इंडियन ऑइल कार्पोरेशन व अलीम्को यांचे दिव्यांगांना मोफत उपकरणे व साहित्य वाटपासाठी शिबिर आयोजित केल्यामुळे आभार मानले व नॅब जिल्हा दिव्यांग पुनर्वसन केंद्राचे पूर्ण सहकार्य असेल असे आश्वासन दिले.

सोनवणे म्हणाल्या, दिव्यांगाने दिलेल्या उपकरणाचे व साहित्याचा परिपूर्ण उपयोग करतील, दिव्यांग बांधवांच्या वतीने असे आश्वासन दिले व तसेच नॅशनल असोसिएशन फॉर द ब्लाइंड यांच्या दिव्यांग क्षेत्रातील कार्याचे संस्थेचे कौतुक केले. नॅब संस्थेचे उपाध्यक्ष अनुगीता पवार, सदस्य डॉ. किशोर देशपांडे, नॅब संस्थेचे सदस्य अनिल दाबडे, सौरभ शिंगाडे, संगीता गायकवाड, विशाल शिंदे आदीची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन एन.ए.बी. निवासी अंधकार्यशाळेचे अधीक्षक रामचंद्र कुलकर्णी यांनी केले. नॅब संस्थेचे सदस्य देवेंद्र भंडारे यांनी आभार मानले.

## लष्कर मध्यवर्ती डॉ. आंबेडकर जयंती उत्सव अध्यक्षपदी विक्रम वाडे

### सचिवपदी इंद्रजीत भंडारे यांची निवड

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**



लष्कर मध्यवर्ती विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव महामंडळाच्या अध्यक्षपदी विक्रम रामचंद्र वाड तर सचिवपदी इंद्रजीत भंडारे यांची निवड झाली. सत्यनाम चौक येथे महामंडळाचे संस्थापक सदस्य देवेंद्र भंडारे यांच्या अध्यक्षतेखाली २०२५-२०२६ साठी नुतन पदाधिकाऱ्यांची निवड झाली. या बैठकीस मोची समाज अध्यक्ष विजय मरेड्डी, उपाध्यक्ष विजय म्हेत्रे, शिवाजी बनसोडे, कोमल माचले, अताउल्लाह पटेल, अभिजीत भंडारे, श्रीनिवास लिंगराज, सुर्यकांत केंदळे, मच्छिंद्र लोकेकर, लखन गायकवाड, मारूती म्हेत्रे, अंबादास मोतेकर, गंगाधर शिंदे, डॉ. योगेश पल्लोलू, विश्वजीत लिंगराज, संजय मोतेकर, अंबादास मरेड्डी, प्रविण वाडे, मल्लिकार्जुन कांबळे, महेश गायकवाड, विजय लिंगराज, अरुण म्हेत्रे, दत्ता कोपलवार, पिंटू गिरगेल, अनंत गोडलोलू, मारूती देसाई, नंदकुमार वाडे, वैभव वाडे, श्रीकांत नारायणकर, रामप्रसाद शागालोलू आदी उपस्थित होते.

**अन्य पदाधिकारी असे :** उपाध्यक्ष :- रमेश कसबे, बंडू गवळी, दुर्गादास कोल्लूर, सहसचिव :- राहुल जाधव, खजिनदार :- शुभम म्हेत्रे, कार्याध्यक्ष :- महेश तेजबिदे, ऑडिटर :- विशाल लोंढे, प्रसिद्धी प्रमुख :- श्रीकांत कोल्लूर, भूषण हेमरेड्डी.




# शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत शिवानंद बगले प्रथम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेत श्री. न. फू. शहा कोठारी हायस्कूलचे सहशिक्षक शिवानंद महादेव बगले यांना ९ वी १० वी गटात भाषा विषयात जिल्हा प्रथम व तालुकास्तरीय प्रथम क्रमांक पटकाविला.

राज्य शासनाच्या वतीने घेण्यात आलेल्या दर्जेदार शैक्षणिक व्हिडिओ निर्मिती स्पर्धेचे बक्षीस वितरण जिल्हा शिक्षण प्रशिक्षण संस्था वेळापूर व जि.प. शिक्षण विभाग सोलापूर यांच्या वतीने श्री शिवछत्रपती सभागृह रंगभवन येथे संपन्न झाले. त्यांना प्राथमिक शिक्षणाधिकारी कादर शेख, डाएटचे प्राचार्य जितेंद्र साळुंखे, उपशिक्षणाधिकारी हवेले यांच्या हस्ते सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले.

यावेळी विस्तारअधिकारी बापूराव जमादार, अधिव्याख्याते डॉ. शशिकांत शिंदे, तुकाराम राजे आदी उपस्थित होते.

## संघ हीच जीवनगाथा

राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे जनक डॉक्टर केशव बळीराम हेडगेवार (जन्म १ एप्रिल १८८९, मृत्यू २१ जून १९४०). आपल्यासमोर संघ हीच जीवनगाथा या शीर्षकाखाली मी छोट्या छोट्या कथा लिहित आहे. या कथांचे स्वरूप आहे अलक. म्हणजे अति लघु कथा. ही कथा वाचायला सोपी; स्मरणात ठेवायला सोपी; समजायला सोपी; अशी असेल असा माझा प्रयत्न आहे. आधीच सांगते कथा म्हणजे निव्वळ गोष्ट नव्हे एवढे ध्यानी ठेवावे. जसे यथा म्हणजे येन प्रकारेण; तथा म्हणजे तेन प्रकारेण; सर्वथा म्हणजे सर्वे प्रकारेण तसेच कथा म्हणजे केन प्रकारेण, या अर्थाने मी अलक लिहिले आहे.



**- सुरेखा विजय काणे,**
छत्रपती संभाजीनगर
माजी जिल्हा बौद्धिक
प्रमुख राष्ट्र सेविका समिती,
मो. ९९६००५३५२१

### अलकः- (९४) प्रकल्प

देशात २७६ वनवासी जिल्हे आहेत व एक लाख तीस हजार वनवासी गावे आहेत. आज देशभरात ५००० स्थानी ८००० वनवासी कल्याण प्रकल्प आहेत. वीस हजार वनवासी गावांशी संघ कार्यकर्त्यांचा संपर्क आहे. संघाचे स्वयंसेवक भिन्नभिन्न क्षेत्रात गेले व त्यांनी समाज परिवर्तनाची एक एक क्षेत्रे उभी केली ही संघाला अपेक्षित समाज परिवर्तनाची सहज प्रक्रिया आहे. उदाहरणार्थ राजस्थानात उदयपूर झालावाड आदी ठिकाणी अनाज बँक- रक्त बँक औषध बँक खास वनवासींसाठी आहेत. महाराष्ट्रात ठाणे जिल्ह्यातील तलासरी, तसेच पालघर मोखडा आदि ठिकाणी, शिलाई इलेक्ट्रिशियनचे शिक्षण देण्यात येते. उत्तर प्रदेशात गढवाल येथे, पश्चिम बंगालमध्ये पुसालिया, मिदनापूर येथे, तसेच लद्दाख मध्ये धर्मांतरीत वनवासींची पुनश्च हिंदू धर्मात वापसी केली जाते १९६६ ला पश्चिमे ओडीसा दुष्काळ पडला होता तेव्हा विपदा निवारणात प्रत्यक्ष वनवासीच युवकांनी सहयोग नोंदवला होता ३५०० गावातील ३५ हजार लोकांना अन्न वितरित केले होते. हजारो पशुंना चारा दिला होता. शेकडो विहिरी खोदल्या होत्या. ज्येष्ठ समाज कार्यकर्ते गिरीश प्रभुणे यांनी भटके विमुक्तांसाठी यमगरवाडी सेवा प्रकल्पाचा पाया ऑगस्ट १९९३ साली रचला होता हा व असे अनेक प्रकल्प आज कृतीतून सिद्ध झाले आहेत. **क्रमशः**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत

https://epaper.dainiktarunbharat.com/

# बार्शीत ईद-उल-फित्रची नमाज

## हजारो मुस्लिम बांधवांचा सहभाग

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ मार्च-**

शहरातील शाही नाईकवाडी ईदगाह येथे ईद-उल-फित्रची नमाज मोठ्या उत्साहात अदा करण्यात आली. यावेळी बार्शी शहर व परिसरातील हजारो मुस्लिम बांधव एकत्र येऊन नमाज अदा करण्यासाठी उपस्थित होते.

रमजान ईद, ज्याला ईद-उल-फित्र असेही म्हणतात, ही इस्लाम धर्मातील सर्वांत पवित्र सणांपैकी एक आहे. हा सण रमजान महिन्याच्या शेवटी साजरा केला जातो. रमजान हा संयम, आत्मशुद्धी आणि ईश्वरभक्तीचा महिना मानला जातो. या महिन्यात मुस्लिम बांधव रोजे (उपवास) धरतात आणि अल्लाहची भक्ती करतात. रमजान ईद हा सण आनंद, परस्पर प्रेम आणि दानशूरतेचा संदेश देतो. या दिवशी विशेष नमाज अदा केली जाते आणि दानधर्म (सद्‌कत-उल-फित्र) दिला जातो, जेणेकरुन गरजू आणि गरीब लोकांनाही ईदचा आनंद मिळू शकतो.

ईदची मुख्य नमाज बार्शी मदिना मस्जिदचे मौलाना अन्वारुल हक साहब यांच्या मागे अदा करण्यात आली. नमाजानंतर मौलानांनी देशात शांतता, बंधुता आणि सलोखा नांदावा, तसेच सर्व समाज एकमेकांच्या सुखदुःखात आणि अडीअडचणींमध्ये सहभागी व्हावा, अशी प्रार्थना केली. नमाजानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना ईदच्या शुभेच्छा देत आनंद साजरा केला. या प्रसंगी लहान मुले, तरुण तसेच वयोवृद्ध मोठ्या संख्येने उपस्थित होते. उन्हाळ्याचे दिवस असल्यामुळे लहान मुलांना व वृद्धांना त्रास होऊ नये म्हणून पिण्याच्या पाण्याची विशेष व्यवस्था करण्यात आली होती. बार्शी नगरपालिकेने नमाज स्थळी स्वच्छतेची विशेष व्यवस्था केली होती, त्याबद्दल नगरपालिका प्रशासक बाळासाहेब चव्हाण आणि नगरपालिकेच्या कर्मचाऱ्यांचे आभार मानण्यात आले. यावेळी नगरपालिका प्रशासनाचे बाळासाहेब चव्हाण यांचे देखील ईदगाह कमिटीच्या वतीने आभार मानण्यात आले. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनासाठी मौलानांचा सत्कार हाजी शफिक नाईकवाडी यांच्या हस्ते करण्यात आला. तसेच समीर वलसंगकर यांनी आभार मानले.



# करकंब येथे रमजान सण उत्साहात साजरा

## ईदगाह मैदानावर नमाज पठण

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३१ मार्च-**

इस्लाम धर्मात पवित्र रमजान ईद सणास अनन्यसाधारण महत्त्व आहे.या महिन्यात मुस्लिम कुटुंबियांकडून निरंकार रोजे (उपवास) पाळले जातात. अल्लाहची विशेष इबादत (उपासना) केली जाते. मुस्लिमधर्मीय बांधव व महिलावर्ग रोज उपवास करतात. रमजानचा पवित्र व शुभ महिना संपल्यानंतर चंद्रदर्शन होताच शौव्वाल या महिन्याची पहिली तारीख सुरू होते.हा दिवस रमजान ईद म्हणून साजरा केला जातो. यादिवशी दानधर्म केले जाते. रमजान ईद या सणानिमित्त करकंब (ता.पंढरपूर) येथील ईदगाह मैदानावर हजारो मुस्लिम समाजबांधव नमाज पठणासाठी एकत्रित आले होते.

नमाज पठण हाफीज मुबारक शिकलकर यांनी तर खुतबा वाचन मुबारक शिकलकर यांनी केले.यावेळी अल्हाकडे सर्वांना सुखी ठेव,पाऊस पाणी मुबलक व्हावे,शेतकरी वर्गाची प्रगती व्हावी अशी प्रार्थना करण्यात आली. यावेळी मा.जि.प.सदस्य बाळासाहेब देशमुख, सरपंच संघटनेचे जिल्हाध्यक्ष आदिनाथ देशमुख, मा.पं. सदस्य राहुल पुरवत, सहाय्यक पोलीस निरीक्षक सागर कुंजीर, सतीश देशमुख, ग्रामपंचायत मा. सदस्य सचिन शिंदे, महेंद्र शिंदे यांच्यासह पोलीस, हिंदूबांधव व विविध मान्यवरांनी शुभेच्छा दिल्या.

या दिवशी मुस्लिम धर्मियांकडून दानधर्म केले जाते. ईद दिवशी सकाळी प्रार्थनेनंतर प्रथम दहीभात आणि साखर यांचे जेवण होते.दुधात शेवया टाकून केलेली खीर,मिठाई व शिरखुर्मा खाऊ घालण्यात येतो.रमजान म्हणजे बरकती आणि ईद म्हणजे आनंद.मनामनातील दरी कमी करून परस्परांमध्ये स्नेह वाढवणारा हा सण.

## संक्षिप्त वृत्त



### लहुजी शक्ती सेना जिल्हाअध्यक्षपदी नागेश जाधव यांची निवड

**अक्कलकोट, दि. ३१ मार्च-**

लहुजी शक्ती सेना संस्थापक अध्यक्ष विष्णू कसबे यांच्या अध्यक्षतेखाली आढावा बैठक संपन्न झाली. यावेळी अनेक कार्यकर्त्यांचा संघटनेत प्रवेश झाला सोलापूर जिल्हाध्यक्षपदी नागेश जाधव यांची निवड करण्यात आली. लहुजी शक्ती सेना सोलापूर जिल्ह्याच्या वतीने पदनियुक्ती व आढावा बैठक संपन्न झाली. लहूश्री कसबे, प्रदेश अध्यक्ष कैलास खंदारे, महादेव भोसले, अमोल चव्हाण, दत्ता जगताप, संजय कदम, सोमनाथ कसबे, अण्णा भालेराव, नवनाथ साठे, राजाभाऊ अस्टूळ, खिलारे, लक्ष्मण दुनगे उपस्थित होते. यावेळी अक्कलकोट दक्षिण सोलापूर या विभागाच्या जिल्हाध्यक्षपदी नागेश जाधव व जिल्हा संपर्कप्रमुख वसंत देडे व सोलापूर महिला जिल्हाध्यक्षपदी वैशाली डोलारे यांची निवड करण्यात आली. सोलापूर शहर कोर कमिटी अध्यक्ष विकास डोलारे, सुनील काळे, गणेश पवार, सागर कोलारे यांची नियुक्ती करण्यात आली.



### अक्कलकोटचे सेवानिवृत्त प्रा.मास्टर यांचा पंच्याहत्तरीनिमित्त सत्कार

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**

अक्कलकोट महाविद्यालयातील वाणिज्य विभागातील निवृत्त प्राध्यापक एस. एस. मास्टर यांचा अमृत महोत्सवानिमित्त सहकारी, कुटुंबिय, मित्र परिवार व विद्यार्थ्यांच्यावतीने सत्कार करण्यात आला. पुण्यातील मांजरी येथील मिठानीन सभागृहात झालेल्या हृद्य कार्यक्रमात प्रा. मास्टर यांच्या बालमित्रांनी आठवणी जागून विपरित परिस्थितीत त्यांनी कसे शिक्षण घेतले याबाबत सांगितले. सहकारी प्राध्यापकांनी महाविद्यालयीन काळातील आठवणी जागवल्या. विद्यार्थ्यांनी प्रा. मास्टर यांच्या शिकवणीतून जीवनातील अनेक अवघड प्रसंगावर केलेली मात व आयुष्याच्या वळणावर प्रा. मास्टर हे दिशादर्शक असल्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. प्रा. मास्टर यांनी आपल्या आयुष्यातील वळणांवर प्रकाश टाकत अक्कलकोटमधील जीवनावर भाष्य केले. प्रारंभी महात्मा बसवेश्वरांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. श्रीकंठ मास्टर यांनी स्वागत व प्रास्ताविक केले. यावेळी प्रा. व्ही. बी. आगासे, प्रा. एस. एस. वाले, सी. ए. सुरेश पांढरे, सूर्यकांत बिराजदार, सूर्यवंशी, अभय दिवाणजी, सिद्धानंद कलशेट्टी, प्रा. मुल्ला, मल्लिकार्जून मुलगे, वैजयंती पवार-भोसले, सुरेखा सिरसट, प्रिया मास्टर यांची भाषणे झाली. प्रा. सतीश कुमदाळे यांनी सूत्रसंचालन केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी श्रीनिधी मास्टर, कल्याणी शरणार्थी, गुरुदेवी शरणार्थी, प्रेमिला मास्टर, श्रीधर मास्टर यांनी परिश्रम घेतले.

### डॉ. प्रवीण मस्तुद यांच्या पुस्तकास राज्यस्तरीय पुरस्कार

**बार्शी, दि. ३१ मार्च-**

छत्रपतीसंभाजीनगरयेथे२९मार्चरोजीपुरोगामीसामाजिकसांस्कृतिक महासंघ यांच्यावतीने घेण्यात आलेल्या दुसऱ्या परिवर्तनवादी साहित्य संमेलनाच्यावतीने डॉ. प्रवीण मस्तुद यांच्या 'मराठी भाषिक व्यंगचित्र पत्रकारितेचा इतिहास' या पुस्तकात डॉ. बाबासाहेब आंबेडकर राज्यस्तरीय पुरस्कार देण्यात आला. हा पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीच्या अध्यक्षा सूर्यकांता गाडे यांच्या हस्ते दिला गेला व हा पुरस्कार वसुधा कल्याणकर यांनी स्वीकारला. या साहित्य संमेलनाचे अध्यक्ष प्रा. डॉ. ऋषिकेश कांबळे तसेच मुख्य संयोजक प्रा. समाधान दहिवळ यांच्यासह आदी उपस्थित होते. या पुस्तकाच्या निमित्ताने मराठी भाषेतला व्यंगचित्र पत्रकारितेचा इतिहास एकत्रित रुपाने उपलब्ध नव्हता तो या पुस्तकातून वाचकांसाठी उपलब्ध झाला आहे. हे पुस्तक व्यंगचित्रकार, पत्रकारितेचे, मराठी भाषा व इतिहासाचे अभ्यासक यांना उपयोगी संदर्भ ग्रंथ आहे. या पुस्तकाला विद्यापीठाचे पत्रकारिता विभागाचे विभागप्रमुख प्रा. डॉ. रवींद्र चिंचोलकर यांची प्रस्तावना तर मलपृष्ठावर डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाचे पत्रकारिता विभागाचे प्रा. सुरेश पुरी यांचा शुभेच्छा संदेश आहे. या पुरस्कारासाठी बार्शी शिक्षण प्रसारक मंडळाच्या चेअरमन प्रभा झाडबुके तसेच खजिनदार वर्षा ठोंबरे-झाडबुके श्रीमान भाऊसाहेब झाडबुके महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मनोज गादेकर, प्रा. डॉ. जगन्नाथ पाटील, प्रा. तानाजी ठोंबरे, प्रा. डॉ. सुहास कुलकर्णी भारत इतिहास संशोधन मंडळाचे राजेश जाधव, आई सुरेखा मस्तुद यांनी शुभेच्छा व्यक्त केल्या आहेत.



### केमच्या ॲड. रेवती अवघडे यांना बार कौन्सिलची सनद

**करमाळा दि.३१ मार्च-**

केम (ता.करमाळा) येथील ॲड. रेवती अवघडे यांना ऑल इंडिया बार कौन्सिलची सनद मिळाली आहे. त्यांना आता देशातील कोणत्याही न्यायालयामध्ये वकिली करता येणार आहे. अँड अवघडे या सामाजिक कार्यकर्ते विजय अवघडे यांच्या कन्या असून त्यांचे दहावीपर्यंतचे शिक्षण केम येथील उत्तरेश्वर विद्यालयामधून झाले. यशवंतराव चव्हाण सायन्स महाविद्यालयातून बी.एससी पूर्ण केल्यानंतर सातारा येथील इस्माईल साहेब विधी महाविद्यालयातून कायद्याची पदवी संपादन केली. सध्या त्यांची सातारा येथील सत्र न्यायालयात प्रॅक्टिस सुरू असून इंडियन बाल कौन्सिल असोसिएशनच्या परीक्षेत यश मिळाल्यामुळे त्यांचे सर्वत्र अभिनंदन केले जात आहे.



# पिलीव शहर परिसरात गुढीपाडवा उत्साहात साजरा

**तभा वृतसेवा,**
**पिलीव, दि. ३१ मार्च-**

माळशिरस तालुक्यातील पिलीव शहर व आसपासच्या परिसरात हिंदू नववर्षाचा महत्वाचा गुढीपाडवा हा सण मोठ्या उस्हात साजरा करण्यात आला. पिलीव शहर व परीसरात सर्वत्र नागरिकांनी आपल्या घरावर गुढी उभा केली होती.



गुढीची पारंपरिक पद्धतीने पुजा करण्यात आली. या सणासाठी महत्वाच्या असणाऱ्या हारगाठी बाजारपेठेत मोठ्या प्रमाणात विक्रीसाठी आल्या होत्या. या हार गाठी यंदा ८० ते १०० किलो दराने विकणयात येत होत्या. गुढीपाडव्यानिमीत्त पिलीव येथील ग्रामदैवत महालक्ष्मी, मारुती व विठ्ठल रुक्मिणी मंदीरात भाविकांनी दर्शनासाठी गर्दी केली होती. आजपासून शंभू महादेव यात्रा सुरू होत असल्याने या यात्रेसाठी जाणाऱ्या कावडीची पिलीव गावातून मिरवणूक काढण्यात आली.

# गुढीपाडव्यानिमित्त महूद येथील मारुती मंदिरात पाडव्याचे वाचन

**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.३१ मार्च-**

गुढीपाडव्यानिमित्त महूद, ता.सांगोला येथील मारुती मंदिरात पाडव्याचे वाचन करण्यात आले. गेल्या शेकडो वर्षाच्या परंपरेनुसार येथील मारुती मंदिरात गुढीपाडव्याच्या मुहूर्तावर पाडवा वाचन म्हणजेच नवीन वर्षात येऊ घातलेल्या फलाचे वाचन केले जाते.

सुरुवातीला माजी उपसरपंच दिलीप नागणे व लालासाहेब लवटे यांच्या हस्ते नवीन पंचांगाचे पूजन करण्यात आले. हिमालय देशपांडे यांनी पौराहित्य केले. नवीन वर्षात येऊ घातलेल्या फलाचे वाचन करताना हिमालय देशपांडे यांनी सांगितले की, चालू वर्षी शके १९४७ असून विश्वावसुनाम संवत्सर आहे. यावर्षी रब्बीचा स्वामी चंद्र असल्यामुळे पाऊस चांगला पडून दूध, फुले, फळे यांची समृद्धी होईल. लोकांची संपत्ती वाढेल. पाचू वगैरे रत्ने व कडधान्ये विपुल होतील. जेष्ठ कृष्ण द्वादशीला रविवार (ता.२२) जून रोजी सूर्य आर्द्रा नक्षत्रात प्रवेश करतो आहे. त्याचे फल लोकांमध्ये सुख, समाधान वाढेल. मेघ निवास परिटाच्या घरी असून रोहिणी नक्षत्र तटावर पडले आहे. त्यामुळे पाऊस पुष्कळ पडेल व धनधान्याची समृद्धी होईल.

या कार्यक्रमास सेवानिवृत्त तहसीलदार उत्तम तपासे, सामाजिक कार्यकर्ते उमेश पाटील, देवस्थान समितीचे अध्यक्ष कैलास खबाले, रुपेश देशमुख, बाळासाहेब धोकटे, संजय धोकटे, भारत पळसे, अरुण माने, दत्तात्रय आसबे, कुमार बाजारे, महावीर गांधी, संजय महाजन, गणेश गुरव, अशोक गुरव, नवनाथ गुरव, उत्तम गुरव, रामचंद्र कुंभार उपस्थित होते. गुढीपाडव्यानिमित्त येथील शंभू महादेवाची मानाची महाजन यांच्या गवळणी हलग्यांच्या कडकडाटात व हर हर महादेव असा जयघोष करत गावातील विविध मंदिरात जाऊन जलाभिषेक केला.

# बार्शीत घर फोडून नऊ लाखांचा ऐवज लंपास

**तभा वृत्तसेवा,**
**बार्शी, दि. ३१ मार्च-**

घरातील सर्वजण वरच्या मजल्यावर झोपले असल्याची संधी साधत शेजारील घरांना बाहेरुन कड्या लावून किचनच्या दरवाजाचा कडी कोयंडा उचकटून सोन्या चांदीचे दागिने, रोख रक्कम, पोलीस कर्मचाऱ्याचा गणवेश असा तब्बल नऊ लाख रुपये किमतीचा ऐवज पोलीस कर्मचाऱ्याच्या घरातूनच चोरट्यांनी लंपास केला. भागीरथी मधुकर अलाट (रा. मळेगाव, ता. बार्शी) यांनी पांगरी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. चोरट्याचा शोध घेण्यासाठी सोलापूर येथून ठसे तज्ज्ञ, श्वानपथक, व फॉरेन्सिक पथक यांनी घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. स्थानिक गुन्हे शाखेचे पथकानेही भेट दिली. शुक्रवारी २८ मार्च रोजी दोन्ही मुले वैराग व सोलापूर येथे गेली होती. घरातील सर्वजण जेवण करुन हॉलमध्ये झोपले होते. मध्यरात्री साडेतीनच्या सुमारास शेजारी राहणारे अमोल जामदार यांनी बाहेरुन घरांना कड्या घातल्याचे सांगितले.



# विठ्ठल-रुक्मिणी मंदिरे समितीच्या वतीने सुरेल मैफिल सप्तसुरांची उधळण

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि. ३१ मार्च-**

श्री विठ्ठल रुक्मिणी मंदिरे समिती पंढरपूर यांच्या वतीने आयोजित गुढीपाडवा या नवीन वर्षाच्या सुरुवातीलाच सुशिल कुलकर्णी प्रस्तुत मैफिल सप्तसुरांची सुरेल कार्यक्रम संपन्न झाला.

सुरुवातीला विठ्ठल रुक्मिणी मंदिर समितीचे व्यवस्थापक मनोज श्रोत्री साहेब.आणि सह कलाकार यांचे हस्ते विठूरायाच्या प्रतिमेचे पूजन आणि दीपप्रज्वलन करण्यात आले आणि कार्यक्रमाला सुरुवात झाली. गायिका योगिनी ताठे, स्वराली सावळे, गायक आप्पासाहेब चुंबळकर, प्रसाद खिस्ते व श्रीकांत कुलकर्णी आणि सुशील कुलकर्णी यांच्या सहभागाने सुरुवात झाली.

कार्यक्रमाच्या सुरुवातीला पंचतुंड नलरुंड मालधर या नांदीने सुरेल सुरुवात होत आम्हीं विठ्ठलाचे वारकरी, देव देव्हाऱ्यात नाही, मी विकत घेतला शाम, थकले रे नंदलाला, माझे जीवन गाणे, पद्मनाभा नारायणा, झिनी झिनी वाजे बिन, मि तर जाते जत्रेला अशा अनेक मराठी भावगीते, भक्तिगीते आणि विविध गाण्यांनी पंढरपूरकरांना मंत्रमुग्ध करत मराठी वर्षारंभाला सुंदर स्वरांची मेजवानी दिली.त्यांना तितकीच सुंदर साथसंगत तबला सुशील कुलकर्णी, हार्मोनियम आप्पासाहेब चुंबळकर, टाळ नंदकुमार कानडे यांनी करत संपूर्ण कार्यक्रमाचे अभ्यासपूर्ण निवेदन ऋतुजा फुलकर यांनी करत कार्यक्रमाला आगळीवेगळी उंची निर्माण केली.

# शिंगणापूर यात्रेसाठी परिवहन विभाग सज्ज

## अकलूज आगार प्रमुख प्रमोद शिंदे यांची माहिती

**तभा वृत्तसेवा,**
**माळशिरस, दि. ३१ मार्च-**

शिखर शिंगणापूरच्या शंभू महादेवाची यात्रा ४ एप्रिल पासून १२ एप्रिल पर्यंत असून यात्रेकरूंना वाहतूक सेवासुविधा देण्यासाठी परिवहन विभाग सज्ज असल्याची माहिती अकलूज आगार प्रमुख प्रमोद शिंदे यांनी दिली.

यंदा शिंगणापूर यात्रेसाठी सोलापूर विभागामार्फत ९० बसेस चे नियोजन आहे. अकलूज आगारामार्फत १३ बसेसचे नियोजन केलेले असून सदरच्या बसेस या अकलूज शिंगणापूर, शिंगणापूर नातेपुते, शिंगणापूर, पंढरपूर या मार्गावर फेऱ्या करतील. यात्रेतील मार्गस्थ बिघाड झालेल्या बसेस या कमी वेळात दुरुस्त होण्यासाठी नातेपुते व शिंगणापूर येथे यांत्रिक कर्मचारी यांची आवश्यक साधन सामुग्री सह नियुक्त करण्यात येणार आहे. शिंगणापूर यात्रेचा कालावधी हा दिनांक ४ ते १२ एप्रिल यात्रेचे मुख्य दिवस हा ८ एप्रिल एकादशी व १२ एप्रिल पौर्णिमा असा आहे.

# डॉ. ऋषिकेश कानडेचे एमबीबीएस परिक्षेत यश

**अणदूर, दि. ३१ मार्च-**



अणदूरचे सुपुत्र डॉ. ऋषिकेश कानडे यांनी जीएसएमसी केईएम कॉलेज (परेल दादर) मुंबई येथून एमबीबीएस परीक्षा प्रथम श्रेणीत उतीर्ण होउन डॉक्टर ही पदवी प्राप्त केल्याने त्यांचे सर्वत्र कौतुक केले जात आहे.

डॉ. ऋषिकेश परशुराम कानडे हे अणदूर येथील रहिवाशी असून त्यांनी इयता पहिली ते चौथीचे शिक्षण हे जिल्हा परिषद केंद्रिय प्राथमिक शाळा अणदूर येथे पूर्ण केले असून पाचवी ते दहावीचे शिक्षण हे जवाहर विदयालय अणदूर येथे घेतले आहे, त्यानंतर इयत्ता अकरावी व बारावीचे शिक्षण हे शाहु कॉलेज लातूर येथील नामवंत कॉलेजमध्ये पूर्ण केले त्यानंतर नीट परिक्षेत यश संपादन केले. त्यानंतर त्यानी जीएसएमसी केईएम मेडिकल कॉलेज (परेल दादर) मुंबई या ठिकाणी पहिल्या गुणवता यादीत प्रवेश मिळाला. डॉ. ऋषिकेश यांनी जानेवारी २०२५ मध्ये झालेल्या शेवटच्या वर्षाच्या परिक्षेची परिक्षा देऊन त्यानी यश संपादन केले.

# पीकपाणी चांगले, कडधान्ये मुबलक, राजकीय उपद्रव वाढेल

## करकंब येथील पाडवा पोथी वाचनात भाकीत

**तभा वृत्तसेवा,**
**करकंब, दि. ३१ मार्च-**

हिंदू नववर्षाची सुरुवात गुढीपाडव्यापासून सुरू होत असल्याने करकंब (ता.पंढरपूर) येथे गुढीपाडवा सण पारंपारिक पद्धतीने घरासमोर गुढी उभारून उत्साहात साजरा करण्यात आला. अनेक वर्षापासून चालत असलेल्या परंपरेनुसार बनगर गल्ली येथील महादेव मंदिरात हत्तरगे व स्वामी यांनी नूतन वर्षाचे पंचांग व पोथीचे पूजन केल्यानंतर पाडवा वाचनाचा कार्यक्रम पार पडला.यामध्ये नवीन वर्षातील पीकपाणी, धान्य उत्पादन, पाऊसपाणी, हवामान व राजकारणासंबंधी भाकित वर्तविण्यात आले.नवीन सालाचे नाव विश्वावसू नामसंवत्सरे असून या सालात राजा उपद्रव करील तर पीक पाणी चांगले होऊन उत्पादन वाढेल.आगाते, कडधान्ये चांगली येतील. उत्तर दिशेसी शुभिक्ष, पूर्वेस राजभय तर दक्षिणेसी अन्य दुःख व पश्चिमेस हळहळ उठेल. चैत्र महिन्यापासून पुढे उष्णता वाढेल, ज्येष्ठ श्रावण व भाद्रपद या महिन्यात चांगला पाऊस होऊन धनधान्य चांगले येईल असे भाकीत करकंब येथील पाडव्याच्या पोथीत वर्तविण्यात आले. याप्रसंगी शेतकरी, व्यापारी, शिक्षक, ग्रामस्थ पोथीवाचन ऐकण्यासाठी व लिहून घेण्यासाठी उपस्थित होते.

### श्रावण महिन्यात कृष्ण पक्षातील नवमीला पाऊस

या संवत्सराचे (वर्षाचे) नाव विश्र्वावसु आहे. या संवत्सरात राज्यकर्त्यांना त्रास होईल. अनेक राजकीय उठाव होतील. आकाशात मेघ (ढग) भरपूर प्रमाणात राहतील. त्यामुळे चांगले पीकपाणी होईल. पूर्व दिशेतील परिस्थिती चांगली राहील परंतु पश्चिम भागात दुष्काळ किंवा वाईट परिस्थिती निर्माण होईल. दक्षिण भागामध्ये घटना घडतील. पाश्चिमात्य देशांमध्ये हल्ले व अशांतता वाढेल. मध्य देशांमध्ये (मध्य भारत, मध्य आशिया) युद्धजन्य परिस्थिती निर्माण होईल. वादळ, वाऱ्यामुळे मोठे नुकसान होईल. समुद्र शांत राहील परंतु जमिनीवरील पाणीसाठा विविध अडथळ्यांमुळे वाढणार नाही.चीनमध्ये बुद्ध पौर्णिमा रविवारी असेल. सूर्याचा प्रवास विशिष्ट नक्षत्रांमध्ये होईल. त्यामुळे काही ठिकाणी जास्त उष्णता तर काही ठिकाणी थंडी दिवस ढगाळ हवामान राहील परंतु शेवटी भरपूर पाऊस होईल. श्रावण महिन्यात कृष्ण पक्षातील नवमीला पाऊस होईल. वैशाखवदी (कृष्ण पक्ष) अमृतासारखा पाऊस पडेल. वर्षाच्या शेवटी पश्चिम भागात संतापजनक घटना घडतील. हे भाकीत हवामान, पाऊस, राज्यव्यवस्था, सामाजिक घडामोडीशी संबंधित आहे.



CMYK

# आपला जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## वळसंगमध्ये रमजान ईद उत्साहात साजरी

तभा वृत्तसेवा
**वळसंग, दि. ३१ मार्च-**
वळसंग (ता.दक्षिण सोलापूर) येथे रमजान ईद उत्साहात संपन्न झाली. सकाळी ईदगाह येथे नमाज झाल्यानंतर मुस्लीम बांधव गळाभेट घेत एकमेकांना शुभेच्छा देत होते.

यानंतर माजी तंटामुक्त अध्यक्ष सत्तार कुरेशी, माजी उपसरपंच आरिफ कुरेशी यांच्या घरात माजी सरपंच श्रीशैल दुधगी, माजी मुख्याध्यापक सिद्धारूढ काळे, माजी उपसरपंच संगण्णा खैराटे,माजी सरपंच महादेव होटकर, ग्रामपंचायत सदस्य मलकप्पा कोडले, अनिल बर्वे, पत्रकार अल्ताफ पटेल, पत्रकार कल्लय्या स्वामी, आनंद भैरामडगी, बसवराज कलशेट्टी,



माजी सरपंच सिद्धाराम कोडले आदी मान्यवरांनी शिरकुर्माचा आस्वाद घेतला.



## संक्षिप्त वृत्त...



### बार्शीत सकल हिंदू समाजातर्फे महिलांची मोटारसायकल रॅली

**बार्शी, दि. ३१ मार्च-**
हिंदू नववर्ष व गुढी पाडव्याच्यानिमित्ताने आयोजित महिलांच्या मोटरसायकल रॅलीला उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. सकल हिंदू समाज बार्शी आयोजित बार्शी शहरात प्रथमच महिलांच्या मोटरसायकल रॅलीला बार्शीतील महिलांचा उस्फूर्त प्रतिसाद मिळाला. मोटरसायकल रॅलीची सुरुवात भगवंत मंदिर पूर्वद्वार येथून झाली. पुढे महाद्वार चौक, वीर सावरकर चौक, पटेल चौक, तुळशीराम रोड, ऐनापुर मारुती चौक, शाहीर अमर शेख चौक, सोमवार पेठ मार्गे, शिव सृष्टी येथे छत्रपती शिवाजी महाराज आणि धर्मवीर छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन करुन समारोप झाला. यावेळी कर्मवीर ढोल ताशा पथकाने वादन करुन भगवंत चरणी सेवा अर्पण केली.



### स्वामी सेवा कार्य समितीतर्फे स्वामी भक्तांना प्रसाद वाटप

**सोलापूर, दि. ३१ मार्च-**
अक्कलकोट येथील समाधी मंदिरात श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त आज सोलापूर येथील स्वामी सेवा कार्य समिती सोलापूर भक्त मंडळाच्या वतीने पुलाव व लाडूच्या प्रसादाचे वाटप केले. मंडळाने यंदाच्या श्री स्वामी समर्थ प्रकट दिनानिमित्त हा अनोखा उपक्रम राबवला. यामध्ये त्यांनी समाधी मंदिरात येणाऱ्या भाविकांना ५१ किलो तांदळाचा पुलाव व १००१ लाडूंचे वाटप केले. यावेळी महांतेश झेंडेकर, शिवा संघटना अध्यक्ष राजकुमार सारणे, गोरख चौधरी, सचिन कुसेकर, पीएमसीसी क्रिकेट क्लबचे अध्यक्ष परमेश्वर माळगे, नागेंद्र चौधरी, श्रीकांत पाटील, नितीन क्षीरसागर, सागर अंजिखाने, वैभव कुंभार, राजू शर्मा, बलराम चौधरी उपस्थित होते. याप्रसंगी अक्कलकोट समाधी मठाचे पुजारी श्री केदार महाराज यांचे सहकार्य लाभले.

### बार्शीत ३ मे पासून भगवंत महोत्सव; सांस्कृतिक आणि अध्यात्मिक मेजवानी

**बार्शी, दि. ३१ मार्च-**



बार्शीकरांचे विशेष आकर्षण असलेला भगवंत महोत्सव यंदा दि. ३ ते १० मे या कालावधीत मोठ्या उत्साहात साजरा केला जाणार आहे. या महोत्सवाच्या नियोजनासाठी भगवंत महोत्सव समितीची बैठक नुकतीच पार पडली. या बैठकीस माजी आमदार राजेंद्र राऊत, महोत्सव समिती अध्यक्ष सुभाष लोढा यांच्यासह भगवंत देवस्थान ट्रस्टचे अध्यक्ष दिलीप बुडूख, अरुण बारबोले, विलास रेणके, संतोष सूर्यवंशी, अभिजित सोनिग्रा, रावसाहेब मनगिरे, रमेश पाटील, प्रा. विलास जगदाळे, श्रीधर कांबळे, अमित आपटे, बाळासाहेब तातेड, ड वासुदेव ढगे, सचिन मडके, गणेश भोळे, दिलीप गांधी, शंकर वाघमारे, प्रशंत खराडे, वर्षा रसाळ, ॲड. राजश्री डमरे आदी मान्यवर उपस्थित होते. भगवंताच्या जन्मोत्सवाच्या निमित्ताने गेल्या काही वर्षांपासून भगवंत मैदानावर हा भव्य महोत्सव आयोजित केला जातो. यंदाही पंचक्रोशीतील भाविकांसाठी विविध सांस्कृतिक व आध्यात्मिक कार्यक्रमांची मेजवानी असणार आहे. भगवंत मंदिरात दि.९ मे रोजी पहाटे या महोत्सवात भगवंत प्रकटोत्सव हभप जयवंत महाराज बोधले यांचे किर्तनाचा कार्यक्रम होणार आहे. यानंतर श्री भगवंत प्रकटोत्सवाचा विशेष कार्यक्रम पार पडणार. सांस्कृतिक कार्यक्रमात मराठी नाटक, ऑर्केस्ट्रा आणि स्थानिक कलाकारांचे सादरीकरण. मंदिरात व परिसरात कीर्तन,प्रवचन यासारखे धार्मिक कार्यक्रम. ८ मे रोज हभप इंदुरीकर महाराज यांचे कीर्तन होणार आहे. तसेच दि.९ मे रोजी सायं. ५ वाजता शोभायात्रा निघणार आहे. दुपारी १२ वाजता मॉर्निंग क्लबच्या वतीने महाप्रसाद ठेवण्यात आला आहे. तसेच दि. १० मे रोजी आतषबाजी होईल. माजी आमदार राजेंद्र राऊत यांनी सर्व बार्शीकरांनी या महोत्सवात सहभागी व्हावे आणि श्री भगवंत महोत्सव थाटामाटात साजरा करावा, असे आवाहन केले आहे.

# दक्षिण कृषी कार्यालयातील तळीरामांचे अड्डे उध्वस्थ

### घेणार मोकळा श्वास

### अतिक्रमणांसह वाढलेली चिलारीची झाडेही काढली

तभा वृत्तसेवा,
**सोलापूर, दि. ३१ मार्च-**
उपप्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या बाजूला असलेल्या आत्मा, माती परीक्षण आणि दक्षिण सोलापूर तालुका कृषी कार्यालयाच्या परिसरात वाढलेल्या अतिक्रमणासह चिलारी झाडे काढून तळीरामांचे अड्डे उध्वस्त करण्यात आले आहेत. त्यामुळे येथील तिन्ही कार्यालयांनी आता मोकळा श्वास घेतला आहे. मोकळ्या जागेमुळे ग्रामीण भागातील शेतकऱ्यांनाही कार्यालयाला भेट देणे सोईस्कर होणार आहे.

येथे कृषी विभागाच्या मालकीची आठ एकर जागा आहे. या जागेत आत्मा, माती परीक्षण आणि दक्षिण सोलापूर तालुका कृषी अधिकारी अशी तीन कार्यालये आहेत. या जागेत वैदू व बहूरूपी समाजातील काही जणांकडून अतिक्रमण करून ते आपल्या कुटुंबासह वास्तव्य करत होते. त्यामुळे हा संपूर्ण परिसर कायम चिलारी झाडांसह इतर परीसरात अस्वच्छ होते . तसेच या कार्यालयाच्या बाजूला असेलल्या एका शाळेनेही संरक्षक भिंत पाडून मोकळ्या जागेचा वापर सुरु केला होता. शिवाय, शाळेच्या बसेसही तेथे थांबवले जात होते . वाढलेल्या चिलारीमुळे येथे रात्री या भागातील तळीरामांचा ठिय्याच बनला होता. तालुका कृषी कार्यालयाने धाडस दाखवत येथील अतिक्रमण काढण्यासाठी संबंधित कार्यालयाकडे पाठपुरावा केल्याने आणि चिलारी काढल्याने हा संपूर्ण परिसर मोकळा झाला आहे. कृषी विभागाच्या वरिष्ठ कार्यालयाच्या वतीने येथे शेतकऱ्यांसाठी आठवडा बाजार, कृषी भवन, कृषी प्रदर्शन भरवण्यासाठी ही जागा अनुकूल आहे. शेतकरी निवासही झाल्यास येथे शेती माल विक्रीसाठी आलेल्या शेतकऱ्यांना माफक दरात निवासाची सोय होऊ शकते. शिवाय परीसरातील नागरीकांसाठी वॉकींग ट्रॅक व गार्डनची निर्मितीसाठी प्रयत्न होणे गरजेचे आहे.



आठ एकर जागा जिल्हा कृषी अधीक्षक कार्यालयाच्या नावे आहे. त्यामुळे भविष्यात याठिकाणी कृषी संबंधित जिल्हास्तरीय अन्य कार्यालये सुरू होऊ शकतात. ज्वारी व डाळींब संशोधन केंद्र, कृषी भवन, शेतकरी निवासी प्रशिक्षण, शेतकरी व्याख्यान सभागृह, शेतकरी निवास, शेतकरी महिला बचत गट विक्री केंद्र, कृषी महोत्सव, मालेटस् महोत्सव, शेतकरी उत्पादक कंपनी उत्पादित मालांसाठी बाजारपेठ, कृषी संकुल, कृषी कर्मचारी वसाहत, आत्मा प्रशिक्षण सभागृह यासह अन्य कार्यालय सुरू करण्यासाठी लोकप्रतिनिधीनी प्रयत्न करणे गरजेचे आहे.

दक्षिण तालुक्यातील शेतकयांच्या कल्याणासाठी अनेक कामे केली आहेत. यापुढे सुद्धा शेतकऱ्यांना केंद्रबिंदू मानून काम करण्याचा मानस आहे. कृषी भवन किंवा कृषी प्रदर्शन केंद्रासह शेती व शेतकरी संबंधित कार्यालय सुरू करण्यासाठी पाठपुरावा करणार आहे. दक्षिणमधील शेतकऱ्यांना शेती संबंधित सोईसुविधांच्या निर्मितीसाठी संबंधित मंत्र्याकडे पाठपुरावा करणार आहे.

**- सुभाष देशमुख,** आमदार, दक्षिण सोलापूर

येथील मोकळ्या जागेत शहर आणि जिल्ह्यातील शेतकऱ्यांसाठी आठवडा बाजार, मार्गदर्शन केंद्र, कृषी भवन, कृषी महोत्सव व शेतकऱ्यांसाठी निवासाची व्यवस्थासह अन्य उपक्रम राबवता येऊ शकतात. तसा प्रस्ताव वरिष्ठ कार्यालयाकडे सादर केला आहे. कृषी विभागाशी संबंधित इतर कार्यालये एका छताखाली आल्यास दक्षिणमधील शेतकऱ्यांना अन्य योजनांचा फायदा होऊ शकतो.

**- अवधूत मुळे,** तालुका कृषी अधिकारी, दक्षिण सोलापूर

तालुका कृषी अधिकारी अवधूत मुळे यांच्या पाठपुराव्यामुळे अतिक्रमण काढण्यात आले आहे. आठ एकर जागेवर दक्षिणमधील शेतकर्यांसाठी लाभदायक ठरणार्या अन्य कार्यालय सुरू करण्यासाठी आमदार सुभाष देशमुख यांच्याकडे पाठपुरावा करणार आहे. नवनवीन तंत्रज्ञाना संबंधित अद्ययावत माहीती मिळणारे कार्यालय सुरू करण्यात यावे.

**- यतीन शहा,** चिटणिस, भाजपा

# बाळूमामाच्या चरणी नतमस्तक होऊन धन्य झालो

### विधान परिषदेचे सभापती राम शिंदे यांचे प्रतिपादन

### बेलाटी येथे बाळूमामा सभा मंडपाचे उद्घाटन

सोलापूर, दि.३१ मार्च-
प्रति आदमापूर म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बेलाटी येथील बाळूमामाचे दर्शन घेऊन व बाळूमामाच्या चरणी नतमस्तक होऊन धन्य झालो, असे प्रतिपादन विधान परिषदेचे प्रा. सभापती राम शिंदे यांनी केले.

सोमवारी उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी येथील बाळूमामाचे दर्शन घेतल्यानंतर सभापती राम शिंदे यांच्या हस्ते बाळूमामा सभा मंडपाचे उद्घाटन, बाळूमामा भक्त निवासाचे लोकार्पण, बाळूमामा मेंढीतळ व सद्गुरू संत बाळूमामा आणि त्यांच्या पत्नी सत्यव्वादेवी त्यांच्या मूर्तीचे प्रतिष्ठापना करण्यात आले.



यावेळी बोलताना विधान परिषदेचे सभापती शिंदे म्हणाले, मंदिर समिती अध्यक्ष श्रीराम पाटील यांनी बाळूमामाबद्दल असलेली श्रद्धा, निष्ठा आणि भक्ती यांच्या माध्यमातून बेलाटी परिसरात एक प्रकारे चांगले धार्मिक केंद्र व मेंढी प्रकल्प प्रकल्प उभारी असून या माध्यमातून विकास करण्यासाठी त्यांच्या प्रयत्नाला आम्ही चालना देण्यासाठी प्रयत्न करू. बाळूमामांच्या मंदिरासाठी सहकार्य करू, असेही राम शिंदे म्हणाले.

माजी आ. ॲड. रामहरी रुपनवर यांनी प्रास्ताविकात बेलाटीच्या बाळूमामा मंदिराबद्दल माहिती सांगून येत्या दहा वर्षांमध्ये प्रति आदमापूर म्हणून नावलौकिक होईल असे सांगितले.

माजी आ. दिलीप माने म्हणाले, उत्तर सोलापूर तालुक्यातील बेलाटी एक धार्मिक केंद्र म्हणून नावा रूपास येत आहे. श्रीराम पाटलाच्या माध्यमातून त्या मंदिराला कलाटणी मिळाली आहे. येत्या काही काळात मंदिराचे भरभराटी दिसून येईल.

यावेळी काँग्रेसचे शहराध्यक्ष चेतन नरोटे, भाजपचे शहराध्यक्ष नरेंद्र काळे, उत्तर सोलापूरचे तहसीलदार निलेश पाटील, सलगर वस्ती पोलीस ठाण्याचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमाकांत शिंदे, सेवानिवृत्त प्राध्यापक देवेंद्र मदने, जिल्हा परिषदेचे माजी सभापती अशोक देवकते, द्वारका नगरी सोसायटीचे माजी अध्यक्ष मल्लिकार्जुन देशमुख -शेंडगे, मंदिर समितीचे पुजारी व माजी सरपंच सुनील काटकर, धनगर समाजाचे नेते सिद्राम चोपडे, पंचायत समितीच्या माजी सभापती विजया पाटील, मंदिर समितीचे सचिव श्रीकांत पाटील, सुनिता पाटील यांच्यासह मान्यवर मोठ्या संख्येने उपस्थित होते. सूत्रसंचालन मुख्याध्यापक सदाशिव होनमाने यांनी केले. आभार मंदिर समितीचे अध्यक्ष श्रीराम पाटील यांनी मानले.



## सहकार महर्षी कारखाना सेवक पतसंस्था निवडणूक बिनविरोध

### चेअरमनपदी युवराज इनामदार

तभा वृत्तसेवा,
**अकलूज, दि.३१ मार्च-**
शंकरनगर अकलूज येथील सहकार महर्षी शंकरराव मोहिते पाटील सहकारी साखर कारखाना सेवक सहकारी पतसंस्थेच्या चेअरमनपदी युवराज इनामदार यांची निवड झाली असून व्हा. चेअरमनपदी पांडुरंग इनामदार यांची निवड करण्यात आली आहे. या पतसंस्थेची २०२५ ते २०३० यासाठीची पंचवार्षिक निवडणूक बिनविरोध पार पडली. २०१६ पासून कारभार पाहत असणारे युवराज इनामदार यांना चेअरमनपदाची पुनश्च संधी प्राप्त झाली तर व्हाइस चेअरमन म्हणून पांडुरंग इनामदार यांची निवड करण्यात आली आहे. सचिवपदी अभिजीत माने देशमुख, खजिनदार म्हणून केशव मोहिते, तर संचालक म्हणून गणेश लोकरे,अशोक डोके, बाळासाहेब किर्दकर, गुलाब देशमुख, संतोष नाशिककर, कल्याण जाधव, नामदेव सावंत, संदीप खंडागळे, नागेश झपके यांची बिनविरोध निवड झाली आहे. मॅनेजर पदाचा कारभार नागेश राजमाने हे पाहत आहेत. या झालेल्या निवडीबद्दल नूतन चेअरमन, व्हाईस चेअरमन व सर्व नूतन संचालकांचे कारखान्याचे चेअरमन जयसिंह मोहिते-पाटील, संचालिका स्वरूपाराणी मोहिते-पाटील यांनी अभिनंदन केले.

## मोडनिंब येथे शेतकऱ्यांना फार्मर आयडीबाबत प्रबोधन

### शेतकऱ्यांना विविध योजनेचा लाभ होणार सुलभ

तभा वृत्तसेवा,
**मोडनिंब, दि.३१ मार्च -**
मोडनिंब मंडलात शेतकरी ॲग्रीस्टॅक युनिक आयडी काढण्याचे काम गतीने सुरू आहे. याबाबत नुकतीच कृषी विभाग व महसुली विभाग यांची बैठक घेण्यात आली.

सर्व शेतकरी व त्यांचे शेती गट क्रमांक आधार क्रमांकांशी जोडले जाणार आहेत. शेतकऱ्यांना मिळणाऱ्या ओळखपत्रामुळे त्यांना विविध योजनेचा लाभ घेणे जलद व सुलभ होणार आहे. राज्यात कृषी विभागाच्या शंभरहून अधिक योजना आहेत. त्याचा लाभ घेण्यासाठी महाडीबीटी पोर्टलवर नोंदणी करणे शेतकऱ्यांना बंधनकारक करण्यात आले आहे. तसेच दुष्काळ, अतिवृष्टी, गारपीट, इत्यादी नैसर्गिक आपत्ती पीक विमा अनुदानाची रक्कम शेतकऱ्यांच्या बँक खात्यात थेट जमा करण्यात येते. यासाठी सुद्धा शेतकरी ओळखपत्र गरजेचे आहे. मोडनिंब मंडलातील शेतकऱ्यांना फार्मर आयडीबाबत महसूल विभागाने प्रबोधन केल्यामुळे शेतकऱ्यांतून उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत असल्याचे दिसून येत आहे.ॲग्रीस्टॅक (शेतकरी ओळख पत्र) रजिस्ट्रेशन जवळच्या सी. एस. सी. सेंटर मध्ये जाऊन शेतकरी बांधवांनी आपले रजिस्ट्रेशन करून घ्यावे, असे आवाहन महसूल मंडळ आधिकारी विशाल गायकवाड यांनी केले आहे. शेतकरी ओळख पत्रासाठी ग्राम महसूल अधिकारी मोहसीन हेड्डे, मनोहर मोहिते, शिवाजी इंगोले, उमेश बनसोडे, विवेक आखाडे, शितल आवताडे तसेच कृषी पर्यवेक्षक संतोष सुर्वे, दादासाहेब पवार, कृषी सेवक पल्लवी मामडगे, आप्पा पाटील,स्मिता बादगुडे, कृषी सहाय्यक सुहास इंगळे, सोमनाथ देवडकर व दीपक शिंदे यांच्यासह महसूल विभागातील इतर कर्मचारी परिश्रम घेत आहेत.

# हर हर महादेवच्या नामघोषात अकलूजमध्ये कावडींची ग्रामप्रदक्षिणा

तभा वृत्तसेवा
**अकलूज दि.३१ मार्च-**
अकलूज येथे चैत्री पाडव्याच्या मुहूर्तावर कावड्यांना वस्त्र परिधान करून नीरा नदीचे पाणी कावडीमध्ये भरून हलगी व ढोलकीच्या तालावर शहरातून भव्य ग्रामप्रदक्षिणा मिरवणूक काढण्यात आली. अकलूजमधील सर्व मंदिरात कावडीच्या पाण्याची धार घालून दर्शन घेत तरूणांनी खांद्यावर कावड घेऊन हलगीच्या तालावर ठेका धरत नृत्य करत मनमुराद आनंद घेतला.

शिखर शिंगणापूर (ता. दहीवडी) येथील शंभू महादेवाच्या यात्रेला आजपासून प्रारंभ झाला. त्यामुळे महाराष्ट्रातून विविध जिल्ह्यातून व ग्रामीण भागातून शंभू महादेवाचे भक्त कावड खांद्यावर घेऊन शिखर शिंगणापूरसाठी पायी चालत निघतात. व्दादशी दिवशी महाराष्ट्रातून आलेल्या सर्व कावडी शंभू महादेवावर पाणी घालतात. तर पोर्णिमेच्या दिवशी यात्रेची सांगता होते. लांबच्या कावडी आजपासून शिखर शिंगणापूरकडे मार्गस्थ होत असतात. गणेश कुंभार, राजू कुंभार, किशोर माने पाटील, रेवडे यांच्या मनाच्या कवडी पारंपरिक आहेत.

अकलूज येथील टेके परिवाराने सुरू केलेली कावड व देवांग कोष्टी समाज यांच्या सहकार्याने गेल्या तीन पिढ्यापासून कावडीची परंपरा जपली आहे. देवांग कोष्टी समाज कावडीचे मानकरी असलेले हेमंत टेके यांच्या घरासमोर सुवासिनींनी कावडीची विधीवत पुजा करून दर्शन घेतले. चालू वर्ष हे या कावडीचे ७६ वर्ष सुरू आहे. दिनांक १२ एप्रिल रोजी हनुमान जयंती दिवशी व पोर्णिमेनिमित्त कावडीतील लोकांसाठी,आप्तेष्ट मित्र परिवारासाठी महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले आहे. कावडी यशस्वी पार पडण्यासाठी हेमंत टेके, विलास भरते,रविन्द्र टेके,सुनिल टेके, आकाश टेके,योगीराज टेके, काशिनाथ बारवे,सागर उपासे, विनय उंट,देवांश टेके,नितीन टेके,



साईराज टेके, निलेश टेके, नितीन इंगोले, महेश कोतमीरे, रामचंद्र लोखंडे, नवनाथ सुर्यवंशी, रफिक पठाण,जितूराज माळी, अतुल उपासे, सौरभ उपासे, कार्तिक बाप्ते परिश्रम घेत आहेत.

CMYK

धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## तेरणा पब्लिक स्कूलमध्ये स्वामी समर्थ प्रकट दिन उत्साहात साजरा



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मार्च -**

तेरणा पब्लिक स्कूलमध्ये स्वामी समर्थ महाराजांच्या प्रकट दिनानिमित्त भक्तिमय वातावरणात भजन व सत्संगाचे आयोजन करण्यात आले. शाळेतील विद्यार्थ्यांनी श्रद्धेने भजन सादर केले.

ज्यामध्ये इयत्ता सहावी व सातवीतील मुलींनी विशेष आकर्षण निर्माण केले. शाळेमध्येच स्वामी समर्थ महाराजांचे मंदिर असल्यामुळे विद्यार्थ्यांना अध्यात्मिक प्रेरणा मिळते. तेरणा पब्लिक स्कुलचे विलास मोरे यांनी स्वतः भजन सादर करून कार्यक्रमाची शोभा वाढवली. प्राचार्य विलास मोरे हे दर रविवारी विद्यार्थ्यांसोबत सत्संग घेतात. त्यामुळे शाळेत आध्यात्मिक संस्कार जोपासले जातात.

आज प्रकट दिनाच्या निमित्ताने स्वामी समर्थांची विशेष पूजा करून विद्यार्थ्यांना प्रसाद वाटप करण्यात आला. शाळेतील सर्व शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी आणि विद्यार्थी यांनी या भक्तिमय सोहळ्याचा आनंद घेतला.



## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### तेर येथे रमजान ईद उत्साहात साजरी

**तेर, दि.३१ मार्च -**

धाराशिव तालुक्यातील तेर येथे सोमवारी रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. येथील मुस्लिम बांधवांनी रमजान ईद निमित्ताने तेर येथील ईदगाह मैदानात सामुहिक नमाज पठाण करण्यात आली. यावेळी सर्वांनी ईदच्या एकमेकांना शुभेच्छा दिल्या. यावेळी मोठ्या प्रमाणावर मुस्लिम समाज बांधवांना उपस्थित होते.



### नारंगवाडीत राम नवमीनिमित्त क्रिकेट स्पर्धा

**उमरगा, दि.३१ मार्च -**

उमरगा तालुक्यातील नारंगवाडी प्रभू श्रीराम नवमीनिमित्त येथे भव्य गावाईज नारंगवाडी चषक क्रिकेट स्पर्धेचे उद्घाटन करण्यात आले. ३२ संघाने यात सहभाग नोंदवला असुन उदघाटन नारंगवाडीचे सरपंच शेखर घंटे, पोलीस पाटील हेमंतराव पाटील, किशोर सांगवे, जिल्हाध्यक्ष युवक काँग्रेस गणेश पवार, युवक काँग्रेस तालुकाध्यक्ष हनुमंत सांगवे, भाजपा तालुका सरचिटणिस विठ्ठल चिकुंद्रे, व्यापारी मंडळाचे अध्यक्ष खंडू पवार, पांडुरंग पवार, तंटामुक्ती अध्यक्ष आकाश पवार, तुकाराम चव्हाण, मुस्तफा चौधरी, विशाल राजपूत, राजेश घंटे, राहुल देशमुख आयोजक अमोल पवार, शंकर पांचाळ, रणजित चिकुंद्रे, शाम पवार, सदाशिव आष्टे, राज राजपूत, संतोष गरड, आदित्य राजपुत आदी ग्रामस्थ खेळाडू उपस्थित होते.



### क्षीरसागर यांनी मुख्यमंत्र्यांचे केले स्वागत

**तुळजापूर, दि.३१ मार्च -**

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस हे दि.२९ मार्च रोजी आई तुळजाभवानी मातेचे दर्शनासाठी तुळजापूर येथे आले असता भाजपचे नेते परंडा विधानसभा निवडणूक प्रमुख बाळासाहेब क्षीरसागर यांनी स्वागत केले. यावेळी तालुक्यातील विविध विकास कामावर मुख्यमंत्र्यांसोबत क्षीरसागर यांनी चर्चा केली. याप्रसंगी भाजप जिल्हाध्यक्ष संताजी चालुक्य पाटील, तालुकाध्यक्ष महादेव वडेकर, तालुका सरचिटणीस संतोष सुपेकर, बाबासाहेब वीर उपस्थित होते.



### ईद निमित्त मुस्लिम बांधवाना किराणाचे वाटप

**तुळजापूर, दि.३१ मार्च -**

रमजान ईद सणानिमित्त दि.३० एप्रिल रोजी जनसेवक अमोल कुतवळ मित्र परिवारच्या वतीने वासुदेव गल्ली, गंगा निवास या भागातील मुस्लिम बांधवाना किराणा साहित्याचे वाटप करण्यात आले. याप्रसंगी महाविकास आघाडीचे काँग्रेस जिल्हाध्यक्ष धीरज पाटील, शाम पवार, सुधीर कदम, नागनाथ भांजी, रणजीत इंगळे, युसुफ बागवान, बाळासाहेब कदम, राहुल खपले, आनंद मालक जगताप, सुनील शिंदे, तोफिक शेख, अक्षय परमेश्वर, आकाश शिंदे यांच्यासह सर्व मुस्लिम बांधवांसह महिला मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### बावची विद्यालयास संविधानाची प्रत भेट

**परंडा, दि.३१ मार्च -**

विद्यालयात शासन आदेशानुसार भारतीय संविधानास ७५ वर्ष पूर्ण झाल्यानिमित्त संविधान मोहोत्सवा अंतर्गत सन २०२४-२५ पासून घर घर संविधान या कार्यक्रमा अंतर्गत विद्यालयात भारतीय संविधानावर घोषवाक्य निर्माण करण्यात आले. यावेळी विद्यालयातील शेकडो विद्यार्थ्यांनी अतिशय सुंदर असे घोषवाक्य तयार करून आणले होते. याप्रसंगी इ.८ वीच्या वर्गाकडून विद्यालयास भारतीय संविधानाची प्रत भेट देण्यात आली. यावेळी घेण्यात आलेल्या कार्यक्रमास विद्यालयाचे प्राचार्य नारायण खैरे, तानाजी मिसाळ, शिवाजी शिंदे हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन व आभार संदिप अनभुले यांनी केले.

# संतोष देशमुख हत्याकांड प्रकरणाशी संबंधीत महिलेचा आढळला मृतदेह

## ▶▶ कळंब शहरातील द्वारकानगर येथील घटना... पोलिसांचा तपास सुरु...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.३१ मार्च -**



बीडमधील मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्येप्रकरणात रोज नवीन माहिती समोर येत आहे. सामाजिक कार्यकर्त्या अंजली दमानिया यांनी एक धक्कादायक खुलासा केला होता. त्यानुसार, संतोष देशमुख यांच्यावर अनैतिक संबंधाचा आरोप करण्यासाठी तयार करण्यात आलेल्या कळंब (जि. धाराशिव) शहरातील द्वारकानगरमध्ये राहत असलेल्या महिलेची हत्या झाल्याचे उघड झाली आहे.

दमानिया यांनी आपल्या सोशल मीडिया पोस्टमध्ये म्हटले की, बीडमधील गुंड संपत नाहीत, हत्याही संपत नाहीत. मृत संतोष देशमुखांवर अनैतिक आरोप करण्यासाठी तयार असलेली कळंब शहरातील द्वारकानगरमधील महिलेची हत्या झाल्याचे कळते.



ही महिलेची हत्या ७ ते ८ दिवसांपूर्वी झाल्याचे दमानिया यांनी सांगितले. या घटनेने शहरात खळबळ माजवली असून, वेगवेगळे तर्क-वितर्क लावले जात आहेत.

अंजली दमानिया यांनी याबाबतच्या तपासावर प्रश्न उपस्थित करत, हया महिलेची हत्या अनैतिक संबंधातून झाली का? असा सवाल केला आहे.

घटनेच्या तपासादरम्यान, बीड पोलिसांना माहिती मिळाल्यानंतर, ते स्थानिक पोलिसांसोबत घटनास्थळी पोहोचले. द्वारकानगरमधील एक घरात महिलेला साडलेल्या अवस्थेत मृत आढळले.

घराला बाहेरून कुलूप लावलेले होते, पण पोलिसांनी दरवाजा तोडून आत प्रवेश केला. मृतदेहाचे शवविच्छेदन तत्काळ करण्यात आले.

दमानिया यांनी सांगितले की, मृत महिलेने अनेक पुरुषांना अडकवण्याचा प्रयत्न केला होता. यासाठी ती विविध नावांचा वापर करत होती, जसे मनीषा आकुसकर, मनीषा बिडवे, मनीषा मनोज बियाणी इत्यादी.

या प्रकरणाचा तपास सुरू असून, पोलिसांनी घटनास्थळी सखोल तपास सुरु केला आहे. कळंब शहर आणि परिसरात या घटनेमुळे दहशत पसरली आहे.

कळंबमध्ये जी महिला मृत अवस्थेमध्ये आढळून आली, तपासाअंती तिचा संतोष देशमुख यांच्या हत्या प्रकरणाशी अद्याप कोणताही संबंध आढळून आलेला नाहीये. पोलिसांकडून या प्रकरणाचा अधिक तपास सुरू आहे, जर या महिलेचा संतोष देशमुख हत्या प्रकरणात काही संबंध आढळला तर त्याची माहिती दिली जाईल.

## परंड्यात स्वामी समर्थ महाराजांचा प्रगट दिन साजरा



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३१ मार्च -**

येथील स्वामी समर्थ मंदिरात प्रतिवर्षी प्रमाणे दि.३१ मार्च रोजी स्वामी समर्थ महाराज याचा प्रगट दिन उत्साही व धार्मिक वातावरणात साजरा करण्यात आला.

या निमित्ताने सकाळी स्वामी च्या मुर्तीस रुद्राभिषेक करण्यात आला असून त्यानंतर स्वामी नामजप तसेच हभप. सायली देवधर याची किर्तन सेवा झाली. त्यानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले होते. सांयकाळी भजन व भारुडाचा कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

यावेळी सर्व स्वामी भक्तांनी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी मंदीर समिती उत्सव समिती च्या वतीने नियोजन करण्यात आले होते.

## तुळजाई नगरीत महिलांचा मराठमोळा फॅशन वॉक शो संपन्न

### मराठी नववर्ष चैत्र पाडवा निमित्त महिलांची बाईक रॅली



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ मार्च -**

पुजारी नगर फाऊंडेशनच्या वतीने मराठी नववर्ष चैत्र पाडवा निमित्त महिलांचा पारंपरिक वेशभूषा मराठमोळा फॅशन वॉक शोसह महिला बाईक रॅली आयोजित करण्यात आली होती.

श्रीनाथ लॉन्स येथे पारंपरिक वेशभूषा मराठमोळा फॅशन वॉक शो सादर करण्यात आला. या शो मध्ये १५० महिलांनी सहभाग नोंदवला. फॅशन वॉक शोचे उद्घाटन नम्रता अमर हंगरगेकर, शुभांगी गणेश पूजारी, सुजाता चौगुले, रेखा कदम, डॉ. प्रिया पाटील, दीपाली पूजारी, कल्पना शिंदे, जगदेवी लोंढे आदींच्या उपस्थितीत करण्यात आले.



पूजारी नगर सोसायटीच्या महिलांच्या वतीने शुभांगी गणेश पूजारी यांच्या नेतृत्वाखाली पारंपरिक वेशभूषेत बाईक रॅली काढण्यात आली. या रॅलीत ६० महिलांचा सहभाग होता. बाईक रॅलीतील महिलांनी भगवे फेटे धारण केले होते. ही बाईक रॅली पूजारी नगर नळदुर्ग रोड येथून छत्रपती शिवाजी महाराज चौक इथपर्यंत होती.

बाईक रॅलीतील महिलांनी छत्रपती शिवाजी महाराज व छत्रपती संभाजी महाराज पूर्णाकृती पुतळ्यास पुष्पहार अर्पण करत जयघोष केला. याप्रसंगी युवा नेतृत्व निलेश रोचकरी यांनी या रॅलीचे भगवा ध्वज देऊन स्वागत केले. सोबत गणेश पूजारी, श्रावण पवार, डॉ. राजेश पाटील, हरिदास नाईकवाडी, सिद्धेश्वर इंगोले, शिवाजी जोत उपस्थित होते.

## परंडा तालुक्यात ईद उत्साहात साजरी



**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.३१ मार्च -**

रमजान ईद सोमवार ३१ मार्च रोजी शहरासह परंडा पोलीस ठाण्याच्या हाद्दीत आकरा ठिकाणी शांततेत उत्साहात साजरी करण्यात आली.

शहरात ईदची नमाज मुस्लिम बांधवांनी मोगल मस्जीद, पल्ला मस्जीद तर मोठ्या संख्येने मुस्लिम बांधवांनी ईदगा मैदानावर जफरअली काझी यांच्या नेतृत्वाखाली नमाज अदा केली. रमजान ईदची नमाज अदा करण्याआधी शहर काझी जफरअली यांनी मुस्लिम बांधवांनी रमजान महिनाभर रोजे (उपवास) केले याचे महत्त्व काय आहे ते सांगितले.

नमाज अदा केल्यानंतर मुस्लिम बांधवांनी एकमेकांना गळाभेटी देऊन ईदच्या शुभेच्छा दिल्या पोलीस निरीक्षक दिलीपकुमार पारेकर तहसीलदार निलेश काकडे पोलीस उपनिरीक्षक बाबासाहेब खरात पोलीस हवालदार पवार, शिंदे, शेख, मुख्याध्यापक अंकुशराव जाधव, नितीन गुंडाळे यांनी मुस्लिम बांधवांना गुलाबाचे फुल देऊन इच्छा शुभेच्छा दिल्या.

त्यानंतर मुस्लीम बांधवांनी आपल्या स्नेही मित्र मंडळी ना घरी बोलवून शिरखुबा व मिठाईचा मिळुन आस्वाद घेतला यावेळी पोलीस निरीक्षक पारेकर यांच्या मार्गदर्शनाखाली चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यात आला होता.

परंडा पोलीस ठाण्याच्या हाद्दीत शहरात तीन ठिकाणी तर ग्रामीण भागात जवळा (नि), माणकेश्वर, शेकापूर, लोणी, आसु, वाकडी, कुंभेफळ, बावची या आकरा ठिकाणी ईदची नमाज शांततेत पार पाडली.

### मोफत नेत्र व दंत रोग तपासणी शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ मार्च -**

मारुती स्कायलाईन मल्टीपर्पज सोशल फाऊंडेशनच्या पुंडलिक माने यांच्या स्मरणार्थ व श्री तुळजाभवानी नेत्रालयाच्या द्वितीय वर्धापन व सुश्रत पॅरोमेडिकल कौशल्य विकास संस्था यांच्या संयुक्त विद्यमानाने सात दिवसाचे भव्य साप्ताहिक मोफत नेत्र तपासणी व दंत रोग तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे.

तालुक्यातील सर्व सहकारी कर्मचाऱ्यांसाठी या सात दिवसीय भव्य शिबिरात मोफत तपासणी आणि मोफत औषधे देण्यात येणार आहेत.

३ ते १० एप्रिलपर्यंत घेण्यात येणाऱ्या या शिबिराचा जास्तीत जास्त कर्मचाऱ्यांनी लाभ घ्यावा असे आवाहन डॉ. गीतांजली माने यांनी केले आहे.

## तुळजापूरात रमजान ईद उत्साहात साजरी; एकत्रीतपणे नमाज अदा



**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.३१ मार्च -**

महिनाभर रोजे करून सश्रध्द भावनेने अल्लाहची 'इबादत' केल्यानंतर सोमवारी तुळजापूर शहरात मुस्लिम बांधवांनी ईद-ऊल-फितर (रमजान ईद) उत्साही, आनंदी आणि मंगलमय वातावरणात साजरी केली. हिंदू बांधवांनी मुस्लीम बांधवांना ईदच्या शुभेच्छांचा वर्षाव केला. दिवसभर घरोघरी शिरखुम्र्याचा आस्वाद घेत सर्वांनी ईदचा आनंद घेतला.

शहरासह आसपासच्या ग्रामीण भागातील मुस्लिम बांधवांनी दि.३१ सोमवारी सकाळी ९.३० वाजता ईदगाह मैदानावर ईद-ऊल-फितरची नमाज (रमजान ईद) अदा करण्यात आली.

सोमवारी सकाळी घाटशिळ रोडवरील ईदगाह मैदानावरती मौलाना बिलाल रजा व मौलाना गुलाम मोहम्मद यांनी मुस्लीम बांधवांना रमजान महिन्याचे महत्व सांगितले. ईदगाह मैदानावरती सकाळी ९.३० वाजता मौलाना बिलाल रजा यांनी नमाजचे पठण केले.

याप्रसंगी कुठलाही अनुचित प्रकार घडू नये म्हणून तुळजापूर पोलीस ठाण्याच्या वतीने ईदगाह मैदानावर चोख पोलीस बंदोबस्त ठेवण्यांत आला होता.

शेवटी मौलाना बिलाल रजा व मौलाना गुलाम मोहम्मद यांनी नगर परिषद व पोलीस प्रशासनाचे आभार मानले.

## ▶▶ वाशी तालुक्यात रस्त्याचे प्रश्न गंभीर... ▶▶ कडकनाथवाडी तेरखेडा बावी रस्त्यावरून वातावरण तापले...

# रस्ता भूसंपादन केलेल्या क्षेत्रात नाही झाल्यास आंदोलन करणार : सरपंच संजय शिंदे







**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.३१ मार्च -**

वाशी तालुक्यातील रस्त्याचे प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आले आहेत. तालुक्यातील अनेक छोट्या मोठ्या रस्त्याची चाळण झाली असून रस्त्यांची मोठी दुर्दशा झाली आहे. रस्त्यावर खड्याचे साम्राज्य पसरले आहे. खड्ड्यात रस्ता की रस्त्यात खड्डा समजणे मुश्किल झाले आहे. रस्त्यावर काटेरी झाडे झुडपे वाढली आहेत. वळण रस्त्यावर झाडांच्या फांद्या आल्यामुळे अनेक छोटे-मोठे अपघात घडत आहेत. शासनाकडून दर वर्षी करोडो रुपये रस्ते दुरुस्तीसाठी खर्च केले जात आहेत. तरी देखील रस्त्याची दुरवस्था कशी होते? असा सवाल आता उपस्थित झाला आहे. शासन दरबारी ही कामे कागदावर करून ठेकेदारामार्फत संगनमताने शासनाच्या पैशावर डल्ला मारला जातो का? बावी ते कडकनाथवाडी हा रस्ता दळणवळणाच्या दृष्टीने महत्वाचा आहे.

सोलापूर, धाराशिव आणि बीड जिल्ह्यातील अनेक गावे यामार्गाने जोडली जात आहेत. परंतु वर्षानुवर्षे रस्त्याची प्रचंड दुरवस्था असल्यामुळे गावांचा संपर्क कमी झाला आहे. काही दिवसांपूर्वी कडकनाथवाडी बार्शी झालेला सिमेंट रस्ता हा आता बिलगाडीच्या रस्त्यासारखा झाला आहे.

रस्त्यावरचे सिमेंट आणि खडी निघू लागल्याने कामाच्या दर्जेबाबत लोकांच्या मनात प्रश्न उपस्थित झाला आहे. ठेकेदाराने इस्टिमेटमध्ये नमूद केल्याप्रमाणे साहित्य वापरले का? की अधिकाऱ्यांनी ऑफिस मध्ये बसून रस्त्याचे काम पाहिले.

शासन दर वर्षी तालुक्यातील रस्त्यांचे टेंडर काढते पण ठेकेदार अधिकाऱ्यांच्या आशीर्वादाने रस्त्याची तात्पुरती मलमपट्टी करून बिल लाटतात आणि अधिकारी देखील त्यांना खराब कामे करण्यासाठी आशीर्वाद देतात. संबंधित अधिकाऱ्यांचे तालुक्यातील ठेकेदार घनिष्ठ मित्र हैं इसलीय सब रस्ते उद्वस्त हैं ये तो दिलकी बात हैं सब अपने हात हैं असा प्रकार सुरू आहे, असे सुज्ञ नागरिकांचे म्हणणे आहे.

त्यामुळेच वर्षोनुवर्षे रस्त्यांची अशी दुर्दशा होते की काय? त्यात बावी तेरखेडा रस्त्याच्या कामावरून बावी गावात चांगलेच वातावरण तापले आहे. गावचे सरपंच संजय शिंदे यांनी गावालगत सुरू असलेल्या रस्त्याच्या कामाची तक्रार दिली आहे.

त्यांनी तक्रारीत रस्ता हा भूसंपादित झालेल्या क्षेत्रामध्ये होत नसून नदीपात्रात केला जात आहे. कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग धाराशिव, उपविभागीय अभियंता बांधकाम वाशी, भूअभिलेख वाशी या कार्यालयाने व ठेकेदाराने संगनमत करून रस्ता हा पूर्वीच्या नदीपात्रात करत असल्याची लेखी तक्रार राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे व जिल्हाधिकारी यांच्याकडे देऊन कारवाईची मागणी केली आहे.

आता मंत्री महोदय, जिल्हाधिकारी तसेच ठेकदारांचे मित्र असलेले संबंधित अधिकारी या प्रकरणात पुढे काय कारवाई करतात हे पाहणे गरजेचे आहे. भूसंपादन केलेल्या क्षेत्रात रस्त्याचे काम नाही झाल्यास ग्रामस्थांना घेऊन आंदोलन करणार असल्याचे सरपंच संजय शिंदे यांनी सांगितले.



नांदेड- शहरासह जिल्ह्यात रमजान ईद उत्साहात साजरी करण्यात आली. ईदगाह मैदानावर हजारोंच्या संख्येने उपस्थित राहून मुस्लीम समाज बांधवांनी नमाज अदा केली.

# राज्यातील अनुसूचित जातीचे आरक्षणाचे उपवर्गीकरण करावे: डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेची मागणी

**तभा वृतसेवा**
**नायगांव, दि. ३१ मार्च**

महाराष्ट्र राज्यातील मागासवर्गीय समाजातील काही विशिष्ट जाती ह्या अजून ही विकासाच्या प्रवाह पासून कोसो दूर असलेल्या जातीला विकासाच्या मुख्यप्रवाहात आणण्या साठी भारतीय संविधानाच्या तरतुदीनुसार महा राज्यातील काही समाजातील ५९ जातीचा अनुसूचित जातीचा १३ टक्क्यांमध्ये समावेश केला असून. राज्या तील अनुसुचित जातीच्या एकूण लोकसंख्येपैकी 'मातंग' समाज हा महाराष्ट्र राज्यात दुसऱ्या क्रमांकाच्या स्थानी असून अजूनही 'मातंग' समाज विकासाच्या मुख्यप्रवाहा पासून कोसो दूर राहिलेला आहे.त्यामूळे राज्यातील अनु सुचित जातीतील समाजातील 'मातंग' समाजाचे उपवर्गीकरण करून अ, ब, क, ड या संवर्गात समायोजन करुन आरक्षण द्यावे अशी मागणी डॉ.आण्णा भाऊ साठे क्रांती सेनेकडून केली आहे.



मागील १ ऑगस्ट रोजी देशातील माननीय सुप्रीम न्यायालयाने देशाला स्वातंत्र्य मिळून खूप वर्षे झाले तरी ही राज्यातील अनुसूचित जातीतील 'मातंग' समाज हा विकासाच्या मुख्य प्रवाहापासून वंचित असून. अशा विकासाच्या प्रवाहापासून वंचित असलेल्या समाजाला विकासाच्या मूळ प्रवाहात आणण्यासाठी.देशातील माननीय सर्वोच्च न्यायाल याने यावेळी माजी न्यायमूर्तीच्या उपस्थिती मध्ये 'बदर' समितीची स्थापनाकरून महाराष्ट्र राज्यसरकारने राज्यातील अनुसूचित जातीचे तात्काळ उपवर्गीकरण करून अ,ब,क,ड या संवर्गात समायोजन करावा असा अध्यादेश काढला असून ही.महाराष्ट्र राज्यसरकारने मात्र राज्यातील'अनुसूचि त जातीचे' उपवर्गीकरण करुन आरक्षण देण्यास जाणून बुजून दिरंगाई होत आहे.

त्या अनुषंगाने नायगांव तालुक्यातील डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेच्या वतीने राज्यातील राज्य सरकारने माननीय सुप्रीम कोर्टाचा आदेश हा अंतिम मानून राज्य सरकारने महाराष्ट्रराज्यातील अनुसूचित जातीचे उपवर्गीक रण अ,ब,क,ड या संवर्गात समावेश करून समाजातील अनु सूचित जातीतील 'मातंग' समाजाला आरक्षण देऊन न्याय द्यावा. अन्यथा २० एप्रिल रोजी राज्यातील सकल 'मातंग' समाज राज्य सरकार विरोधात मुंबईतील आझाद मैदानावर आंदोलनाचा मोठा लढा उभारेल अशा अशयाचे दि.२० मार्च गुरुवारी सकाळी तहसीलदार सौ धम्मप्रिया गायकवाड यांना निवेदन देऊन मागणी केली.

यावेळी डॉ.अण्णाभाऊ साठे क्रांती सेनेचे जिल्हाध्यक्ष पंडित वाघमारे, रा. ना.मेटकर,डॉ.शंकर गड्डमवार, शंकर माळगे,डॉ.प्रभाकर गायकवाड, डॉ.भिष्म झुंजारे, आनंदराव सूर्यवंशी, प्रा.भास्कर वाघमारे, राजेंद्र रेड्डी,दिगंबर रोडे, राव साहेब बैलके,अशोक गारोळे, राधा कृष्णन झुंजारे, सचिन सुर्यकार आदी मान्यंवर मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त



### गुढीपाडव्या निमित ध्वजारोहन व रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण

**उमरी-**उमरी तालुका शिवसेने च्या वतीने गुढीपाडव्या च्या निमित्ताने छत्रपती शिवाजी महाराज यांच्या पुतळ्या समोर ध्वजारोहण करण्यात आले व त्यानंतर शिवसेना आयोजित तिथी प्रमाणे शिवजयंती च्या शोभायात्रे चे व रांगोळी स्पर्धेचे बक्षीस वितरण करण्यात आले आहे यामध्ये शोभायात्रातील रहाटी च्या कोचिंग क्लासेस च्या विद्यार्थ्यांनच्या संचने प्रथम क्रमांक पटकावला , तर द वर्ल्ड स्कूल उमरी ने छावा चित्रपटातील देखावा सादर केला होता त्यानी द्वितीय क्रमांक पटकावला आणि गिरीश देशमुख गोरठेकर शाळेने तृतीय क्रमांक पटकावला आहे. तर रांगोळी स्पर्धेतील प्रथम पारितोषक अश्विनी देवराय , द्वितीय जयश्री आरसेवाड , तृतीय वेदिका बच्चेवार , व रांगोळी स्पर्धेतील बाल गटात प्रथम क्रमांक अक्षरा माने , व द्वितीय पारितोषिक स्वरा पवितवार हिने पटकावला .शिवसेना तालुकाप्रमुख तथा माजी नगराध्यक्ष सुभाष पेरेवार यांच्या मार्गदर्शनाखाली हा कार्यक्रम पार पडला . यावेळी उदोजक मारोतराव कवळे गुरुजी , कैलास देशमुख गोरठेकर ( नांदेड मध्यवर्ती बँक संचालक ) माजी नगराध्यक्ष संजय कुलकर्णी , विजू आप्पा उत्तरवार, पांडुरंग देशमुख , शहरप्रमुख शिवाजी शिंदे , विष्णू पंडीत ,अशोक मामीडवार, पारस सेट दर्डा, गजानन श्रीरामवार , राजेश जाधव, बालाजी पाटील पतंगे ,कृष्णा कोहिडवार, गोविंद केते पाटील , संतोष पसनुरवार , सोमू हेमके, प्रदीप दीक्षित ,अंकुश तामसेकर , शिवसेना महिला शहर अध्यक्षा पार्वतीबाई प्रदीप दीक्षित , कांचन उमाटे , राजेंद्र सिंग ,विनोद वर्मा ,माधव सोळंके , कैलास पवार आदी उपास्थित होते.

### विष्णुपुरी प्रकल्प पूर्ण भरलेला असताना शेतकऱ्यांचा रब्बी हंगाम गेल्यात जमा

**नांदेड-**विष्णुपुरी प्रकल्प, दिग्रस बंधारा, अंतेश्वर बंधाऱ्यात मुबलक पाणी असतानाही रब्बी हंगाम जलसंपदाच्या अयोग्य नियोजनामुळे धोक्यात आला असून धरण उशाला कोरड घशाला या म्हणीप्रमाणे शेतकऱ्यांची मेहनत, पैसा, वेळ, पिकाचे संरक्षण अशा अनेक पटीने नुकसान होत आहे तरी जलसंपदा विभागाच्या अयोग्य नियोजनामुळे शासनाने तात्काळ नुकसान भरपाई शेतकऱ्याला मोबदला देऊन तात्काळ पाणी सोडण्याचे आदेश द्यावेत, अशी मागणी एका निवेदनाद्वारे मराठवाडा शेतकरी प्रतिनिधी प्रा. शिवाजी मोरे सोनखेडकर यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली. विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्याला अयोग्य नियोजनाद्वारे मागील दोन वर्षापासून दुरुस्तीच्या नावाखाली पाणी सोडले जात नाही, त्यामुळे दोन वर्षापासून नैसर्गिक संकटामुळे खरीप हंगाम जात असताना रब्बी हंगाम प्रशासनाच्या अयोग्य नियोजनामुळे शेतकऱ्यासमोर सुलतानी संकट उभे राहिले आहे. विष्णुपुरी प्रकल्प हा आशिया खंडातला सर्वात मोठा उपसा जल सिंचन प्रकल्प म्हणून ओळखला जातो तो पूर्ण क्षमतेने भरलेला आहे. तसेच दिग्रस बंधारा, अंतेश्वर बंधारा हे सुद्धा पूर्ण क्षमतेने भरलेले आहेत. परंतु जलसंपदा विभागाच्या अयोग्य, अवास्तव चुकीच्या नियोजनामुळे व इस्टिमेट बनवण्याच्या वृत्तीमुळे शेतकऱ्यांच्या पाणी पाळ्यांच्या नियोजनाकडे दुर्लक्ष होत आहे. जलसंपदा अधिनियम २००५ नुसार जर जलसंपदा विभागाने कालव्याला दोन पाणी पाळ्यापेक्षा कमी पाणी सोडले तर पाणीपट्टी लावण्याचा अधिकार जनसंपदा विभागाला नाही. एकीकडे जलसंपदा विभागाने अर्धा रब्बी हंगाम संपल्यानंतर जानेवारीच्या शेवटच्या आठवड्यात विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्याला पाणी सोडले व दुसरे पाणी फेब्रुवारीमध्ये सोडले आणि तिसरे पाणी सोडलेच नाही. निवडणुका चालू असल्यामुळे विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालवा सल्लागारची बैठक विभागीय आयुक्तांनी घेतली आणि या बैठकीमध्ये विष्णुपुरी प्रकल्पाच्या कालव्यांना रब्बीसाठी चार पाणी पाळ्या, उन्हाळी तीन पाणी पाळ्यांचे नियोजन घोषित केले, असे या कालवा सल्लागारचे सचिव अधीक्षक अभियंता हे तोंडी सांगत होते.



नांदेड- वजिराबाद पोलीस ठाण्याच्या गुन्हे शोध पथकाने गोवर्धन घाट परिसरातील तुषार सुधाकर सोनवणे यास अटक केली असून त्याच्याकडून एक गावठी पिस्टल व दोन रिकामे काडतुसे जप्त केली आहेत.

# सूर्यकांताताई पाटील यांचे ३ एप्रिल रोजी व्याख्यान

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. ३१ मार्च**

येथील पु. साने गुरुजी संस्कारमाला सार्वजनिक वाचनालय व प्रतिष्ठानच्या रौप्य महोत्सवानिमित्त स्व. गंगाधरराव कुंटूरकर स्मृती समारोह व साने गुरुजी प्रबोधन व्याख्यानमाला आयोजित केली आहे. दि. ३ एप्रिल रोजी सायंकाळी ७ वाजता होणाऱ्या या समारंभात जिल्ह्यातील फरड्या वक्त्या माजी मंत्री तथा स्व. कुंटूरकर यांच्या सोबत अनेक वर्षे राजकारणात कार्यरत असलेल्या सूर्यकांताताई पाटील यांचे 'स्व. गंगधरराव कुंटूरकर : व्यक्तित्व आणि कर्तृत्व' या विषयावर व्याख्यान संपन्न होणार आहे. या समारंभाचे अध्यक्ष म्हणून माजी मंत्री तथा विचारवंत वक्ते माधवराव किन्हाळकर उपस्थित राहणार आहेत. तर यावेळी ज्येष्ठ बाल साहित्यिक डॉ. सुरेश सावंत, कुंटूरकर शुगरचे चेअरमन राजेश देशमुख कुंटूरकर, सूर्यकांत कदम, सूर्याजी चाडकर, शिवाजी होळकर, बाबुराव आडकीने, सरपंच आशाताई कदम, बालाजीराव पवार आदी मान्यवर उपस्थित राहणार आहेत. स्व. गंगाधरराव कुंटूरकर यांच्या कर्तृत्वशाली व्यक्तिमत्त्वाची नव्या पिढीला ओळख व्हावी, त्यांच्या स्मृती चिरंतन जाग्या राहाव्यात यासाठी हे व्याख्यान महत्त्वाचे आहे.

या सोहळ्यात चळवळीच्या साने गुरुजी सेवा सन्मान २०२४ हे पुरस्कार बीड येथील एच.आय.व्ही. बाधित बालकांची सेवा करणारे दत्ता बारगजे, ज्येष्ठ कार्यकर्ते तथा विद्यार्थीप्रिय प्रा.डॉ. बालाजी कोंपलवार, बचत गट प्रेरक रेखाताई कांबळे यांना तर वाड्मय पुरस्कार २०२४ हे लातूरचे ज्येष्ठ लेखक भारत सातपुते व नांदेडच्या बालकवयित्री मीनाक्षी आचमे-चित्तरवाड यांना प्रदान केले जाणार आहेत.

# आदमपूर येथे ईदगाह मैदानावर रमज़ान ईद साजरी

**तभा वृत्तसेवा**
**आदमपूर, दि. ३१ मार्च**

बिलोली तालुक्यातील ग्राम आदमपूर येथे दि.३१ मार्च रोजी रमज़ान ईद अर्थात 'ईद-ऊल-फित्र' निमित्त माळावरील ईदगाह मैदानावर सकाळी १० वाजता ईदेची सामुहिक नमाज व दुआँ पठण करण्यात आली. घरातून ईदगाह मैदानाकडे निघताना नवीन कपडे,सुगंधित अत्तर,डोळ्यात सुरमा आणि शिरखुर्मा या चविष्ट सेवयारूपी पदार्थाने तोंड गोड करून मुस्लिम समाज बांधव मैदानावर गोळा होतात.वर्षभराची देणगी, देवाण,हाफिज या खाजगी शिक्षकाच्या पगाराची तेरीज पूर्ण होते. त्यानंतर सामुदायिक नमाज पठणाला सुरूवात होते.नमाजानंतर समाज बांधव एकमेकांस गळाभेट घेऊन मनपूत शुभेच्छां देतात.

# म. फुले-डॉ. आंबेडकर संयुक्त जयंती उत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी आ. केराम

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ३१ मार्च**

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी किनवट राष्ट्रपिता म. जोतीराव फुले आणि राष्ट्रनिर्माते डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव धडाक्यात साजरा करण्यात येणार असून या उत्सवाच्या स्वागताध्यक्षपदी किनवट-माहूर विधानसभा मतदारसंघाचे लोकप्रिय आमदार भीमराव केराम यांची निवड करण्यात आली आहे.

किनवट येथे दरवर्षी म. फुले आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची जयंतीनिमित्त भरगच्च कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. यंदाही महात्मा फुले यांच्या जयंतीदिनापासून म्हणजेच ११ एप्रिलपासून या महोत्सवाला प्रारंभ होणार आहे. ११ एप्रिल रोजी म. फुले यांच्या पुतळ्याजवळ सकाळी ९.३० वाजता ध्वजारोहण करून मानवंदना दिली जाईल. १४ एप्रिल रोजी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीदिनी जेतवन बुद्ध विहार येथे ध्वजारोहण आणि भोजनदान होईल. सायंकाळी ५ वाजता जेतवन बुद्ध विहारापासून म. फुले आणि डॉ. आंबेडकरांच्या तैलचित्रांची मिरवणूक निघेल. ही मिरवणूक किनवट शहरातील प्रमुख रस्त्यांनी जाऊन जेतवन बुद्ध विहार येथे विसर्जित होईल.



२७ एप्रिल रोजी सायंकाळी हुतात्मा गोंडराजे मैदान येथे जागर संविधानाचा भीम महोत्सव होईल. या महोत्सवात राजाभाऊ शिरसाट यांचा 'भीमा तुझ्या जन्मामुळे', प्रा. अविनाश नाईक प्रस्तुत 'गाथा महासूर्याची' आणि भीम शाहीर नागसेनदादा सावदेकर यांचा भीमगीतांचा कार्यक्रम होईल. नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते या महोत्सवाचे उद्घाटन होईल. बाळासाहेब ठाकरे हळद संशोधन व प्रशिक्षण केंद्राचे अध्यक्ष आ. हेमंत पाटील हे कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी राहतील. लाँग मार्चचे प्रणेते व पीपल्स रिपब्लिकन पार्टीचे राष्ट्रीय अध्यक्ष जोगेंद्र कवाडे, एकतावादी रिपब्लिकन पक्षाचे नेते भैय्यासाहेब इंदिसे, लघु उद्योग विकास महामंडळाचे उपाध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) जयदीप कवाडे, हदगावचे आमदार बाबुराव कोहळीकर, आदिलाबादचे खासदार नागेश गोडाम, पांढरकवडा-केळापूरचे आमदार राजू तोडसाम यांची यावेळी प्रमुख उपस्थिती राहील.

या महोत्सवात मराठवाडा गोदावरील पाटबंधारे विकास महामंडळाचे मुख्य प्रशासक संतोष तिरमनवार, सहायक समाज कल्याण आयुक्त शिवानंद मिनगिरे, दौंड नगरपालिकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विजय कावळे, मंत्रालयातील सार्वजनिक बांधकाम विभागाचे डेस्क ऑफिसर प्रशांत राठोड यांच्यासह आंबेडकरी चळवळीतील मान्यवरांचा सत्कार करण्यात येणार असल्याची माहिती म. फुले- डॉ. बाबासाहेब आंबेडकर संयुक्त जयंती उत्सव समितीचे अध्यक्ष विनोद भरणे यांनी दिली.

# महामार्गावरील स्वच्छतागृह व्यवस्थापनातुन महिलांना रोजगाराची संधी: सागरताई शिंदे

**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. ३१ मार्च**

राज्यातील प्रत्येक महामार्गावर २५ किलोमीटर अंतरावर सुसज्य स्वच्छतागृह व स्थानिक बचत गटांना उत्पादनांची विक्री व्यवस्था करण्याच्या महिला व बाल विकास मंत्रालयाच्या निर्णयाचे किनवट तालुक्यातील महिला बचत गटाकडून जोरदार स्वागत होत असून या निर्णयामुळे किनवट सारख्या मागास दुर्गम भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व होतकरू महिलांना रोजगाराची संधी उपलब्ध होणार आहे अशा प्रतिक्रिया भाजपा महिला मोर्चाच्या जिल्हा उपाध्यक्ष सौ सागरताई शिंदे यांनी दैनिक तरुण भारतशी बोलताना दिल्या आहेत.



चौथ्या महिला धोरणानुसार महिलांचे आरोग्य आणि स्वच्छता सुविधा उपलब्ध करून देण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास मंत्रालयाने एक महत्त्वकांक्षी निर्णय घेतला आहे. यानुसार महामार्गावर प्रत्येक २५ किमी अंतरावर सुसज्ज महिला स्वच्छतागृह उभारले जाणार असून या स्वच्छतागृहांचे देखभाल व व्यवस्थापनाचे काम स्थानिक महिला बचत गटामार्फत करण्यात येणार आहे. शिवाय महामार्गावर बचत गटांना उत्पादनांची विक्री व्यवस्था करण्याचे नियोजन करण्यात येणार असल्याची माहिती महिला व बाल विकासमंत्री अदिती तटकरे यांनी शुक्रवारी २८ मार्च रोजी दिली. महिला धोरणात महिलांच्या सुरक्षेला प्राधान्य देताना राज्यातील राज्य महामार्ग राष्ट्रीय महामार्ग समृद्धी महामार्गासह दृतगती महामार्गावर प्रत्येक २५ किलोमीटर अंतरावर महिलासाठी स्वतंत्र स्वच्छतागृह उभारण्याचे निश्चित करण्यात आले होते सार्वजनिक बांधकाम विभागाच्या समन्वयातून हा प्रकल्प राबविला जाणार असून या महिला स्वच्छतागृहाची देखभाल व व्यवस्थापन स्थानिक महिला बचत गटामार्फत केली जाणार आहे. महिला व बाल विकासमंत्री अदिती तटकरे यांनी घेतलेल्या या निर्णयाचे किनवट तालुक्यातील महिला बचत गटाकडून जोरदार स्वागत करण्यात आले आहे. या संदर्भात प्रतिक्रिया देताना भाजपा महिला आघाडीच्या नांदेड जिल्हाउपाध्यक्षा सौ सागरताई शिंदे म्हणाल्या महामार्गावरील महिला स्वच्छतागृह देखभाल व व्यवस्थापन तसेच महामार्गावरील उत्पादन विक्रीतुन किनवट सारख्या मागास दुर्गम भागातील आर्थिकदृष्ट्या दुर्बल व होतकरू महिलांच्या हाताला रोजगाराची नवी संधी उपलब्ध होऊन आर्थिक उन्नतीची संधी लाभणार आहे.

या निर्णयाबद्दल महिला व बाल विकासमंत्री यांचे आभार व्यक्त करत महिला सक्षमीकरणाच्यादृष्टीने राज्य सरकारचे हे महत्वाचे व महत्वकांक्षी पाऊल आहे असे सौ सागरताई शिंदे म्हणाल्या.

# डॉ. करकरे यांचा सेवागौरव सोहळा

**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि.३१ मार्च**

केआरएम महिला महाविद्यालय, नांदेड येथील अर्थशास्त्र विभागातील प्रो.डॉ. छाया प्रभाकर करकरे (बचाटे) या प्रदीर्घ सेवेनंतर नियत वयोमानानुसार प्राध्यापक पदावरून ३१ मार्च रोजी सेवानिवृत्त होत आहेत. त्या निमित्ताने त्यांचा सेवा गौरव समारंभ मंगळवार, दि. १ एप्रिल रोजी सायंकाळी ६ वाजता हॉटेल ग्रिनफिल्ड, श्रीराम मंदिराजवळ, कॅनल रोड, नांदेड येथे आयोजित करण्यात आला आहे.

या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी स्वारातीम विद्यापीठाचे प्र-कुलगुरू प्रो.डॉ. अशोक महाजन हे राहणार असून प्रमुख पाहुणे म्हणून सहसंचालक डॉ. किरणकुमार बोंदर उपस्थित राहणार आहेत. तसेच प्रमुख उपस्थितीमध्ये प्रो.डॉ. बाबुराव पावडे, डॉ. एल.एच. पाटील हे उपस्थित राहणार आहेत.

# खा. अशोक चव्हाणांची माणिक लोहगावे यांची सदिच्छा भेट



**तभा वृत्तसेवा**
**नायगांव, ३१मार्च**

खा. अशोकराव चव्हाण यांनी सगरोळीच्या दौऱ्या दरम्यान नरसी येथील माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भाजपाचे जिल्हा सरचिटणीस माणिकराव लोहगांवे यांच्या निवासस्थानी सदिच्छा भेट दिली.

यावेळी अशोकराव चव्हाण यांचा सत्कार लोहगांवे परिवारांच्या वतीने करण्यात आला. भाजपचे जिल्हा अध्यक्ष संतुकराव हंबर्डे, आमदार जितेश अंतापुरकर, किशोर स्वामी, बालाजी बच्चेवार, बालाजी मसलगेकर सह अनेक मान्यवर उपस्थित होते यावेळी मान्यवरांचा सत्कार करण्यात आला.

नरसी सेवा सहकारी सोसायटीवर दणदणीत विजय मिळविलेल्या संचालकांच्या वतीने व नरसी ग्रामपंचायत च्या वतीने त्यांचा गौरव करण्यात आला यावेळी सरपंच गजानन शिवाजीराव भिलवंडे,,मोहन पाटील भिलवंडे, प्रकाश पाटील भिलवंडे यांनी गावातील विविध विकास कामाबद्दल निवेदन देऊन विकास कामे पूर्ण करण्याची विनंती केली.

यावेळीबापूरावकोरेआनंदराव लोहगावे, जीवन पाटील साखरे, व्यंकटेश कुलकर्णी, श्यामसुंदर कोकणे , परमेश्वर लोहगावे, बालाजी दरेगांवे,गोपाळराव कुलकर्णी, बालासाहेब ,ताटे, अशोक साखरे, पांडुरंग बागडे,चांदु सूर्यवंशी ,गणेश भिलवंडे , विश्वंभर लोहगांवे, सचिन कोकणे ,श्याम जानोरे, जब्बार शेख, राजू पाटील साखरे ,रंगनाथ कुलकर्णी सह नागरिक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# अन्यायग्रस्त विद्यार्थ्यांना त्वरित न्याय द्या : राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. ३१ मार्च**

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाने एम.ए. सोशॉलॉजी (प्रथम सत्र) परीक्षेच्या निकालात मोठी चूक करत असंख्य विद्यार्थ्यांना अनुपस्थित दर्शवले आहे. हे विद्यार्थी प्रत्यक्ष परीक्षेला हजर होते, तरीही चुकीच्या निकालामुळे त्यांचे पुढील शिक्षण धोक्यात आले आहे. आणि परीक्षा आवेदन पत्र भरण्यासाठी फक्त दोन दिवस सुटले आहेत. त्यामुळे त्यांना परीक्षेचे आवेदन पत्र भरण्यासाठी पण सूट द्यावी. या चुकीच्या विरोधात राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दीकी यांनी विद्यापीठ प्रशासनाला तातडीने सुधारित निकाल जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच, निकाल त्वरित दुरुस्त न झाल्यास तीव्र आंदोलन छेडण्याचा इशारा दिला आहे. यावेळी निवेदन देताना राष्ट्रवादी विद्यार्थी काँग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हाध्यक्ष फैसल सिद्दिकी, अमितसिंघ सुखमणी, रोहित पवार, मोहसीन खान, लकीसिंघ जागीरदार, अभिषेक शिंदे इत्यादी पदाधिकारी उपस्थित होते.


## मुदखेड नगर परिषद मुदखेड जि. नांदेड

### ई-निविदा सुचना (क्रं. ०२/२०२५)

**जा.क्र. मुनपा/ताशा/विकास/२०२४-२५/४०५** **दिनांक २८ /०३/२०२५**

### पाणीपुरवठा व स्वच्छता विभाग

याव्दारे सर्व कंत्राटदारास सुचित करण्यात येते की, मुदखेड नगरपरिषद मुदखेड घनकचरा प्रकल्प येथे SBM २.० अंतर्गत स्थापत्य विषयक विकास कामे करण्याकरीता ऑनलाईन ई निविदा मागविण्यात येत आहेत. अटी शर्ती सह सविस्तर ई-निविदा प्रपत्र महाराष्ट्र शासनाच्या www.mahaetenders.gov.in या संकेतस्थळावर दि. ०१/०४/२०२५ दुपारी १०.३० वाजता ते दिनांक २१/०४/२०२५ रोजी सायंकाळी १७.०० वाजेपर्यंत उपलब्ध आहे. ऑनलाईन निविदा वरील संकेतस्थळावर दिनांक २१/०४/२०२५ रोजी १७.०० वाजेपर्यंत स्विकारण्यात येतील.

**(शैलेश फडसे)**
**मुख्याधिकारी व प्रशासक**
**न.प. मुदखेड जि.नांदेड**

लातूर
# दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## लातुरात उभारली गेली स्वच्छतेची गुढी

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** सुर्याच्या पहिल्या किरणासोबत स्वच्छतेचा संदेश देत भारतीय संस्कृती जोपासण्याचे आवाहन करीत प्रथम मानाचा सार्वजनिक गुढी महोत्सवातर्फे लातुरात स्वच्छतेची गुढी उभारण्यात आली. यावेळी वारकरी आणि महिला भजनी मंडळींनी टाळ-मृदंगाच्या तालात प्रभातफेरी काढण्यात आली.

प्रथम मानाची सार्वजनिक गुढी महोत्सव समितीचे संस्थापक अध्यक्ष पंकज जैस्वाल, सचिव नितीन पडिले, यंदाचे स्वागताध्यक्ष रामभाऊ जवळगे, नारायण भूतडा, रोहिदास सोनकांबळे, दिलीप गायकवाड, रामेश्वर भराडीया, काकासाहेब घुटे यांच्या हस्ते सार्वजनिक गुढीचे पूजन करण्यात आले.

यावेळी तपस्वीबाबा हनुमान चौक प्रभात फेरीचे ओमप्रकाश निर्मळ, नंदुसेठ करवा, रामभाऊ बोराडे पाटील, दत्तात्रय कोटलवार, अनिल डोळे, शामराव सोनवळकर,माणिकलाल परदेशी, भास्कर मोहरीर (पूजारी), धनंजय चिद्रेवार, दगडूअप्पा कोरे, बंडू येलगटे, विजयकुमार उबाळे, रामभाऊ सोनवळकर, रोहिदास सोनकांबळे, दिलीप गायकवाड, नामदेव कांबळे, रामभाऊ पाटील, आनंद झुंजारे, माणीक परदेशी, प्रभाकर जोशी (पूजारी), भास्कर जोशी (पूजारी) आदिंची उपस्थिती होती.

तसेच यावेळेस सौ. सरीता सोनवळकर, कांताभाभी धूत, अलकाताई शेटे, कीर्ति देशपांडे, सुमनताई जाधव, सुरेखा मानकोसकर, कुमूद मानकोसकर, उषा झुंजे , शारदा जोगदंड, सरला कारवा, मंजू राठी, उषा भूतडा, वर्षा वैजवाडे आदिंनी टाळ मृदंगाच्या तालात प्रभात फेरीमध्ये सहभाग नोंदविला.



https://dainiktarunbharat.com, https://epaper.dainiktarunbharat.com
सोलापूर तरुण भारत

### संक्षिप्त वृत्त...

## महात्मा बसवेश्वरच्यावतीने पशु चिकित्सा व औषधोपचार शिबीर

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** महात्मा बसवेश्वर महाविद्यालय, राष्ट्रीय सेवा योजना, लातूर आणि आम्ही सेवक, हैप्पी व्हिलेज, हासेगाव ता.औसा जि.लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने हॅप्पी व्हिलेज, हासेगाव येथे युथ फॉर माय भारत व युथ फॉर डिजिटल लिटरसी विशेष युवक वार्षिक शिबिरात मौजे हिप्परसोगा येथे दुग्धशास्त्र विभाग, प्राणीशास्त्र विभाग व हिप्परसोगा ग्रामपंचायत यांच्या संयुक्त विद्यमाने पशुचिकित्सा व औषधोपचार शिबीर नुकतेच संपन्न झाले.

या शिबिराला प्राचार्य डॉ.संजय गवई, मुख्य समन्वयक डॉ.नल्ला भास्कर रेड्डी आणि आम्ही सेवकचे संस्थापक प्रा.रवी बापटले यांचे मार्गदर्शन लाभले. यामध्ये गर्भ तपासणी १५, वंधत्व तपासणी १९, उपचार २२, जंतनाशके १५४ देण्यात आले. यावेळी पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.डी.एस.हराळकर, डॉ.डी.जी.लंगर, डॉ.एस.एल. वाघमारे, डॉ. एम.आर.देवकाते आदि तज्ज्ञ डॉक्टरांनी पशु तपासणी व औषधोपचार केले.या शिबिराच्या यशस्वीतेकरिता दुग्धशास्त्र विभागप्रमुख डॉ.गुणवंत बिराजदार, प्राणीशास्त्र विभाग प्रमुख डॉ. विनायक वाघमारे, रासेयो कार्यक्रमाधिकारी डॉ.रत्नाकर बेडगे, प्रो. डॉ.शिवप्रसाद डोंगरे, डॉ.मनोहर चपळे, प्रा.किसनाथ कुडके, डॉ.टि. घन:श्याम, शिबिरार्थी विद्यार्थी आणि ग्रामस्थांनी मौलिक सहकार्य केले.

## उच्च शिक्षण संचालक डॉ. देवळाणकर यांचा सत्कार

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** पुणे येथील महाराष्ट्र राज्य उच्च शिक्षण संचालनालयाचे संचालक डॉ.



शैलेंद्र देवळाणकर यांचा लातूरच्या राजमाता जिजामाता शैक्षणिक संकुलातर्फे पुष्पगुच्छ व शाल देऊन संस्थेचे सचिव प्राचार्य डी. एन. केंद्रे यांनी सत्कार केला.

यावेळी राजमाता जिजामा ता शैक्षणिक संकुलाच्या अध्यक्षा के. ए. जायभाये, संस्थेच्या सहसचिव तथा तुळजाभवानी प्राथमिक विद्यामंदिरच्या मुख्याध्यापिका स्वाती केंद्रे, तुळजाभवानी माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचे प्राचार्य जी. आर. मुंडे उपस्थित होते.

## डॉ. राम बोरगावकर पुरस्काराने सन्मानित

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** येथील सरस्वती संगीत कला महाविद्यालयाचे संस्थापक अध्यक्ष तालमणी डॉ. राम बोरगावकर यांना रोटरी क्लब ऑफ लातूर, श्रेयसच्या वतीने दिला जाणा-या व्यावसायिक गुणवत्ता पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

डॉ. राम बोरगावकर यांनी आजतगायत दिलेल्या शैक्षणिक, संगीत, सांस्कृतिक आणि सामाजिक क्षेत्रातील मौलिक योगदानाबद्दल रोटरी परिवार, श्रेयस, लातूरच्या वतीने रोटरी चे गव्हर्नर डॉ. हरिप्रसाद सोमाणी यांच्या हस्ते 'व्यावसायिक गुणवत्ता पुरस्कार २०२५' पुरस्काराने डॉ. रह्याम बोरगावकर यांना सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी मंचावर रोटरी क्लब,लातूर श्रेयस चे गव्हर्नर डॉ. हरिप्रसाद सोमाणी, संजीवनी कडतने, सचिव शालिनी पाटील, डॉ. मायाताई कुलकर्णी, सुमन सोमाणी, अंबादास सोमवंशी, सुनीता बोरगावकर, प्रा. वैशाली बोरगावकर हे उपस्थित होते. त्यांना मिळालेल्या या पुरस्काराबद्दल तुकाराम पाटील, प्रा. शिवराज मोटेगावकर, प्राचार्य बाबुराव जाधव, प्राचार्य डॉ. हरिदास फेरे, प्राचार्य डॉ. सुदाम पवार आदिंनी अभिनंदन केले आहे.

## लातूर विभागाला मिळाल्या ५ नव्या बसेस

### भाजप नेत्या डॉ. चाकूरकर यांच्या प्रयत्नाला यश

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या लातूर विभागात अत्याधुनिक पाच नव्या एसटी बस सेवेचा लोकार्पण कार्यक्रम आज लातूर बस स्थानकात भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते थाटात पार पडला.

या कार्यक्रमाला शिवसेनेचे जिल्हा संपर्क प्रमुख अँड .बळवंतराव जाधव, भाजपाचे दिग्विजय काथवटे, प्रवीण सावंत, शिरीष कुलकर्णी संगीत रंदाळे, ओम धरणे ,गणेश गवारे, आबासाहेब चौगुले, मीनाताई गायकवाड, हेमाताई येळे ,संगमेश्वर स्वामी, दिलीप जाधव, विभागीय वाहतूक अधिकारी संदीप पडवळ, विभागीय उपयंत्र अभियंता संदीप मडावी, विभागीय सुरक्षा व दक्षता अधिकारी रंजीत यादव, विभागीय लेखा अधिकारी अमित गंडाळे, विभागीय सांख्यिकी अधिकारी अतुल वळसंकर, आगार व्यवस्थापक बाळासाहेब राठोड, स्थानक प्रमुख संतोष बिरादार, सहाय्यक वाहतूक निरीक्षक व्यंकटराव बिरादार आदींची प्रमुख उपस्थिती होती.

मागील वीस दिवसापूर्वी म्हणजे ७ मार्च रोजी राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची भाजपा नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी मुंबई येथे भेट घेऊन लातूरच्या राज्य परिवहन विभागातील विविध समस्यांवर चर्चा केली होती.

लातूर विभागास ७५ नवीन बसेसची उपलब्धता करून देण्याची मागणी केली होती. मंत्री महोदयांनी तात्काळ १०बसेस प्राथमिक स्तरावर उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेतला त्यानुसार लातूर विभागास त्यातील पाच बसेस उपलब्ध झालेल्या आहेत. त्याचा लोकार्पण सोहळा आज मान्यवरांच्या उपस्थितीत पार पडला.

राज्य परिवहन महामंडळाच्या लातूर विभागास ७५ नवीन बसेस मिळाव्यात, लातूर विभागातील ५९वाहनांचे आयुर्मान पूर्ण झाल्यामुळे ते मोडीत निघणार आहेत, वाहतुकीचे नियोजन करणे करिता मोडीत निघणारी ५९ तसेच



स्थगित नियते चालू करण्यासाठी १६ अशी एकूण ७५नवीन वाहनांची आवश्यकता लातूर विभागाला असून, नागरिकांची गरज लक्षात घेता ७५नवीन एसटी बसेस उपलब्ध करून देण्याची मागणी डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांनी राज्य परिवहन मंडळाचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे एका लेखी निवेदनाद्वारे केली होती . डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या या प्रयत्नाबद्दल त्यांना लातूरकर धन्यवाद देत आहेत. प्रवासी वर्गामध्ये आनंदाचे वातावरण पसरलेले आहे.

## कचरा जाळल्याने महावितरणचे रोहित्र जळून खाक

### वीजयंत्रणेजवळ कचरा न जाळण्याचे महवितरणचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** महावितरण प्रशासनाने वारंवार सूचना देवूनही वीजयंत्रणेजवळ कचरा टाकण्याचे व तो जाळण्याचे प्रमाण वाढत चालले आहे. गेल्या दहा दिवसात रोहित्रा जवळ कचरा जाळल्याने रोहित्र जळून वीजपुरवठा खंडीत होण्याबरोबरच लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.

शहरातील अनेक भागात नागरिक रस्त्यावर कचरा टाकत आहेत. मोकळ्या जागी, मुख्य रस्त्याच्या कडेला तसेच वीजपुरवठा करणाऱ्या रोहित्रांच्या जवळील कचरा जाळण्याचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे रोहित्राला आग लागण्याच्या घटना घडत आहेत. मागील आठवडयात सावेवाडी येथील रोहित्रास कचरा जाळल्यामुळे आग लागल्याने वीजपुरवठा खंडीत होण्याबरोबर लाखो रूपयांचे नुकसान झाले आहे.

> वारंवार आवाहन करूनही नागरिक रोहित्रा जवळ कचरा टाकून जाळण्याचे प्रकार दिसून येतात. यामुळे वीजयंत्रणेला मोठा फटका बसतो. पर्यायाने वीजग्राहकांनाही याची झळ सहन करावी लागते. रोहीत्रे उन्हाच्या तिव्रतेने गरम झालेले असतात. अशावेळी रोहीत्राजवळ कचरा जाळल्यास त्याची धग रोहीत्रास बसून रोहीत्राचे तापमान वाढल्याने प्रसंगी रोहीत्रास आग लागून रोहीत्र जळून जाते. परिणामी वीजपुरवठा खंडीत होतो. त्याचबरोबर रोहीत्राचा स्फोट झाल्यास गंभीर अपघातही होण्याची शक्यता असते.त्यामुळे वीजग्राहकांनी सजग राहून रोहीत्राजवळ कचरा टाकू नये अथवा कचरा टाकून जाळणाऱ्यास मज्जाव करावा.
> **– ज्योती कुमठेकर, उपकार्यकारी अभियंता, महावितरण.**

नागरिकांनी आग लागल्यास लगेचच महावितरणच्या कार्यालयाला संपर्क साधण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

नागरिकांनी उघड्यावर असलेल्या वीज यंत्रणेला धोका निर्माण होईल अशा ठिकाणी कचरा टाकू नये किंवा साठवलेला कचरा जाळू नये. अशा घटनांतून वीज यंत्रणेला आग लागल्यास अग्निशमन दला सोबतच महावितरणच्या १९१२ किंवा १९१२०, १८००-२१२-३४३५ आणि १८००-२३३-३४३५ या टोल फ्री क्रमांकांवर किंवा नजीकच्या महावितरण कार्यालयाला त्याची सूचना देण्याचे आवाहन महावितरणने केले आहे.

## असेल देशी पशुधन तर होईल समृद्ध ग्रामजीवन : डॉ.बाबासाहेब ठोंबरे

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** शेतीचा कणा म्हणजे सुपीक जमीन आणि त्यासाठी हवे विपुल पशुधन. पशुधनाचे शेतीमध्ये काय महत्व आहे, पशुंना होणारे आजार व त्यावरील उपचार तसेच त्यांपासून मिळणाऱ्या दुध व दुग्धजन्य पदार्थांमुळे शेतकरी अधिकाधिक उत्पन्न मिळवून सुखी, संपन्न कसा होवू शकतो या विविध विषयांवर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्याकरिता कृषि महाविद्यालय, लातूर व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालय, लातूर यांच्या संयुक्त विद्यमाने मौजे दर्जी बोरगाव येथे राष्ट्रीय सेवा योजनेच्या निवासी विशेष शिबिर आयोजित करण्यात आले.

या अंतर्गत पशुरोग निदान व उपचार शिबीर घेण्यात आले. या वेळी अध्यक्ष म्हणून श्री.संजय माने प्रमुख मार्गदर्शक म्हणून कृषि महाविद्यालय व विलासराव देशमुख कृषि जैवतंत्रज्ञान महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ.बाबासाहेब ठोंबरे, प्रक्षेत्र अधिकारी श्री.कुणाल घुंगार्डे, सुधाकर साळवे प्रमुख अतिथी म्हणून बाभळगाव येथील देवणी पशुपालक श्री.बच्चेसाहेब देशमुख, डॉ. ओमप्रकाश पोपले, डॉ. विजय गिरी, यांची प्रमुख उपस्थिती होती. प्रतिमापूजन आणि स्वागतगीत झाल्यानंतर कार्यक्रमास सुरुवात झाली.

या वेळी प्रमुख मार्गदर्शक डॉ.बाबासाहेब ठोंबरे म्हणाले की, शेतकरी पशूंची पोटच्या लेकराप्रमाणे काळजी घेतात. आज पशूंची संख्या कमी होत आहे. रासायनिक शेतीमुळे अनेक पर्यावरणीय समस्या निर्माण होत आहेत. ते टाळण्यासाठी जनावरांचे शेण, गोमुत्र यांचा अधिकाधिक वापर शेतीत जर केला तर शेती समृद्ध होवू शकते हे त्यांनी असेल देशी पशुधन तर होईल समृद्ध ग्रामजीवन या शब्दात सांगितले.श्री. सुधाकर साळवे यांनी दूध उत्पादनात भारत क्रमांक एक वर असून गुणवत्तापूर्ण दूधउत्पादन वाढविण्याची आवश्यकता सांगितली.

अध्यक्षीय समारोपात श्री.संजय माने यांनी राष्ट्रीय सेवा योजनेच्या कार्याची प्रशंसा करून विद्यार्थ्यांना पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

## तिरंगा 'निर्भया' गुढी उभारत दिला एकतेचा संदेश

### सार्वजनिक गुढी महोत्सव समितीचा उपक्रम

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** सार्वजनिक गुढी महोत्सव समितीच्यावतीने मराठवाड्यातील मानाची गुढी असलेल्या गंजगोलाई येथील जगदंबादेवी मंदिरासमोर यावर्षी तिरंगा 'निर्भया' गुढी उभारण्यात आली. यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या 'माझं लातूर' परिवाराचा मान्यवरांच्या हस्ते सन्मान करण्यात आला.

हिंदू नववर्षाची सुरूवात गुढीपाडव्यापासून होते. पंचांगानुसार चैत्र शुध्द प्रतिपदेला म्हणजेच



वसंत ऋतूच्या पहिल्या दिवसाला गुढीपाडवा साजरा केला जातो. जिल्हाभरात पारंपरिक पध्दतीने गुढी उभारून सरत्या वर्षाला निरोप देऊन उगवत्या वर्षाचे जल्लोषात स्वागत करण्यात आले.

गुढीपाडवानिमित्त सार्वजनिक गुढी महोत्सव समितीच्यावतीने प्रतिवर्षी गंजगोलाई येथे गुढी उभारण्यात येते. याही वर्षी पाडवा आणि रमजान ईदचे औचित्य साधत समितीने एकतेची तिरंगा 'निर्भया' गुढी उभारत 'निर्भय व्हा, ११२ वर कॉल करा' हा सामाजिक संदेश दिला. यावेळी भाजप नेत्या डॉ. अर्चनाताई पाटील चाकूरकर यांच्या हस्ते गुढी उभारण्यात आली.

यावेळी माजी उपमहापौर चंद्रकांत बिराजदार, नरसिंह घोणे, दीपक गंगणे यांच्यासह सार्वजनिक गुढी महोत्सव समितीचे सर्व पदाधिकारी उपस्थित होते. यावेळी सामाजिक क्षेत्रात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल 'माझं लातूर' परिवाराचा सन्मान करण्यात आला.

## दिन दुबळ्यांचे दु:ख जाणण्यातच देवपण



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** समाजातील दिन दुबळ्याचे दु:ख जाणून त्यांना आधार देण्यासाठी परिश्रम घेणाऱ्या व्यक्तीच देव मानाव्यात नव्हे नव्हे तर त्यांच्यातच खरे देवपण असते, व्यक्ती परत्वे अनेकांच्या अनेक प्रकारच्या पिडा, कष्ट याने व्यथित झालेल्यांना तारण्याचा प्रयत्न जे करतात त्यांच्यातच देव, संत अथवा सज्जन जाणावे असे मत शिभप रामलिंगप्पा बुलबुले महाराज यांनी व्यक्त केला.

बुलबुले महाराज हे लातूर तालुक्यातील हरंगुळ बु परिसरातील कैलास नगर येथील महादेव मंदिरात सुरू असलेल्या अखंड शिवनाम सप्ताहातील तिसऱ्या प्रहराच्या कार्यक्रमातील किर्तन सोहळ्याचे आज पाचवे पुष्प अर्पण करताना ते बोलत होते.

यावेळी शिभप बुलबुले यांनी देवाचे अस्तित्व कशा कशात आहे हे पटवून देताना सांगितले की, केवळ मंदिरातच देव शोधून त्याची नाना प्रकारच्या पुजा साहित्याने अर्चना करुन ईश्वर प्राप्तीच्या पराकाष्ठा करत बसलो आणि दिन दुबळ्यांना हिन लेखून त्यांच्याकडे दुर्लक्ष केले तर ईश्वर प्राप्ती होत नाही. तर ईश्वर हा इतरांचे दु:ख जाणून त्याला सहकार्य करण्यात आहे असेही त्यांनी सांगितले. तसेच प्रत्येकाला आपल्या ऐहिक आणि अध्यात्मिक जीवनात समाधान मिळवण्यासाठी गुरुंचे महत्त्व पटवून दिले.

यावेळी त्यांनी भावनिक, तात्विक आणि वैचारिक दृष्टांत देऊन समाज प्रबोधनात्मक विमोचन करत त्यांनी रसिकांना मंत्रमुग्ध करून टाकले. या किर्तन सोहळ्याच्या पाचव्या पर्वात गायनासाठी हभप भरत महाराज खरपले, शिभप जयश्रीताई रामलिंगप्पा बुलबुले, हार्मोनियमवर हभप गौरीताई खरपले, हभप पांडुरंग येमे, हभप ज्योतीराव पांचाळ, हभप महेश महाराज पांचाळ, शिभप गौरव महाराज बुलबुले यांनी साथ संगत दिली तर मृदंगाचार्य वैभव महाराज माळी, अक्षय महाराज पांचाळ, आण्णा किसवे, पिता रावळे, अनिता मिटकरी, श्रीमती ढोबळे, श्रीमती अरुणा रावणकोळे यांनी सहकार्य केले.

## दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते श्री मांजरेश्वर हनुमानाची आरती



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** शनी अमावस्यानिमित्त शनिवारी माजी मंत्री दिलीपराव देशमुख यांच्या हस्ते चिंचोलीरावावाडी येथील विलासनगर येथील श्री मांजरेश्वर हनुमान मंदिरात सायंकाळी आरती करण्यात आली. यानंतर विठ्ठल-रुक्माई, श्री गुरुदत्त, श्री नरसिंह, मंदिरात दर्शन घेत मनोभावे पूजा करण्यात आली.

यावेळी जागृती शुगरचे उपाध्यक्ष लक्ष्मणराव मोरे, माजी जिल्हा परिषद अध्यक्ष संतोष देशमुख, श्री मांजरेश्वर ट्रस्टचे विश्वस्त सुहास काळे, बळवंत काळे, सूर्यकांत सुडे, गुरुनाथ गवळी, विकास देशमुख, सचिन दाताळ, हरिराम कुलकर्णी, शशिकांत कदम, विनायक चव्हाण, श्रीकृष्ण काळे, हणमंत कुलकर्णी, अर्थव कुलकर्णी, सुधाकर नागमोडे, गोविंद बाचपल्ले, आर. के. शिंदे तसेच भाविक - भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी उपस्थित मान्यवरांचा ट्रस्टच्यावतीने शाल, श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले.

## मुलाकडून दोन गावठी कट्टे, दोन काडतूस जप्त

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. ३१ मार्च -** स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्त्वात पथकाने शनिवारी सायंकाळी शहरातील गांधी मार्केट परिसरातून एका १७ वर्षीय अल्पवयीन मुलास ताब्यात घेऊन त्याच्याकडून दोन गावठी कट्टे व दोन जिवंत काडतूस जप्त करण्यात आले.

आगामी सण आणि उत्सवाच्या अनुषंगाने अवैध शस्त्र बाळगणाऱ्या इसमावर कारवाई करण्याबाबत पोलीस अधीक्षक सोमय मुंडे, अपर पोलीस अधीक्षक डॉ. अजय देवरे यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक संजीवन मिरकले यांच्या नेतृत्वात स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाकडून कार्यवाही करण्यात येत आहे. दोघांकडे गावठी कट्टा असल्याची माहिती पथकाला मिळाली. शनिवारी सायंकाळी १७ वर्षीय विधी संघर्ष बालकाला (रा. मांजरी, ता. लातूर, ह.मु. गोकुळनगर पठार, वारजे माळवाडी, पुणे) शहरातील




गांधी मार्केट परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्याची झडती घेतली असता त्याच्याकडे दोन गावठी कट्टे आणि दोन जिवंत काडतूस आढळून आले. त्याची चौकशी केली असता त्याचा मित्र व्यंकटेश ऊर्फ विकी शिवशंकर अनपुरे (रा. सहयोगनगर, दत्त मंदिराजवळ, गोकुळ पठार, वारजे माळवाडी, पुणे) याने व मी हे गावठी कट्टे व जिवंत काडतूस घेतले असल्याची कबुली त्याने दिली. या अल्पवयीन मुलाकडून दोन गावठी कट्टे व दोन जिवंत काढतूस जप्त करण्यात आले.

पोलीस व्यंकटेश अनपुरे याचा शोध घेत आहेत. याप्रकरणी गांधी चौक पोलीस ठाण्यात गुन्हा नोंद झाला आहे.

वरिष्ठांच्या मार्गदर्शनात स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक मिरकले यांच्या नेतृत्वात पोलीस उपनिरीक्षक राजेश घाडगे, पोलीस अंमलदार माधव बिलपटे, तुराब पठाण, नवनाथ हासबे, पाराजी पुट्ठेवाड, युवराज गिरी, राजेश कचे, प्रदीप स्वामी, मोहन सुरवसे, नकुल पाटील यांनी ही सेवा बजावली.

CMYK

लातूर
# जिल्हा

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड,
तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## शिव सप्ताहनिमित्त प्रताप कोयले यांना सन्मानचिन्ह

**तभा वृत्तसेवा**
**देवणी, दि.३१ मार्च -**

तालुक्यातील बोरोळ येथे छत्रपती शिवाजी महाराज यांच्या ३५० व्या राज्याभिषेक वर्षा निमित्त चालू असलेला शिव सप्ताहा निमित्त प्रसिद्धी माध्यम म्हणून पत्रकार प्रताप कोयले यांना व्याख्यानकार प्रा शिवाजीराव देवनाळे, जिजाऊ ब्रिगेडच्या लातुर जिल्हाध्याक्षा अनिता जाधव यांच्या हस्ते सन्मान चिन्ह देऊन गौरवण्यात आले.



यावेळी केंद्र प्रमुख राजकुमार मुळखेडे सर, इंजिनिअर राजकुमार कोयले, रामचंद्र गरड, भरत कोयले, तानाजी बालुरे, संजय कोयले, सत्यदेव गरड, दत्ता हुरुनाळे सह आदिंची उपस्थिती होती.

शिव सप्ताहानिमित्त दि.२८ मार्च ते दि.३ एप्रिल दरम्यान संध्याकाळी ६ ते ९ या वेळेत शिवचरित्रांची व्याख्यानमाला आणि सकाळी ८ ते १० या वेळेत ग्राम गीतावाचन करण्यात येत आहे. सदरील कार्यक्रमाचे आयोजन श्री संत लक्ष्मणनाथ भीमनाथ महाराज मठ देवस्थान येथे जिल्हा परिषद प्रशाला बोरोळ आणि कै यशवंतराव चव्हाण मा. व उच्च माध्यमिक विद्यालय बोरोळ यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आले आहे.

## ▶▶ संक्षिप्त वृत्त...



### वैद्यकीय शिक्षण उत्तीर्ण स्वप्निल व्यंजनेचा सत्कार

**शिरूर अनंतपाळ, दि.३१ मार्च -**

शहरातील शेतकरी कुटुंबातील, घरात कसलेही शैक्षणिक वातावरण नसताना लहानपणापासून शिक्षण घेण्याची जिद्द असलेल्या स्वप्निल चे यश हे कौतुकास्पद व प्रेरणा देणारे आहे. स्वप्निल हा लहानपणापासून शिक्षणात हुशार असा विद्यार्थी त्यांचे प्राथमिक शिक्षण पहिले ते चौथीपर्यंत भोजराज नगर जिल्हा परिषद शाळा, पाचवी ते दहावी चे शिक्षण हे अनंतपाळ नुतन विद्यालय शिरूर अनंतपाळ येथे तर अकरावी, बारावीचे शिक्षण हे परीमल महाविद्यालयात पुर्ण करुन वैद्यकीय शिक्षण हे मुंबई येथील प्रसिद्ध लोकमान्य टिळक वैद्यकीय महाविद्यालयातून, मुंबई येथून वैद्यकीय शिक्षण (MBBS) अंतीम वर्षाचे प्रथम श्रेणीमध्ये उत्तीर्ण झाल्याबद्दल स्वप्निल व्यंजने यांचा राष्ट्रवादीचे प्रदेश सचिव महादेव आवाळे व महादेव पारशेटे यांच्या हस्ते करण्यात आला या वेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे जिल्हा सरचिटणीस प्रमोद धुमाळे, शहराध्यक्ष व्यंकट हांद्राळे, गोरख लोहार, प्रा. हनुमंत पटणे, अमर आवाळे, विश्वनाथ हांद्राळे, अब्दुल बारगीर, चंद्रकांत धुमाळे तसेच संजय व्यंजने, शोभा व्यंजने, अमर तसेच मित्र परिवार उपस्थित होता.



### संगायो कमिटीचे नुतन अध्यक्ष ॲड. गणेश सलगरे यांचा सत्कार

**शिरूर अनंतपाळ, दि.३१ मार्च -**

शिरूर अनंतपाळ तालुका संजय गांधी निराधार कमिटीच्या अध्यक्षपदी किसान गणेश मंडळाचे सदस्य तथा युवा कार्यकर्ते ॲड. गणेश सलगरे यांची नुकतीच निवड झाल्याबद्दल किसान गणेश मंडळाचे अध्यक्ष तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाचे प्रदेश सचिव महादेव आवाळे व काँग्रेस पक्षाचे शहराध्यक्ष अशोक कोरे यांच्या हस्ते किसान गणेश मंदिर येथे सत्कार कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यावेळी किसान गणेश मंडळाचे मार्गदर्शक शिवलिंग शिवणे, अकबर तांबोळी, सोमेश्वर तोंडारे, अमर आवाळे, महादेव संभाळे, सुरेश हांद्राळे, पप्पू धुमाळे, रुषिकेश आवाळे, गणी तांबोळी, शुभम डिगोळे, अस्लम तांबोळी, सौरभ शिवणे, गुरूनाथ सुगावे उपस्थित होते.




### शिवनेरीत छत्रपती संभाजी महाराजांना अभिवादन

**शिरूर अनंतपाळ, दि.३१ मार्च -**

येथील शिवनेरी महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना विभागाच्या वतीने रयतेचे दुसरे राजे धर्मरक्षक छत्रपती संभाजी महाराज यांच्या पुण्यतिथी निमित विशेष कार्यक्रमाचे आयोजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी महाविघालयाचे प्राचार्य डॉ. अरुण धालगडे व कार्यक्रम अधिकारी डॉ. पांडूरंग मुठ्ठे यांच्या हस्ते छत्रपती संभाजी महाराज यांच्या प्रतिमेचे पुजन करून पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. यावेळी इतिहास विभाग प्रमुख डॉ. नारायण सुर्यवंशी यांनी छत्रपती संभाजी महाराज यांच्या कार्यावर प्रकाश टाकला. यावेळी ते म्हणाले कि धर्म रक्षण व देश रक्षणासाठी त्यांनी आपले बलिदान दिले पण स्वाभीमान घाण ठेवला नाही, असे राजे पुन्हा होणे नाही असे डॉ. सुर्यवंशी म्हणाले. यावेळी कार्यक्रम अधिकारी डॉ. अमोल इंगळे सह प्राध्यापक तसेच विद्यार्थी शिक्षकोत्तर कर्मचारी उपस्थीत होते.

### शिवगंगाबाई पाटील यांचे निधन

**शिरूर अनंतपाळ, दि.३१ मार्च -**



दैठणा (ता. शिरूर अनंतपाळ) येथील शिवगंगाबाई बळीराम पाटील यांचे रात्री अकरा वाजता अल्पशा आजाराने वयाच्या ७० व्या वर्षी निधन झाले. यांच्यावरती अंत्यसंस्कार दि.३१ मार्च रोजी करण्यात आले. त्यांच्या पश्चात बळीराम नरसिंगराव पाटील, दोन मुले, तीन मुली, सुना. नातवंडे असा कौटुंबिक दृष्ट्या सधनपरिवार आहे.

### इदं न मम् माहितीपटाचा लोकार्पण

**नळदुर्ग, दि.३१ मार्च -**

समाजातील भटक्या विमुक्तांना न्याय मिळवून देण्यासाठी ज्यांनी आयुष्यातील २० वर्षे संघर्ष केला, प्रसंगी पोलिसांसोबत ज्यांना झुंज द्यावी लागली, अशा एका सामाजिक कार्यकर्त्याची नियुक्ती 'राज्य पोलिस तक्रार प्राधिकरणा'च्या न्यायिक सदस्यपदी होते.

# महाराजाचा तीन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार

### आरोपी अद्यापही मोकाटच...

**तभा वृत्तसेवा**
**वलांडी, दि.३१ मार्च -**

देवणी तालुक्यातील बोंबळी (बु.) येथे तीन अल्पवयीन मुलींवर लैंगिक अत्याचार केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. शीत पेयाचे आमिष दाखवून एका मंदिराचा पुजारी असलेल्या एका नराधमाने हे दुष्कर्म केले आहे. याप्रकरणी देवणी पोलीस ठाण्यात एकाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात



आला असून आरोपी अद्यापही फरारच आहे.

पिडित मुलींच्या नातेवाईकाने दिलेल्या फिर्यादीवरून आरोपी अनिल वेंकट लांडगे महाराज (वय ५७ रा. बोंबळी बु, ता. देवणी) याने दि.२२ मार्च रोजी दुपारी बारा ते एक वाजण्याच्या सुमारास फिर्यादीच्या मुलीसह इतर दोन मुलींना आपल्या दुचाकीवर बसवून शेतात नेले. त्यांना थंड पेय पाजून मोबाईलवरील अश्लील व्हिडिओ दाखवत त्यांच्यासोबत लैंगिक अत्याचार केला. याबाबत घरच्यांना काही सांगितले. तर जीवे मारण्याचीही धमकी देखील आरोपीने मुलींना दिली. मात्र, मुलींनी झालेली घटना रात्री आपल्या नातेवाईकांना सांगितली. या बाबत देवणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदविण्यात आला आहे. तक्रारीनंतर दि.२७ मार्च रोजी गुन्हा दाखल करण्यात आला.

या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक प्रदीप गोंड करत असून प्रभारी अधिकारी म्हणून सपोनि. डोके यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली.

### आरोपी अद्याप ही फरार...

आरोपी अनिल लांडगेची सबंध पंचक्रोशीत महाराज म्हणून ओळख आहे. शिवाय तो एका मंदिराचा पुजारीही असून त्याला महाराज याच नावाने संबोधले जाते. मात्र, त्याचे हे दुष्ककृत्य समोर आल्याने महाराज या नावाला काळिमा फासण्याचे काम आरोपीने केलं आहे. आरोपी अनिल महाराज याची पार्श्वभूमी ही वादग्रस्तच असल्याचे बोलले जात असून थंड पेयाचे आमिष दाखवून त्याने अल्पवयीन मुलींसोबत केलेल्या कृत्याबद्दल रोष व्यक्त होत आहे. घटना घडून आठ दिवस झाले तरी आरोपी अद्याप फरार आहे आरोपीस तात्काळ अटक करण्याची मागणी होत आहे.

## मंगेशकर महाविद्यालयाच्या वतीने तगरखेडा येथे आरोग्य शिबिराचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३१ मार्च -**

तालुक्यातील औराद शहाजानी येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालय व लाईफ लाईन मल्टीस्पेशालिटी हॉस्पिटल यांच्या संयुक्त विद्यमाने शिक्षणमहर्षी कै. विश्वनाथराव वलांडे गुरुजी यांच्या जयंतीनिमित्त दि.१ एप्रिल रोजी सकाळी ८ ते दुपारी २ यावेळेत ग्रामपंचायत कार्यालय, तगरखेडा (ता. निलंगा) येथे आरोग्य शिबीराचे आयोजन करण्यात आले असून तगरखेडा व परिसरातील ग्रामस्थांनी मोठ्या संख्येत उपस्थित राहून आरोग्य शिबीराचा लाभ घ्यावा, असे आवाहन महाविद्यालय व हॉस्पिटल प्रशासनाकडून करण्यात आले आहे.



सदर आरोग्य शिबीरात डॉ. योगेश जाधव, लातूर (किडनी तज्ज्ञ), डॉ. किरण माने, लातूर (पोटविकार तज्ज्ञ), डॉ. श्रीधर अहंकारी, निलंगा (मधुमेह तज्ज्ञ), डॉ. सुनील साळुंके, निलंगा (ह्दयविकार तज्ज्ञ), डॉ. ज्ञानेश्वर कदम, औराद शहाजानी (बालरोग तज्ज्ञ), डॉ. सविता भारती प्राथमिक आरोग्य उपकेंद्र, तगरखेडा इत्यादींकडून आरोग्य तपासणी व सल्ला देण्यात येणार आहे. तसेच डॉ. श्रीधर अहंकारी, निलंगा यांचे व्याख्यान व मार्गदर्शन संपन्न होणार आहे.

महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. विजयकुमार पवार यांच्या मार्गदर्शनात समन्वय समितीसह सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी आरोग्य शिबीराच्या यशस्वीतेसाठी परिश्रम घेत आहेत.

## देशातील एकोप्यासाठी दुआ; निलंग्यात रमजान ईद उत्साहात साजरी

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३१ मार्च -**

निलंगा शहरासह तालुक्यात मुस्लिम बांधवांकडून रमजान ईद मोठ्या उत्साहात साजरी करण्यात आली. निलंगा शहरातील लातूर रोडवरील ईदगाह मैदान येथे हजारो मुस्लिम बांधवांनी सामुदायिक नमाज पठण केली. शहरासह संपूर्ण देशात सुख, शांती आणि एकोपा नांदो, अशी दुआ यावेळी करण्यात आली.

रमजान पर्वातील महिनाभराचे रोजा मुस्लिम बांधवांनी पूर्ण करत सोमवारी दि.३१ मार्च रोजी रमजान ईद साजरी केली. सकाळी साडे नऊच्या सुमारास शहरातील लातूर रोडवरील ईदगाह मैदानावर जामा मस्जिद चे शाही ईमान हाफिज महेबूब सहाब यांच्या नेतृत्वाखाली हजारो मुस्लिम बांधवांनी ईदची सामुदायिक नमाज पठण केली. त्यानंतर शहरासह संपूर्ण देशात सुख, शांती आणि एकोपा नांदो, अशी दुआ यावेळी करण्यात आली. नमाजची सांगता होताच मुस्लिम बांधवांनी एकमेकांची गळाभेट घेत ईद मुबारक म्हणत एकमेकांना शुभेच्छा दिल्या.



यावेळी माजी मंत्री आ. संभाजीराव पाटील निलंगेकर, उपविभागीय अधिकारी शरद झाडके, उपविभागीय पोलीस अधिकारी नितीन कटेकर, तहसीलदार प्रसाद कुलकर्णी, परिविक्षाधीन पोलीस उपाधीक्षक राजश्री तेरणी पाटील, शिवसेनेचे जेष्ठ नेते लिंबन महाराज रेशमे, जि.प.चे माजी अध्यक्ष पंडितराव धुमाळ, काँग्रेसचे प्रदेश सचिव अभय साळुंके, डॉ. सेलचे जिल्हाध्यक्ष डॉ. अरविंद भातांबरे यांच्यासह अनेक शासकीय अधिकारी कर्मचारी आणि विविध पक्ष संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी आदी मान्यवरांनी ईदगाह मैदानावर उपस्थित राहत मुस्लिम बांधवांना रमजान ईदच्या शुभेच्छा दिल्या.

## नागनाथेश्वर यात्रेनिम्मित टॅलेंट सर्च परीक्षेला विद्यार्थ्यांचे उदंड प्रतिसाद

### परिसरातून सहाशे पंचाहत्तर विध्यार्थी सहभागी

**तभा वृत्तसेवा**
**उस्तुरी, दि.३१ मार्च -**

तालुक्यातील उस्तुरी येथे दि.२९ मार्च रोजी ग्रामदैवत श्री नागनाथेश्वर यात्रेनिम्मित आयोजित टॅलेंट सर्च परीक्षसाठी परिसरातील सहाशे पंचा हत्तर विद्यार्थ्यांनी सहभाग नोंदवत अभूतपूर्व प्रतिसाद दिला.



उस्तुरी येथे ग्रामदैवत श्री नागनाथेश्वर मंदिर असून दरवर्षी गुढीपाढवा निम्मित विविध सामाजिक, धार्मिक कार्यक्रमांचे आयोजन केले जाते. गेल्या दोन वर्ष्यापासून गावातील व परिसरातील विध्यर्थ्याना शैक्षणिक विषयाची आवड निर्माण व्हावी या उद्देशाने नागनाथेश्वर टॅलेंट सर्च परीक्षा मंडळामार्फत टॅलेंट सर्च परीक्षा आयोजित केली जात आहे. यावर्षीही मंडळाने शनिवार दि.२९ मार्च रोजी सकाळी दहा वाजता येथील जि.प. शाळेत परीक्षेचे आयोजन केले होते. यावेळी उस्तुरी व परिसरातील विध्यार्थ्यांनी मोठी गर्दी केली होती. या परीक्षेसाठी उस्तुरी व परिसरातून एकूण सहाशे पंच्याहत्तर विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. या टॅलेंट परीक्षेस कासार सिरसीचे एपीआय राठोड यांनी भेट देत ग्रामीण भागात असे उपक्रम राबविण्यात येत असल्याबद्दल ग्रामस्थांचे कौतुक केले.

इयत्ता चौथी ते नववी पर्यंतच्या विद्यार्थ्यांचे तीन गटात विभागणी करून सकाळी दहा वाजता परीक्षा घेण्यात आले. शाळेतील अभ्यासक्रमानुसार घेतलेल्या या टॅलेंट सर्च परीक्षेत पन्नास प्रश्नाचा व शंभर मार्कचा पेपर घेण्यात आला. क्रांतिज्योती सवित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजनाने परीक्षेला सुरुवात झाली. या परीक्षेचा निकाल मंडळाकडून जाहीर करण्यात आले असून प्रत्येक विभागातून प्रथम, द्वितीय, तिसरा सोबत एक उत्तेजनार्थ बक्षीसासाठी विद्यार्थांची निवड करण्यात आली आहे.

सोमवार दि.३१ रोजी सकाळी अकरा वाजता या विद्यार्थ्यांना ट्रॉफी व बक्षीस वितरित करण्यात येणार आहे. या टॅलेंट सर्च परीक्षेसाठी गावातील शिक्षक, प्राध्यापक, शिक्षणप्रेमी युवक यांनी प्रिरश्रम घेतले.

## स्त्री हीच विश्वाची निर्माती आहे : आ. संजय बनसोडे



**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३१ मार्च -**

आई, पत्नी, मुलगी व बहीण अशा अनेक रूपात स्त्री आपल्या कुटुंबाला पुढे घेवुन जात असतात. पुरुषसत्ताक कुटुंब पद्धत असताना देखील आपल्या देशातील स्त्री देशाच्या विकासात मोठे योगदान देत आहे अशी ही स्त्री विश्वाची निर्मिती आहे असे मत माजी मंत्री आ. संजय बनसोडे यांनी केले.

ते उदगीर येथील लाल बहादुर शास्त्री विद्यालयात अनंत श्री विभूषित जगद्गुरु रामानंदाचार्य श्री स्वामी नरेंद्राचार्याजी महाराज यांच्या प्रेरणेने प्रेरित होवून, जगद्गुरु नरेंद्राचार्याजी महाराज भक्त सेवा मंडळाच्या वतीने आयोजीत गुढीपाडवा शोभायात्रेप्रसंगी बोलत होते. यावेळी सुरेश शिंदे, विजय देशपांडे, तुकाराम गुडले, श्रीदेवी पाटील, अनिल पुदाले, अंकुश आठाणे, सुरज क्षीरसागर, दत्ता मोटे, लासुने, बल्लाळनाथ शिंदे, कृष्णकांत कोंपले, बाळासाहेब पाटोदे, सुभाष चव्हाण, अमोल पांचाळ, भास्कर पाटील, अंतेश्वर पांचाळ, संगिता नागापल्ले, मंगल लासुणे, अरूणा वायगावकर, रेणुका पांचाळ, पद्मजा दिवाण, छबाबाई पांचाळ, शोभा नातेवार, छाया पुदाले, आदी उपस्थित होते.

पुढे बोलताना आ. संजय बनसोडे यांनी, मराठी नविन वर्षाच्या सर्वांना शुभेच्छा दिल्या व समाजात वावरत असताना आपल्या माता-भगिनींचा आदर ठेवुन आपण सर्वांनी समाजात वावरले पाहिजे. आपण स्त्रीचा सन्मान केला तरच आपली पुढची पिढी ही सन्मान करत असते असा विश्वास आ. बनसोडे यांनी व्यक्त केला. या शोभायात्रेत सकाळी ७ वाजल्यापासुन गुरु माऊलीच्या सानिध्यात भाविक तल्लीन होवून भाविक लेझीम पथक घेवुन गुढी उभारुन, तुलसी, कलश डोक्यावर घेवुन भाविक मोठ्या भक्ती भावाने या शोभायात्रेत सहभागी झाले होते.

यावेळी गुरु बंधु, गुरु भगिनी व जिल्हाभरातुन भाविक-भक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## विधिज्ञ संघाच्या निवडणूकीत सर्वसमावेशक समतावादी पॅनलचा विजय

### अध्यक्षपदी आनंद मुंढे तर उपाध्यक्षपदी गितानंद अक्कनगीरे

**तभा वृत्तसेवा**
**उदगीर, दि.३१ मार्च -**

उदगीर तालुका विधिज्ञ वकील संघाच्या पदाधिकारी निवड २०२५-२६ साठी २८ मार्च रोजी झालेल्या निवडणूकीत सर्वसमावेशक समतावादी पॅनलचा दनदतीत विजय झाला आसून तालुका विधिज्ञ संघाचे अध्यक्ष, उपाध्यक्ष व कोषाध्यक्ष आणि ग्रंथालय सचिव या पदावर उमेदवार बहुमताने निवडून आले आहेत. तर विधिज्ञ विकास पॅनला सचिव पदावर आपला शिक्कामोर्तब करता आला तर सहसचिव पदावर अपक्ष उमेदवाराने विजय खेचून आणला.

चुरशीच्या झालेल्या या अटीतटीच्या निवडणूकीत सर्वसमावेशक समतावादी पॅनलचे उदगीर विधिज्ञ संघाच्या अध्यक्षपदी ॲड. आनंद पंढरीनाथ मुंढे तर उपाध्यक्षपदी ॲड. गितानंद गोविंदराव अक्कनगिरे हे निवडून आले आहेत.




विजयी उमेदवार पुढील पुढील प्रमाणे.

विजयी उमेदवार ॲड. आनंद मुंढे (अध्यक्ष), ॲड. गितानंद अक्कनगिरे (उपाध्यक्ष), ॲड. चंद्रशेखर भोसले (सचिव), ॲड. शरदचंद्र पाटील (सहसचिव), ॲड. विजयकुमार पाटील माने (कोषाध्यक्ष), ॲड. अमोल कळसे (ग्रंथालय सचिव) या उमेदवारांनी दणदणीत विजय मिळविला.

तर तत्पूर्वीच ॲड. संतोषीमाता सुर्यवंशी (महिला उपाध्यक्षपदी), ॲड. अश्लेषा बिरादार (महिला सहसचिव), ॲड. वर्षा पंकज कांबळे (महिला प्रतिनिधी) हे बिनविरोध निवडून आले आहेत.

यावेळी निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ॲड. महेश माशाळकर यांनी काम पाहीले तर सहाय्यक म्हणून ॲड. संदीप भांगे यांनी सहकार्य केले. विजयी उमेदवारांचा सत्कार जेष्ठ विधिज्ञ ॲड.एस.टी. पाटील, ॲड. भरत गुंडरे, ॲड. बालाजी पाटील, ॲड. बाळासाहेब नवटक्के, ॲड. तानाजी केंद्रे, ॲड. सोपनराव धोंड, ॲड. तोबरे, ॲड.बी.एन. बोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत सत्कार करण्यात आला.

## डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव समिती कार्यकारिणी जाहीर

**तभा वृत्तसेवा**
**निलंगा, दि.३१ मार्च -**

येथील शासकीय विश्रामगृहात डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती महोत्सव समिती गठीत करण्यात आली. यात सर्वानुमते अध्यक्षपदी धम्मानंद काळे तर कार्याध्यक्षपदी रामलिंग पटसाळगे यांची निवड करण्यात आली.

या समिती उपाध्यक्षपदी दिगंबर सूर्यवंशी, वाल्मीक चव्हाण, देवदत्त सूर्यवंशी, संदीप बनसोडे, कोषाध्यक्षपदी संजय सोनकांबळे, सहकोषाध्यक्ष निलेश गायकवाड, सचिवपदी गोविंद सूर्यवंशी, सह सचिव अमोल सोनकांबळे, प्रसिद्धीप्रमुख पदी मिलिंद कांबळे, सोशल मीडिया प्रमुखपदी दयानंद कांबळे, सल्लागार प्रकाश गायकवाड संघटकपदी दत्ता सूर्यवंशी चिचोंडिकर, कायदेविषयक सल्लागार ॲड. सुशील सोमवंशी इत्यादींची सर्वानुमते निवड करण्यात आली.

या समितीतउध्दव मेकाले, राजू कांबळे, दीपक चोपणे, मजीब सौदागर, दत्ता शिंदे, सुमित गायकवाड, करण कांबळे, आश्विन सूर्यवंशी, आशिष पराग, आशिष सोनकांबळे, समर्थ देशमुख, श्रीनिवास शिंदे, प्रवीण कांबळे, सचिन सुरवसे, बालाजी कांबळे, विजय पाटील, उत्तम माने, विश्वनाथ शिंदे, विरेंद्र काळे, राहुल मोरे, सुधीर पटसाळगे, दत्ता सूर्यवंशी माळेगावकर, अतिश काळे, इत्यादींचा सक्रिय सहभाग आहे.